मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषद

नियतकालिक

(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

भारतीय फाल्गुन-चैत्र-वैशाख शके १९४६

एप्रिल - मे - जून २०२४/खंड ४८, अंक १

## 'अर्थसंवाद'च्या लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. लेखकांनी आपले शोधनिबंध Shree Lipi (२३३५) किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Pagemaker किंवा Ms Word मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही Font वापरू नये.

२ **संशोधनपर लेखाची प्रत अथवा सीडी पोस्टाद्वारे पाठवू नये.** काही अडचण असल्यास संपादकांशी संपर्क साधावा.

३. **संशोधनपर लेखाची एक सॉफ्ट कॉपी (एक मूळ फाईल व त्याचीच PDF केलेली फाईल अशा दोन फाईल्स्) ई-मेल द्वारे प्रमुख संपादकांकडे rahulmhopare@rediffmail.com या ई-मेल ॲड्रेसवर पाठवावी.** लेखासोबत संपादकांना लेख पाठवल्याची स्वाक्षरी केलेली कव्हर नोट स्कॅन करून पाठवावी. तसेच ई-मेल केल्यानंतर संपादकांशी भ्रमणध्वनीवर (९९२३८७९०२०) संपर्क साधून आपला ई-मेल व्यवस्थित पोचल्याची खात्री करून घ्यावी.

४. संशोधनपर लेख पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल लिहिणे आवश्यक आहे.

५. लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.

६. संशोधनपर लेख खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखात गरजेनुरूप सांख्यिकीय तक्ते व आलेखांचा वापर केल्यास उत्तम. लेखांची गुणवत्ता पाहून तज्ज्ञ परिक्षकांनी केलेल्या सर्व सूचनांची पूर्तता केल्यानंतरच त्याची प्रसिद्धीसाठी निवड केली जाईल.

७. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा उपयोग करावा. संपादकांना पाठवलेल्या कव्हर नोटसह लेखनाची एक प्रत स्वत जयळ अवश्य ठेवावी.

८. लेखकांनी कृपया संशोधनपर लेख टाईप केल्यानंतर सर्व सांख्यिकी माहिती, शुद्धलेखन आणि व्याकरण अचूक तपासून नंतरच अंतिम प्रत पाठवावी.

९. संदर्भ सूची देताना पूढील पद्धतीने देणे आवश्यक आहे : उदा. पाटील, ज.फा., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, २०१०, (पृष्ठ क्रमांक असेल तर द्यावा.)

## अधिवेशनासाठी शोधनिबंध पाठविण्यासंबंधी सूचना

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४७ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन नोव्हेंबर २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे होत आहे. शोधनिबंधासाठीची शब्दमर्यादा २००० व सोबत ३०० ते ४०० शब्दांत गोषवारा अत्यावश्यक आहे. शोधनिबंध मराठीतच असणे आवश्यक असून यापूर्वी तो इतरत्र प्रकाशित झालेला नसावा. शोधनिबंधावर आपला आजीव सदस्य क्रमांक ,भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल, महाविद्यालयाचे नाव व पत्ता इत्यादी तपशील मराठीत देणे आवश्यक आहे. शोधनिबंधाच्या दोन प्रतीत हार्ड कॉपी मा. अध्यक्षांच्या पत्त्यांवर पाठवून आपला शोधनिबंध त्यांना (dranilwavare@gmail.com, maparishad1977@gmail.com) मेल करावा. शोधनिबंध २० ऑक्टोबर २०२४ पर्यंत मा. अध्यक्ष मराठी अर्थशास्त्र परिषद यांना पोहचतील या बेताने पाठवावेत.

शोधनिबंधासाठी विषय

१. २०१५ पासूनच्या अर्थशास्त्रातील नोबेल स्मृती पारितोषिक प्राप्त अर्थतज्ज्ञांचे आर्थिक विचार.

२. भारताच्या वित्तीय क्षेत्राच्या बदलत्या आकृतीबंधाचा अभ्यास.

३. महाराष्ट्रातील शैक्षणिक व आरोग्यविषयक धोरणांचा आर्थिक अभ्यास.

**पत्रव्यवहारासाठी पत्ता**

**प्रा. डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे,**

प्राध्यापक, अर्थशास्त्र विभागप्रमुख, छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा.४१५००१

मो. ९८५०११७२२६ ई-मेल : dranilwavare@gmail.com, maparishad1977@gmail.com

**- डॉ. मारोती तेगमपुरे**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।
www.marthpari.org
(स्थापना वर्ष - १९७७)

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

# अर्थसंवाद

(यु.जी.सी. केअर लिस्ट (ग्रुप१) समावेशीत तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक)

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

एप्रिल-मे-जून २०२४ / खंड ४८ / अंक १

**प्रमुख संपादक**
राहुल शं. म्होपरे
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

**सहाय्यक संपादक**
चंद्रकांत जाधव
(य.च.वारणा महाविद्यालय, वारणानगर)

**सल्लागार मंडळ**
(२०२२-२५)
संतोष दास्ताने
मुक्ता जहागिरदार
के. के. पाटील
एस. एम. भोसले

**संपादकीय पत्रव्यवहार**
राहुल शं. म्होपरे
'सर' निवास, री.स.नं. ३३/क/२,
प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी,
दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे,
उजळाईवाडी, ता. करवीर,
जि. कोल्हापूर - ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**लेखातील मते लेखकांचीच**

## अ नु क्र म णि का

१. **देशमुख एम. एस., पाटील व्ही. डी.**
संस्थात्मक वित्तपुरवठ्याचे सांगली जिल्ह्याच्या शेतीविकासातील योगदान ........ ३

२. **भिमराव पांडुरंग उगले, आबासाहेब श्रीरंग हांगे**
भारतातील बेरोजगारीचे सिंहावलोकन व चिकित्सा ........ ११

३. **सुभाष पाटील**
भरडधान्याचे आर्थिक अध्ययन : भारताच्या संदर्भात ........ २०

४. **अजय देरेकर**
पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास ........ ३१

५. **सुनिता जाधव**
कृषी कायदे २०२० रद्द करण्याचा निर्णय आणि त्याचा भारतीय कृषी विपणन सुधारणांवर होणारा परिणाम ........ ४४

६. **संतोष दास्ताने**
अर्थक्षेत्रातील महिलांचे योगदान ........ ५६

७. **कारभारी भालचंद्र काशिनाथ**
बिमारू राज्यांचा बहुआयामी गरिबी निर्देशांकाच्या अनुषंगाने सामाजिक, आर्थिक प्रगतीचा तुलनात्मक आढावा ........ ६४

८. **शेडगे दत्तात्रय भगवानराव**
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार धोरणाबाबतचे विचार ... ७५

९. **राहुल शं. म्होपरे**
भारत : माहिती तंत्रज्ञान आणि ग्रामीण विकास ........ ८५

१०. **प्रशांत हरमकर** : शोधनिबंध विषयक रूपरेषा
२०१५ पासूनच्या अर्थशास्त्रातील नोबेल स्मृती पारितोषिक प्राप्त अर्थतज्ज्ञांचे आर्थिक विचार ........ ९२

११. **सुभाष सावंत** : शोधनिबंध विषयक रूपरेषा
महाराष्ट्रातील शैक्षणिक व आरोग्यविषयक धोरणांचा आर्थिक अभ्यास ........ ९६

१२. **माधव एच. शिंदे** : शोधनिबंध विषयक रूपरेषा
भारतातील वित्तीय क्षेत्राच्या बदलत्या आकृतीबंधाचा अभ्यास ........ ९९

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## कार्यकारी मंडळ २०२४-२५

- **अध्यक्ष**

  **अनिलकुमार कृ. वावरे (सातारा)**

- **कार्याध्यक्ष**

  **अविनाश रा. निकम (शहादा)**

- **कार्यवाह खजिनदार**

  **मारोती वि. तेगमपुरे (अंबड)**

- **प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

  **राहुल शं. म्होपरे (कोल्हापूर)**

- **विश्वस्त**

  **विकास सुकाळे (नांदेड)**
  **विठ्ठल घीणमीने (हिंगणघाट)**
  **धोंडीराम पवार (पुणे)**

- **सदस्य**

  **संजय धनवटे (कारंजा)**
  **विजय भोपाळे (नांदेड)**
  **सुरेश घुमटकर (बीड)**
  **जयवंत इंगळे (मलकापूर)**
  **बाळासाहेब पाटील (पनवेल)**
  **सुभाष सावंत (नाशिक)**
  **राजाराम पाटील (सोलापूर)**
  **जितेंद्र तलवारे (धुळे)**
  **विठ्ठल ठावरी (भिसी)**
  **राजू शिंदे (धुळे)**
  **हनुमंत भोसले (खामगाव)**

- **स्वीकृत सदस्य**

  **अजय दरेकर (बारामती)**
  **संजय धोंडे (मेढा)**

- **स्थानिक कार्यवाह**

  **बालाजी घुटे (लातूर)**



**कार्यालयीन पत्रव्यवहार:**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक : **मारोती वि. तेगमपुरे**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
'संगाई', घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना.
पिन - ४३१ २०४ भ्रमणध्वनी : ९४२३९९३१३७

**अर्थसंवाद वर्गणी :**

- **परिषदेचे सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| आजीव सदस्य | : रु. ३०००/- | (एकरकमी) |
| इमारत निधी | : रु. २०००/- | |
| सदस्य सूची | : रु. १००/- | |
| एकूण | : रु. ५१००/- | |

- **संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:**

  शैक्षणिक संस्था, व्यावसायिक संस्था, ग्रंथालये } रु.२०००/-(त्रैवार्षिक), रु.३०००/-(पंचवार्षिक)

- **वर्षगणना :** १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्ट किंवा NEFT (BOI खाते क्र. 094720110000368, IFSC - BKID0000947, राजारामपुरी, कोल्हापूर) द्वारे प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.

**'अर्थसंवाद'साठी अनुदानाबद्दल आभार:**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

टीप : म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

हे त्रैमासिक, प्रकाशक मारोती वि. तेगमपुरे (प्रमुख संपादक राहुल शं. म्होपरे) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड - ४३१ २०४ येथे प्रसिद्ध केले.

# संस्थात्मक वित्तपुरवठ्याचे सांगली जिल्ह्याच्या शेतीविकासातील योगदान

**देशमुख एम. एस.**†
**पाटील व्ही. डी.** ††

**प्रस्तावना :**

सावकार व सराफी पेढी यांच्याद्वारे होणाऱ्या शेती वित्तपुरवठ्यातील त्रुटीवरती उपाय म्हणून शेतीसाठी संस्थात्मक वित्तपुरवठ्याचा विस्तार व विकास झाला. शेतीच्या समस्या, शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा व शेतकऱ्यांच्या आत्महत्या, संस्थात्मक वित्तपुरवठा या संदर्भात विविध शोधनिबंधांचा अभ्यास केला असता, जिल्हा पातळीवरील वित्तपुरवठ्याची स्थिती, प्रवाह व कल याचा अभ्यास दिसून येत नसल्याने प्रस्तुत शोधनिबंधामध्ये, जिल्ह्यातील अग्रणी बँकेच्या २०१०-११ ते २०२०-२१ या कालावधीतील अहवालाचा आधार घेऊन संस्थात्मक वित्तपुरवठ्याची स्थिती, प्रवाह व कल अभ्यासला आहे. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा व शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा अलीकडच्या काळातील एक ज्वलंत प्रश्न होऊन बसला आहे. शेतीविकासासाठी केला जाणारा कर्जपुरवठा हा त्याला जबाबदार आहे, असा तर्क आपण करत असतो. त्यामागे ग्रामीण भागातील शेतीसाठी कर्जपुरवठा करणारी परंपरागत चालत आलेली सावकारकीची पद्धत ही त्याला जबाबदार असल्याचेही आपण कारण देतो. रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेनंतर रिझर्व्ह बँकेने ग्रामीण भागातील शेतीच्या विकासासाठी कर्जपुरवठा करण्यासाठी वेगळी यंत्रणा निर्माण केली होती. परंतु १९५१ च्या अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहाणी समितीच्या निष्कर्षाद्वारे पहिल्यांदा शेतीला कर्जपुरवठा करण्याच्या एका उद्देशाने इम्पेरियल बँकेचे राष्ट्रीयकरण करून त्याचे रूपांतर स्टेट बँकेमध्ये करण्यात आले. त्याचबरोबर ग्रामीण भागातील वित्तपुरवठ्याचे प्रश्न सोडवण्यासाठी बँकांच्यावरती सामाजिक नियंत्रणे आणली. एवढेच नव्हे, तर १९ जुलै १९६९ रोजी १४ मोठ्या व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. याद्वारे शेतीला संस्थात्मक वित्तपुरवठा करणारी रचना निर्माण करण्यात आली. याशिवाय स्वातंत्र्यापूर्वी १९०४ च्या कायद्याने या देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये शेतीला वित्तपुरवठा करण्यासाठी सहकारी तत्त्वावर ती प्राथमिक पतपुरवठा संस्थांची निर्मिती झालेलीच होती. त्याचबरोबर

† प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आजीव सभासद क्र. ११००, भ्रमणध्वनी : ९८६९२७६२६५, ई-मेल : msd_eco@unishivaji.ac.in
†† सहाय्यक प्राध्यापक, व्यवसायिक अर्थशास्त्र विभाग, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा.
आजीव सभासद क्र. १६६२, भ्रमणध्वनी : ९८५०८४९३८३, ई-मेल : vijaypatil1581@gmail.com

सहकाराच्या चळवळीमध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, राज्य सहकारी बँका इत्यादी संस्थात्मक व्यवस्था शेतीला कर्जपुरवठा करण्यासाठी उपलब्ध होत्या. १९७५ नंतर ग्रामीण भागाच्या विकासासाठी प्रादेशिक ग्रामीण बँकांची स्थापना करण्यात आली. १९८२ ला राष्ट्रीय ग्रामीण विकास बँक स्थापन झाली. ग्रामीण भागाच्या वित्तपुरवठ्याचा प्रश्न सोडवण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण विकास बँकेने (नाबार्डने) १९९७ किसान क्रेडिट कार्ड हे एक नावीन्यपूर्ण उत्पादन पुढे आणले व शेतीला कर्जपुरवठा करण्यासाठी योजना आखली. खऱ्या अर्थाने शेतीचा कर्जपुरवठा करणाऱ्या रचनेमध्ये सहकारी संस्थांच्याबरोबर सार्वजनिक क्षेत्रातील बँका, नाबार्ड, खाजगी क्षेत्रातील बँका व सहकारी क्षेत्रातील बँका असा एकात्मिक वित्तपुरवठ्याच्याद्वारे शेतीला कर्जपुरवठा करण्याचे धोरण आखले गेले.

शेती हे भारतीय अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. वित्तपुरवठा हा शेतीविकासासाठी एक महत्त्वपूर्ण आदान म्हणून ओळखण्यात येते. शेतीविकासासाठी इतरही आदानांची भूमिका महत्त्वपूर्ण असते. जसे की, बियाणे, खते, अवजारे इत्यादी आदाने शेतीविकासामध्ये उपयोगात येतात, यात कोणतीही शंका नाही. परंतु योग्य प्रमाणात व वेळेवर उपलब्ध होणारा वित्तपुरवठा हा देखील शेतीविकासामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो. शेती वित्तपुरवठा १९९० पर्यंत शेतीविकासासाठी खूप महत्त्वपूर्ण होता. १९९० नंतर व पुन्हा २००८ मध्ये पहिल्यांदा मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात आल्याने नंतरच्या काळात काही राज्यांपूर्ती मर्यादित २०१५ व २०१७ या वर्षात कर्जमाफी करण्यात आल्याने असे असताना देखील शेतीच्या समस्या व शेतकऱ्यांच्या आत्महत्या यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते (सागवान,२०१५). भारताने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे उद्दिष्ट ठेवून देखील शेतकऱ्यांच्या व शेतीच्या समस्या हा शेतीवर आधारित अर्थव्यवस्थेमध्ये एक ज्वलंत प्रश्न बनत आहे. भारतामध्ये सर्वसाधारणपणे प्रत्येकी ३० मिनिटाला सरासरी एका शेतकऱ्याची आत्महत्या होताना दिसते (साईनाथ, २००८). याची मुख्य कारणे म्हणजे कर्जबाजारीपणा, वित्तपुरवठा रचनेमधील त्रुटी, कर्जदाराप्रति समाजाचा दृष्टिकोन इत्यादी आहेत. उच्च प्रमाणात असलेले शेतीचे प्रश्न आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा केवळ शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणामुळे होणारा परिणाम नसून यासाठी अनेक कारणे जबाबदार आहेत (तळुले,२०१३). भारतीय शेतकऱ्यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात असलेल्या कर्जबाजारीपणाला शेतीमध्ये केली जाणारी अपुरी गुंतवणूक हे कारण जबाबदार आहे (पाटील बी.,२००८). शेतीसाठी केल्या जाणाऱ्या परंपरागत वित्तपुरवठ्याच्या रचनेनुसार मोठ्या प्रमाणात व्याजदर सावकारांच्याकडून आकारले जातात. सावकार लोक प्रामुख्याने शेतकऱ्यांची पिळवणूक करतात. या सर्व परिस्थितीतून शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठी संस्थात्मक वित्तपुरवठ्याची गरज खूप असते (आलेक्सपांडी आणि रमेश कुमार,२०१४). शेतीचे अलीकडच्या काळातील स्वरूप बदलत असेल तर सबळ आणि योग्य अशा शेतीला वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थांची गरज आहे (मोहन आर.,२००६). किसान क्रेडिट कार्डमुळे महाराष्ट्रातील सिंचित प्रदेशांमध्ये असलेल्या लहान व सीमांत शेतकऱ्यांना खूप फायदा झाला आहे (पाटील ए.के.,२०२१). एका संशोधन निबंधानुसार शेती आणि जमीन धारणेचा शेती वित्तपुरवठ्याच्या क्षमतेवरती परिणाम होतो (मोरया एस.के. आणि विश्वकर्मा,२०२१). एका संशोधनामध्ये फक्त भारतातील शेती वित्तपुरवठ्याचा इतिहास अभ्यासला आहे (निशा भारती,२०१८). वेगवेगळ्या संशोधकांनी अशा पद्धतीने संशोधन निबंध लिहिले असले, तरी सर्व बाजूंनी सारंभूत विचार करणारा जिल्हापातळीवरचा कोणताही शोधनिबंध दिसून येत

नसल्याने उपरोक्त उल्लेख केलेल्या शोधनिबंधामध्ये संशोधन गाळा निर्माण होत असल्याने शेतीला वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थात्मक वित्तपुरवठ्याची स्थिती, प्रवाह व कल अभ्यास करणे व संस्थात्मक शेती वित्तपुरवठ्याचे शेतीविकासातील योगदान ही या शोधनिबंध अभ्यासाची उद्दिष्ट्ये धरून शोधनिबंध मांडला आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम माहिती साधनांचा आधार घेतला आहे. दुय्यम साधनसामग्रीसाठी बँक ऑफ इंडिया या सांगली जिल्ह्यातील अग्रणी बँकेच्या २०१०-११ ते २०२०-२१ या कालावधीतील अहवालांचा आधार घेतला आहे. दुय्यम आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी टक्केवारी, चक्रवाढ वाढीचा दर (CGR), विचरणाचा गुणांक (CV), प्रतिगमन प्रतिमान इत्यादी साधनांचा उपयोग केला आहे.

**निष्कर्ष आणि चर्चा:**

सांगली जिल्ह्यामध्ये सहकारी वित्तपुरवठा संस्थांचा उगम संस्थानिक काळात झालेला दिसून येतो. सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना २८ मार्च,१९२७ रोजी तत्कालीन संस्थानचे राजेसाहेब श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांच्या प्रयत्नाने सुरुवातीच्या पाच हजार रुपयेच्या भाग-भांडवलातून तसेच या बँकेचे उत्तम व कार्यक्षम व्यवस्थापक कै.नानासाहेब जोशी व कै. माधवराव भिडे यांच्यासारख्या अर्थव्यवहारांमध्ये चाणाक्ष असलेल्या व्यक्तींच्याद्वारे झालेली आहे. आज मिथिला सांगली जिल्ह्यामध्ये वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थांच्या एकूण ३१० शाखा ग्रामीण भागामध्ये आहेत. तसेच १११ शाखा निमशहरी भागामध्ये आहेत. तसेच ८२ शाखा शहरी भागामध्ये आहेत. त्याचबरोबर शेतीला वित्तपुरवठा करण्यासाठी परंपरागत चालत आलेली सावकार व सराफी पेढीवाले ही पद्धत देखील सुरू आहे. सांगली जिल्ह्यामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील व्यापारी बँकांच्या, खाजगी क्षेत्रातील व्यापारी बँकांच्या, सहकारी संस्थांच्या व बँकांच्या प्रादेशिक ग्रामीण बँकांच्याद्वारे शेती वित्तपुरवठा करण्यात येतो.

**सांगली जिल्ह्यातील संस्थात्मक वित्तपुरवठ्यातील स्थिती :** तक्ता क्र. १ च्या आधारे सांगली जिल्ह्यातील संस्थात्मक वित्तपुरवठ्यातील स्थिती लक्षात येते.

तक्त्याच्या आधारे हे समजून येते की, सांगली जिल्ह्यामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील एकूण १२ व्यापारी बँकांचा समावेश होतो. या १२ व्यापारी बँकांपैकी शेतीसाठी कर्जपुरवठा मोठ्या प्रमाणात करणाऱ्या प्रमुख ०५ व्यापारी बँका आहेत. यामध्ये बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्रा, युनियन बँक व बँक ऑफ बडोदा या ०५ मुख्य बँकांचा समावेश होतो. बँक ऑफ इंडिया ही सांगली जिल्ह्यातील प्रमुख अग्रणी बँक आहे. सन २०१०-११ या वर्षांमध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी शेतीक्षेत्राला केल्या जाणाऱ्या एकूण वित्तपुरवठ्यापैकी ४०.१५ % एवढा कर्जपुरवठा केला होता. सन २०२०-२१ या वर्षामध्ये शेतीक्षेत्राला केल्या जाणाऱ्या एकूण वित्तपुरवठ्यापैकी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी जवळजवळ ३५.६१% एवढा कर्जपुरवठा शेतीसाठी केला होता.

सांगली जिल्ह्यामध्ये खाजगी क्षेत्रातील व्यापारी बँकांच्याद्वारेदेखील शेतीला वित्तपुरवठा होतो. यामध्ये प्रमुख ०७ व्यापारी बँकांचा समावेश होतो. आयसीआयसीआय बँक, रत्नाकर बँक, कर्नाटका बँक, आयडीबीआय बँक, फेडरल बँक, ॲक्सिस बँक, एच.डी.एफ.सी. बँक या खाजगी क्षेत्रातील व्यापारी बँका शेतीसाठी वित्तपुरवठा करत असल्याचे दिसून येते. यामध्ये प्रामुख्याने आय.सी.आय.सी.आय. या बँकेने आत्तापर्यंत सर्वात जास्त शेती वित्तपुरवठा केलेला आहे. सन २०१०-११ या वर्षांमध्ये खाजगी क्षेत्रातील

**तक्ता क्र. ०१: सांगली जिल्ह्यातील संस्थात्मक वित्तपुरवठ्यातील स्थिती**

| अ. क्र. | | सार्व-जनिक क्षेत्रातील बँका | YoY वाढ (%) | खाजगी क्षेत्रातील बँका | YoY वाढ (%) | सहकारी बँका | YoY वाढ (%) | प्रादेशिक ग्रामीण बँका | YoY वाढ (%) | एकूण कृषी वित्तपुरवठा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०१०-११ | ४२२६३ (४०.१५) | | १६२६९ (१५.४६) | | ४६७१२ (४४.३८) | | ८ (0.0१) | | १०५२५२ (१००) |
| २ | २०११-१२ | ८४०२७ (५०.५३) | ९८.८२ | २१४१२ (१२.८७) | ३१.३१ | ६०७७५ (३६.५४) | ३०.११ | ९३ (0.00६) | १०६२.५ | १६६३०७ (१००) |
| ३ | २०१२-१३ | १०३६२७ (५३.९६) | २३.३३ | ३२५६४ (१६.९६) | ५२.०८ | ५५६६४ (२८.९९) | -८.४१ | १८३ (0.१०) | ९६.७७ | १९२०३८ (१००) |
| ४ | २०१३-१४ | ७७७२० (४०.४) | -२५.00 | ४२९४३ (२२.३४) | ३१.८७ | ७१३६२ (३७.१२) | २८.२० | २१२ (0.११) | १५.८५ | १९२२३७ (१००) |
| ५ | २०१४-१५ | ९४०६९ (४८.0१) | २१.0४ | २९४२९ (१५.0२) | -३१.४७ | ७२१६६ (३६.८३) | १.१३ | २५५ (0.१३) | २०.२८ | १९५९१९ (१००) |
| ६ | २०१५-१६ | १२६७९६ (४७.७४) | ३४.७९ | ५७२०५ (२१.५४) | ९४.३८ | ८१३४६ (३०.६३) | १२.७२ | २५३ (0.१०) | -0.७८ | २६५६00 (१००) |
| ७ | २०१६-१७ | १४९३३८ (४५.१६) | १७.७८ | ६९२८५ (२०.९५) | २१.१२ | १११७६२ (३३.८०) | ३७.४१ | २८० (0.0८) | १०.६७ | ३३०६६५ (१००) |
| ८ | २०१७-१८ | ९६३०८ (३८.८०) | -३५.५१ | ६०६६९ (२४.४४) | -१२.४४ | ९११२६ (३६.७१) | -१८.४६ | १२२ (0.0५) | -५६.४३ | २४८२२५ (१००) |
| ९ | २०१८-१९ | ९९४५६ (२६.३८) | ३.२७ | ९२२३० (२४.६४) | ५२.0२ | १८५१९५ (४९.१२) | १०३.२ | १३० (0.0३) | ६.५६ | ३७७०११ (१००) |
| १० | २०१९-२० | ८५८५७ (३५.२८) | -१३.६७ | ७०५५७ (२८.९९) | -२३.५० | ८६९०१ (३५.७१) | -५३.0८ | ३८ (0.0२) | -७०.७७ | २४३३५३ (१००) |
| ११ | २०२०-२१ | १०९६६१ (३५.६१) | २७.७३ | ७२४०७ (२३.५१) | २.६२ | १२५४८५ (४०.७५) | ४४.४० | ३९५ (0.१३) | ९३९.४७ | ३०७९४८ (१००) |
| | एकूण | १०६९११२२ (४०.७४) | | ५६४९७० (२५.३१) | | ९८८४९४ (३७.६६) | | १९६९ (0.00८) | | २६२४५५५ (१००) |
| | चक्रवाढ वाढीचा दर (CGR) | ५.२४ | | १६.६१ | | १०.४२ | | १३.४५ | | ९.४७ |
| | SD | २७९९८ | | २४४०८ | | ३९३१० | | ११५ | | ७९०१५ |
| | विचरणाचा गुणांक (CV) | २८.१९ | | ४७.५२ | | ४३.७४ | | ६४.0३ | | ३३.१२ |

स्त्रोत : सांगली जिल्ह्याचे प्रमुख बँक अहवाल (२०१०-११ ते २०२०-२१).

टीप: कंसातील आकडे एकूण टक्केवारी दर्शवतात.

वित्तीय संस्थांनी वा बँकांनी १५.४६% एवढा वित्तपुरवठा शेतीसाठी केला होता. सन २०२०-२१ या वर्षामध्ये खाजगी क्षेत्रातील बँकांनी जवळजवळ २३.५१% एवढा कर्जपुरवठा शेतीसाठी केला होता.

सांगली जिल्ह्यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने तसेच राज्य सहकारी बँकेच्या शाखांनी मोठ्या प्रमाणावरती शेतीसाठी वित्तपुरवठा केला असल्याचे दिसून येते. २०१०-११ या वर्षामध्ये या वित्तपुरवठ्याची रक्कम रुपये ४६,७१२ लाख इतकी होती. यामध्ये वाढ होऊन २०१८-१९ साली या रकमेचा आकडा १८५१९५ लाख इतका झाला. सहकारी संस्थांच्याद्वारे शेतीला केल्या जाणाऱ्या वित्तपुरवठ्यामध्ये सातत्याने वाढ होत असलेली दिसून येते. कारण सहकारी संस्थांच्या अनेक शाखा ग्रामीण भागामध्ये स्थापन झालेल्या आहेत. शिवाय त्या शेतकऱ्यांशी अत्यंत जवळीक आहेत. सन २०१०-११ या वर्षांमध्ये सहकारी क्षेत्रातील बँकांनी ४४.३८% एवढा वित्तपुरवठा शेतीसाठी केला होता. सन २०२०-२१ या वर्षामध्ये सहकारी बँकांनी सुमारे ४०.७५% एवढा कर्जपुरवठा शेतीसाठी केला होता.

सांगली जिल्ह्यामध्ये प्रादेशिक ग्रामीण बँकांच्या एकूण ०४ शाखा आहेत. या शाखांची संख्या कमी असली तरी शेतीसाठी कर्जपुरवठा त्या करत असल्याचे दिसून येते. प्रादेशिक ग्रामीण बँकेचे नाव विदर्भ-कोकण ग्रामीण बँक असे आहे. प्रादेशिक ग्रामीण बँकांची सुरुवात समाजातील गरजू शेतकऱ्यांच्या व व्यक्तींच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी व ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी झालेली असल्याने याही बँका शेती वित्तपुरवठ्यामध्ये आपली भूमिका बजावत असल्याचे दिसून येते. २०१०-११ यावर्षी विदर्भ-कोकण या ग्रामीण बँकेने सांगली जिल्ह्यामध्ये शेतीसाठी फक्त ०८ लाख रुपये एवढ्या रकमेचा कर्जपुरवठा केला असल्याचे दिसून येते. यामध्ये वाढ होऊन २०२०-२१ या वर्षामध्ये ३९५ लाख इतक्या रकमेचा वित्तपुरवठा केल्याचे दिसते. सन २०१०-११ या वर्षामध्ये प्रादेशिक ग्रामीण बँकांचा सहभाग अत्यल्प होता. तो फक्त ०.०१% एवढाच होता. सन २०२०-२१ या वर्षामध्ये प्रादेशिक ग्रामीण बँकांचा विचार करता तो ०.१३% एवढा वाढलेला दिसून येतो.

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या कर्जपुरवठ्याचा वार्षिक चक्रवाढ वाढीचा दर (CGR) ५.२४% तर विचरणाचा गुणांक (CV) हा २८.१९% असलेला दिसून येतो. तसेच खाजगी क्षेत्रातील बँकांनी केलेल्या वित्तपुरवठ्याचा वार्षिक चक्रवाढ वाढीचा दर १६.६१% तर विचरणाचा गुणांक ४७.५२% असलेला दिसून येतो. सहकारी क्षेत्रातील बँकांनी केलेल्या वित्तपुरवठ्याच्या वार्षिक चक्रवाढ वाढीचा दर हा १०.४२% तर विचरणाचा गुणांक ४३.७४% असलेला दिसून येतो. यावरून आपल्याला असे म्हणता येते की, खाजगी क्षेत्रातील बँकांनी केलेल्या वित्तपुरवठ्याच्या विचरणाचा दर (CV) हा सहकारी क्षेत्रातील बँकांनी केलेल्या व सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी केलेल्या वित्तपुरवठ्याच्या विचरणाच्या दरापेक्षा निश्चितपणे जास्त आहे. शेतीक्षेत्राला केल्या जाणाऱ्या वित्तपुरवठ्यामध्ये प्रादेशिक ग्रामीण बँकेचा अत्यल्प सहभाग आहे, याचे कारण म्हणजे सांगली जिल्ह्यामध्ये प्रादेशिक ग्रामीण बँकांच्या फक्त ०४ शाखा आहेत. खाजगी क्षेत्रातील बँका व वित्तीय संस्था प्रामुख्याने सिंचनाच्या सुविधा उपलब्ध असलेल्याच ठिकाणी अधिक कर्जपुरवठा करीत असल्याचे दिसून आले. सांगली जिल्ह्यामध्ये सहकारी संस्थांनी शेतीसाठी केलेल्या वित्तपुरवठ्याचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून आले. याचे कारण सहकारी संस्थांच्या शाखांचे जाळे सर्वत्र ग्रामीण भागामध्ये शेतकऱ्यांच्यापर्यंत पोहोचलेले आहे.

**सांगली जिल्ह्यातील संस्थात्मक वित्तपुरवठ्यातील वाढीचा कल आणि वाढ**

सांगली जिल्ह्यातील संस्थात्मक वित्तपुरवठ्यातील

वाढीचा कल आणि संस्थात्मक वित्तपुरवठ्यातील वाढ तक्ता क्र. २ मध्ये दाखविली आहे.

सांगली जिल्ह्यातील संस्थात्मक वित्तपुरवठ्यातील वाढीचा कल आपल्याला साध्या प्रतिगमन प्रतिमानाच्या आधारे तसेच लॉग प्रतिगमन प्रतिमानाच्याआधारे व्यक्त करता येतो. या दोन्ही प्रतिगमन प्रतिमानाचा उपयोग केला आहे. कारण वर्षनिहाय वित्तपुरवठ्यातील वाढीचा कल (Trend) कोणता आहे हे लक्षात येते. अधिक R 2 मूल्य असेल तर वर्षनिहाय काळ या चलामुळे (स्वावलंबी चलामुळे) वित्तपुरवठा या चलातील (परावलंबी चलातील) वाढीचा कल योग्य रीतीने भाकीत करता येतो. R 2 मूल्य हे अधिक असेल तर याला प्रतिमान कल स्पष्ट करण्यासाठी (Model is goodness of fit) योग्य आहे असे मानतात. याउलट R 2 मूल्य हे कमी असेल याला प्रतिमान कल स्पष्ट करण्यासाठी (Model is not goodness of fit) योग्य नाही असे मानतात. प्रतिमानानुसार R 2 मूल्य हे अधिक असल्याचे दिसून येते. याचा अर्थ, जवळजवळ ९९% परावलंबी चलातील विचरण वा कल स्वावलंबी चलामुळे भाकीत करता येतो. याला अपवाद फक्त प्रादेशिक ग्रामीण बँकांचा आहे. त्याचबरोबर F मूल्य हे संख्याशास्त्रीयदृष्ट्या ५% या प्रमाणाशी लक्षणीय आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँका व प्रादेशिक ग्रामीण बँका वगळता a मूल्य दोन्ही प्रतिमानामध्ये ५% या प्रमाणाशी लक्षणीय धनसंबंधित आहे.

**तक्ता क्र. ०२ : संस्थात्मक कृषी कर्जाचा कल आणि वाढ**

| अ. क्र. | बँका | प्रतिगमन प्रतिमान | प्रतिगमन (b) | R स्क्वेअर मूल्य | F मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक क्षेत्रातील बँका | Y=a+bt | १४८०.३३३ (०.६०१) | ०.०४३२ | ०.३६१ |
| | | लॉग Y=a+bt | ०.००६७० (०.६९१) | ०.०५६४ | ०.४७८ |
| २ | खाजगी क्षेत्रातील बँका | Y=a+bt | ६५२८.१२७ (५.०८७) | ०.७६४ | २५.८७८ |
| | | लॉग Y=a+bt | ०.०५९४ (५.१९५) | ०.७७१ | २६.९९३ |
| ३ | सहकारी बँका | Y=a+bt | ८८३३.३९४ (२.७१९) | ०.४८० | ७.३९३२ |
| | | लॉग Y=a+bt | ०.०४१ (३.५७०) | ०.६१४ | १२.७४६ |
| ४ | W.K. प्रादेशिक ग्रामीण बँका | Y=a+bt | ५.५८२ (०.४६१) | ०.०२६ | ०.२१३ |
| | | लॉग Y=a+bt | -०.००७ (-०.१९५) | ०.००५ | ०.०३८ |

स्रोत : सांगली जिल्ह्याचे प्रमुख बँक अहवाल (२०१०-११ ते २०२०-२१).

**समारोप :**

सांगली जिल्ह्याचा संस्थात्मक वित्तपुरवठ्याचा अभ्यास केला असता असा निष्कर्ष निघतो की, शेतीसाठी वित्तपुरवठा करणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील बँका, खाजगी क्षेत्रातील वित्तीय संस्था व बँका, तसेच सहकारी क्षेत्रातील बँका यांचा कर्जपुरवठा आणि पतपुरवठा शेतकऱ्यांसाठी उपलब्ध होत आहे. प्रामुख्याने खाजगी क्षेत्रातील बँका व वित्तीय संस्था सिंचन असणाऱ्या क्षेत्रातीलच शेतकऱ्यांना द्राक्षे व ऊस यासारख्या नगदी पिकांसाठी व शेती उपयुक्त अवजारांसाठी कर्जपुरवठा करत आहेत. सहकारी बँका प्रामुख्याने उसासारख्या नगदी पिकाला मोठ्या प्रमाणावरती कर्जपुरवठा करत आहेत. अलीकडच्या काळात लघु वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थादेखील शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करताना पुढे आलेल्या आहेत. वित्तपुरवठ्याचा परिणाम शेतीच्या उत्पादनावरती, शेतीविकासावरती, जलसिंचन साधनांच्यावरती धनात्मक होत आहे. संस्थात्मक वित्तपुरवठ्याचा व कर्जमाफीचा सर्व लाभ मोठ्या शेतकऱ्यांना व मध्यम शेतकऱ्यांना झालेला आहे; परंतु अवर्षण प्रवण शेतकरी, अल्पभूधारक व अन्नधान्याचे उत्पादन करणारा शेतकरी यापासून वंचित आहे. अशा शेतकऱ्यांना शेतीसाठी कर्जपुरवठा पुरेशा व योग्य वेळेत उपलब्ध होत नसल्याने कर्जमाफीसारखे राजकीय निर्णयाद्वारे शेतीच्या विकासामध्ये अडथळे निर्माण होत आहेत.

या संशोधनासाठी संस्थात्मक शेती वित्तपुरवठ्याच्या संबंधित कालश्रृंखला दुय्यम साधनसामग्रीचा उपयोग केल्यामुळे ग्रामीण भागातील पतपुरवठ्याचे धोरण आखणाऱ्या सर्व धोरणकर्त्यांना तसेच ग्रामीण भागातील विकास करू इच्छिणाऱ्या सरकारी यंत्रणांना, बिगर सरकारी संघटनांना आणि शेतीवित्त क्षेत्रातील बँका व वित्तीय संस्थांच्या व्यवस्थापकांना उपयोग होणार आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**


१. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय विशेष अहवाल (२०१८), शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठीचा समितीचा विशेष अहवाल.

२. अग्रणी बँक अहवाल, सांगली जिल्ह्यातील बँक ऑफ इंडिया या अग्रणी बँकेचे २०१०-११ ते २०२०-२१ या कालावधीतील अहवाल.

३. आर.बी.आय.अंतर्गत कार्यगट अहवाल (२०१९), कृषी कर्जाचे पुनरावलोकन अंतर्गत कार्यगट अहवाल, महेश कुमार जैन यांच्या अध्यक्षतेखाली कृषी कर्जाचे पुनरावलोकन करण्यासाठी स्थापन करण्यात आलेला अंतर्गत कार्यगट, सप्टेंबर २०१९.

४. नाबार्ड अहवाल (२०१९), सांगली जिल्ह्याच्या नाबार्डच्या संभाव्य लिंक्ड प्लॅनचा अहवाल, अर्थ मंत्रालयाचा आर्थिक व्यवहार विभाग, नाबार्ड, नवी दिल्ली,२०१९-२०.

५. महाराष्ट्र सरकार आर्थिक सर्वेक्षण (२०२०-२१), महाराष्ट्राचा आर्थिक सर्वेक्षण अहवाल, महाराष्ट्र शासन मुद्रण कार्यालय, मुंबई.

६. Alexpandi, M.& Rameshkumar, S.(2014), Utilization and Repayment of Agricultural Credit : The case of Madhurai District, Tamilnadu, Journal of Rural Development, Vol. 33, No.2.PP.147-159.

७. Maurya, S.K.& Vishwakarma, N. (2021), Status of Agricultural Credit : An Analysis, The Indian Economic Journal, 69(1), PP-24-31.

८. Mohan, R.(2004), Lecture, 17th National Conference of Agricultural Marketing, Indian Society of Agricultural Marketing Economic and Political Weekly, Vol. 41, Issue No. 1 February 5, 2004.

९. Mohan, R. (2006), Agricultural Credit

in India, Economic and Political Weekly, Volume 41, Issue No. 11.
१०. Nisha Bharti, (2018), "Evolution of Agriculture Finance in India : a Historical Perspective", Agricultural Finance Review, Vol. 78, Issue: 3, PP.376-392, https://doi.org/10.1108/AFR-05-2017-0035.
११. Patil,B.V.(2008), Agricultural Indebtedness Crisis and Revival, Economic and Political Weekly, 43(5), Feb. 2, 2008, PP. 47.
१२. Patil.A.K. (2021), Agricultural Developments Through Kisan Credit Card in Western Maharashtra, International Journal in Management in Social Science. Volume 09, Issue 2, PP.22-28.
१३. Sainath, P. (2008), "17060 Farm Suicide in One Year, The Hindu, January 31.
१४. Sangwan, S. S. (2015), More Credit for Agriculture Households NSSOs 70 th round on Indebtedness. Economic and Political Weekly, April 18,2015 Vol. No. 16 PP.23.
१५. Sukanya, N. & Vishwanath (2014), Commercial Bank Finance to Agriculture in India the recent trends and issue. Journal of Rural Development, Vol.33, No.4, PP.493-508.
१६. Talule,D.C.(2013), Political Economy of Agricultural Distress and Farmer's Suicide in Maharashtra. International Journal of Social Science & Interdiscilinary research. Volume 2, Issue 2, PP.95-124.

◆

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मराठी भाषेत प्रकाशित झालेल्या अर्थशास्त्रीय ग्रंथास रु. १०००/- चे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक प्रतिवर्षी देण्यात येते. १ जानेवारी, २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथाच्या लेखकांना (मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सभासद असणे आवश्यक) स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे ३० ऑगस्ट २०२४ पर्यंत पाठवाव्यात. नोव्हेंबर २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे संपन्न होत असलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४७ व्या राष्ट्रीय अधिवेशनात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**पत्रव्यवहारासाठीचा पत्ता**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, डॉ. मारोती तेगमपुरे, 'संगाई', घर क्रमांक २२, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, शहीद भगतसिंग नगर, पारनेर रोड, अंबड, जि. जालना ४३१२०४ (भ्रमणध्वनी: ९४२३९९३१३७)

**- डॉ. मारोती तेगमपुरे**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद

# भारतातील बेरोजगारीचे सिंहावलोकन व चिकित्सा

**भिमराव पांडुरंग उगले** †
**आबासाहेब श्रीरंग हांगे** ††

**प्रस्तावना:**

कोणत्याही देशाला आर्थिक विकासाबरोबर आर्थिक समस्यांचा सामना करावा लागत असतो. आर्थिक समस्या प्रत्येक देशाला भेडसावणारी बाब आहे. म्हणून आर्थिक समस्या ही संकल्पना अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाची संकल्पना मानली जाते. सद्य:स्थितीला सर्वच देश आर्थिक समस्यांचा सामना करत आहे. भारत स्वातंत्र्यापासून आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. आर्थिक समस्यांमध्ये बांधकाम क्षेत्र, कृषिक्षेत्र, औद्योगिक क्षेत्र, सेवाक्षेत्र, दळणवळण व पायाभूत क्षेत्र, संरक्षण क्षेत्रापर्यंत विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. सर्वात मोठे संकट म्हणजे वाढत्या लोकसंख्येबरोबर वाढती बेरोजगारी होय. वाढत्या बेरोजगारीमुळे आर्थिक विकासाला चालना देणे आवश्यक असताना ते साध्य झालेले नाही. कारण अस्थिर राजकारणामुळे देशातील आर्थिक समस्या सोडवण्याचा प्रयत्न केलेला नाही. आर्थिक समस्यांचा केव्हा उद्रेक होईल हे सांगणे कठीण असले तरी आर्थिक समस्यावर उपाययोजना करणे महत्त्वाचे असताना सरकार त्यावर उपाययोजना न करता मलमपट्टी करत आहे. त्यामुळे या समस्यांचा सामना नेहमी करावा लागत आहे. भारतातील सर्वात महत्त्वाची आर्थिक समस्या म्हणजे सुशिक्षित बेरोजगारी होय. एकीकडे मूल्यावर आधारित शिक्षणव्यवस्थेकडे मोठ्या प्रमाणात पदविका व पदवीधरकांची उत्तीर्ण होण्याची संख्या दिवसेंदिवस वाढत असताना त्या प्रमाणात त्यांना रोजगार मिळत नाही. जगातील सर्वाधिक बेरोजगारीचा देश म्हणून भारताकडे पाहिले जात आहे. प्रत्येक निवडणुकीमध्ये बेरोजगारांना रोजगार संधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले जाते. मात्र, ते पूर्ण कधीच केले जात नाही. त्यामुळे भारतामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक समस्या निर्माण होत आहे. उच्चशिक्षणामध्ये गुणवत्ता धारकांची संख्या मोठ्या प्रमाणात वृद्धी होत असताना, त्या प्रमाणात त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाहीत. अशा उच्चशिक्षितांच्या प्रश्नाकडे सरकार कानाडोळा करत असेल तर आर्थिक विकास साध्य करणे शक्य नसून ते अशक्य आहे. २८ ऑक्टोबर २०१९ च्या सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमीच्या

† संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
आजीव सभासद क्र.१६७८, भ्रमणध्वनी : ९५११७३५३२७, ई-मेल : bhimrao.beed@gmail.com
††प्राचार्य व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, व्ही.पी. महाविद्यालय, पाटोदा, जि.बीड.
आजीव सभासद क्र. ९९१, भ्रमणध्वनी: ९४२३७१५५८३, ई-मेल : abasaheb.hange@gmail.com

अहवालामध्ये भारतातील बेरोजगारीचा दर ६.९% होता. यापूर्वी २०१४ मध्ये बेरोजगारीचा दर ५.६०% म्हणजे बेरोजगारीची संख्या १४ कोटी होती, तर २०१९ मध्ये त्यात भर पडली असून बेरोजगारीची संख्या ३० कोटी झाली आहे. मार्च २०२२ मध्ये बेरोजगारीचा दर ७.५७% होता. यामध्ये शहरी बेरोजगारीचा दर ९.२२ तर ग्रामीणचा दर ७.१८% होता. राज्यवार पहिले तर सर्वाधिक बेरोजगारीचा दर हरियाणा ३४.५% तर सर्वात कमी बेरोजगारीचा दर हिमाचल प्रदेश १०.२% होता.

थोडक्यात, राज्य सरकार रोजगार देण्यास अयशस्वी झाल्यामुळे भारतातील बेरोजगारीचा दर वाढत आहे. महाराष्ट्र राज्य प्रगत म्हणून ओळखले जात असले तरी महाराष्ट्र राज्याचा बेरोजगारीचा दर एप्रिल २०२२ मध्ये ३.१% होता. अशा वाढत्या बेरोजगारीच्या दरामुळे आर्थिक समस्यांमध्ये भर पडत आहे. युवकांना काम करण्याची इच्छा असताना काम मिळत नसेल तर आर्थिक विकास साध्य करूनही आर्थिक विकास झाला आहे असे म्हणणे अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून अयोग्य आहे. म्हणून आर्थिक विकास ही संकल्पना गुणात्मक असून सर्वव्यापी आहे. आज भारतातील आर्थिक संकट मोठ्या प्रमाणात उद्‌भवत आहेत. म्हणून यावर उपाययोजना न केल्यास येणाऱ्या पुढील काळात आर्थिक संकट बिकट होईल.

**शोध विषयाचे महत्त्व:**

आर्थिक समस्यांचा सामना करत असताना त्या देशातील उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुरेपूर वापर करून घेणे आवश्यक आहे. आर्थिक समस्या नष्ट होणाऱ्या नसल्या तरी त्या दूर करता येतात. असा कोणताही देश नाही की त्या देशाला आर्थिक समस्या नाहीत. आजच्या परिस्थितीमध्ये प्रत्येक देश विकसित होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. पण विकासाच्या नावाखाली देशांमध्ये इतर समस्या निर्माण होत आहे, याचे भान कोणत्याही देशाला राहिले नसल्याचे दिसून येते. एकीकडे आर्थिक विकास साध्य करायचा आणि दुसरीकडे निसर्गाच्या होणाऱ्या हानीकडे कानाडोळा करायचा, हा सर्वात मोठा प्रश्न जगासमोर असून प्रत्येक देशाला वाटत आहे की, निसर्गाची जोपासना झाली पाहिजे. वास्तविक पाहाता, निसर्गाची जोपासना काही ठराविक देशांकडून होत असल्याचे आढळून आले. अशा विविध कारणांमुळे प्रत्येक देशामध्ये आर्थिक समस्या आढळून येत आहे. खासकरून भारतातील वाढत्या बेरोजगारीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात असताना केंद्र व राज्य सरकार या गंभीर समस्येवर बोलण्यास तयार नसून यावर उपाययोजना केव्हा करणार असा प्रश्न बेरोजगार युवकांच्या मनात भेडसावत आहे. जनतेला सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याचे कर्तव्य केंद्र व राज्य सरकारचे असते. केंद्र व राज्य सरकार कर्तव्यापासून दूर होत असतील, तर नक्कीच देशांमध्ये बेरोजगारीचा वणवा पेटल्याशिवाय राहाणार नाही. आजची भारताची लोकसंख्या सुमारे १३६ कोटींच्यावर आहे. म्हणून एवढ्या विशाल लोकसंख्येच्या देशांमध्ये वाढत्या बेरोजगारीचा प्रश्न महत्त्वाचा असताना केंद्र सरकार त्यांच्या असणाऱ्या विविध विभागामधील रिक्त पदभरती करत नसल्यामुळे स्पर्धा परीक्षा देणाऱ्या युवक-युवतीमध्ये असंतोष वाढत आहे. त्यामध्ये राज्य सरकार ही विविध ताळेबंदीच्या नावाखाली शासकीय पदभरतीकडे कानाडोळा करत असल्यामुळे देशातील बेरोजगारीचा दर वाढत चालला आहे. म्हणून भारतातील आर्थिक समस्यांचा अभ्यास करत असताना बेरोजगारीच्या समस्यांवर अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. कोणत्याही देशाला अज्ञानातून विकास साध्य करणे शक्य नसून ते अशक्य आहे. बेरोजगारीच्या दरात वृद्धी करून देशाची आर्थिक प्रगती होत नसते. आजघडीला भारतातील आर्थिक समस्यांमध्ये वाढती लोकसंख्या, वाढती बेरोजगारी, वाढती चलनवाढ, वाढते सामाजिक वाद-विवाद, आरक्षणाचा वादविवाद, बांधकाम

क्षेत्रातील मंदी, वाढते तेलाचे दर, उत्पादन क्षेत्रातील मंदी व परदेशी गुंतवणुकीचा न्यूनदर, औद्योगिक क्षेत्राचा घटता विकासदर आणि कृषिक्षेत्रातील नैसर्गिक संकटे इत्यादी आर्थिक समस्यांमुळे भारताचा आर्थिक विकास दर कमी होत आहे. म्हणून आर्थिक वृद्धी घडून आणण्यासाठी देशातील आर्थिक समस्यांवर उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. सदरील शोधनिबंधामध्ये भारतातील आर्थिक समस्यांचा चिकित्सक पद्धतीने अभ्यास केला असून, यामध्ये भारतातील वाढती लोकसंख्या, वाढती बेरोजगारी, वाढते इंधन दर, कमी उत्पादन व गुंतवणूक  इत्यादी कारणांचा शोध घेतला असून, सदरील शोधनिबंधाचे वर्णनात्मक पद्धतीने विश्लेषण केलेले आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये:**

संशोधन निरंतर चालणारी एक प्रक्रिया आहे. संशोधनाला एक दिशा मिळवण्यासाठी ठरावीक उद्दिष्टांची आवश्यकता असते. त्या उद्दिष्टांच्या आधारावर चिकित्सक पद्धतीने अभ्यास करणे सोयीस्कर ठरते. म्हणून सदरील विषयासाठी खालीलप्रमाणे संशोधनाची उद्दिष्ट्ये निश्चित केली आहे.

१. भारतातील वाढती बेरोजगारी या समस्येचा अभ्यास करणे.
२. भारतातील वाढत्या बेरोजगारीच्या कारणांचा अभ्यास करणे.
३. भारतातील विविध आर्थिक समस्यांवरील उपाय-योजना सुचवणे.

**संशोधन पद्धती:**

सदरील शोधनिबंध दुय्यम साधनसामग्रीवर आधारित आहे. प्रस्तुत शोधनिबंधासाठी विविध पुस्तके, वर्तमानपत्रे, विविध चर्चासत्रे, विविध शोधनिबंध व लेख तसेच शासकीय, निमशासकीय आणि संशोधकांनी या विषयावर केलेल्या अभ्यासाचा वापर सदर शोधनिबंधामध्ये करण्यात आलेला आहे. सदर शोधनिबंध दुय्यम साधनसामग्रीवर असून वर्णनात्मक पद्धतीवर अवलंबून असल्यामुळे वरील विविध ग्रंथ सामग्रीचा वापर करणे अपरिहार्य ठरते.

वाढती बेरोजगारी ही समस्या देशातील आर्थिक विकासाला मारक ठरत असते. म्हणून भारतामध्ये बेरोजगार युवकामध्ये असंतोष निर्माण होत आहे. वाढती बेरोजगारी देशातील गुन्हेगारी, नक्षलवाद, आतंकवाद वाढीस अनुकूल ठरत आहे. यामुळे देशातील संरक्षण क्षेत्राला घातक ठरत आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे बेरोजगारी दर वाढत आहे. यावर केंद्र व राज्य सरकार वाढत्या बेरोजगारीवर उपाययोजना करण्यास असमर्थ ठरत आहे. सर्वप्रथम बेरोजगारी म्हणजे काय ही संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे.

बेरोजगारीची व्याख्या : प्रचलित वेतन (चालू पगार) जर मान्य आहे, काम करण्याची इच्छा व शक्ती आहे, तरीही त्या व्यक्तीस काम मिळत नसेल तर त्या व्यक्तीस बेकार म्हटले जाते. दुसऱ्या शब्दांमध्ये ही बेकारी म्हणजे अशी एक अवस्था की, लोकांची काम करण्याची पात्रता असते आणि काम करायला तयार असतात, परंतु त्यांना काम प्राप्त होत नाही ही स्थिती श्रमांचा अतिरिक्त पुरवठा व त्या तुलनेत श्रमिकांची मागणी यातून निर्माण होते.

थोडक्यात, एखाद्या व्यक्तीला काम करण्याची इच्छा असते; पण त्या प्रचलित वेतन दरावर काम मिळत नाही अशा सर्वांना बेरोजगार म्हणतात. ही अवस्था अर्थव्यवस्थेला आर्थिक विकासासाठी मारक ठरत आहे. म्हणून ज्या देशांमध्ये बेरोजगारीचा दर जास्त आहे त्या देशांमध्ये आर्थिक विकास, देशातील सामाजिक प्रश्न, गुन्हेगारी, गुंतवणुकीचा दर, औद्योगिक विकास दर इत्यादींमध्ये प्रतिकूल परिणाम घडवून येतो.

कामगारांची मागणी आणि रोजगार दरांमधील बदलत्या आर्थिक आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि ग्रामीण आणि शहरी भागात शाश्वत वाढ सुनिश्चित करण्यासाठी विचारशील, धोरणात्मक उपायांची आवश्यकता आहे. रोजगाराच्या संधी अधिक निर्माण करण्यासाठी आणि देशाची आर्थिक लवचिकता वाढवण्यासाठी आर्थिक क्रियाकलापांमध्ये विविधता

आणण्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भारतातील मागील वर्षांमध्ये बेरोजगारीचा दर कशाप्रकारे आहे ते खालील तक्त्यामध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्र. १ :भारतातील बेरोजगारीचा दर**

| वर्ष | बेरोजगारी दर (टक्केवारी) |
|---|---|
| २००८ | ५.४१ |
| २००९ | ५.५४ |
| २०१० | ५.५५ |
| २०११ | ५.४३ |
| २०१२ | ५.४१ |
| २०१३ | ५.४२ |
| २०१४ | ५.४४ |
| २०१५ | ५.४४ |
| २०१६ | ५.४२ |
| २०१७ | ५.३६ |
| २०१८ | ५.३३ |
| २०१९ | ५.२७ |
| २०२० | ८.०० |
| २०२१ | ५.९८ |
| २०२२ | ७.३३ |
| २०२३ | १०.०५ |

स्रोत : Centre for Monitoring Indian Economy (CMIE).

तक्ता क्र. १ वरून असे दिसून येते की, भारतातील मागील वर्षांमध्ये बेरोजगारीच्या दरामध्ये वृद्धी झालेली आहे. सन २००८ मध्ये बेरोजगारीचा दर ५.४१% वरून २०२३ मध्ये १०.५ टक्क्यावर गेलेला आहे. थोडक्यात, सरकारने बेरोजगारी संदर्भात उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. वाढत्या बेरोजगारीच्या दरामुळे नोकरीच्या संधीवर परिणाम करून पर्यायाने अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक विकासाला अडथळा निर्माण होतो.

आजही उच्च शिक्षिताना त्यांच्या उच्चशिक्षणानुसार नोकरी मिळत नाही. यामध्ये केंद्र व राज्य सरकारच्या अधिपत्याखालील रिक्तपदांची संख्या वाढत आहे. केंद्र सरकारच्या रिक्तपदांची संख्या ८.७२ लाख असल्याचे (१ मार्च २०२०) कार्मिक राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी राज्यसभेत लेखी प्रश्नाच्या मुद्द्यावर माहिती दिली. महाराष्ट्र राज्यामध्ये २.४४ लाखापेक्षा जास्त आहे. शासनाच्या पदभरतीबाबत उदासीन धोरणांमुळे बेरोजगारीचा दर वाढत आहे. आजही अनेक राज्यांत बेरोजगारीचा दर वाढत आहे.

**तक्ता क्र. २ : राज्यनिहाय भारतातील बेरोजगारीचा दर २०२३**

| राज्य | बेरोजगारी दर (टक्केवारी) |
|---|---|
| हरियाणा | ३७.४ |
| राजस्थान | २८.५ |
| बिहार | १९.१ |
| झारखंड | १८ |
| त्रिपुरा | १४.३ |
| सिक्कीम | १३.६ |
| दिल्ली | ११.२ |
| गोवा | ९.९ |
| आंध्रप्रदेश | ७.७ |
| हिमाचल प्रदेश | ७.६ |
| आसाम | ४.७ |
| छत्तीसगढ | ३.४ |
| मध्यप्रदेश | ३.२ |
| महाराष्ट्र | ३.१ |
| कर्नाटक | २.५ |
| गुजरात | २.३ |
| ओडीसा | ०.९ |

स्रोत : Centre for Monitoring Indian Economy (CMIE).

तक्ता क्र. २ वरून असे दिसून येते की, सर्वात जास्त बेरोजगारीचा दर हरियाणा ३७.४% असून राजस्थान २८.५%, बिहार १९.१%, झारखंड १८%, त्रिपुरा १४.३, सिक्कीम १३.६ आणि दिल्ली ११.२% राज्यात आहे. या राज्यामध्ये बेरोजगारीचा दर इतर राज्यांपेक्षा अधिक आहे. थोडक्यात, वरील राज्यातील बेरोजगारीची आकडेवारी दोन अंकांमध्ये किंवा दहापेक्षा जास्त आहे. तर उर्वरित राज्यातील बेरोजगारींची संख्या १० पेक्षा कमी व एकपेक्षा जास्त आहे. भारतातमध्ये सर्वाधिक कमी बेरोजगारीचा दर ओडीसा ०.९%, गुजरात २.३%, कर्नाटक २.५ % आहे. या राज्यांमध्ये बेरोजगारीचा दर कमी असून, या राज्यांनी बेरोजगारीबाबत योग्य धोरण राबवत असल्यामुळे बेरोजगारीचा दर कमी राखण्यात यशस्वी झालेले आहे. इतर राज्यांतील बेरोजगारीचा दर वाढल्यामुळे पर्यायी देशातील बेरोजगारीचा दर वाढला आहे. तसेच भारतामध्ये कंत्राटी कामगारांच्या संकल्पनामुळे ही बेरोजगारीची स्थितीमध्ये भर पडत आहे. कंत्राटी कामगार धोरण हे कामगारांचे शोषण करणारे धोरण आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. ज्या देशांमध्ये बेरोजगारीचा दर उच्च आहे अशा देशांमध्ये कंत्राटी कामगार धोरण राबवणे कितपत योग्य आहे, यावर विश्लेषणात्मक चर्चा होणे आवश्यक आहे. कंत्राटी कामगार म्हणजे ज्या व्यक्तीला ठरावीक कालावधीमध्ये कामावर घेतले जाते. कंत्राटी कामगारांमध्ये ठरावीक संस्थेच्या अधिपत्याखालील काम करावे लागतात. तसेच कंत्राटी कामगारांना इतर जे कायमस्वरूपी कामगार आहेत त्याप्रमाणे काम करावे लागत असले तरी त्यांना कायमस्वरूपी कामगारांएवढे मानधन मिळत नाही. म्हणजे काम एकच प्रकारचे असते पण कामावर दिला जाणारा मोबदला वेगवेगळा आहे. उदाहरणार्थ, सहाय्यक प्राध्यापकाला पूर्णवेळ प्रतिमहिन्याला १ लाख रुपयांच्यावर पगार आहे. तर तासिका तत्त्वावरील काम करणाऱ्या सहाय्यक प्राध्यापक यांना प्रतिमहिना १६ हजार रुपयेपर्यंत मानधन मिळत असून, ते बारा महिने मिळत नसून फक्त सहा महिन्यांसाठी असले तरी ते कधी मिळेल याची शाश्वती नसते. म्हणून कंत्राटी कामगार पण बेरोजगारीमध्ये का गणले जाऊ नये? असा प्रश्न उपस्थित होतो. आज भारतामध्ये सुशिक्षित बेरोजगारांची संख्या झपाट्याने वाढत असताना सरकारी पातळीवर या सुशिक्षित बेरोजगारांना त्यांच्या पात्रतेनुसार रोजगार देण्यात जाणून-बुजून रोजगार उपलब्ध करत नसल्याचे दिसून येते. रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे काम केंद्र व राज्य सरकारचे असते. पण वास्तविक पाहाता, सरकार रोजगाराबाबत उदासीन धोरणामुळे देशात बेरोजगारीचा उद्रेक झालेला आहे. औद्योगिक आणि सेवाक्षेत्रातही बेरोजगारीच्या संधी कमी प्रमाणात असल्यामुळे वाढत्या बेरोजगारीला आळा घालण्यासाठी गुंतवणुकीच्या दरात वृद्धी होणे अपेक्षित आहे. आधुनिक युगात रोजगारीच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध होतील असे अनेक अर्थतज्ज्ञांचे म्हणणे योग्य ठरत आहे. कारण की, आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे मनुष्यबळाचा होणारा वापर कमी होतो. औद्योगिक क्षेत्रातील सौम्य मंदीचा फटका बेरोजगारीवर भर घालत आहे. खासकरून बांधकाम क्षेत्रातील मंदीमुळे असंघटित आणि संघटित क्षेत्रातील कामगारांना बेरोजगारीचा भार सोसावा लागत आहे. बांधकाम क्षेत्रामध्ये असंघटित कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. तसेच बांधकाम क्षेत्रामुळे इतर व्यवसायातील कामगारांना काम मिळत असून यामध्ये लोह-पोलाद विक्रेते, सिमेंट विक्रेते, वीट कामगार, खडी-वाळू विक्रेते अशा विविध विक्रेत्यांकडून कामगारांची गरज भासत असते. पण मागील सहा ते दहा वर्षांमध्ये बांधकाम क्षेत्रामध्ये मंदी सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने बांधकाम क्षेत्रातील कुशल आणि अकुशल कामगारांना बेरोजगारीचा फटका बसलेला आहे.

देशामध्ये बेरोजगारीचा दर वाढण्याच्या कारणांमध्ये मागील दोन वर्षात कोविडने घातलेला धुमाकूळ होय. कोविडमुळे अनेकांच्या नोकरीवर गदा आलेली होती. काहींचा पगार कपात तर काहींना कामावरून कमी करण्यात आले होते. कोविडमुळे अनेकांच्या नोकऱ्या गेल्या. याचा परिणाम म्हणून २०२० मध्ये ३५४८ युवकांनी आत्महत्या केल्या आहेत. CMIE च्या अहवालानुसार भारतामध्ये टाळेबंदीनंतर १२ कोटीपेक्षा जास्त युवक बेरोजगार असल्याचे नमूद आहे. जागतिक बँकेचे माजी प्रमुख व अर्थतज्ज्ञ कौशिक बासू यांनी असे, मत व्यक्त केले की, १९९१ मध्ये भारतामध्ये आर्थिक मंदी आली होती. रोजगारविषयक समस्याही निर्माण झाली. पण त्यावर्षीच्या आणि मागील तीन दशकांमध्ये देशातील सद्य:स्थितीतील बेरोजगारीचा दर सर्वाधिक आहे.

**भारतातील बेरोजगारी वाढण्याचे प्रमुख घटक कोणते आहेत ते पुढीलप्रमाणे:**

**१. अतिरिक्त लोकसंख्या :** अतिरिक्त लोकसंख्या हे बेरोजगारीचे प्रमुख कारणांपैकी एक कारण आहे. कारण सध्या भारताची लोकसंख्या दरवर्षी २% ते २.५% ने वाढत असल्याने अशा अतिरिक्त लोकसंख्यामुळे रोजगाराच्या संधी सर्वांना प्राप्त होणे शक्य होत नाही. म्हणून पर्यायाने बेरोजगारीमध्ये वाढ होत आहे.

**२. नियोजनाचा अभाव :** देशातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, औद्योगिक, कृषी अशा विविध क्षेत्रातील धोरण महत्त्वाचे आहे. धोरणाशिवाय आर्थिक विकासदरामध्ये वाढ होणे कठीण असते. म्हणून रोजगाराविषयी धोरणांचा अभाव दिसून येत आहे. प्रत्येक देशामध्ये बेरोजगारीच्या नियोजनासाठी एक व्यवस्था निर्माण केलेली असते. लोकसंख्येत ज्या प्रमाणात वाढ होते त्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होणे आवश्यक असते. पण भारतामध्ये पूर्वीपासून बेरोजगारीसंदर्भात नियोजनाचा अभाव आहे. कोरोनाच्या काळामध्ये केंद्र व राज्य सरकारने विविध मनरेगाची कामे हाती घेऊन ग्रामीण रोजगार देण्याचा प्रयत्न केला. पण सार्वजनिक नोकरी देण्याचे काम हाती घेण्याची गरज असताना ती साध्य केलेली नाही. तसेच अनेक भरती परीक्षांमध्ये झालेल्या भ्रष्टाचारामुळे युवकांमध्ये नाराजी व उद्रेकाची लाट दिसून येत आहे. म्हणून यासाठी केंद्र व राज्य सरकारने बेरोजगारी संदर्भात नियोजन करून रोजगारनिर्मितीला चालना देणे गरजेचे आहे.

**३. ग्रामीण रोजगाराच्या अपुऱ्या संधी :** भारत हा खेड्याचा देश म्हणून ओळखला जातो. आजही भारतामधील एकूण लोकसंख्यापैकी ६० ते ७०% लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. एकूण लोकसंख्यापैकी ५०% लोकसंख्या कृषी व कृषीवर आधारित उद्योग-व्यवसायावर अवलंबून आहे म्हणून शहराच्या तुलनेत ग्रामीण भागामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यास सरकारला अपयश आलेले आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे ग्रामीण भागात असणारे कुटीर उद्योग, लघुउद्योग आणि शेतीसंबंधित उद्योगांचा ऱ्हास होत आहे. त्यामुळे ग्रामीण रोजगाराच्या अपुऱ्या संधीमुळे बेरोजगारीमध्ये वाढ होत आहे. भारतामध्ये २०१७ पासून बेरोजगारीचा दर ५ ते ६% पर्यंत सीमित होता. पण कोरोनाच्या उद्रेकानंतर देशांमध्ये ताळेबंदीमुळे आर्थिक व्यवहारांवर बंधने घातल्याने अनेक उद्योग-व्यवसायांनी कामगार कपात केल्यामुळे बेरोजगारीमध्ये वाढ होत गेली. तसेच वर्क फ्रॉर्मच्या कामकाजामुळे मनुष्यबळाची गरज कमी झाली. सर्वात जास्त फटका कोरोनाचा उद्रेकामुळे बसलेला आहे. सध्याची परिस्थिती पूर्वपदावर आली असली, तरी वर्क फ्रॉर्म होमच्या कामकाजामुळे रोजगारांची संधी कमी प्रमाणात निर्माण होत आहे. देशांमध्ये सार्वजनिक यंत्रणामध्ये विविध विभागांमध्ये रिक्तपदांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे बेरोजगारीमध्ये वाढ होत आहे. तसेच राज्य सरकारच्या विविध विभागामध्ये रिक्तपदांची संख्या

दरवर्षी वाढत असल्यामुळे सार्वजनिक नोकरीसाठी प्रयत्न करणाऱ्या उमेदवारांची संख्या वाढत आहे. केंद्र सरकारच्या अधिपत्याखालील रिक्तपदांची संख्या ८.७२ लाखांपेक्षा जास्त असल्याचे दिसून आले. महाराष्ट्र राज्यामध्ये सार्वजनिक रिक्तपदांची संख्या २.४४ लाखांपेक्षा जास्त असल्याचे आढळून आले.

**४. सुशिक्षित बेरोजगार :** ज्या व्यक्तीने शिक्षण घेतले आहे आणि त्याची काम करण्याची इच्छा व पात्रता असूनही काम मिळत नसेल अशा स्थितीला सुशिक्षित बेकारी म्हणतात. मागील दहा वर्षांमध्ये उच्च पदवीधरांची संख्या वाढत आहे. यामध्ये व्यावसायिक पदवीधरांची संख्या झपाट्याने वाढल्यामुळे सुशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढत आहे. आजच्या स्थितीला विधी, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, नेट, सेट, पीएच.डी. धारकांच्या संख्यामध्ये मोठी वाढ होत असल्यामुळे व त्यांना त्यांच्या पात्रतेनुसार काम मिळत नसल्यामुळे सुशिक्षित बेरोजगारांची संख्या झपाट्याने वाढलेली असून धोरणामध्ये बदल न केल्यास अजून संख्या वाढत जाणार आहे. भारतामध्ये नेट, सेट आणि पीएच. डी. धारकांची संख्या जवळपास ७० हजारांच्यावर गेलेली असताना त्यांना त्यांच्या पात्रतेनुसार रोजगार मिळत नसल्याने युजीसीने आपल्या अहवालात स्पष्ट नमूद केली आहे.

थोडक्यात, भारतातील आर्थिक समस्यांमध्ये बेरोजगारांची समस्या संदर्भात नियोजनाचा अभाव जाणवत असून सद्य:स्थितीला सरकार बेरोजगारीवर धोरण आणि उपाययोजना करताना आढळून येत नाही. म्हणून बेरोजगारीसोबत देशांमध्ये गुंतवणुकीचा ओघ कमी झाला आहे. त्यातच देशातील सतत वाढणारी चलनवाढ सोबतच कोरोनाचा झालेला उद्रेक इत्यादींमुळे आर्थिक समस्यांमध्ये भर पडत आहे. एकीकडे केंद्र सरकार देशातील सार्वजनिक उद्योगांचे निर्गुंतवणूकीकरण करत असताना व बेरोजगारीकडे दुर्लक्ष करत आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेकडे घेऊन जात असताना युवकांना रोजगारांच्या संधी कशा उपलब्ध होतील हे पाहाणे पण आवश्यक आहे. म्हणून भांडवलदाराच्या मदतीने देशातील गुंतवणूक वाढवणे आवश्यक असून यातून रोजगाराच्या संधी निर्माण होतील तेव्हा आर्थिक समस्यांवर मात करण्यास सरकारला यश मिळेल. भारतातील आर्थिक समस्यांवर उपाययोजना करणे आवश्यक आहे. सध्याच्या स्थितीमध्ये शिक्षणक्षेत्रातील झालेल्या गर्दीमुळे उच्चशिक्षित बेरोजगारीची संख्या वाढत आहे. शैक्षणिक संस्थांचे विलीनीकरण करून उच्च शिक्षणातील बाजार रोखणे आवश्यक असून केंद्र व राज्य सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील संस्था निर्माण करणे गरजेचे आहे. कारण आजच्या स्थितीला अनेक खाजगी संस्था चालक पैशाच्या जोरावर अनेकांना बोगस पदविका व पदवी वाटप करत असल्याचे आढळून आले. त्यामुळे उच्च शिक्षणातील बाजार रोखण्यासाठी शैक्षणिक संस्था सरकारने स्वतःच्या हातामध्ये घेणे आवश्यक आहे. केंद्र सरकारने वित्तीय धोरणातून सार्वजनिक आणि खाजगी गुंतवणूक वाढीस प्रोत्साहन देऊन रोजगारनिर्मितीस वाव देणे आवश्यक आहे. केंद्र व राज्य सरकारने विविध प्रकल्प हाती घेऊन रोजगारनिर्मिती करणे आवश्यक आहे. जसे की, मोठ्या धरणाची बांधणी. जलविद्युत प्रकल्प तयार करणे, नदीजोड प्रकल्प, पायाभूत सुविधांसाठी प्रकल्प तयार करणे अशा विविध प्रकल्पांच्या माध्यमातून नवीन रोजगार निर्मिती होऊन बेरोजगारी दरात घट करणे शक्य आहे.

**बेरोजगारी संदर्भातील उपाययोजना :**

सदर निबंधामध्ये भारतातील बेरोजगारीच्या समस्यांवर विश्लेषणात्मक चर्चा करण्यात आली असून, बेरोजगारीच्या कारणाचा शोध घेण्यात आला आहे. तरी पुढीलप्रमाणे उपाययोजना सुचविण्यात आल्या असून, या उपाययोजनांची अंमलबजावणी केल्यास नक्कीच भारतातील बेरोजगारीची समस्या कमी होईल.

**१. पायाभूत सुविधा :** केंद्र व राज्य सरकारने विविध पायाभूत सुविधांमध्ये वाढ करणे आवश्यक आहे. जसे की, केंद्र व राज्य मार्ग एकमेकांना जोडणे, जलवाहतूक सुविधा वाढवणे, रेल्वे रुंदीकरण करणे, नवीन रेल्वे मार्ग जोडणे, ग्रामीण व शहरी मार्गांचा आढावा घेऊन रुंदीकरण करणे, सिमेंट व डांबरीकरण रस्त्यांचा आढावा घेऊन त्याची दुरुस्ती करणे अशा विविध पायाभूत सुविधांच्या माध्यमातून रोजगार निर्माण झाल्यास बेरोजगारांची संख्या कमी होईल.

**२. कर्ज सुविधा :** देशातील गुंतवणूक वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी लघु, सूक्ष्म आणि मध्यम उद्योगांना सवलतीच्या दराने मागेल त्याला कर्ज दिल्यास गुंतवणूक वाढवून नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होतील. पर्यायाने बेरोजगारीमध्ये घट होईल.

**३. सार्वजनिक रिक्तपदे :** केंद्र व राज्य सरकारच्या अंतर्गत येणारी सर्व शासकीय रिक्तपदे तात्काळ भरून उच्च शिक्षणातील बेरोजगारी कमी करता येईल. म्हणून शासकीय पदभरतीमध्ये जशी पदे रिक्त होतील तसे भरणे आवश्यक आहे. तेव्हा उच्चशिक्षित बेरोजगारांची संख्या कमी होईल.

**४. लोकसंख्या धोरण :** भारतातील लोकसंख्या धोरण लवकरच लवकर जाहीर करून 'हम दो हमारे दो'याची संपूर्ण देशात शक्तीची अंमलबजावणी करणे. लोकसंख्येच्या जन्म-मृत्यु दर संतुलन अवस्थेत आल्यावर लोकसंख्या धोरणाचा अभ्यास करून पुन्हा धोरण बदलणे आवश्यक आहे.

**५. शैक्षणिक धोरण :** शैक्षणिक धोरणामध्ये बदल करून सर्व शैक्षणिक संस्था सरकारने ताब्यात घेऊन त्याचे नियोजन करणे. कारण आज शैक्षणिक संस्था बाजारीकरणाचे कामकाज करत असल्यामुळे बनावट पदवींचा सुळसुळाट झाल्यामुळे पैसे देऊन पदवी विकत घेतल्यामुळे शैक्षणिक संस्था दुकानदारीचे काम करत आहे.

केंद्र व राज्य शासनाने वरील उपाययोजना राबविल्यास नक्कीच भारतातील बेरोजगारांची समस्या कमी होऊन आर्थिक विकास दरात भर पडेल.

**निष्कर्ष :**

सदर शोधनिबंधामध्ये भारतातील बेरोजगारीच्या संदर्भात वर्णनात्मक पद्धतीने विश्लेषण केले आहेत. यामध्ये भारतामधील बेरोजगारी वाढीची कारणे आणि उपाययोजनांचा समावेश आहे. सदरील शोधनिबंधातील निष्कर्ष खालीलप्रमाणे.

१. भारतातील बेरोजगारीचा दर ८.७२% असून तो मागील ५० वर्षातील उच्च अंकावर पोहोचला आहे.
२. भारतातील सर्वात जास्त बेरोजगारीचा दर हरियाणा राज्यामध्ये ३७.४% असून सर्वात कमी ओडीसा ०.९% आहे.
३. केंद्र सरकारच्या अधिपत्याखाली रिक्तपदांची संख्या ८.७२ लाख आहे. त्यामुळे बेरोजगारीच्या दरामध्ये केंद्र सरकार कारणीभूत असल्याचे दिसून आले.
४. महाराष्ट्र राज्यामध्ये बेरोजगारीचा दर ३.१% असून महाराष्ट्राच्या सार्वजनिक विभागातील रिक्त संख्या २.४४ लाखांपेक्षा जास्त असल्यामुळे उच्चशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढत आहे.
५. भारतामध्ये मार्च २०२२च्या आकडेवारीनुसार ग्रामीण ६.५७% बेरोजगारीपेक्षा शहरी ८.७४% बेरोजगारीचा दर जास्त असल्याचे आढळून आले.
६. भारतातील बेरोजगारी कमी करण्यासाठी केंद्र सरकारने विविध प्रकल्प आणि गुंतवणूक करणे आवश्यक असताना अशा विविध योजना आणि उपाययोजनांकडे दुर्लक्ष केले असल्याचे आढळून आले.
७. भारतामध्ये उच्चशिक्षित बेरोजगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार त्यांना रोजगार मिळत नसल्याचे

आढळून आले.

८. भारतातील अतिरिक्त लोकसंख्या वाढीमुळे बेरोजगारीच्या दरामध्ये दिवसेंदिवस वाढ आढळून आली.

९. जागतिक कोविड रोगामुळे उद्योगांनी कामगार कपात केल्यामुळे बेरोजगारीच्या दरामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

१०. भारतामध्ये बेरोजगारी संदर्भात केंद्र व राज्य सरकारचे नियोजनाचा अभाव दिसून आला आहे.

११. भारतामध्ये आधुनिक तंत्रज्ञानामुळे ग्रामीण भागातील कुटीर उद्योग ऱ्हास पावत असल्यामुळे ग्रामीण बेरोजगारी वाढत असल्याचे आढळून आले.

१२. भारतामधील सार्वजनिक संधीचे प्रमाण कमी झाल्याचे उच्चशिक्षित युवकांचा केंद्र सरकारवर असंतोष निर्माण होत असल्याचे आढळून आले.

१३. बेरोजगारीच्या दरामध्ये सातत्याने वाढ होत असल्यामुळे देशात पर्यायाने महाराष्ट्रामध्ये मंदी सदृश्य परिस्थिती निर्माण होत असल्याचे दिसून आले.

**सारांश:**

भारतातील बेरोजगारीमुळे आर्थिक विकासाला फटका बसलेला आहे. सद्य:स्थितीला बेरोजगारीचा दर ७.९% असून अशीच परिस्थिती राहिल्यास यामध्ये वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. राज्यांमधील बेरोजगारीचा दर वाढत आहे. राज्याने रोजगारनिर्मिती करणे आवश्यक असताना राज्य सरकारला बेरोजगारीच्या समस्या संदर्भात अपयश आल्याचे स्पष्ट होत आहे. म्हणून केंद्र सरकार व राज्य सरकारने त्यांच्या अधिपत्याखालील असणारी रिक्तपदे लवकरात लवकर भरती केल्यास नक्कीच बेरोजगारीचा दर कमी होऊन पद भरतीमधून सरकारला परीक्षा फीच्या स्वरूपातून मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त होईल. यामुळे बेरोजगार युवकांमध्ये निर्माण झालेला असंतोष दूर होऊन रोजगार पातळीमध्ये एकूण बचत आणि गुंतवणुकीमध्ये वाढ होईल. जोपर्यंत विकासकामे हाती घेत नाही तोपर्यंत रोजगार निर्माण होणार नाही. पर्यायाने विकास होणे अशक्य आहे. म्हणून यासाठी केंद्र व राज्य सरकारने विविध उद्योगांच्या मदतीने मोठ्या प्रमाणात प्रकल्प व गुंतवणूक करून विकास करणे अनिवार्य आहे. विकासाच्या फुगवटात दाखवून विकास साध्य करणे सोपे आहे. पण प्रत्यक्षामध्ये ते साध्य करणे शक्य नाही. बेरोजगारी कमी करण्यासाठी सरकारने विविध प्रकल्पाची कामे हाती घेणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**


१. जंगले मंगला, (२०१५), महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

२. पाटील जे.एफ. व काकडे व्ही.बी., (२०२०), भारतातील बेरोजगारी आणि रोजगाराचा हक्क, समाजवादी प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी.

३. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२० ते २०२३.

४. सिंह रमेश, (२०१८), भारतीय अर्थव्यवस्था, मॅक्रोशील एज्युकेशन पब्लिकेशन, दिल्ली.

५. Bohare Ramakant (1995) Rural Poverty and Unemployment in India, Northern Book Center, New Delhi.

६. Centre for Monitoring Indian Economy (CMIE)

७. Ishan Gera, Is unemployment in India rising or falling? The Economic Times, 19 December 2023.

८. Ministry of Finance Government of India, Oxford press, Economic Survey, 2020-2021.

९. https://www.forbesindia.com/article/explainers/unemployment-rate-in-india/87441/1

१०. www.niti.gov.in (Niti Aayog)

११. https://hi.wikipedia.org/wiki/


◆

# भरडधान्याचे आर्थिक अध्ययन : भारताच्या संदर्भात

**सुभाष पाटील** †

**प्रास्ताविक :**

भारतातील कृषी उत्पादनात प्रामुख्याने अन्नधान्य, कडधान्ये, भाजीपाला, फळे, फुले, वनौषधी, पशुखाद्ये आदींचा समावेश होतो. अन्नधान्यअंतर्गत भरडधान्य / तृणधान्याचा समावेश होतो. भरडधान्य (Millets) हा लहान बीज असलेल्या तृणवर्गीय पिकांचा एक वैविध्यपूर्ण गट असून प्रामुख्याने Poaceae या वनस्पती कुटुंबातील गवत आहे. भारतीय भरडधान्य हा पौष्टिकदृष्ट्या समृद्ध आणि मुख्यतः भारतातील शुष्क आणि अर्ध-शुष्क प्रदेशात पिकवला जाणारा खाद्यान्न समूह आहे. भरडधान्ये लाखो गरीब शेतकऱ्यांसाठीच्या खाद्यान्न आणि चाऱ्याचा एक महत्त्वाचा स्रोत बनून भारताच्या पर्यावरणीय आणि आर्थिक सुरक्षेत महत्त्वाची भूमिका बजावतात. यांना 'भरड तृणधान्ये' किंवा 'गरिबांचे धान्य' असेही म्हणतात. आपल्या पूर्वजांनी आहारात निवडलेल्या या स्थानिक भरडधान्यांमध्ये अनेक पोषक गुणधर्म असून इतर अन्नधान्य व कडधान्याच्या तुलनेत आरोग्याला चालना देणारे एक पौष्टिक पीक आहे. आज पाश्चात्य आहाराच्या प्रभावामुळे भारतीयांच्या रोजच्या आहारातील भरडधान्यांचा उपभोग कमी झाला आहे. हरितक्रांतीनंतरच्या काळात भरडधान्यांची जागा हळूहळू बाजारपेठेत सर्वाधिक मागणी असलेल्या गहू व तांदूळासह इतर नगदी पिकांनी घेतल्याने भरडधान्य लागवडीखालील क्षेत्रात व उपभोगात प्रचंड वेगाने घट झाल्याचे दिसते. १९६२ ते २०१० या काळात भरडधान्यांचा दरडोई उपभोग ३२.९ किलोग्रॅमवरून ४.२ किलोग्रॅमपर्यंत कमी झाला आहे. मात्र वर्तमान जीवनशैलीतील आजारांच्या वाढत्या चिंतेमुळे आधुनिक ग्राहक हळूहळू पण अधिकाधिक पोषकतत्त्वांनी समृद्ध भरडधान्याकडे गहू आणि तांदळाला योग्य पर्याय म्हणून पाहात आहेत. कोविड-१९ मुळे तर त्याचा वेग वाढला असून नागरी आणि ग्रामीण ग्राहक आपले पोषण सुधारण्यासाठी आणि रोगप्रतिकारकशक्ती मजबूत करण्यासाठी भरडधान्यांची निवड करीत आहेत. प्रस्तुत लेखात भरडधान्याचे फायदे, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, प्रादेशिक आणि राज्य पातळीवरील भरडधान्ये लागवडीखालील क्षेत्र व उत्पादनातील कल आणि भारत सरकारची भरडधान्ये उत्पादनाला प्रोत्साहन देण्याची भूमिका याबाबतचा आर्थिक अंगाने आढावा घेतला असून, सदर अभ्यास पूर्णपणे दुय्यम आधारसामग्रीवर

† प्राध्यापक व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभागप्रमुख, एस. एन. डी.टी. महिला विद्यापीठ, कर्वे पथ, पुणे- ४११०३८.
आजीव सदस्य क्र. ११६०, भ्रमणध्वनी - ९८५०४३४५८९, ई-मेल - subhashrpatil1971@gmail.com

आधारित आहे.

**भरडधान्याचे फायदे:**

साधारणतः भरडधान्ये ही आकाराने बारीक, गोलाकार तसेच खाण्यासाठी जशीच्या तशी वापरता येऊन त्याला विशेष प्रकारची शुद्धता किंवा कोणतीही विशेष प्रक्रिया करण्याची गरज नसते. गहू आणि तांदूळ यापेक्षा भरडधान्ये अधिक पौष्टिक व श्रेष्ठ आहेत. कारण ते प्रथिने, जीवनसत्त्वे आणि खनिजे यांनी समृद्ध आहेत. भारतात अंदाजे प्रमुख १६ प्रकारची भरडधान्ये उत्पादित आणि निर्यात केली जातात. ज्यात ज्वारी (Sorghum) बाजरी (Pearl millet) नाचणी/ नागली (Finger millet), कांगणी/ राळे (Foxtail millet) शमुळ/ बार्ली (Barnyard millet), भगर/ वरई (Proso millet), कोद्रा (Kodo millet), सावा / साणवा / झांगोरा/ कुटकी (Little millet), राजगिरा (Amaranth Millet) आदी भरडधान्यांचा समावेश आहे.

भरडधान्याचा वापर अन्न आणि चारा या दुहेरी उद्देशांसाठी केला जातो, ज्यामुळे ते अधिक कार्यक्षम बनते. भरडधान्य ही पर्यावरणीय परिस्थितीच्या विस्तृत श्रेणीशी अत्यंत अनुकूल आणि पावसावर अवलंबून असते. अति उष्ण हवामान आणि पाणी, खते आणि किटकनाशकांची किमान गरज असते. आपल्या पूर्वजांनी आहारात निवडलेल्या स्थानिक भरडधान्यांमध्ये अनेक गुणधर्म असून इतर अन्नधान्य व कडधान्याच्या तुलनेत आरोग्याला चालना देणारे पौष्टिक पीक आहे. ते लोह, जस्त आणि कॅल्शियम यांसारख्या खनिजांचे चांगले स्रोत आहेत. आरोग्याच्यादृष्टीने ग्लायसेमिक इंडेक्स (GI) कमी असल्याने मधुमेहाच्या प्रतिबंधास मदत होते. वजन आणि उच्च रक्तदाब कमी करण्यासाठी उपयुक्त असल्याचे आढळले आहे. भारतात, भरडधान्ये सामान्यतः शेंगांसह वापरली जाते, ज्यामुळे प्रथिनांचा भरपूर स्रोत आहे. रेडी टू कुक, रेडी टू इट श्रेणीतील भरडधान्यावर आधारित मूल्यवर्धित उत्पादने शहरी लोकांसाठी सहज उपलब्ध आणि सोयीस्कर आहेत.

भरडधान्यांचे पर्यावरणीय महत्त्व विचारात घेता कमी पाण्यात येणारी पिके असून जेथे भरडधान्ये पिकविली जातात तेथे जमिनीतील नत्राचे प्रमाण वाढून जमिनीचा कस वाढतो. काही पक्ष्यांचे हे आवडते खाद्य आहे. भरडधान्यासोबतच अनेक रानभाज्या व अन्य वनस्पतींची विविधता जपली जाते. पर्यावरणाचा समतोल राखला जातो. विशेष म्हणजे कोणत्याही रासायनिक आदानांचा फारसा वापर न करता याचे पीक उत्तम येते. हे एक पौष्टिक धान्यदेखील आहे. ज्यामध्ये फायबर आणि आवश्यक खनिजे यांचे प्रमाण जास्त असते. या कारणांमुळे भरडधान्य हे महत्त्वाचे अन्न पीक आहे. भरडधान्याचे अमूल्य महत्त्व मान्य करत तसेच संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत ध्येयाशी त्याची सांगड घालता येते.

**भरडधान्याचे आंतरराष्ट्रीय वर्ष २०२३ :**

भरडधान्याचे आहारातील महत्त्व व मुख्य घटक विचारात घेऊन देशांतर्गत आणि जागतिक मागणी वाढविण्यासाठी आणि पोषण सुरक्षेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी भारत सरकारने २०१८ मध्ये 'राष्ट्रीय भरडधान्य वर्ष' साजरे केले होते. तसेच भारत सरकारने संयुक्त राष्ट्राला २०२३ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष' म्हणून घोषित करण्याची सूचना केली होती. भारताला इतर ७२ देशांचा पाठिंबा मिळाला आणि ५ मार्च २०२१ रोजी संयुक्त राष्ट्रमहासभेने (United Nations General Assembly-UNGA) २०२३ हे वर्ष भरडधान्याचे आंतरराष्ट्रीय स्तरावर तसेच भारतात आंतरराष्ट्रीय वर्ष म्हणून घोषित केले. यात भारत सरकारचा मोठा पुढाकार आहे. देशभरात आणि जगभरात भरडधान्याची मूल्यवृद्धी आणि भरडधान्याच्या फायद्यांबद्दल लोकसंख्येला जागरूक करून स्वीकार्यता करण्यावर भर दिला आहे. भरडधान्याचे आंतरराष्ट्रीय वर्ष साजरे करण्यामागे i) अन्नसुरक्षेमध्ये भरडधान्याचे

योगदान वाढविणे, ii) भरडधान्याचे जागतिक उत्पादन वाढविणे, iii) कार्यक्षम प्रक्रिया, वाहतूक, साठवणूक आणि वापर सुनिश्चित करणे आणि iv) भागधारकांच्या सहभागाने भरडधान्याचे शाश्वत उत्पादन आणि गुणवत्ता यांत सुधारणा करणे ही प्रमुख उद्दिष्ट्ये निर्धारित करण्यात आली आहेत.

**वर्तमान आंतरराष्ट्रीय स्थिती:**

भरडधान्ये इ.स. पूर्व ७००० वर्षे लागवडीत होती असे मानण्यात येते. जगातील प्रमुख संस्कृतीतील लोकांनी पोषणासाठी भरडधान्यांचा प्रामुख्याने वापर केला आहे. पुरातन अवशेषांच्या गहू आणि सातू साठविण्याची कोठारे मेसोपोटेमिया, इजिप्त, ग्रीस व इटलीत आणि मक्याची कोठारे माया, अ‍ॅझटेक, इंका आणि पश्चिम गोलार्धातील इतर संस्कृतींच्या उत्खननात मिळाली आहेत. भरडधान्यांची लागवड केल्यामुळे उदरभरणाची हमी मिळाल्याने प्राचीन रानटी अवस्थेतील भटक्या जमातीच्या लोकांनी भटकंती सोडून स्थिर जीवनक्रम सुरू केला.

भरडधान्य हे एक प्रकारचे असे धान्य आहे की, जे जगाच्या अनेक भागांमध्ये विशेषत: आफ्रिका आणि आशियामध्ये लोकप्रिय व मुख्य अन्न आहे. जागतिक खाद्यान्न कार्यक्रमानुसार, अंदाजे १.२ अब्ज लोक आहाराचा एक घटक म्हणून भरडधान्याचे नियमित सेवन करतात. भरडधान्ये पिकांचे उत्पादन, लागवड आणि उपभोग हवामानानुसार, राष्ट्रानुसार आणि खंडांनुसार बदलणारे आहे. अमेरिका आणि युरोपमध्ये भरडधान्ये प्रामुख्याने चाऱ्यासाठी पिकवली जातात, तर आफ्रिकन आणि आशियाई देशांमध्ये ती खाण्यासाठी पिकवली जातात. जागतिक पातळीवर भरडधान्याचे उत्पादन प्रामुख्याने उष्णकटिबंधीय व समशीतोष्ण कटिबंधीय प्रदेशांमध्ये घेतले जाते. त्यातही आशिया आणि आफ्रिका खंडात त्याचे उत्पादन आणि उपभोग मोठ्या प्रमाणावर होतो. जगात प्रामुख्याने ११२ देशांमध्ये ज्वारीचे आणि ३५ देशांमध्ये बाजरीचे उत्पादन घेतले जाते. २०१९ या वर्षी जागतिक पातळीवर, भरडधान्य पिकांखालील लागवड क्षेत्र ७८.४३ दशलक्ष एकर इतके होते, तर ९७.७५ दशलक्ष टन इतके उत्पादन झाले होते. भरडधान्यात ज्वारी आणि बाजरीचा वाटा ९०% इतका आहे, तर नाचणी, रागी, भगर यांचा वाटा १०% इतका आहे. भरडधान्याचे उत्पादन गेल्या काही वर्षांत तुलनेने स्थिर राहिले आहे. आशियानंतर आफ्रिकेमध्ये बहुतेक भरडधान्याचे उत्पादन केले जाते. तक्ता १ मध्ये जागतिक पातळीवरील भरडधान्य लागवड क्षेत्र, उत्पादन आणि उत्पादकता दर्शविली आहे.

जागतिक पातळीवर भरडधान्य उत्पादनात ज्वारीचा वाटा जास्त आहे. एकूण ज्वारी उत्पादनात सुदान, नायजेरिया, भारत, नायजर आणि अमेरिका ही पाच राष्ट्रे आघाडीवर असून त्यांचा वाटा ४५% आणि एकूण लागवडीखालील क्षेत्राचा वाटा ५७% इतका आहे. ज्वारी लागवडीखालील क्षेत्रात सुदानचा तर ज्वारी उत्पादनात अमेरिकेचा प्रथम क्रमांक आहे. जागतिक पातळीवर ज्वारीची प्रतिहेक्टर उत्पादकता १४६० किलोग्रॅम असून, भारतात ती १०६४ किलोग्रॅम इतकी आहे. जागतिक पातळीवर प्रामुख्याने बाजरी उत्पादनात भारत, युथोपिया, नेपाळ, युगांडा आणि मलावी ही पाच राष्ट्रे आघाडीवर असून त्यांचा वाटा ९९.६% आणि एकूण लागवडीखालील क्षेत्राचा वाटा ९९.४% इतका आहे. भारताचा बाजरी उत्पादनात (४६.७%) आणि लागवडीखालील क्षेत्रात (३१.५%) प्रथम क्रमांक आहे. जागतिक पातळीवर बाजरीची प्रतिहेक्टर उत्पादकता ८३४ किलोग्रॅम असून भारतात ती १२३७ किलोग्रॅम इतकी आहे. ज्वारी आणि बाजरीशिवाय इतर भरडधान्याचे उत्पादन आफ्रिकेत प्रामुख्याने इथिओपिया आणि इरिट्रियामध्ये घेतले जाते जे जगाच्या उत्पादनात ९०%पेक्षा जास्त योगदान देतात.

**तक्ता १ : जागतिक पातळीवरील भरडधान्य लागवड क्षेत्र, उत्पादन आणि उत्पादकता (सरासरी २०१५ ते २०१९)**

| भरडधान्य | लागवड क्षेत्र (दशलक्ष हेक्टर) | उत्पादन (दशलक्ष टन) | उत्पादकता (किलोग्रॅम प्रतिहेक्टर) |
|---|---|---|---|
| ज्वारी | ४१.९१ | ६१.१८ | १४६० |
| बाजरी | २८.३८ | २३.६८ | ८३४ |
| चेना/पुनर्वा | ०.७७ | १.१९ | १५३५ |
| नाचणी | २.३१ | ३.३३ | १४४२ |
| कांगणी/ राळे | ०.७९ | २.११ | २६८८ |
| इतर भरडधान्ये | ४.२७ | ६.२६ | -- |
| एकूण | ७८.४३ | ९७.७५ | १२४७ |

Source: Indian Farming, January 2023, ICAR, PP.16

**भारतातील भरडधान्य उत्पादन स्थिती:**

भारतात एकूण निव्वळ लागवडयुक्त १४१ दशलक्ष हेक्टर क्षेत्रापैकी पावसावर आधारित ८५ दशलक्ष हेक्टर क्षेत्र १७७ पेक्षा जास्त जिल्ह्यात व्यापलेले आहे की जे एकूण शेतीक्षेत्राच्या अंदाजे ६०% इतके आहे. देशाच्या एकूण अन्नधान्य उत्पादनात पावसावर आधारित शेतीचा वाटा सुमारे ४४% आहे आणि ७५% कडधान्ये आणि ९०% पेक्षा जास्त ज्वारी, बाजरी आणि भुईमुगाचे उत्पादन कोरडवाहू आणि अर्धशुष्क प्रदेशातून होते. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी काळातदेखील हे क्षेत्र सुमारे ५०% ग्रामीण लोकांना उपजीविका आणि देशाच्या ६०% पशुधनास टिकवून ठेवण्यास मदत करीत आहे.

भारत हा जगातील सर्वात मोठा अन्नधान्य उत्पादक तसेच सर्वात मोठा निर्यातदार देश आहे. भारताचे अन्नधान्य निर्यातीचे मूल्य २०२२-२३ या वर्षात १,११,०६२.३७ कोटी रुपये (म्हणजे १३,८५७.९५ दशलक्ष अमेरिकन डॉलर) इतके होते. याच काळात भारताच्या एकूण अन्नधान्य निर्यातीत तांदळाचा (बासमती आणि बिगर-बासमतीसह) वाटा मूल्याच्या दृष्टीने ८०% तर गव्हासह इतर तृणधान्येचा वाटा २०% इतका आहे. भारत हा जगातील भरडधान्ये उत्पादक देशांपैकी एक प्रमुख देश आहे आणि जगात उत्पादित होणाऱ्या एकूण भरडधान्यांपैकी जवळपास ४०% उत्पादन एकट्या भारतात होते. मात्र देशातील एकूण भरडधान्य उत्पादनापैकी केवळ एक टक्के भरडधान्यांची निर्यात होते.

भारत हा भरडधान्याचा सर्वात मोठा उत्पादक आहे, त्यानंतर नायजर आणि चीनचा क्रमांक लागतो. इतर प्रमुख भरडधान्य उत्पादक देशांमध्ये बुर्किना फासो, माली आणि सेनेगल यांचा समावेश होतो. विकसित जगामध्ये भरडधान्य हे प्रमुख अन्नपीक नसले तरी विकसनशील देशांतील अनेक लोकांच्या आहारात ती महत्त्वाची भूमिका बजावते. भारतात अलीकडच्या काळात भरडधान्याचे उत्पादन वाढत आहे. भारत भरडधान्याच्या सर्वात मोठ्या उत्पादकांपैकी एक आहे आणि भारतीय शेतकरी दुष्काळ प्रतिरोधक पीक म्हणून भरडधान्याची वाढत्या प्रमाणात लागवड करत आहेत.

१९७० मध्ये जगात भरडधान्य लागवडीखालील क्षेत्र ७०.३८ कोटी हेक्टर इतके होते. त्यापैकी भारताचा वाटा १४.५% तर उत्पादनातील वाटा ९.३% इतका

होता. भरडधान्यांपैकी भारतात भाताखाली सर्वात जास्त क्षेत्र आहे. त्यानंतर ज्वारी, बाजरी व गहू यांचा क्रम लागतो. सद्य:स्थितीत जागतिक पातळीवर भरडधान्ये निर्यात करणाऱ्या पहिल्या पाच देशांत भारताचा समावेश होतो. २०२० या वर्षात भरडधान्याच्या जागतिक निर्यातीचे मूल्य ४०० दशलक्ष डॉलर तर २०२१ या वर्षात ते ४७० दशलक्ष डॉलर इतके होते. भारताने २०२२-२३ मध्ये ७५.४६ दशलक्ष डॉलर किमतीची भरडधान्याची निर्यात केली. २०२१-२२ मध्ये त्याचे मूल्य ६२.९५ दशलक्ष डॉलर इतके होते. अर्थात, भरडधान्य आधारित मूल्यवर्धित उत्पादनांचा वाटा नगण्य आहे. भारत सरकार आपल्या राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियानाचा भाग म्हणून भरडधान्याच्या उत्पादनाला प्रोत्साहन देत आहे. या घटकांचा परिणाम म्हणून, भारतातील भरडधान्याचे उत्पादन येत्या काही वर्षांत वाढत राहाण्याची अपेक्षा आहे. तक्ता २ मध्ये भारतातील भरडधान्याचे क्षेत्र आणि उत्पादनाचा सरासरी कल दर्शविला आहे.

**तक्ता २: भारतातील भरडधान्याच्या उत्पादनाचा कल (२००९ ते २०२२)**

| भरडधान्य | क्षेत्र (दशलक्ष हेक्टरमध्ये) | | उत्पादन (दशलक्ष टनमध्ये) | | उत्पादकता किलोग्रॅम प्रतिहेक्टर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | २००९-१३ | २०१४-१८ | २०१९-२२ | २००९-१३ | २०१४-१८ | २०१९-२२ | २०१९-२२ |
| ज्वारी | ६.६८ | ४.९१ | ४.३५ | ४.२९ | ४.४० | ४.६३ | १०६४ |
| बाजरी | ८.४८ | ७.१४ | ७.४१ | ७.०३ | ८.७४ | १०.१५ | १३६९ |
| रागी | १.२१ | १.१० | १.१० | ९.८५ | १.७१ | १.८१ | १६४७ |
| लहान तृणधान्ये | ०.७७ | ०.५७ | ०.४४ | ०.४३ | ०.४० | ०.३५ | ८०० |
| एकूण भरडधान्ये | १७.१५ | १३.७२ | १२.६८ | १२.७४ | १५.२५ | १६.९३ | १२७३ |

Source: Indian Farming, January 2023, ICAR, PP.17.

भरडधान्य उत्पादनात भारत आघाडीवर आहे. भारतात सुमारे १२.७ दशलक्ष हेक्टर क्षेत्रातून एकूण १६.९ दशलक्ष टन भरडधान्य उत्पादन घेतले जाते, ज्याचा हिस्सा एकूण राष्ट्रीय अन्नधान्य उत्पादनात सुमारे ६% इतका आहे. सुमारे ७४ लाख हेक्टरक्षेत्रावर बाजरीचे १०.१ दशलक्ष टन उत्पादन पीक घेतले जाते. त्या खालोखाल ज्वारी (४.३५ दशलक्ष हेक्टर, उत्पादन ४.६३ दशलक्ष टन), नाचणी (१.१ दशलक्ष हेक्टर, उत्पादन १.५८ दशलक्ष टन) आणि इतर भरडधान्ये (०.४४ दशलक्ष हेक्टर, उत्पादन ०.३५ दशलक्ष टन) ज्वारी, बाजरी आणि नाचणी यांचा हिस्सा सुमारे ९५% इतका आहे. गेल्या काही वर्षांत पाश्चात्त्य आहाराच्या प्रभावामुळे भारतीयांच्या रोजच्या आहारातील भरडधान्ये कमी झाली आहेत. हरितक्रांतीमुळे नंतरच्या काळात भरडधान्यांची जागा हळूहळू बाजारपेठेत सर्वाधिक मागणी असलेल्या गहू, तांदूळासह इतर नगदी पिकांनी घेतल्याने भरडधान्य लागवडीखालील क्षेत्रात घट झाल्याचे दिसते. अशी घट होण्यास कारणीभूत असणाऱ्या घटकांत स्पर्धात्मक पिकांची तुलनेने जास्त मागणी व जास्तीचा नफा, कमी बाजारभाव, प्रतिस्पर्धी पिकांना अन्नपीक म्हणून कृत्रिमरीत्या आधार, शहरीकरण आणि उत्पन्नवाढ यामुळे जीवनशैलीतील बदल इत्यादींचा समावेश आहे.

**भारतातील राज्यनिहाय स्थिती :**

भारत हे भरडधान्याच्या प्रमुख उत्पादक आणि पुरवठादारांपैकी एक राष्ट्र आहे. भारतातील बरीचशी राज्ये भरडधान्ये पिकाच्या एक किंवा अधिक प्रजाती पिकवतात. भारतात राजस्थान, महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, गुजरात आणि मध्यप्रदेश ही भारतातील मुख्य भरडधान्य उत्पादक राज्ये आहेत. या राज्यांव्यतिरिक्त, संपूर्ण भारतात अनेक लहान भरडधान्य उत्पादक प्रदेश आहेत. ज्यात उत्तरप्रदेश, बिहार आणि मध्यप्रदेश या राज्यांचा प्रामुख्याने समावेश होतो. तक्ता ३ मध्ये भारतातील राज्यनिहाय भरडधान्याचे क्षेत्र व उत्पादन दर्शविले आहे.

**तक्ता ३: भारतातील राज्यनिहाय भरडधान्याचे क्षेत्र व उत्पादन (वर्ष २०२२)**

| राज्ये | ज्वारी | | बाजरी | | नाचणी | | लहान भरडधान्ये | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | क्षेत्र | उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | क्षेत्र | उत्पादन |
| महाराष्ट्र | २२५७ | १६४१ | ७१९ | ५९४ | ८६ | ९८ | ५० | २५ | ३११२ | २३५८ |
| कर्नाटक | ९११ | ९५४ | २४० | २७२ | ६६६ | १०७१ | ३० | २१ | १८४७ | २३१९ |
| राजस्थान | ५७२ | ४३३ | ४२४० | ४१९३ | -- | -- | १० | ८ | ४८२३ | ४६३३ |
| तामिळनाडू | ३७९ | ३९९ | ५९ | १४२ | ७९ | २५१ | २४ | ३१ | ५४१ | ८२३ |
| उत्तरप्रदेश | १६८ | २१६ | ९०७ | १८५३ | -- | -- | ९ | ६ | १०८४ | २०७५ |
| मध्यप्रदेश | १५७ | २९९ | ३०८ | ६९२ | १ | ० | ११७ | ९२ | ५८२ | १०८३ |
| आंध्रप्रदेश | १३४ | ३०६ | ३४ | ६३ | ३३ | ४१ | २२ | १७ | २२२ | ४२८ |
| तेलंगणा | ७८ | १०२ | ११ | १० | १ | २ | १ | १ | ९१ | ११३ |
| गुजरात | ७२ | ९९ | ४२३ | ९४२ | १३ | १४ | ९ | १२ | ५१८ | १०६७ |
| हरियाणा | ४२ | २२ | ४८३ | ९८६ | --- | --- | --- | --- | ५२५ | १००९ |
| ओडीसा | ६ | ४ | २ | १ | ४१ | ३० | ३१ | १६ | ८० | ५१ |
| छत्तीसगढ | ३ | ४ | --- | --- | ६ | १ | ८३ | २३ | ९२ | २९ |
| उत्तराखंड | --- | --- | --- | --- | ९५ | १३२ | ५६ | ७५ | १५१ | २०७ |

Source: Indian Farming, January 2023, ICAR, Pp.17.

(टीप : क्षेत्र हजार हेक्टरमध्ये आणि उत्पादन हजार टनामध्ये दर्शविले आहे.)

तक्ता ३ नुसार, ज्वारी उत्पादनात महाराष्ट्र, बाजरी उत्पादनात राजस्थान, नाचणी उत्पादनात कर्नाटक आणि लहान भरडधान्ये उत्पादनात मध्यप्रदेश व उत्तराखंड ही राज्ये आघाडीवर आहेत.

**महाराष्ट्र राज्यातील भरडधान्याची स्थिती :**

शेती हा महाराष्ट्र राज्याचा मुख्य आधार व लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. राज्यात अन्नधान्य पिके व नगदी पिके अशी दोन्ही पिके घेतली जातात. प्रमुख पिकांमध्ये तांदूळ, ज्वारी, बाजरी, गहू, कडधान्ये, हळद, कांदे, कापूस, ऊस, भुईमूग, सूर्यफूल आणि सोयाबीन यासह अनेक तेलबियांचे उत्पादन घेतले जाते. राज्यात फळांखाली मोठे क्षेत्र (सुमारे ८३० हजार हेक्टर) असून त्यात आंबा, केळी, द्राक्षे, डाळिंब आणि संत्री या मुख्य फळांची लागवड केली जाते. राज्यातील शेती प्रामुख्याने पावसावर अवलंबून असून देशातील एकूण २४% दुष्काळ प्रवण क्षेत्र महाराष्ट्रात आहे. तथापि,

कृषी विकासात अनेक आव्हाने असूनही राज्यात विकासाची क्षमता आहे. राज्यात वर्षभर अनेक फळे, भाज्या आणि पिके घेण्यास अनुकूल वातावरण आहे. मात्र अवर्षण प्रवण क्षेत्रात सातत्याने पडणारा दुष्काळ हे महाराष्ट्रातील एक मोठे आव्हान आहे. शेती आणि पशुधन हे सुमारे ६४%पेक्षा जास्त लोकांचे उत्पन्नाचे साधन आहे. तथापि, जवळपास ५६% निव्वळ पेरणी क्षेत्र अनियमित पावसावर अवलंबून आहे. महाराष्ट्र राज्यात गेल्या १० ते १२ वर्षात भरडधान्य उत्पादनात घट होताना दिसते. २०११ या वर्षात ज्वारी, बाजरी आणि नाचणी या पिकांच्या लागवडीखालील क्षेत्र अनुक्रमे २३, १८ आणि १.३० लाख हेक्टर इतके तर उत्पादन अनुक्रमे १३, ८ आणि १.३७ लाख टन इतके होते. २०२२ या वर्षात ज्वारी, बाजरी आणि नाचणी या पिकांच्या लागवडीखालील क्षेत्र अनुक्रमे १९, ७ आणि ०.८० लाख हेक्टर इतके, तर उत्पादन अनुक्रमे १८ , ६ आणि १ लाख टन इतके होते. ज्वारी पिकाच्या उत्पादनात वाढ होत असून बाजरी आणि नाचणी पिकांच्या एकूण उत्पादनात घट झाल्याचे दिसते. तक्ता ४ मध्ये २०२०-२१ या वर्षातील महाराष्ट्र राज्यातील विभागनिहाय भरडधान्य लागवडीखालील क्षेत्र आणि उत्पादन दर्शविले आहे.

**तक्ता ४: महाराष्ट्र राज्यातील विभागनिहाय भरडधान्य उत्पादन (वर्ष २०२०-२१)**

| विभाग | ज्वारी (खरीप) | | ज्वारी (रब्बी) | | बाजरी | | रागी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | क्षेत्र | उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | क्षेत्र | उत्पादन |
| कोकण | --- | --- | --- | --- | --- | --- | ३१.८६ | ३२.९३ |
| नाशिक | ८२.१५ | १३३.८७ | ७५.८७ | ११४.१२ | १७१.९९ | २४७.९१ | २२.७५ | १६.२७ |
| पुणे | ५.७३ | ३.५३ | ९५८.२४ | ६७९.१७ | २४८.६९ | ३२८.०२ | २.५८ | २.०३ |
| कोल्हापूर | ७२.६८ | १०.५३ | २७९.९२ | २६८.६४ | १२४.८५ | ११७.४९ | २४.४२ | ४२.६८ |
| औरंगाबाद | ८.७१ | ६.०७ | २७०.६० | २९५.४६ | १२९.८५ | २०६.४८ | --- | --- |
| लातूर | १५६.०१ | ९५.३१ | ३२८.१८ | ४१७.१२ | ९.७२ | ४.५९ | ०.०१ | ०.००८ |
| अमरावती | ५०.३७ | ३५.६२ | २१.४९ | २५.८६ | २.३७ | १.१२ | --- | --- |
| नागपूर | ३.०७ | १.६७ | ७.३६ | ४.५० | --- | --- | --- | --- |
| महाराष्ट्र | ३७८.७० | ३८१.४० | १९४१.७० | १८०४.९० | ६८७.५० | ९०५.६० | ८१.६० | ९३.९० |

Source: E-Catalogue for Export of Millets and Value-Added Products Maharashtra, APEDA, PP.5

(टीप : क्षेत्र हजार हेक्टरमध्ये आणि उत्पादन हजार टनामध्ये दर्शविले आहे.)

तक्ता ४ नुसार, ज्वारी (खरीप) उत्पादनात नाशिक व लातूर विभाग, ज्वारी (रब्बी) उत्पादनात पुणे व लातूर विभाग, बाजरी उत्पादनात पुणे, नाशिक व औरंगाबाद विभाग आणि रागी उत्पादनात कोल्हापूर व कोकण आघाडीवर आहेत. महाराष्ट्र राज्यात प्रामुख्याने सोलापूर, अहमदनगर , उस्मानाबाद, बीड, सातारा, सांगली, पुणे, परभणी, जालना, जळगाव या जिल्ह्यांमध्ये ज्वारीचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. बाजरीचे पीक अहमदनगर, नाशिक, बीड, सातारा, धुळे, सांगली, पुणे, सोलापूर, औरंगाबाद (सध्याचे छत्रपती संभाजीनगर) आणि जळगांव या जिल्ह्यात होते, तर नाचणीचे पीक नाशिक, कोल्हापूर, पालघर, रत्नागिरी,

सातारा, रायगड, पुणे, ठाणे आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांत घेतले जाते.

**भरडधान्य संवर्धनासाठी भारत सरकारचा पुढाकार :**

भरडधान्य संवर्धन व प्रोत्साहनासाठी केंद्र सरकारने अनेक पावले उचलली आहेत. भरडधान्याच्या लागवडीकरिता शेतकऱ्यांना मदतीसाठी शासनामार्फत खालील योजना राबविल्या जात आहेत.

१) शेतीचे स्थूल व्यवस्थापनात एकात्मिक तृणधान्य विकास कार्यक्रम (Integrated Cereals Development Programmes in Coarse Cereals- ICDP-CC) अंतर्गत भरडधान्य समाविष्ट आहे.

२) राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत (Rashtriya Krishi Vikas Yojana - RKVY) पर्जन्यसिंचित क्षेत्र विकास कार्यक्रम (Rainfed Area Development Programme-RADP) समाविष्ट आहे.

३) राष्ट्रीय कृषी विकास योजना अंतर्गत सघन भरडधान्य संवर्धनाद्वारे पोषण सुरक्षेसाठी पुढाकार.

४) भरडधान्याचे पौष्टिक मूल्य विचारात घेऊन सरकारने भरडधान्यास पौष्टिक तृणधान्ये म्हणून अधिसूचित केले आहे आणि त्याचा समावेश पोषण अभियानअंतर्गत केला आहे.

५) केंद्रीय अर्थसंकल्प २०२३-२४ मध्ये सरकारने भरडधान्याचे नामांकन 'श्रीअन्न' असे केले आहे की, ज्याचा अर्थ 'सर्व अन्नधान्यांमध्ये सर्वोत्तम' असा होतो. यामुळे भरडधान्याविषयी जागरुकता निर्माण होऊन जगभरात लागवडीखालील क्षेत्रफळ, उत्पादन आणि उत्पादकता वाढून मागणीत वाढ होईल आणि भरडधान्याच्या बाजारपेठेचा विस्तार वाढेल.

याशिवाय भरडधान्यास प्रोत्साहन देण्यासाठी भारत सरकारच्या योजना पुढीलप्रमाणे सांगता येतील.

i) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान (National Food Security Mission -NFSM): कृषी आणि संलग्न क्षेत्रांचा सर्वांगीण विकास सुनिश्चित करण्यासाठी हे अभियान ऑक्टोबर २००७ मध्ये सुरू झाले. भरडधान्याची लागवड करणे हा यामधील एक मुख्य घटक आहे. अन्नसुरक्षा आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी भरडधान्याचे उत्पादन वाढविणे हे या अभियानाचे मुख्य ध्येय्य आहे.

ii) राष्ट्रीय कृषी विकास योजना (Rashtriya Krishi Vikas Yojana -RKVY) : शेती आणि संलग्न क्षेत्राचा सर्वांगीण विकास सुनिश्चित करण्यासाठी २००७ मध्ये छत्री योजना सुरू झाली. २०२२-२३ परंपरागत कृषी विकास योजना, पीक वैविधीकरण कार्यक्रम इत्यादींचे विलीनीकरण करून ही योजना पुनर्रचित करण्यात आली. भरडधान्ये व इतर पिकांची लागवडीसाठी सुधारित शेती पद्धती, तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधा अवलंब करण्यास राज्यांना वित्तीय मदत केली जाते.

iii) शाश्वत कृषी राष्ट्रीय अभियान (National Mission for Sustainable Agriculture - NMSA): पावसावर अवलंबून असलेल्या भागात कृषी उत्पादकता वाढविणे, एकात्मिक शेती, पाणी वापर, मृदा आरोग्य व्यवस्थापन व संसाधन संवर्धनात समन्वय साधणे, भरडधान्याच्या लागवडीसह शाश्वत कृषी पद्धती, उत्पादकता वाढवणे, नैसर्गिक संसाधनांचे जतन करणे आणि हवामान बदलाशी जुळवून घेऊन शेती उत्पादनात बदल करणे यावर NMSAलक्ष केंद्रीत करते.

iv) परंपरागत कृषी विकास योजना (Paramparagat Krishi Vikas Yojana - PKVY) : ही योजना भरडधान्ये लागवडीसह सेंद्रिय शेती पद्धतीस प्रोत्साहित करते. सेंद्रिय शेती पद्धतीचा अवलंब करण्यासाठी शेतकऱ्यांना आर्थिक मदत व तांत्रिक सहाय्य आणि सेंद्रिय प्रमाणपत्र मिळविण्याकरिता

मदत करते.

v) पौष्टिक -तृणधान्य अभियान: NFSM अंतर्गत २०१८-१९ या वर्षासाठी पौष्टिक तृणधान्यांवरील उपअभियानाकरिता ३०० कोटी रुपयांच्या खर्चासह सुरुवात केली. उत्पादन, मागणी आणि बाजाराभिमुख दृष्टिकोनातून संशोधन यासाठी विकास व्यूहरचना तयार करणे हे त्याचे ध्येय आहे. देशातील निवडक जिल्ह्यांमध्ये क्षेत्रविस्तार आणि उत्पादकता वाढीद्वारे न्यू पौष्टिक भरडधान्यांचे शाश्वत पद्धतीने उत्पादन वाढविणे, त्यांची बियाणे पुरवठा व्यवस्था बळकट करणे, कार्यक्षम बाजार लिंकेजद्वारे शेतकऱ्यांच्या उत्पादनाला चांगला बाजारभाव प्राप्त करणे ही या अभियानाची मुख्य उद्दिष्ट्ये आहेत.

vi) भरडधान्ये विकास कार्यक्रम: भारतीय कृषी संशोधन परिषद (The Indian Council of Agricultural Research - ICAR) : द्वारा भरडधान्य उत्पादन संशोधन, विकास आणि प्रचार यांस चालना व समर्थन देण्यासाठी भरडधान्ये विकास कार्यक्रम सुरू केला आहे. या कार्यक्रमातून भरडधान्याचे सुधारित वाण, शेतीविषयक पद्धती आणि तंत्रज्ञान सुधारणांवर लक्ष केंद्रित केले जाते.

**भरडधान्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यांची अभियाने:**

भरडधान्यांचा वापर पुनरुज्जीवित करण्याच्या उद्देशाने २०१७ मध्ये ओडिसा राज्याने भरडधान्य अभियान सुरू केले. याद्वारे उत्पादन, प्रक्रिया, वापर, विपणन याबरोबरच सरकारी योजनांमध्ये समावेशन करण्यावर भर दिला जात आहे. आंध्रप्रदेश व छत्तीसगड या राज्यातील आदिवासी आणि दुष्काळ निवारण प्रकल्पाद्वारे भरडधान्यांची लागवड व व्यापक पुनरुज्जीवन हे अधोरेखित करण्यायोग्य आहे. हरियाणा राज्यात भावांतर भारपेयी योजना, मध्यप्रदेशमध्ये कोडो आणि लहान भरडधान्याचा प्रचार, नागालँड व तामिळनाडू येथे पौष्टिक -तृणधान्य अभियानाद्वारे आहारामध्ये भरडधान्याला प्रोत्साहन दिले जात आहे. या उपक्रमांचा सकारात्मक परिणाम भरडधान्याचा मागणी व उत्पादनावर झाला आहे.

**भरडधान्य संवर्धनासाठी महाराष्ट्र शासनाची भूमिका:**

राष्ट्रीय पातळीवरील प्रयत्नांबरोबरच राज्यपातळीवर महाराष्ट्र राज्यात कृषी विद्यापीठांमधून जमिनीच्या प्रतवारीनुसार भरडधान्यांचे बियाणे व विविध वाणांचे संशोधन केले जात आहे. राज्यातील पौष्टिक भरडधान्ये उत्पादन क्षेत्र वाढीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे आणि त्या उत्पादनांना योग्य हमीभाव मिळेल यासाठी महाराष्ट्र राज्य शासन आग्रही आहे. महाराष्ट्र शासनानेदेखील 'महाराष्ट्र मिलेट मिशन' सुरू करून यासाठी २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यांत भरडधान्य प्रक्रिया उद्योगांना अर्थसहाय्य केले जात आहे. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया, मुख्यमंत्री अन्नप्रक्रिया योजना, स्मार्ट प्रकल्प यांची सांगड घालून शेतकरी उत्पादक कंपन्यांना अर्थसहाय्य करण्यात येत आहे. शासन स्तरावरून भरडधान्य पिकांचे क्षेत्र व उत्पादन वाढीसाठी त्यांच्या आधारभूत किंमतीत मोठी वाढ केली आहे. ज्वारीसाठी ७३% टक्के, बाजरीसाठी ६५% आणि नाचणीसाठी ८८% वाढ केली आहे. महाराष्ट्रातील ३१ जिल्ह्यांमध्ये ज्वारी, बाजरी आणि नाचणी पिकांसाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे. पौष्टिक भरडधान्य विकासासाठी उत्पादन व उत्पादकतेत वाढ, पोषणमूल्य व आरोग्यविषयक फायदे, मूल्यवर्धन, प्रक्रिया व पाककृती विकास, नवउद्योगातून व्यावसायिक दृष्टिकोन वाढविणे, प्रचारप्रसिद्धीतून जनजागृती, निर्यातवृद्धी आणि धोरणात्मक निर्णयातून अंमलबजावणी ही भरडधान्य विकासाची सप्तसूत्री आहे.

**सारांश :**

शतकानुशतके भरडधान्य हे भारतातील मुख्य पीक होते; परंतु हरितक्रांतीनंतर ते उपेक्षित झाले. कारण गहू

आणि तांदळाच्या उच्च उत्पादन देणाऱ्या वाणांचा वापर करून अन्नधान्य उत्पादन आणि उत्पादकता वाढविण्यावर भर देण्यात आला. मात्र आधुनिक ग्राहक हळूहळू, पण अधिकाधिक पोषक तत्त्वांनी समृद्ध भरडधान्याकडे गहू आणि तांदळाला योग्य पर्याय म्हणून पाहात आहेत. कोविड-१९ मुळे तर त्याचा वेग वाढला असून, नागरी आणि ग्रामीण ग्राहक आपले पोषण सुधारण्यासाठी आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी भरडधान्यांची निवड करीत आहेत. देशांतर्गत आणि जागतिक पातळीवर भरडधान्यांची मागणी निर्माण करण्यासाठी आणि लोकांना पौष्टिक अन्न पुरविण्यासाठी भारत सरकारने संयुक्त राष्ट्रांच्या महासभेच्या सहकार्याने २०२३ हे 'आंतरराष्ट्रीय भरडधान्ये वर्ष' घोषित केले. शिवाय भरडधान्याचे नामांकन 'श्रीअन्न' असे केले. काढणीपश्चात मूल्यवर्धन, देशांतर्गत वापर वाढविणे आणि भरडधान्य उत्पादनांचे देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय स्तरावर भरडधान्याच्या प्रचार व प्रसारासोबतच मागणी आणि पुरवठा याचा विस्तार करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. महाराष्ट्र शासनाने देखील 'महाराष्ट्र मिलेट मिशन' सुरू करून महाराष्ट्रातील ३१ जिल्ह्यांमध्ये ज्वारी, बाजरी आणि नाचणी पिकांसाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान राबविण्यात येऊन भरडधान्य प्रक्रिया उद्योगांना अर्थसहाय्य केले जात आहे. राज्यातील पौष्टिक भरडधान्ये उत्पादन क्षेत्र वाढीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे आणि त्या उत्पादनांना योग्य हमीभाव मिळेल यासाठी महाराष्ट्र राज्यशासन आग्रही आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची


१. Chikkathimme Growda, (2019), "Millets production and prospects in India: An economic overview' ResearchGate.

२. E-Catalogue for Export of Millets and Value-Added Products Maharashtra, Agricultural and Processed Food Products Export Development Authority, Ministry of Commerce and Industry, Government of India, 2023.

३. Economic Survey of Maharashtra 2020-21, 2021-22, Directorate of Economics and Statistics, Planning Department, Government of Maharashtra, Mumbai.

४. FAOSTAT database, http://www.fao.org/faostat/en/

५. Indian farming, January 2023, ICAR, Volume 73, No.01.

६. Millets- Annual Report-2022, ICAR-Indian Institute of Millets Research, Hyderabad.

७. Millets-Future of Food and Farming, Millet Network of India- Deccan Development Society-FIAN, India, 2023.

८. Millets- Reviving Health and Heritage: Shri Anna, Pryavaran patra, Vol.17.1.4, Environmental Information, Awareness, Capacity Building and Livelihood Programme (EIACP) Department of Environment, Chandigarh Administration, Chandigarh, 2023.

९. NABARD, (2023), International Year of Millets 2023. National Bank for Agriculture and Rural Development. Available at: https://www.nabard.org/international-year-ofmillets-2023.aspx.

१०. NITI Aayog, (2023), Promoting millets in diets: Best practices across states/UTs of India. Available at: https://niti.gov.in/sites/default/files/2023- 06/Report-on-Promoting

-Best-practices-on Millet-26_4_23.pdf.

११. Pouchepparadjou and others (Editors) (2023), "Sensitizing the Millet Farming, Consumption and Nutritional Security- Challenges and Opportunities, Department of Agricultural Economics and Agricultural Extension, Pandit Jawaharlal Nehru College of Agriculture and Research Institute, Karaikal, Puducherry, India.

१२. Satyam Raj, (2023), "Millet economy and Government interventions in India', ResearchGate.

१३. The Millets of India, Environmental Information, Awareness, Capacity Building and Livelihood Programme (EIACP), Wildlife Institute of India, Dehradun, 2023.

१४. चौधरी व गोखले, 'तृणधान्ये', मराठी विश्वकोश, https://vishwakosh.marathi.gov.in/18760/

१५. जोरवर नीलिमा, (२०२२), 'शेतासह ताटामधूनही नामशेष होताहेत भरडधान्ये', ॲग्रोवन इ-सकाळ, २ मे २०२२ (https://agrowon.esakal.com/market-intelligence/market-trend/coarse-grains-are-becoming-extinct-even-from-the-fields-and-trays).

१६. पाटील निलेश, (२०२२), 'भरडधान्य- काळाची आवश्यकता', दैनिक सनातन प्रभात, २३ ऑगस्ट २०२२, (https://sanatanprabhat.org/marathi/606919.html).

१७. भरडधान्य, विकिपीडिया, मुक्तर ज्ञानकोश (https://mr.wikipedia.org/wiki/).

१८. भरडधान्ये तसेच त्यांच्या मूल्यवर्धित उत्पादनांच्या निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारची कृती योजना, वाणिज्य व उद्योग मंत्रालय, नवी दिल्ली, १० नोव्हेंबर २०२२, (https://pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID=1874989)

१९. लोकराज्य, फेब्रुवारी २०२३, वर्ष ७४ वे, अंक ५, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन.

◆

स्पर्धा केवळ उपभोगासाठी संरक्षणाचा आधार नाही, तर प्रगतीसाठी प्रोत्साहन आहे

- हार्बर्ट हुवर

# पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास

**अजय दरेकर** †

**प्रस्तावना :**

भारतात दारिद्र्यरेषेबाबत अभ्यासास स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरुवात झाली आहे. भारतीय अर्थशास्त्राचे जनक दादाभाई नौरोजी यांनी त्यांच्या 'पॉव्हर्टी अ‍ॅण्ड ब्रिटिश अन रूल इन इंडिया' या पुस्तकात देशातील दारिद्र्याबाबत उल्लेख केला होता. त्यांनी दारिद्र्यरेषा निश्चितीसाठी १८६७-६८ हे पायाभूत वर्ष निश्चित करून दरडोई प्रतिवर्षी १६ ते ३५ रुपये या दरम्यान दारिद्र्यरेषा निश्चित केली होती.

स्वातंत्र्यानंतर देखील केंद्रसरकारने विविध समित्यांची नेमणूक करून देशातील दारिद्र्य मोजमाप करण्याचे कार्य पार पाडले आहे. केंद्र सरकारने आपली कल्याणकारी राज्याची भूमिका पार पाडताना देशातील दारिद्र्याचे उच्चाटन करण्यासाठी शहरी आणि ग्रामीण पातळीवर विविध सामाजिक स्वरूपाच्या योजना सुरू केल्या. त्यामध्ये प्रामुख्याने स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना ही स्वयंरोजगाराची योजना गावपातळीवर सुरू केली. तसेच शहरी भागातील दारिद्र्याचे निर्मूलन करण्यासाठी स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना सुरू केली. तसेच गरीब लोकसंख्येच्या अन्न व पोषण दर्जात सुधारणा करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था, एकात्मिक बालविकास कार्यक्रम यांसारखे कार्यक्रम सुरू केले आहेत. संयुक्त राष्ट्राने देखील जगातील दारिद्र्याचे उच्चाटन करण्यासाठी आठ ध्येये निश्चित केली असून, त्यात दारिद्र्यनिर्मूलनाचा समावेश आहे. भारतात आपल्या विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून दारिद्र्याखालील लोकसंख्येला दारिद्र्यरेषेच्यावर आणले आहे. त्यामुळे सध्या दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण १४.९% इतके खाली आले आहे. यापुढे देखील सरकारने सामाजिक विकासाचे कार्यक्रम हाती घेणे गरजेचे आहे.

भारतातील एकूण दारिद्र्यरेषेखालील कुटुंबसंख्या २०२१-२२ प्रमाणे १७०५.२६ लाख एवढी आहे. भारतात सर्वात जास्त दारिद्र्यरेषेखालील कुटुंबसंख्या बिहार ४८२.१६ लाख, उत्तरप्रदेश ३७३.१६ लाख, मध्यप्रदेश १९२.०७ लाख, महाराष्ट्र १०१.६० लाख या राज्यात आढळते, तर सर्वात कमी दारिद्र्यरेषेखालील कुटुंबसंख्या म्हणून जम्मू-काश्मीर या राज्यांचा क्रमांक लागतो.

महाराष्ट्रात ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची संख्या २०२१-२२ मध्ये ४३,०८,५९७ एवढी

† सहयोगी प्राध्यापक, मु.सा. काकडे महाविद्यालय सोमेश्वरनगर, ता.बारामती, जि.पुणे ४१२३०६.
आजीव सभासद क्र. ८६५, भ्रमणध्वनी : ७७२००५१८५७, ई-मेल : ajaydarekar1857@gmail.com

आहे. महाराष्ट्र राज्यातील २०२१-२२ नुसार ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या विचारात घेतल्यास सर्वात जास्त जळगांव २,६८,०६८, नाशिक २,४८,८४५, ठाणे २,३५,९२२, अमरावती २,०८,०९८ यांचा क्रमांक लागतो. त्यानंतर रत्नागिरी, जालना, धुळे, सोलापूर, उस्मानाबाद, नागपूर, पुणे, गडचिरोली, रायगड, बीड, वाशिम, लातूर, भंडारा, अहमदनगर, यवतमाळ, अकोला व वर्धा या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. महाराष्ट्र राज्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची लोकसंख्या सर्वांत कमी हिंगोली ५९,४२२ या जिल्ह्यात आढळते.

पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची सर्वांत जास्त लोकसंख्या २०२१ प्रमाणे बारामती १४,३१२, हवेली १३,३७५, इंदापूर १३,२१९, जुन्नर १२,८६५, खेड ११,९४०, दौंड ११,१६३, शिरूर ९,७१०, आंबेगाव ८,३३३, पुरंदर ७,३११, मावळ ६,८०८, भोर ६,६५५, मुळशी ४,२४६ आणि वेल्हे या तालुक्यात सर्वांत कमी २,१९५ एवढी आहे.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये :**

१. पुणे जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या प्रगतीचा अभ्यास करणे.
२. पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे.
३. पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांसाठी असणाऱ्या शासकीय योजनांचा अभ्यास करणे.

**अभ्यासाची गृहीतके :**

१. ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत सुधारणा होत आहे.
२. ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांना शासकीय योजनांचा लाभ होत आहे.
३. ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांमध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण कमी आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर केला आहे. कोणतेही संशोधन करीत असताना त्या संशोधनासाठी वास्तविक माहिती संकलित करावी लागते. प्राथमिक सामग्रीमध्ये ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लाभार्थ्यांची प्रश्नावली व निरीक्षण करून माहिती गोळा करण्यात आली आहे. संशोधन करीत असताना प्राथमिक स्त्रोतांद्वारे जी माहिती गोळा केली आहे ती स्तरीत यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने केली आहे.

**पुणे जिल्ह्याची निवड :**

भारतातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या सन २०२१-२२ मध्ये सर्वात जास्त बिहार (४८२.१ लाख) राज्यात आढळते. त्यानंतर उत्तर प्रदेश (१७३.१६ लाख), मध्यप्रदेश (१९२.०७ लाख) महाराष्ट्र (१०१.६० लाख) या राज्यांचा क्रमांक लागतो. तर भारतात सर्वात कमी दारिद्र्यरेषेखालील लोकांची लोकसंख्या जम्मू-काश्मीर या राज्यात दिसून येते. प्रस्तुत अभ्यासासाठी प्राथमिक तसेच दुय्यम साधनसामग्रीचा वापर केलेला आहे. प्राथमिक सामग्री जमा करण्यासाठी नमुना निवड करून प्रश्नावलीच्या साहाय्याने माहितीचे विश्लेषण केलेले आहे. प्रस्तुत अभ्यासासाठी पुणे जिल्ह्याची निवड करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्रात ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची संख्या २०२१-२२ मध्ये ४३,०८,५९७ एवढी आहे. महाराष्ट्र राज्यातील २०२१-२२ नुसार ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या विचारात घेतल्यास सर्वात जास्त जळगांव (२,६८,०६८), नाशिक (२४,८८५), ठाणे (२,३५,९२२), अमरावती (२,०८,०९८) यांचा क्रमांक लागतो. रत्नागिरी,

तक्ता क्र. १ महाराष्ट्रातील जिल्हानिहाय दारिद्र्यरेषेखालील ग्रामीण कुटुंबाची संख्या (२०२१-२२)

| अनुक्रमांक | जिल्हा | ग्रामीण कुटुंबांची एकूण संख्या | दारिद्र्यरेषेखालील ग्रामीण कुटुंबे | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी | ३५११५८ | १२१७५६ | २.८२ |
| २ | हिंगोली | १७२०९२ | ५९४२२ | १.४० |
| ३ | जालना | २७४३१५ | १०५१८८ | २.४४ |
| ४ | धुळे | ३११७८७ | १६७२७३ | ३.९ |
| ५ | सोलापूर | ५७२३७५ | १६७७५७ | ३.८९ |
| ६ | सिंधुदुर्ग | १८२०८२ | ६१५५६ | १.४२ |
| ७ | उस्मानाबाद | २८४२८४ | ९३३०५ | २.१६ |
| ८ | नागपूर | ३५८५२५ | १३२७६० | ३.१० |
| ९ | ठाणे | ५२३३०० | २३५९२२ | ५.४७ |
| १० | पुणे | ६२५४२३ | ९६९९२ | २.२५ |
| ११ | गडचिरोली | २०७५७७ | ११२५३८ | २.६१ |
| १२ | रायगड | ३७९५१४ | ११४६५६ | २.६६ |
| १३ | बीड | ४१०६५० | ११०२४४ | २.५६ |
| १४ | औरंगाबाद | ३८३८८७ | ११०१९० | २.५५ |
| १५ | गोंदिया | २५१७९६ | १४४२४८ | ३.३४ |
| १६ | वाशिम | २०४९५३ | ८८६९८ | २.१० |
| १७ | अमरावती | ४१९८०७ | २०८०९८ | ४.८२ |
| १८ | परभणी | २४०५८६ | ८००२१ | १.८५ |
| १९ | नांदेड | ४१०६४७ | १३७७०५ | ३.१९ |
| २० | सांगली | ४११०२४ | ६८२०७ | १.५८ |
| २१ | नंदुरबार | २४३३०४ | १७५३४० | ४.०६ |
| २२ | लातूर | ३२९२०६ | ९८१३६ | २.२७ |
| २३ | सातारा | ५१९७२० | ६४१०८ | १.५० |
| २४ | चंद्रपूर | ३५५७०७ | १६९५२६ | ३.९३ |
| २५ | भंडारा | २२६६०२ | ११६०२५ | २.६९ |
| २६ | बुलढाणा | ४१९१६१ | १८६४१० | ४.३२ |
| २७ | अहमदनगर | ७११९७२ | १६९७३६ | ३.९४ |
| २८ | कोल्हापूर | ५६१७३९ | ७४३०० | १.७२ |
| २९ | जळगाव | ६१४५७० | २६८०६८ | ६.२२ |
| ३० | नाशिक | ६१५६११ | २४८८४५ | ५.७७ |
| ३१ | यवतमाळ | ५०५५४० | ११४९२७ | २.६८ |
| ३२ | अकोला | २४४९०६ | ११६२४९ | २.७ |
| ३३ | वर्धा | २१९९२७ | ९०३९१ | २.०९ |
| ३४ | मुंबई शहर | - | - | - |
| ३५ | मुंबई उपनगर | - | - | - |
|  | एकूण | १२५४२५२४ | ४३०८५९७ | १०० |

स्रोत- Maharashtra District Social & Economic Survery-2021-22.

जालना, धुळे, सोलापूर, उस्मानाबाद, नागपूर, पुणे, गडचिरोली, रायगड, बीड, वाशिम, लातूर, भंडारा, अहमदनगर, यवतमाळ, अकोला व वर्धा या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. महाराष्ट्र राज्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची लोकसंख्या सर्वांत कमी हिंगोली (५९,४२२) या जिल्ह्यात आढळते. सर्वात जास्त वेगाने विकास होणाऱ्या शहरामध्ये पुणे शहर हे सर्वात अग्रेसर असलेले दिसून येते. पुणे शहराचा जितक्या प्रमाणात विकास झालेला आहे, तितक्या प्रमाणात ग्रामीण भागाचा विकास झालेला नाही.

**तालुक्यांची निवड :**

पुणे जिल्ह्यात एकूण १४ तालुके आहेत. या १४ तालुक्यांत २०२१ प्रमाणे ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबसंख्या १२२१३२ एवढी आहे. या १४ तालुक्यांपैकी ज्या तालुक्यांमध्ये १०,००० पेक्षा जास्त लोकसंख्या आहे, अशा ६ तालुक्यांची अभ्यासासाठी निवड केली आहे.

तक्ता क्रमांक २ मध्ये पुणे जिल्ह्यातील अभ्यासासाठी निवडलेल्या तालुक्यातील कुटुंबसंख्या दर्शवली आहे. पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील सर्वात जास्त दारिद्र्यरेषेखालील कुटुंबसंख्या असणाऱ्या ६ तालुक्यांची संशोधनासाठी स्तरीत यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने निवड केली आहे. पुणे जिल्ह्यातील सर्वाधिक दारिद्र्यरेषेखालील कुटुंबसंख्या बारामती (१,४३,२१२) तालुक्यात आहे. त्यानंतर हवेली (१,३३,७५), इंदापूर (१३,२१९), जुन्नर (१२,८६५), खेड (११,९४०), तर त्याखालोखाल दौंड (११,१६३) या तालुक्यात आहे. पुणे जिल्ह्यातील १४ तालुक्यांतील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबसंख्या १,२२,१३२ असून यापैकी अभ्यासासाठी निवडलेल्या ६ तालुक्यांतील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबसंख्या ७६,८७४ एवढी आहे. ही संख्या एकूण दारिद्र्यरेषेखालील कुटुंबसंख्येच्या ६२.९४% आहे.

**तक्ता क्र. २ पुणे जिल्ह्यातील अभ्यासासाठी निवडलेल्या तालुक्यातील कुटुंबसंख्या**

| अनु. क्र. | तालुके | दारिद्र्यरेषेखालील कुटुंबसंख्या | अभ्यासासाठी निवडलेली कुटुंबसंख्या |
|---|---|---|---|
| १ | बारामती | १४३१२ | ९९ |
| २ | हवेली | १३३७५ | १०६ |
| ३ | इंदापूर | १३२१९ | १२० |
| ४ | जुन्नर | १२८६५ | ३७ |
| ५ | खेड | ११९४० | ११२ |
| ६ | दौंड | १११६३ | ९० |
| | एकूण | ७६८७४ | ५६४ |

स्रोत : पुणे जिल्हा आर्थिक व सामाजिक पाहणी-२०२१-२२, तक्ता क्रमांक ८.२८, पान क्रमांक -१७२.

**गावांची निवड :**

पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील १०,००० पेक्षा जास्त कुटुंबसंख्या असलेल्या ६ तालुक्यांची प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी निवड करण्यात आली आहे. प्रस्तुत संशोधनासाठी ६ तालुक्यातील गावांची निवड करताना सर्वांत जास्त दारिद्र्यरेषेखालील कुटुंबसंख्या असलेली प्रत्येकी ५ गावे निवडण्यात आली आहेत.

### तक्ता क्र.३ नमुना निवडीसाठी निवडण्यात आलेली कुटुंबसंख्या

| अ. क्र. | तालुका | नमुना निवडीसाठी गावे | दारिद्र्यरेषेखालील कुटुंबसंख्या | नमुना निवडीसाठी निवडलेली कुटुंबसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | बारामती १४,३१२ | १. माळेगाव | ८१० | ४१ |
| | | २. सांगवी | ३३७ | १७ |
| | | ३. पंधारे | ३२९ | १६ |
| | | ४. काटेवाडी | २६८ | १३ |
| | | ५. झारगवाडी | २५२ | १२ |
| | | एकूण- | १९९६ | ९९ |
| २ | हवेली १३,३७५ | १. लोणीकाळभोर | ६२४ | ३१ |
| | | २. उरुळीकांचन | ५०० | २५ |
| | | ३. मांजरी बु. | ३२४ | १६ |
| | | ४. दमवावस्ती | ३१९ | १६ |
| | | ५. थेऊर | ३५८ | १८ |
| | | एकूण- | २१२५ | १०६ |
| ३ | इंदापुर १३,२१९ | १. सणसर | ६३७ | ३२ |
| | | २. बावडा | ५२२ | २६ |
| | | ३. निमगाव के. | ४५५ | २३ |
| | | ४. कळंब | ३९५ | २० |
| | | ५. शेळगाव | ३७० | १९ |
| | | एकूण- | २३७९ | १२० |
| ४ | जुन्नर १२,८६५ | १. पिंपळवंडी | १९१ | १० |
| | | २. येडगाव | १३७ | ७ |
| | | ३. सावरगाव | १३३ | ७ |
| | | ४. येणेर | १३१ | ७ |
| | | ५. पिंपरी पेंढार | १२६ | ६ |
| | | एकूण- | ७१८ | ३७ |
| ५ | खेड ११,९४० | १.कडूस | ७५२ | ३७ |
| | | २.काळूस | ६०८ | ३० |
| | | ३.वाडा | ४०० | २० |
| | | ४.दोंदे | २४१ | १३ |
| | | ५.कोयाळी | २४० | १२ |
| | | एकूण- | २२४१ | ११२ |
| ६ | दौंड ११,१६३ | १.पाटस | ६२२ | ३१ |
| | | २.वरवंट | ४६७ | २३ |
| | | ३.बोरीपारधी | ३४९ | १७ |
| | | ४.खडकी | २४८ | १२ |
| | | ५.बोरीबेल | १३६ | ७ |
| | | एकूण- | १८२२ | ९० |
| | ७६,८७४ | | ११,२८१ | ५६४ |

स्रोत : पुणे जिल्हा आर्थिक व सामाजिक पाहणी, २०२१-२२, पान क्र.१७२.

तक्ता क्रमांक ३ मध्ये पुणे जिल्ह्यातील सर्वात जास्त दारिद्र्यरेषेखालील कुटुंबसंख्या असणारे ६ तालुके अभ्यासासाठी निवडले आहेत. तर प्रत्येक तालुक्यातील ६ गावांची संशोधनासाठी स्तरीत यादृच्छिक निवड पद्धतीने निवड केली आहे. पुणे जिल्ह्यातील सर्वात जास्त कुटुंबसंख्या बारामती तालुक्यात आहे. या तालुक्यातील सर्वात जास्त कुटुंबसंख्या असणाऱ्या माळेगाव, सांगवी, पंधारे, काटेवाडी, झारगरवाडी या ५ गावांमधून ९९ कुटुंबांची अभ्यासासाठी निवड केली. त्याखालोखाल असणाऱ्या हवेली तालुक्यातील ५ गावांमधून १०६ कुटुंबांची अभ्यासासाठी निवड केली आहे. त्यानंतर इंदापूर तालुक्यात दारिद्र्यरेषेखालील कुटुंबसंख्या १३,२१९ आहे. या तालुक्यातील ५ गावांमधून १२० कुटुंबांची अभ्यासासाठी निवड केली आहे. जुन्नर तालुक्यात दारिद्रेरेषेखालील कुटुंबसंख्या १२,८६५ एवढी आहे. या तालुक्यातील सर्वाधिक दारिद्र्यरेषेखालील कुटुंबसंख्या असणाऱ्या ५ गावांमधून ३७ कुटुंबांची अभ्यासासाठी निवड केली आहे. खेड तालुक्यात ११,९४० एवढी दारिद्र्यरेषेखालील कुटुंबसंख्या आहे. या तालुक्यातील ५ गावांमधून ११२ कुटुंबांची अभ्यासाठी निवड केली आहे व शेवटी दौंड तालुक्यात ११,१६३ एवढी दारिद्र्यरेषेखालील कुटुंबसंख्या आहे. त्यातील ५ गावांमधून अभ्यासासाठी ९० कुटुंबांची निवड केलेली आहे. वरील ६ तालुक्यांमधून नमुना म्हणून निवडलेली दारिद्र्यरेषेखालील कुटुंबसंख्या ५६४ एवढी आहे. या ६ तालुक्यांमधील प्रत्येकी ५ गावांमध्ये ११,२८१ एवढी दारिद्र्यरेषेखालील कुटुंबसंख्या असून त्यापैकी ५% (५६४) लोकांची स्तरीत यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने निवड केली आहे. नमुना निवडीसाठी कुटुंबसंख्या निवडताना कुटुंबांचे आडनाव मुळाक्षर पद्धतीने लावून प्रत्येकी विसावे कुटुंब अभ्यासासाठी निवडण्यात आले आहे.

**गृहीतकृत्यांची पडताळणी:**

गृहीतक क्रमांक १ :- ग्रामीण भागातील

**तक्ता क्र. ४ : दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचे निर्देशक**

| निर्देशक | दारिद्र्यरेषेखालील कार्ड मिळण्याआधी | दारिद्र्यरेषेखालील कार्ड मिळाल्यानंतर |
|---|---|---|
| किचन | ५६४ | ५६४ |
| टी.व्ही. | २५ | ५०१ |
| फर्निचर | ० | १० |
| गॅस | २६ | ५१६ |
| चूल | ५६४ | ५६४ |
| फॅन | ५९ | ५५९ |
| कपाट | ६४ | ५६४ |
| बाथरूम | ७९ | ५४१ |
| शौचालय | २९ | ५१९ |
| शिलाई मशीन | ३८ | २३४ |
| फ्रिज | १६ | १४८ |
| मोबाईल | ३६४ | ५६४ |

स्रोत : क्षेत्रीय पाहणी.

**तक्ता क्र. ५ : आर्थिक व सामाजिक स्थितीच्या अभ्यासासाठी टी कसोटी**

**(मध्यातील फरकासाठी टी कसोटी )**

| | पूर्वी | नंतर |
|---|---|---|
| मध्य | १५२.३३३३३३३ | ४४०.३३३३३३३ |
| प्रचलन | ४६१७१.१५१५२ | ३७६५४.७८७८८ |
| अवलोकन | १२ | १२ |
| पिअरसन सहसंबंध | ०.४३७४२१८९४ | |
| परिकल्पित मध्य अंतर | ० | |
| मुक्तीसंख्या | ११ | |
| टी कसोटीचे परिगणित मूल्य | -४.५८४९०७९७९ | |
| P(T<=t) एकपुच्छ संभाव्यता मूल्य | ०.०००३९२०१२ | |
| एकपुच्छ टी कसोटीचे निर्णयन मूल्य | १.७९५८८४८१९ | |
| P(T<=t) उभयपुच्छ संभाव्यता मूल्य | ०.०००७८४०२३ | |
| उभयपुच्छ टी कसोटीचे निर्णयन मूल्य | २.२००९८५१६ | |

स्रोत : संशोधकाचे गणन

दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत सुधारणा होत आहे.

शून्य गृहीतक (H0) - ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत सुधारणा होत नाही.

पर्यायी गृहीतक (H1) - ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत सुधारणा होत आहे.

वरील गृहीतकृत्य पडताळणी करण्यासाठी दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या जीवनात बदल घडून आला का? हे पाहणे महत्त्वाचे आहे.

दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीतील बदल पाहण्यासाठी T-Test' (Paired Two Sample For Means) वापर केलेला आहे. या ठिकाणी समान विचलन गृहीत धरले आहे. जर तक्ता मूल्य (Table value) ही गणना मूल्यापेक्षा (Calculated value) कमी आले, तर विचलनात (Variance) फरक आहे, असे आपण म्हणू शकतो. म्हणजेच दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या जीवनात आर्थिक व सामाजिक सुधारणा आहे, असे म्हणता येईल. म्हणूनच येथे H0 हे गृहीतक नाकारले जाते व H1 हे गृहीतक स्वीकारले जाते. म्हणजेच दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत सुधारणा झाली आहे.

गृहीतक क्रमांक २ : ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांना शासकीय योजनांचा लाभ होत आहे.

शून्य गृहीतक (H0) - ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांना शासकीय योजनांचा लाभ होत आहे.

पर्यायी गृहीतक (H1) - ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांना शासकीय योजनांचा लाभ होत नाही.

येथे ५% अर्थपूर्णत्वाच्या पातळीवर पर्यायी गृहीतकाचा त्याग करून शून्य गृहीतक मान्य केलेले

**तक्ता क्र. ६ : अभ्यास क्षेत्रातील बीपीएल गटांना लाभलेल्या मुख्य सुविधांचे वितरण**

| | न | % | संदर्भ | प्रमाण | ९५% विश्वास अंतराळ मूल्य | काय वर्ग परिणीत मूल्य | | पी मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | निच्च | उच्च | |
| जनधन योजना बँक अकाऊंट बचतगट लोन | ५३६ | ९५.०% | १००.०% | ५.०% | ३.२% | ५.९% | ०.१२८ | ०.७२० |

स्रोत : संशोधकाचे गणन

P-value by One-Sample Chi-Square test. P-value <0.05 is considered to be statistically significant. *P-value<0.05, **P-value<0.01, ***P-value<0.001, NS: Statistically Non-Significant.

Test Statistics Details:

Value of Chi-Square Test Statistic =0.128.

Value of DF (Degrees of Freedom) = 1.


P-value (Probability value) = 0.720 (Statistically Non-Significant by One Sample Chi-Square test).

आहे.

प्रस्तुत अभ्यासावरून असे आढळून येते की, दारिद्र्यरेषेखालील लोकांसाठी असणाऱ्या शासकीय योजनांचे वितरण उत्पन्नाचे वितरण व प्रमाण वितरण यातील फरक लक्षणीयरीत्या अर्थपूर्ण आहे. दारिद्र्यरेषेखालील लोकांसाठी असणाऱ्या शासकीय योजना त्यांच्यापर्यंत योग्यरित्या पुरवल्या जात आहेत.

आलेख क्रमांक १ मध्ये शासनाकडून

**आलेख क्र. १ शासनाकडून दारिद्र्यरेषेखालील कुटुंबासाठी असणाऱ्या विविध योजनांचे वर्गीकरण**




स्रोत : क्षेत्रीय पाहणी

दारिद्र्यरेषेखालील लोकांना मिळणाऱ्या विविध योजनांचे वर्गीकरण दर्शवण्यात आलेले आहे. शासनाकडून दारिद्र्यरेषेखालील लोकांसाठीच्या जनधन योजनेचा लाभ हा ९५% लोकांना मिळत असल्याचे दिसून येते. तर दारिद्र्यरेषेखालील बचतगट या योजनेचा लाभ ७१.३% लोकांनी घेतलेला दिसून येतो. बँकेकडून दारिद्र्यरेषेखालील लोकांना मिळणाऱ्या लोनचा लाभ ४२.०२% लोकांनी घेतलेला दिसून येतो, तर ९८.०२% दारिद्र्यरेषेखालील लोकांचे बँकेत अकाऊंट असलेले दिसून येतात.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबासाठी सरकार शासकीय योजना राबवत आहे व या शासकीय योजनांचा लाभ दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना मिळत आहे.

गृहीतक क्रमांक ३ : ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांमध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण कमी आहे.

शून्य गृहीतक (H0) : ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांचे उच्च शिक्षणाचे प्रमाण तुलनने जास्त आहे.

पर्यायी गृहीतक (H1) : ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांचे उच्च शिक्षणाचे प्रमाण तुलनने कमी आहे.

येथे ५% अर्थपूर्णत्वाच्या पातळीवर शून्य गृहीतकाचा त्याग करून पर्यायी गृहीतक मान्य केलेले आहे.

**तक्ता क्र. ७ अभ्यास क्षेत्रात्रील दारिद्र्यरेषेखालील लोकांनी घेतलेल्या उच्च शिक्षणाचे वर्गीकरण**

| | न | % | संदर्भ | प्रमाण | ९५% विश्वास अंतराळ मूल्य | काय वर्ग परिणीत मूल्य | | पी मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | निच्च | उच्च | |
| उच्च शिक्षणाचे प्रमाण | १८२ | ६.०% | १००.०% | ९४.०% | ९२.०% | ९५.०% | १९५.६१ | ०.००१*** |

स्रोत : संशोधकाचे गणन

P-value by One-Sample Chi-Square test. P-value <0.05 is considered to be statistically significant. *P-value<0.05, **P-value<0.01, ***P-value<0.001, NS: Statistically Non-Significant.

Test Statistics Details:

Value of Chi-Square Test Statistic =195.61.


Value of DF (Degrees of Freedom) = 1.

P-value (Probability value) = 0.001 (Statistically Significant by One Sample Chi-Square test).

प्रस्तुत अभ्यासावरून असे आढळून येते की, दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे उच्च शिक्षण घेणाऱ्यांच्या प्रमाणामधील वितरण व प्रमाणित वितरणातील फरक अर्थपूर्ण आहे. दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींमध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण अभ्यास क्षेत्रात कमी आहे.

आलेख क्रमांक २ मध्ये क्षेत्रीय पाहणीतील

**आलेख क्रमांक २ क्षेत्रीय पाहणीतील दारिद्र्यरेषेखालील उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण**




स्रोत : क्षेत्रीय पाहणी

दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींचे उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण दर्शवण्यात आलेले आहे. क्षेत्रीय पाहणीतील ९४% व्यक्ती उच्च शिक्षण घेत नाहीत, तर फक्त ६% व्यक्ती पदवीधर व पदव्युत्तर शिक्षण म्हणजेच उच्च शिक्षण घेताना दिसून येतात.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींमध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे.

**निष्कर्ष :**

१) क्षेत्रीय पाहणीतील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचा शिक्षणाचा स्तर अभ्यासला असता असे दिसून आले की, क्षेत्रीय पाहणीतील दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येपैकी ८७.१७% लोक साक्षर आहेत, तर १२.८३% लोक निरक्षर आहेत. एकूण साक्षर लोकसंख्येपैकी २६.४५% लोकांचे पहिली ते चौथीपर्यंत शिक्षण झालेले आहे. पाचवी ते सातवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या लोकांचे प्रमाण २४.४६% आहे. आठवी ते दहावीपर्यंत शिक्षण घेतलेल्या २०.३६% व्यक्ती आहेत, क्षेत्रीय पाहणीतील ९.३६% व्यक्तींनी अकरावी ते बारावी शिक्षण घेतलेले आहे. ५.०% पदवी आणि १.०२% व्यक्तींनी पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेले आहे. यावरून असे मत नोंदविता येईल की, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील मुला-मुलींना साक्षर होण्यासाठी शिक्षण तर घेता येते; परंतु आर्थिक स्थिती बेताची असल्यामुळे इच्छा असूनही उच्च शिक्षण घेता येत नाही.

२) क्षेत्रीय पाहणीतील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या कामाच्या स्वरूपाची माहिती दाखविण्यात आली आहे. क्षेत्रीय पाहणीतील ७०.२१% कुटुंबातील व्यक्तींना नियमित रोजगार मिळतो. तर १२.५९% कुटुंबातील व्यक्तींचे कामाचे स्वरूप अनियमित आहे आणि क्षेत्रीय पाहणीतील १७.२०% कुटुंबांना हंगामी रोजगार मिळतो. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती, कुटुंबांची सामाजिक परिस्थिती आणि कुटुंबाचा सांस्कृतिक गोष्टींवरील विश्वास हे तीन घटक कुटुंबाच्या कामाच्या स्वरूपावर परिणाम करत असतात.

दारिद्र्यरेषेखालील बरेचसे लोक कौशल्य असलेले व बिगर कौशल्य असलेले दिसून येतात. यावरून असा निष्कर्ष नोंदवता येतो की, शासनाच्या रोजगार हमी योजना, बचत गटांतील महिलांना रोजगार मिळण्यासाठी अर्थसाहाय्य या योजनांमुळे दारिद्र्यरेषेखालील जास्तीत जास्त कुटुंबातील सदस्यांना नियमित स्वरूपात रोजगार मिळत आहे व यामुळे जास्तीत जास्त दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होत आहे.

३) दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाचा जोडधंदा म्हणून केल्या जाणाऱ्या व्यवसायानुसार केले असता, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबापैकी २१.९९% कुटुंब कुक्कुटपालन हा व्यवसाय करतात. ३६.७०% कुटुंब जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय करतात. ३७.५८% कुटुंब मेंढीपालन हा व्यवसाय करतात, तर ३.७३% कुटुंब इतर म्हणजेच इतर व्यवसाय करतात. यावरून असे मत नोंदविता येईल की, क्षेत्रीय पाहणीतील १००% दारिद्र्यरेषेखालील कुटुंब जोडधंदा म्हणून व्यवसाय करताना दिसतात. जोडधंदा करण्यासाठी दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना शासनामार्फत आर्थिक सहाय्य मिळते व यामुळे दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत झाली आहे.

४) दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या घरातील सुखसुविधांनुसार वर्गीकरण पाहिले असता असे आढळून आले की, १००% कुटुंबाकडे दारिद्र्यरेषेखालील कार्ड मिळण्यापूर्वी व दारिद्र्यरेषेखालील कार्ड मिळाल्यानंतर स्वयंपाकगृहाची सोय आहे. दारिद्र्यरेषेखालील कार्ड मिळण्यापूर्वी ४.४३% कुटुंबांकडे टी.व्ही., रेडिओ या सुविधा होत्या, तर ८८.८२% कुटुंबांकडे दारिद्र्यरेषेखालील कार्ड मिळाल्यानंतर टी.व्ही., रेडिओ या सुविधा आहेत. ४.६०% कुटुंबांकडे दारिद्र्यरेषेखालील कार्ड मिळण्यापूर्वी गॅस सुविधा होती, तर ९१.४८% कुटुंबाकडे दारिद्र्यरेषेखालील कार्ड मिळाल्यानंतर गॅस सुविधा आहे, १०.४६ कुटुंबाकडे दारिद्र्यरेषेखालील कार्ड मिळण्यापूर्वी फॅन, ही सुविधा होती, तर ९९.११% कुटुंबाकडे दारिद्र्यरेषेखालील कार्ड मिळाल्यानंतर फॅन, सुविधा उपलब्ध आहेत, ५.१४% कुटुंबाकडे तर दारिद्र्यरेषेखालील कार्ड मिळण्यापूर्वी तर ९२.०२% कुटुंबाकडे दारिद्र्यरेषेखालील कार्ड मिळाल्यानंतर शौचालय ही सुविधा आहे. दारिद्र्यरेषेखालील कार्ड मिळण्यापूर्वी ६.७३% कुटुंबांकडे शिवणयंत्र होते, तर ४१.४८% कुटुंबाकडे दारिद्र्यरेषेखालील कार्ड मिळाल्यानंतर शिवणयंत्र आहे. दारिद्र्यरेषेखालील कार्ड मिळण्यापूर्वी २.४३% कुटुंबांकडे फ्रीज होते, तर २६.२४% कुटुंबाकडे दारिद्र्यरेषेखालील कार्ड मिळाल्यानंतर फ्रीज आहे. दारिद्र्यरेषेखालील कार्ड मिळण्यापूर्वी ६४.५३% कुटुंबांकडे मोबाईल होते, तर १००% कुटुंबाकडे दारिद्र्यरेषेखालील कार्ड मिळाल्यानंतर मोबाईल आहे. या आकडेवारीवरून असे मत नोंदवता येईल की, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचा टी. व्ही., रेडिओ, गॅस, फॅन, फ्रीज, स्नानगृह, शौचालय, मोबाईल अशा आधुनिक सोयी-सुविधा वापरण्याकडे कल वाढलेला दिसून येतो. आधुनिक काळात मोबाईल, फ्रीज, टी.व्ही., गॅस या वस्तू कौटुंबिक जीवनात महत्त्वाच्या मानल्या जातात. यावरून असे म्हणता येईल की, दारिद्र्यरेषेखालील कार्ड मिळाल्यानंतर दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांसाठीच्या शासकीय योजनांचा लाभ घेतल्यामुळे दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारण्यास मदत झाली आहे.

५) दारिद्र्यरेषेखालील ९४.३२% कुटुंबांच्या घरात वीज आहे. इंदिरा आवास योजनेअंतर्गत घराबरोबर वीजमीटर अनिवार्य असल्यामुळे वीजमीटर स्वतःच्या नावे आहे, तर ५.६८% कुटुंब भाड्याने वीज घेतात. ग्रामीण भागातील प्रत्येक घरात वीज हवी, या शासनाच्या धोरणामुळे प्रत्येक दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांत वीज असलेली दिसते.

६) क्षेत्रीय पाहणीतील दारिद्र्यरेषेखालील कुटुंब बचत गटाचे सभासद आहात का हे पाहिले असता असे निदर्शनास येते की, ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबापैकी ७१.२७% कुटुंब बचत गटाचे सभासद आहेत, तर २८.७३% कुटुंब बचत गटाचे सभासद नाहीत. यावरून असे सागंता येईल की, बचत गटामुळे होणारे फायदे लक्षात आल्यामुळे जास्तीत जास्त कुटुंब बचत गटाचे सभासद आहेत. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील ७१.१६% स्त्रियांना आपला विकास व्हावा, असे वाटल्यामुळे त्यांनी बचत गटाचे सभासदत्व घेतलेले दिसते. तर अजूनही २८.७३% स्त्रियांना बचत गटाचे महत्त्व समजले नाही किंवा त्याची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने त्या बचत गटात इच्छा असूनही सहभागी होऊ शकत नाहीत, असे म्हणता येईल.

७) क्षेत्रीय पाहणीतील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील स्त्रिया दरमहा किती रक्कमेची बचत करतात, हे पाहिले असता असे दिसून आले की, ३.२३% स्त्रिया दरमहा ५० रुपये, ८२.५९% स्त्रिया दरमहा १०० रुपये, ३.२३% स्त्रिया दरमहा १५० रुपये, तर १०.९५% स्त्रिया दरमहा २०० रुपये बचत करतात. यावरून असे मत नोंदविता येते की, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील स्त्रिया बचत गटात बचत करू लागल्या आहेत. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची आर्थिक परिस्थिती सुधारल्यामुळे महिला बचत करताना दिसतात.

८) क्षेत्रीय पाहणीतील तक्त्यावरून असे दिसून येते की, ७१.२७% महिलांनी बचत गटाचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे लाभ घेतलेला आहे, तर २८.७३% महिलांचा बचत गटाचा कोणता फायदा झालेला नाही. यावरून असे म्हणता येईल की, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना बचत गटाचा जास्तीत जास्त फायदा झालेला दिसतो. बचत गटापासून लघुउद्योगांसाठी मिळणाऱ्या कर्जामुळे रोजगाराला प्रोत्साहन मिळते व त्यामुळे दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची आर्थिक प्रगतीदेखील झालेली दिसते.

९) इंदिरा आवास (घरकुल) योजनेचा फायदा ९८.०४% कुटुंबांनी घेतलेला आहे, तर फक्त १.९६% कुटुंबांनी इंदिरा आवास योजनेचा फायदा घेतलेला नाही. यावरून असे सांगता येईल की, जास्तीत जास्त दारिद्र्यरेषेखालील कुटुंब इंदिरा आवास योजनांचा लाभ घेतात. शासनाकडून राबविण्यात येणारी इंदिरा आवास योजना ही एक कल्याणकारी योजना आहे. आधुनिक कल्याणकारी सरकार आर्थिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची निवाऱ्याची गरज पूर्ण करण्यासाठी इंदिरा आवास योजना राबवते.

१०) उच्च शिक्षण घेण्यासाठी दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांतील मुलामुलींना कोणत्या अडचणी येतात याचे वर्गीकरण करण्यात आले आहे. ४६.२८% कुटुंबातील मुला-मुलींना पैशाचा अभाव असल्यामुळे उच्च शिक्षण घेता येत नाही. २४.४६% कुटुंबातील मुला-मुलींना कॉलेज लांब असल्यामुळे तसेच उच्च शिक्षणाच्या ठिकाणी वसतिगृहांचा अभाव असल्यामुळे उच्च शिक्षण घेता येत नाही, तर २९.२६% कुटुंबांतील मुला-मुलींना कुटुंबांचे आकारमान मोठे असल्यामुळे बहीण-भावंडांच्या शिक्षणासाठी उच्च शिक्षण घेता येत नाही. यावरून असे म्हणता येईल की, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील मुली-मुले सुशिक्षित तर झाली; परंतु विविध अडचणींमुळे आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी उच्च शिक्षण घेता येत नाही.

**शिफारशी :**

१. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांत भूमिहिनांचे प्रमाण अधिक आहे ते कमी करण्यासाठी; तसेच दारिद्र्यरेषेखालील लोकांना कायमचे उत्पन्नाचे साधन मिळवून देण्यासाठी सरकारने भूमिहिनांना गायरान अंतर्गत जमिनी उपलब्ध करून द्याव्यात.

२. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना ज्या शासकीय

योजनांची माहिती आहे, त्या योजनांचा लाभ कसा घ्यावा, कोणकोणत्या कागदपत्रांची पूर्तता करावी लागते, याबाबतचे मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. तसेच शासकीय योजना प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहचवण्यासाठी शासकीय योजनांचा तपशीलवार माहितीचे पत्रक दारिद्र्यरेषेखालील लोकांचे वास्तव्य असणाऱ्या ठिकाणी प्रदर्शित करावे.

३. दारिद्र्यरेषेखालील महिलांच्या बचत गटातील स्त्रियांना कर्ज दिले जाते. परंतु त्याचा विनियोग करायचा, रेकॉर्ड कसे ठेवायचे, कर्जाचे व्यवस्थापन कसे करावे यासाठी व्यवस्थापकीय माहितीबाबत बचत गटातील महिलांना प्रशिक्षण देण्यात यावे.

४. दारिद्र्यरेषेखालील ज्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्याची इच्छा आहे अशा विद्यार्थ्यांसाठी शासनाने 'कमवा व शिका' सारख्या योजनांवर जास्तीत जास्त लक्ष देऊन त्याची अंमलबजावणी योग्य रीतीने व्हावी, याची काळजी घेण्यात यावी.

५. दारिद्र्यरेषेखालील समाज जास्त असलेल्या दुर्गम भागात मुक्त विद्यापीठांचे केंद्र उभारता येईल का, या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावेत.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. कोळंबे रंजन, भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथी प्रकाशन, पुणे, २०१३-१४, पृ.क्र.४८, ४९.

२. डोंगरे अंबरिश, महाभारतातील दारिद्र्य व कुपोषण, १९९१-२००० समाजप्रबोधन पत्रिका, जुलै-डिसेंबर २००५, पृ.क्र.५५-५७.

३. नियोजन आयोग अहवाल २०१३-१४, भारत सरकार द्वारा प्रकाशित, पृ.क्र.१२७.

४. पुणे जिल्हा आर्थिक व सामाजिक पाहणी २०१३-२०१४, तक्ता क्रमांक ४.८, पृ.क्र.२७.

५. भारताची आर्थिक व सामाजिक पाहणी २०१३-१४, भारत शासनाद्वारा प्रकाशित, पृ.क्र.१४७.

६. महाराष्ट्राची आर्थिक व सामाजिक पाहणी २०१४-१५, भारत शासनाद्वारा प्रकाशित, पृ.क्र.२०७.

७. महाराष्ट्राची आर्थिक व सामाजिक पाहणी २०१२-१३, महाराष्ट्र शासनाद्वारा प्रकाशित, पृ.क्र.३४७.

८. Nilangi Sardeshpande, Abhay Shukla, Kerry Scoot (Edi.), Nutritional Crisis in Maharashtra, 2009, SATHI, Sept. 2009, Page No 63.

९. Multidimensional Poverty Index, World Bank report 2015, Page No 216, 2009, Page No 63.

१०. World Urbanisation Prospects- The 1992 Revision, United Nations, New York, 2006.


◆

**निवेदन : अर्थसंवाद**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल तर त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा; मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# कृषी कायदे २०२० रद्द करण्याचा निर्णय आणि त्याचा भारतीय कृषी विपणन सुधारणांवर होणारा परिणाम

**सुनिता जाधव**†

**प्रस्तावना :**

भारताच्या अर्थव्यवस्थेत कृषी/शेतीक्षेत्राची भूमिका महत्त्वाची आहे. देशातील एकूण कामगारांपैकी ५४.६% कृषी/शेती आणि संबंधित कार्याशी निगडित क्रियांमध्ये गुंतलेले आहेत (जनगणना २०११). तसेच २०१९-२० वर्षात (सध्याच्या किंमतीनुसार) देशाच्या एकूण मूल्यवर्धित उत्पन्नात (GVA) शेतीक्षेत्राचा १७.८% हिस्सा आहे (कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय, २०२१). या क्षेत्राचे महत्त्व लक्षात घेता, भारतीय कृषीक्षेत्रासमोरील समकालीन समस्या आणि आव्हानांचे परीक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे.

**भारतीय शेतीक्षेत्रासमोरील सध्याची प्रमुख आव्हाने :**

भारतीय शेतीक्षेत्रासमोर सध्या प्रमुख दोन आव्हाने आहेत. पहिले आव्हान म्हणजे, जागतिक हवामान बदलाचा शेतीच्या उत्पादन क्षमतेवर होणाऱ्या परिणामांना नियंत्रित करणे. त्यासाठी शेतीक्षेत्रामध्ये वापरल्या जाणाऱ्या उत्पादन घटकांची (इनपुट्स) प्रतियुनिट उत्पादकता सतत वाढवण्यासाठी प्रयत्न करत राहाण्याची अपरिहार्यता. दुसरे म्हणजे, शेती करणाऱ्याच्या (शेतकऱ्याच्या) दृष्टिकोनातून शेती फायदेशीर, किफायतशीर बनवणे.

मालवीय (२०२२) यांनी नमूद केल्याप्रमाणे संयुक्त राष्ट्रांनी (UN) असे भाकीत वर्तवले आहे - २०५० पर्यंत भारताची लोकसंख्या १.६४ अब्ज होईल. परिणामी, दरडोई जमीन धारणा (Per Capital Lnd Holding) कमी होईल. भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या मते, दरडोई जमीन धारणा प्रतिव्यक्ती ०.०९ हेक्टर असेल. मालवीय (२०२२) पुढे स्पष्ट करतात, हे आकडे विद्यमान जमीन संसाधनांवर येणारा संभाव्य अतिरिक्त ताण सूचित करतात. तसेच भारतीय लोकसंख्येच्या विविध आहारविषयक गरजांचा विचार केल्यास हा मुद्दा अधिक आव्हानात्मक बनतो (मालवीय, २०२२). वर नमूद केलेला मुद्दा भारताच्या वाढत्या लोकसंख्येला अन्नाचा एकमेव पुरवठादार म्हणून भारतीय कृषिक्षेत्रावरील भविष्यातील संभाव्य ताण दर्शवतो. तसेच जागतिक बाजारपेठेचे मागणी आणि पुरवठ्याच्या आगामी काळासाठीच्या अंदाजाचे कल पाहाता भारताला आगामी वर्षांमध्ये उत्पादनाच्या २०-२५% वाढीव कृषी-अन्न विदेशी बाजारपेठांमध्ये विकणे आवश्यक आहे

† सहयोगी प्राध्यापक, सोफिया कॉलेज (स्वायत्त), मुंबई - ४०००२६.
आजीव सभासद क्र. २०१६, भ्रमणध्वनी : ९८९२४७९९५६, ई-मेल : sunitajadhav98@gmail.com

(चांद, २०२०).

श्रीराम (२०२१) यांनी भारतीय शेतीशी संबंधित आधी उल्लेख केलेल्या दुसऱ्या आव्हानाकडे लक्ष वेधले आहे. श्रीराम (२०२१) सांगतात की, भारतातील कुटुंबांसाठी मिळणाऱ्या उत्पन्नाचे विश्लेषण केले असता असे लक्षात येते की, शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा महत्त्वाचा स्त्रोत म्हणजे मुख्यतः मजुरी, (पोस्ट, बँक इत्यादी वापरून) पाठवलेले पैसे आणि इतर बिगरशेती व्यवसाय हे आहेत. देशभरातील कृषी कुटुंबाच्या उत्पन्नात, प्रत्यक्ष शेतीवर आधारित लागवडीतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वाटा तुलनेने कमी आहे. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालय (NSSO 2014) ७० व्या फेरीचा अहवाल नमूद करतो की, देशभरातील कृषी कुटुंबाचे सरासरी उत्पन्न सुमारे रु. ६,४२६ प्रतिमहिना, त्यापैकी फक्त ३,०८१ (४८%) रुपये लागवडीतून येतात (श्रीराम, २०२१). इतर क्षेत्रांच्या तुलनेत शेतीक्षेत्राचे दरडोई उत्पन्न लक्षणीयपणे कमी आहे.

ही प्रमुख आव्हाने लक्षात घेता, भारत सरकारने २०१५-१६ ते २०२२-२३ या सात वर्षांच्या कालावधीत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यावर आपले लक्ष केंद्रित केले आहे. कुमार ए. (२०२२) स्पष्ट करतात की, सरकारच्या भूतकाळातील धोरणांमध्ये, उत्पादनाच्या विक्रीयोग्यतेपेक्षा केवळ उत्पादनावर भर देण्यात आला होता. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे सरकारचे उद्दिष्ट प्रशंसनीय आहे. हा बदल सरकारच्या भूतकाळातील योजनांपेक्षा खूप वेगळा आहे; परंतु सरकार समोरील मुख्य आव्हान हे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाची सर्वोत्तम किंमत मिळवून देण्यासाठी त्यांना बाजारपेठेशी जोडणे हे आहे (कुमार पी. २०२२).

कृषी, सहकार आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या २०२१-२२ च्या वार्षिक अहवालात नोंदवल्याप्रमाणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे हे साध्य करण्यासाठी सरकारने सात गोष्टी महत्त्वाच्या मानल्या आहेत. या गोष्टी शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीस हातभार लावू शकतात. या सात महत्त्वाच्या गोष्टी पुढीलप्रमाणे आहेत. पीक उत्पादकता वाढवणे, पशुधन उत्पादकता वाढवणे, संसाधन कार्यक्षमतेचा सर्वोत्कृष्ट वापर किंवा उत्पादन खर्च कमी करणे, पीक तीव्रतेत वाढ करणे, उच्च मूल्याच्या पिकांना प्राधान्य देऊन पिकांचे विविधीकरण, शेतकऱ्यांना वास्तविक मिळणाऱ्या पिकांच्या किंमतीमध्ये वाढ आणि रोजगार निर्मितीसाठी शेतीवरचे अवलंबित्व कमी करण्यासाठी शेतीकडून बिगरशेती व्यवसायांकडे वळण्याची गरज (कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार, २०२१).

news18.com ब्लॉग तसेच इतर प्रसारमाध्यमांमध्ये नोंदवल्याप्रमाणे १९ नोव्हेंबर २०२१ रोजी आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतातील शेतकऱ्यांच्या वर्षाहून अधिक काळ चाललेल्या आंदोलनाच्या केंद्रस्थानी असलेले तीन कृषी कायदे रद्द करण्याचा सरकारचा निर्णय जाहीर केला. या घोषणेनंतर वेगवेगळ्या स्तरातून विविध घटकांच्या अनेक संमिश्र प्रतिक्रिया आल्या. या निर्णयामुळे कृषिक्षेत्राशी संबंधित सुधारणांचा मार्ग अचानक बंद झाल्यासारखे वाटल्याचे मत काही सुधारणावादी अर्थतज्ज्ञांनी प्रदर्शित केले. या अनुषंगाने सदर लेखात केंद्र सरकारचे कृषी कायदे २०२० कोणते होते, तसेच त्याला विरोध होण्यामागची कारणे यांचे विश्लेषण केले आहे. सद्य परिस्थितीत शेतीक्षेत्र आणि शेतकरी केंद्रित धोरण आखताना कोणते मुद्दे महत्त्वाचे ठरतील हे सुचवण्याचा प्रयत्न करणे हे या लेखाचे उद्दिष्ट आहे.

लेखाची आखणी खालीलप्रमाणे केली आहे. विभाग I) भारतीय शेतीच्या समकालीन समस्या आणि आव्हानांचा आढावा घेण्याची गरज स्पष्ट करतो. विभाग II) कृषी कायदे २०२० शी संबंधित पार्श्वभूमी शोधतो. विभाग III) हे कायदे भारतीय शेतीमध्ये सुरू केलेल्या एकूण सुधारणांशी सुसंगत कसे मानले गेले यावर प्रकाश

टाकतो. हा विभाग केंद्र सरकारचा दृष्टिकोन आणि या कायद्यांबाबत आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातील फरक मांडतो. विभाग IV हे कायदे रद्द करण्याच्या निर्णयाचा कृषी विपणन सुधारणा प्रक्रियेवर होणारा परिणाम या संबंधित साहित्याचे परीक्षण करतो. भारतातील कृषी विपणन सुधारणांच्या गतीला चालना देण्यासाठी आवश्यक गोष्टी नमूद करून आणि भविष्यातील शेती आणि शेतकरी केंद्रित धोरणाच्या आराखड्याच्या रचनेवर लक्षणीय परिणाम करणाऱ्या घटकांची सूची देऊन भाग V सहलेखाचा समारोप होतो.

**कृषी कायदे २०२० ची पार्श्वभूमी :**

मित्रा (२०२०) दर्शवितात की, भारतातील कृषिबाजार, राज्य सरकारांनी लागू केलेल्या कृषी उत्पन्न बाजार समिती (APMC) कायद्याद्वारे नियंत्रित केले जातात. ते पुढे सांगतात की, या नियंत्रित कृषिबाजारात एकतर विक्रेता मक्तेदारी (Monopoly) आहे किंवा फक्त एकच खरेदीदार (Monopsony) असेल अशी परिस्थिती आहे. बहुतेकदा या कृषिबाजारांना त्या भागातील शेतकऱ्यांना सेवा देण्यासाठी रस्ते, वीज, पाणी इत्यादी स्थानिक पायाभूत सुविधा पुरवण्यासाठी तसेच कर आणि कमिशन यांच्या स्वरूपात सरकारी महसूल वाढवण्यासाठी जबाबदार धरले जाते. मित्रा (२०२०) दावा करतात की, या बाजारपेठा अकार्यक्षमता, भ्रष्टाचार आणि अपरिहार्य राजकारणीकरणाने ग्रस्त आहेत. दोन दशकांहून अधिक काळ, कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये (APMCs)/ मंडई व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी केंद्र सरकारकडून वेळोवेळी प्रयत्न केले जात आहेत; परंतु प्रशासनाच्या संघराज्य रचनेमुळे, सर्व राज्यांकडून अपेक्षित समान अनुकूल प्रतिक्रिया मिळाली नाही (मित्रा, २०२०).

तिवारी आणि शर्मा (२०२१) म्हणतात की, तत्कालीन एन.डी.ए. सरकारच्या अंतर्गत कृषी मंत्रालयाने २००३ मध्ये मॉडेल APMC कायदा तयार केला आणि तो राज्यांमध्ये प्रसारित केला. त्यानंतरच्या यूपीए सरकारनेही या सुधारणांसाठी जोर धरला. परंतु हा राज्याचा विषय असल्याने, राज्यांना मॉडेल APMC कायदा अंगीकारण्यास प्रवृत्त करण्यास केंद्राला मर्यादित यश मिळाले (तिवारी आणि शर्मा, २०२१). नंतर APMC कायदा, २०१७ पास झाला. उद्देश शेतकरी आणि प्रोसेसर (प्रक्रिया करणारे)/निर्यातदार/मोठ्या प्रमाणात खरेदीदार/अंतिम वापरकर्ते (ग्राहक) यांच्यातील परस्पर संवादाला चालना देणे, जेणेकरून खरेदी-विक्री किंमतीचा फरक कमी करून उत्पादक आणि ग्राहक दोघांनाही फायदा होईल (देशपांडे, २०२१). उत्पादकांना त्यांचे उत्पादन खरेदीदाराच्या आवडीच्या ठिकाणी आणि वेळी आणि जेथे त्यांना लाभदायक किंमती मिळेल तेथे विकण्याचे स्वातंत्र्य देण्याचा हेतू होता (देशपांडे, २०२१). मंडईतील मध्यस्थांच्या विरोधामुळे आणि राजकीय नेतृत्वाच्या उदासीनतेमुळे दोन्ही मॉडेल कायदे अनेक राज्यांनी लागू केले नाहीत.

राज्य सरकारच्या अखत्यारीत येणारा विषय ‘कृषी विपणन’ संबंधित सुधारणा करण्याची प्रलंबित मागणी फार पूर्वीपासून होती. ३ जून २०२० रोजी नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने तीन कायद्यांना मंजुरी दिली. दोन दिवसांनंतर राष्ट्रपतींनी अध्यादेश जारी केला. संसदेच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान, सरकारने अध्यादेशांची जागा घेण्यासाठी विधेयके सादर केली, जी अखेरीस मंजूर झाली (तिवारी आणि शर्मा, २०२१).

हे कृषी कायदे खालीलप्रमाणे होते:

१. शेतकरी उत्पादन व्यापार आणि वाणिज्य (प्रोत्साहन आणि सुलभीकरण) कायदा, २०२०.
२. शेतकरी (सक्षमीकरण आणि संरक्षण) किंमत हमी आणि शेती सेवा करार कायदा, २०२०.
३. जीवनावश्यक वस्तू (दुरुस्ती) कायदा, २०२०.

या कृतीला प्रतिसाद म्हणून, सरकार या विषयावर

पुरेसा सल्ला न घेता हे कायदे लादल्याचा आरोप करत सरकारच्या विरोधात निदर्शने करण्यात आली. तिवारी आणि शर्मा (२०२१) यांनी नमूद केले आहे की, पंजाबमध्ये सुरू झालेली निदर्शने नोव्हेंबर २०२० मध्ये राष्ट्रीय राजधानीच्या बाहेरील भागात पोहोचली. पंजाबपासून सुरुवात करत, त्यात हरियाणा, राजस्थान, पश्चिम उत्तर प्रदेश आणि मध्यप्रदेशातील शेतकऱ्यांचा समावेश झाला. दिल्लीच्या सीमेवर आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना, वेगवेगळ्या राज्यांतील शेतकऱ्यांनी पाठिंबा दिला असला, तरी शारीरिक स्वरूपाचा तीव्र निषेध मुख्यत्वे पंजाब, हरियाणा, पश्चिम यूपी आणि राजस्थानच्या काही भागातील शेतकऱ्यांनी चालवला होता, त्यामध्ये पंजाबमधील शेतकरी मुख्य प्रेरक शक्ती होते (तिवारी आणि शर्मा, २०२१). सरकारला शेवटी या कायद्यांसाठी द्यावी लागणारी राजकीय किंमत लक्षात आली आणि त्यांनी जाहीर केले की, समाजाच्या व्यापक हितासाठी कायदे रद्द केले आहेत.

**कृषी कायदे २०२० - कृषी विपणन सुधारणांचा एक भाग म्हणून सादर :**

केंद्राचा दावा आहे की, हे तीन वादग्रस्त कायदे भूतकाळात सादर करण्यात आलेल्या अनेक विपणन सुधारणांच्या संचाच्या अनुरूप होते. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार, (२०२१) ने आपल्या वार्षिक अहवाल २०२०-२१ मध्ये सरकारने सुरू केलेल्या अनेक कृषी बाजार सुधारणांचे तपशीलवार वर्णन केले आहे. खालील मुद्दे कृषी विपणन सुधारणांचा एक भाग म्हणून अहवालात प्रस्तुत केले आहेत.

**१. मॉडेल कृषी उत्पादन आणि पशुधन विपणन समिती (प्रोत्साहन आणि सुविधा) कायदा, २०१७:**

या मॉडेल कायद्याचे उद्दिष्ट विपणन आणि योग्य बाजार संरचना तयार करणे, सार्वजनिक क्षेत्र आणि खाजगी क्षेत्रातील 'घटक' या दोघांनाही कृषिक्षेत्रात सामील होण्यासाठी एक व्यासपीठ तयार करून निरोगी स्पर्धेचे वातावरण विकसित करणे हा आहे (सिंह आणि लोहिया, २०२०). हा मॉडेल कायदा केवळ शेतातील पिकांच्या विपणनासाठीच नाही तर फळे, भाजीपाला, फुले, मसाले, औषधी वनस्पती, पशुधन, कुक्कुटपालन, मत्स्यपालन इत्यादींसह इतर अनेक वस्तूंच्या विक्रीवर आधारित शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याचा सरकारचा निर्धार दर्शवितो (सिंग आणि लोहिया, २०२०).

**२. २२,००० ग्रामीण कृषिबाजार (GrAMs) ची स्थापना करणे:**

लहान शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देणे; तसेच लहान शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळू शकेल, या उद्देशाने केंद्र सरकारने २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात ग्रामीण हाट श्रेणीसुधारित करण्यासाठी या योजनेची घोषणा केली होती. २२,००० ग्रामीण हाटांचे ग्रामीण कृषी बाजार (GrAMs) मध्ये रूपांतर करण्याचा हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आहे (डाउन टू अर्थ, २०२१).

**३. कृषी-निर्यात धोरण २०२२:**

२०२२ पर्यंत कृषी-निर्यात दुप्पट करण्याचे लक्ष्य होते. कृषी निर्यात सध्याच्या US $30+ अब्जवरून २०२२ पर्यंत US$60 + अब्जपर्यंत दुप्पट करणे आणि त्यानंतरच्या काही वर्षात स्थिर व्यापार धोरणासह US$ १०० अब्जपर्यंत पोहोचणे (वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय, २०१८). तसेच भारतीय निर्यात बास्केट विविधीकरण, गंतव्य स्थानामध्ये वैविध्य आणणे आणि नाशवंत वस्तूंवर लक्ष केंद्रित करून उच्च मूल्य आणि मूल्यवर्धित कृषी निर्यातीला चालना देणे ही कृषी-निर्यात धोरण २०२२ ची उद्दिष्टे आहेत.

**४. २०२४ पर्यंत १०,००० शेतकरी उत्पादक संघटनांना (FPOs) प्रोत्साहनः**

पुढील पाच वर्षांत शेतकऱ्यांची संघटित शक्ती वाढवण्यावर भर देऊन शेतकऱ्यांना इकॉनोमिज ऑफ

स्केलचे फायदे मिळवून देण्यासाठी केंद्रीय योजना इकॉनोमिज ऑफ स्केल म्हणजे उत्पादनाच्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे मिळणारे लाभ. उदाहरणार्थ, उत्पादनाच्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे, उत्पादनाच्या प्रतियुनिटची सरासरी किंमत कमी होते इत्यादी.

५. शेतकरी उत्पादन व्यापार आणि वाणिज्य (प्रोत्साहन आणि सुलभीकरण) कायदा, २०२०.

६. शेतकरी (सशक्तीकरण आणि संरक्षण) किंमत हमी आणि शेती सेवा करार कायदा, २०२०.

७. जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ मध्ये सुधारणा, जे विविध कृषी-वस्तूंना नियंत्रणमुक्त करते.

वर सूचीबद्ध केलेल्या ७ प्रमुख सुधारणांपैकी आपण वादग्रस्त कायद्यांशी संबंधित शेवटच्या ३ सुधारणांवर तपशीलवार चर्चा करणार आहोत. News18.com (२०२१) ने सादर केलेल्या लेखाचा आधार घेऊन केंद्राच्या आणि आंदोलक शेतकऱ्यांच्या वैविध्यपूर्ण दृष्टिकोनांचा आपण विचार करूया. हे कायदे भारतीय कृषिक्षेत्रातील एकूण विपणन सुधारणांचा एक भाग म्हणून सादर केले गेले. चला, त्यांचे विश्लेषण करूया.

**शेतकरी उत्पादन व्यापार आणि वाणिज्य (प्रोत्साहन आणि सुलभीकरण) कायदा, २०२०** (Farmers' Produce Trade and Commerce (Promotion and Facilitation) Act 2020): केंद्र सरकारने लागू केलेला हा कायदा देशातील कोणत्याही ठिकाणी शेतमालाची विक्री आणि खरेदी करण्याचे स्वातंत्र्य देतो. केवळ अधिसूचित एपीएमसी मार्केट यार्डमध्ये (मंडई) विक्री करण्याच्या बंधनातून शेतकऱ्यांना मुक्त करतो. शेतकरी त्यांचे उत्पादन अधिसूचित APMC मार्केट यार्ड (मंडई) बाहेर विकू शकतात. या कायद्यांतर्गत शेतकऱ्यांकडून त्यांच्या उत्पादनाच्या विक्रीसाठी कोणताही उपकर किंवा आकारणी केली जाणार नाही. नवीन कायदा कृषी क्षेत्रात ई-कॉमर्सला प्रोत्साहन देतो, तसेच शेती उत्पादनांच्या विक्री आणि/किंवा खरेदीसाठी इलेक्ट्रॉनिक प्लॅटफॉर्म सेट करण्याची परवानगी देतो.

**सरकारचे मत :** सरकारचा दावा आहे की, यामुळे शेतकऱ्यांसाठी अधिक पर्याय खुले होतील. विपणन खर्च कमी होईल आणि शेतकऱ्यांना चांगला भाव मिळण्यास मदत होईल. यामुळे टंचाई असलेल्या भागातील ग्राहकांनाही मदत होईल आणि ते कमी किमतीत अन्नधान्य मिळवू शकतील.

**शेतकरी/आंदोलकांची मते :** राज्ये महसूल गमावतील. कारण शेतकऱ्यांनी नोंदणीकृत कृषी उत्पन्न बाजार समिती (APMC) बाजाराबाहेर आपला माल विकल्यास ते 'मंडी फी' गोळा करू शकणार नाहीत. याशिवाय, संपूर्ण शेतमालाचा व्यापार मंडईतून निघून गेल्यास कमिशन एजंटांना तोटा सहन करावा लागेल.

तिवारी (२०२१) नमूद करतात की या कायद्यामुळे मध्यस्थांच्या हितसंबंधांना धक्का बसू शकतो आणि राज्याच्या महसुलावर परिणाम होऊ शकतो; परंतु शेतकऱ्यांवर त्याचा विपरीत परिणाम अजिबात होणार नाही. आंदोलकांना भीती आहे की, कायदा लागू झाल्यानंतर कृषी उत्पन्न बाजार समित्या (APMC) रद्द केल्या जातील (तिवारी, २०२१). शेतकऱ्यांना शंका आहे की, यामुळे अखेरीस किमान आधारभूत किंमत (MSP) आधारित खरेदीप्रणाली संपुष्टात येऊ शकते आणि खाजगी कंपन्यांकडून शोषण होऊ शकते. मित्रा (२०२०) सूचित करतात की, केंद्र सरकारने हे कायदे लादणे हे APMCs ला बाजूला सारून/डावलून आणि सरकारी खरेदी प्रक्रियेला कमी लेखण्याचा प्रयत्न म्हणून समजले जाते. तसेच हे कृषी कायदे, कृषी व्यापाराचे नियमन आणि कर आकारण्याच्या राज्याच्या अधिकारावर अंकुश ठेवतात (मित्रा, २०२०).

**शेतकरी (सक्षमीकरण आणि संरक्षण) किंमत हमी आणि शेती सेवा करार कायदा, २०२०** (Farmers' Empowerment and Protection

Agreement on Price Assurance and Farm Services Act 2020):

हे कंत्राटी शेतीसाठी कायदेशीर चौकट प्रदान करते. ज्यामध्ये शेतकरी त्यांच्या उत्पादनासाठी कृषी-व्यवसाय कंपन्या, किरकोळ विक्रेते किंवा निर्यातदार यांच्याशी पेरणीच्या हंगामापूर्वी परस्पर सहमतीने किमतीवर करार करू शकतात (तिवारी, २०२१).

**सरकारचे मत :** यामुळे शेतकऱ्यांना (शेतकरी) बाजारातील अनिश्चिततेचा धोका तृतीय पक्षाकडे (प्रायोजक) हस्तांतरित करण्यात मदत होईल. त्यामुळे शेती तंत्रज्ञानातील गुंतवणूक वाढेल. शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान आणि उत्तम निविष्ठा (inputs) उपलब्ध होतील ज्यामुळे शेवटी विपणन खर्च कमी होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल.

**शेतकरी/आंदोलकांची मते :** शेतकरी दावा करतात की, हा कायदा शेतकऱ्यांची वाटाघाटी करण्याची शक्ती कमकुवत करेल. हा कायदा 'भारतीय अन्न आणि शेती व्यवसायावर वर्चस्व गाजवणाऱ्या मोठ्या कंपन्यांना' अनुकूल असल्याचे भासतो. तसेच या कायद्याच्या जोरावर, मोठ्या खाजगी कंपन्या, निर्यातदार, घाऊक विक्रेते आणि प्रोसेसर, जे आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत आहेत आणि समाजकारणी आणि राजकारणी लोकांशी त्यांचे हितसंबंध जोडलेले आहेत, ते लवकरच भविष्यात वरचढ होतील, अशी भीती शेतकरी व्यक्त करतात.

हा कायदा दोन असमान पक्षांना करारामध्ये प्रवेश करण्याचे स्वातंत्र्य देतो. भारतीय कृषिबाजारातील अनिश्चितता आणि माहितीची विषमता यामुळे बाजारकेंद्रित शेती या घडीला अयोग्य वाटते. श्रीराम (२०२१) कंत्राटी शेतीमधील त्रुटींवर प्रकाश टाकतात. कंत्राटी शेतीमध्ये कृषी व्यवसाय महामंडळांच्या दृष्टीने संभाव्य फायदे मिळण्यासाठी, अल्पभूधारक आणि लहान भूखंडधारक शेतकरी, तसेच जमीन वापर आणि जमीन मालकी सुधारणा कायद्यांची अति मंद गतीने अंमलबजावणी हे मुख्य अडथळे आहेत. शेतकऱ्यांच्या दृष्टीने प्रतिकूल परिस्थितीत, कंत्राटी शेती ही व्यवस्था फायदेशीर नाही. कारण हा कायदा नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान, कमी दर्जाची पिके, किटकांच्या हल्ल्यामुळे होणारे पिकांचे नुकसान इत्यादी कृषी उत्पादन संबंधित जोखीम दूर करत नाही (श्रीराम, २०२१).

**अत्यावश्यक वस्तू (सुधारणा) कायदा, २०२०** (Essential Commodities (Amendment) Act):

तिवारी (२०२१) यांच्या मते, हा कायदा अस्तित्वात असलेल्या कायद्यात सुधारणा आहे. सध्या अस्तित्वात असलेला वस्तू कायदा, १९५५ केंद्र आणि राज्य सरकारांना एकाच वेळी काही वस्तूंचे उत्पादन, पुरवठा आणि वितरण नियंत्रित करण्यासाठी, किंमत, साठवणूक आणि ज्या कालावधीसाठी साठा ठेवता येईल हे निश्चित करण्याचे आणि शुल्क लादण्याचे अधिकार देतो (आर्थिक सर्वेक्षण २०१५-१६, २०१५). सुधारित नवीन कायदा तृणधान्ये, डाळी, बटाटा, कांदा, खाद्य तेलबिया यांसारख्या अन्नपदार्थांवर साठवणूक मर्यादा लादण्याच्या केंद्राच्या अधिकारांना रद्द करतो. अपवादात्मक परिस्थितीत (जसे की, युद्ध, दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती) किंवा प्रचंड दरवाढीच्या बाबतीत केंद्र सरकार ही मर्यादा लावू शकते (तिवारी, २०२१).

**सरकारचे मत :** सरकार दावा करते की, हा निर्णय अन्नधान्यांच्या किमती स्थिर ठेवण्यास मदत करेल. अर्थव्यवस्थेला स्थिर करून शेतीक्षेत्रात खाजगी गुंतवणूक/परकीय थेट भांडवली गुंतवणूक (FDI) आकर्षित करू शकेल.

**शेतकरी/आंदोलकांची मते :** शेतीमालाचा साठा करण्याची सरकारची मक्तेदारी संपुष्टात येऊन मोठ्या कॉर्पोरेशनना शेतीमालाचा साठा करण्याचे स्वातंत्र्य आता मिळेल. त्यामुळे या आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम कृषी-

व्यवसाय महामंडळाकडून शेतकऱ्यांची पिळवणूक होण्याची शक्यता शेतकरी व्यक्त करतात.

श्रीराम (२०२१) यांनी असा युक्तिवाद केला की, बफर स्टॉकिंग, सार्वजनिक वितरण, अन्नसुरक्षा, पोषणविषयक गरजा लक्षात घेता, आवश्यक वस्तूंचा पुरवठा व्यवस्थापित करण्याच्या प्रक्रियेत (केंद्र आणि राज्य) सरकारचा सक्रिय सहभाग असणे महत्त्वाचे आहे (श्रीराम, २०२१).

**भारतीय कृषी विपणनावरील शेत कायदे २०२० रद्द करण्याच्या परिणामाचे मूल्यांकन**

हा विभाग केंद्राच्या शेतीविषयक कायदे रद्द करण्याचा निर्णय आणि त्याचा कृषी विपणन सुधारणांवरील परिणामांचे विश्लेषण या विषयावर उपलब्ध निवडक साहित्याचा आढावा सादर करतो.

**संघराज्य व्यवस्थेतील विकेंद्रित प्रशासन प्रक्रियेवर परिणाम :**

मित्रा (२०२०) ने नमूद केले आहे की, कृषी क्षेत्राला स्थानिक स्वरूप आहे. कारण ते स्थानीय भौगोलिक-हवामान परिस्थितीशी जोडलेले आहे. सध्या कृषिक्षेत्र खूप जास्त नियंत्रित आहे. जमिनीची मालकी आणि वापरापासून ते शेतीसंबंधित कच्चामाल मिळविणे, बाजारपेठेत प्रवेश करणे, उत्पादनांची विक्री करणे आणि उत्पादनांची विक्री किंमत ठरविणे, नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे या सर्व गोष्टी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे अनेक कायद्यांद्वारे नियंत्रित केल्या जातात (मित्रा, २०२०).

भारतीय शेती मुक्त करणे आणि शेतीक्षेत्राचे विकेंद्रीकरण करणे ही काळाची गरज आहे, हे कोणीही नाकारत नाही. मित्रा (२०२०) यांनी केंद्राच्या कृषी कायद्यांबाबतच्या दृष्टिकोनावर टीका केली आणि नमूद केले की, सुधारणांच्या नावाखाली नवीन कृषिबाजार कायदे भारतीय संघराज्यातील विकेंद्रित प्रशासनाचे महत्त्व कमी करत आहेत (मित्रा, २०२०). या बदलांची रचना, नियोजन आणि अंमलबजावणी प्रक्रियेत केंद्राने राज्यांचे समर्थन मिळवणे आणि भागधारकांना सामील करणे आवश्यक आहे. विकेंद्रित, सहभागात्मक दृष्टिकोन केंद्राला सर्व भागधारकांचे आवश्यक समर्थन मिळविण्यात मदत करेल. या कायद्यांच्या रूपाने सुधारणा लादण्याचा केंद्राचा प्रयत्न निंदनीय आहे. हेतू कितीही उदात्त असला तरीही केंद्र सरकार राज्यांना या प्रक्रियेमधून बाजूला सारू शकत नाही. कोणत्याही क्षेत्रामध्ये नवीन सुधारणा/ कायदा यांची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र-सरकार आणि राज्य-सरकार यांच्यामध्ये समन्वय असणे अत्यंत आवश्यक आहे. राज्यांना डावलून तसेच त्यांच्या समर्थनाशिवाय अशा प्रकारच्या सुधारणा फक्त कायदे करून जलदगतीने होणे अवघड आहे. या संदर्भात विविध समाजघटकांमध्ये विपणन व्यवस्थेतील सुधारणांची आवश्यकता पटवून देण्यासाठी जनजागृती आणि सातत्यपूर्ण संवाद महत्त्वाचा आहे.

**किमान आधारभूत किंमती (MSP) आधारित सरकारी खरेदीप्रणालीवरील परिणाम:**

तिवारी आणि शर्मा (२०२१) यांनी टिपलेले आणखी एक महत्त्वाचे निरीक्षण. शेतकऱ्यांना भीती वाटत होती की, सध्याच्या APMC मंडई, जिथे ते त्यांचे उत्पादन, मुख्यतः गहू आणि तांदूळ विकतात, अचानक बंद होतील, जर खाजगी घटकांनी मंडईच्या बाहेर कृषी उत्पादनांचा व्यापार सुरू केला आणि एकदा का APMC मंडीप्रणाली निरर्थक बनली, तर त्यावर आधारित खरेदी व किमान आधारभूत किंमती (MSP) प्रणालीदेखील संपुष्टात येतील (तिवारी आणि शर्मा, २०२१). आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांच्या या भीतीमुळे शेतकऱ्यांनी आंदोलनाच्यानंतरच्या टप्प्यावर किमान आधारभूत किंमती (MSP) प्रणाली कायदेशीर करण्याची मागणी केली.

देशपांडे (२०२१) MSP कायदेशीर करण्याचे संभाव्य परिणाम दर्शवितात. देशपांडे (२०२१) यांनी

असा युक्तिवाद केला की, जर MSP कायदेशीर केली तर खाजगी व्यापारी आणि कॉर्पोरेट्सनादेखील MSP वर खरेदी करावी लागेल, जी ते करणार नाहीत. त्यामुळे, सरकारला सर्व कृषी उत्पादनांची खरेदी करावी लागेल, म्हणजे, ज्या सर्व २३ पिकांसाठी सरकारने MSP जाहीर केली आहे यासाठी सरकारला सुमारे १७ लाख कोटी रुपये (बजेटच्या ८५% ) खर्च करावे लागतील. त्यामुळे सरकारी तिजोरीवर मोठा भार पडण्याची शक्यता लक्षात घेता, सरकारला MSP कायदेशीर करणे शक्य नाही (देशपांडे, २०२१). देशपांडे (२०२१) यांनी सरकारी तिजोरीवर MSP कायदेशीर करण्याच्या संभाव्य भाराबद्दल सावध राहाण्याचा इशारा दिला आहे.

मित्रा (२०२०) सांगतात की, आजघडीला कोणत्याही परिस्थितीत, APMC मंडईमध्ये निम्म्याहून कमी शेतमाल विकला जातो. बहुसंख्य (अल्पभूधारक, लहान) शेतकरी पुरेशा विक्रीयोग्य अतिरिक्त पुरवठ्याअभावी, शेतमालाला चांगली किंमत आणि अधिक उत्पन्न मिळवण्यासाठी मंडईत जाण्याची तसदी घेत नाहीत. त्यातील बराचसा भाग स्थानिक व्यापाऱ्यांना विकला जातो. अशा प्रकारे बहुसंख्य लहान आणि सीमांत शेतकरी MSP च्या कक्षेबाहेर राहातात.

चांद (२०२०) युक्तिवाद करतात आणि सांगतात की, MSP प्रणाली अंमलबजावणी आणि पुढे चालू ठेवणे हा एक प्रशासकीय निर्णय आहे. काही पिकांच्या बाबतीत (तांदूळ आणि गहू), तो अन्नसुरक्षेच्या चार महत्त्वपूर्ण स्तंभांचा एक भाग आहे, ज्यामध्ये सरकारी हस्तक्षेप करून (i) अन्नधान्याची खरेदी, (ii) बफर स्टॉक राखणे (iii) सार्वजनिक वितरण व्यवस्था (PDS) चालवणे आणि (iv) किमान आधारभूत किंमत (MSP) प्रणाली अमलात आणणे यांचा समावेश आहे (चांद, २०२०). यावरून सरकारच्या अन्नसुरक्षा धोरणांमध्ये MSP प्रणालीचे महत्त्व स्पष्ट होते.

**कृषी उत्पन्न बाजार समिती (APMC) मंडई व्यवस्थेवरील परिणाम:**

श्रीराम (२०२१) यांनी शेतकरी उत्पादन व्यापार आणि वाणिज्य (प्रमोशन आणि सुलभीकरण) कायदा, २०२०, जो शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन कुठेही विकण्याचे स्वातंत्र्य प्रदान करतो, त्या कायद्याचे वर्णन करण्यासाठी 'कृषी उत्पन्न बाजार समिती (APMC) बायपास ॲक्ट' हा नारायणन, (२०२०) यांनी वापरलेल्या शब्दप्रयोगाचा उल्लेख केला आहे. श्रीराम (२०२१) या कायद्यासंबंधित महत्त्वाचे वैशिष्ट्य अधोरेखित करतात. या कायद्यात 'व्यापारी' आणि 'व्यापार' यांच्या अतिशय विस्तारित अशा व्याख्या आहेत. आयकर विभागाने जारी केलेले कायम खाते क्रमांक (पॅन) कार्ड असलेली कोणतीही व्यक्ती किंवा संस्था 'व्यापारी' समजली जाईल. (श्रीराम, २०२१) तसेच व्यापाराच्या विस्तृत व्याख्येचा देखील उल्लेख आहे. त्यानुसार - वास्तविक 'व्यापार' इलेक्ट्रॉनिक एक्सचेंजेससह कोणत्याही मोडमध्ये असू शकतो. श्रीराम (२०२१) यांनी आधी विद्यमान बाजारातील अपूर्णता/विकृती यावर उपाय शोधून त्यानंतर पुढे कृषी विपणन संरचना नियंत्रणमुक्त करण्याच्या गरजेवर जोर दिला. श्रीराम (२०२१) यांनी असा युक्तिवाद केला की, सार्वजनिक गुंतवणुकीसोबत खाजगी गुंतवणुकीची व्यवस्थित संरचना - एक लवचिक मूल्य साखळी तयार करण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

चांद (२०२०), यांच्या मते, APMC बाजारांची मुख्य समस्या ही अतिरिक्त आकारला जाणारा बाजार शुल्क आणि विविध प्रकारचे कमिशन आहे. एकूण शुल्काच्या जास्तीत जास्त १.५%, बाजार शुल्क आणि कमिशन यासह मंडी चालवण्यासाठी पुरेसे आहे. पंजाब, हरियाणा, राजस्थान, गुजरात, अरुणाचल प्रदेश, पश्चिम बंगाल आणि उत्तर प्रदेश, येथे एकूण शुल्काच्या ५ ते

८.५% पर्यंत बाजार शुल्क आणि कमिशन आकारला जातो. सर्वाधिक शुल्क पंजाबमध्ये आणि नंतर हरयाणा या राज्यांमध्ये आहे (चांद, २०२०). ज्या कारणासाठी विविध शुल्क आणि कमिशन आकारले जातात, त्या विपणन संबंधित पायाभूत सुविधांमध्ये नजीकच्या काळात फारशी वाढ झालेली नाही. चांद (२०२०) असे नमूद करतात की, २००६ नंतर APMC मंडी संबंधित पायाभूत सुविधांमध्ये कोणतीही वाढ नोंदवली गेली नाही.

**शेतकऱ्यांच्या उत्पन्नावरील परिणाम:**

वेंकटेश्वरलू (२०२१) यांनी नमूद केले आहे की, जोपर्यंत लहान, अत्यल्प भूधारक आणि भाडेतत्त्वावर शेती करणारे शेतकरी यांना भेडसावत असलेल्या समस्या कृषी विपणन, पत आणि विस्तार सेवांमध्ये प्राधान्याने हाताळल्या जात नाहीत तोपर्यंत २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा सरकारचा प्रस्ताव प्रत्यक्षात आणणे अव्यवहार्य वाटते. आता, सहकारी तत्त्वावर आधारित/सामूहिक शेतीच्या स्वरूपाकडे जाण्याची वेळ आली आहे. कारण भारतात एकूण शेतकऱ्यांपैकी ८५% शेतकरी हे छोटे आणि सीमांत (Marginal) शेतकरी आहेत (वेंकटेश्वरलू, २०२१). त्याचप्रमाणे भविष्यातील शेतीविषयक धोरणाचा भर कृषी उत्पादकता वाढवण्यावर असायला हवा. तसेच शेतकरी आणि शेतकऱ्याच्या पुढच्या पिढ्यांना शेती हे भरघोस उत्पन्न मिळवण्याचे साधन आहे, अशी भावना निर्माण करणारे कृषीविषयक धोरण राबविले गेले पाहिजे.

**निष्कर्ष आणि सूचना :**

शेती कायदे २०२० रद्द करणे हे विपणन सुधारणा प्रक्रियेच्या समाप्तीचे संकेत देत नाही. कोणत्याही धोरणात्मक निर्णयाला लोकशाही समाजात सार्वजनिक मान्यता मिळणे आवश्यक आहे हेच ते दर्शवते. तिवारी आणि शर्मा (२०२१) यांनी नमूद केले आहे की, तीन शेती कायद्यांमध्ये प्रस्तावित केलेल्या सुधारणांच्या अचूक रचना आणि यंत्रणेमध्ये काही कमतरता असू शकतात, परंतु त्या योग्य दिशेने होत्या. सध्याच्या सरकारने या सुधारणांना मोठ्या विश्वासाने पुढे नेण्याचे ठरविले; परंतु या कृतीमुळे अनेक भागधारकांना दुर्लक्षित वाटले आणि संतप्त प्रतिक्रिया निर्माण झाली (तिवारी आणि शर्मा, २०२१). ग्रामीण कृषी अर्थव्यवस्थेत सुधारणा करण्याच्या भविष्यातील कोणत्याही प्रयत्नांना केवळ सुधारणांच्या चांगल्या आराखड्याची नव्हे, तर व्यापक स्वीकृतीसाठी, अधिक व्यापक सल्लामसलत आवश्यक आहे हे अधोरेखित करते (तिवारी आणि शर्मा, २०२१).

मागील विभागातील चर्चेच्या आधारे, सध्याच्या काळात शेतीक्षेत्रासमोरील आव्हानांना तोंड देण्यासाठी भारतीय कृषी परिवर्तनाच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी खालील उपाय सुचवले आहेत. खालील घटक भारतातील कृषी विपणन सुधारणांच्या अंमलबजावणीची गती आणि परिणामकारकता यावर लक्षणीय परिणाम करतील.

१. केंद्राने कृषी विपणनाचे स्थानिक स्वरूप ओळखले पाहिजे आणि शेतीची नफा आणि उत्पादकता सुधारण्यासाठी प्रदेश विशिष्ट, पीक विशिष्ट विपणन धोरण तयार करण्याची जबाबदारी राज्यांवर सोपवली पाहिजे. भारतीय शेतीतील विविधता लक्षात घेता, केंद्रीकृत दृष्टिकोन असलेली 'एक देश एकच कृषी बाजार' ही संकल्पना उपयोगी नाही.

२. केंद्र सरकारला दबावगट म्हणून संघटित शेतकऱ्यांचे महत्त्व मान्य करावे लागेल आणि शेतकऱ्यांची वाटाघाटी करण्याची क्षमता वाढविण्यासाठी सहकारी तत्त्वावर आधारित संस्थात्मक चौकट मजबूत करावी लागेल. भारतातील डेअरी सहकारी क्षेत्राच्या यशस्वी प्रयोगांच्या धर्तीवर सहकारी विपणन संस्था मजबूत केल्या जाऊ शकतात. यामुळे खाजगी कृषी-व्यवसाय महामंडळ (ॲग्रीबिझनेस कॉर्पोरेशन) आणि शेतकऱ्यांसाठी समान तुल्यबळ असलेले व्यासपीठ

निर्माण करण्यात मदत होईल.

३. कृषी-व्यवसाय महामंडळाच्या दृष्टीने कंत्राटी शेती व्यवहार्य बनवण्यासाठी, शेतकऱ्यांच्या मालकी हक्कांना धक्का न लावता महामंडळांना जमिनीच्या विकासामध्ये गुंतवणूक करण्याची परवानगी देणारे विद्यमान जमीन वापर कायद्यात आवश्यक बदल करणे आवश्यक आहे. तेव्हाच खाजगी विकासक शेत जमिनीमध्ये गुंतवणूक करण्यास प्रवृत्त होतील.

४. किमान आधारभूत किंमती (MSP) प्रणालीचे सरकारच्या अन्नसुरक्षा पुरवण्याच्या वचनबद्धतेमधील महत्त्व पाहाता, काही ठरावीक पिकांसाठी किमान आधारभूत किंमत (MSP) कायदेशीर करून शेतकऱ्यांना एका ठरावीक कालमर्यादेत मदत करता येईल. ठरावीक अंतराने परिस्थितीचे पुनरावलोकन करून हे समर्थन मागे घेतले जावे. किमान आधारभूत किंमत धोरणाचे फायदे केवळ विशिष्ट प्रदेश/पिके/वस्तूंपुरते मर्यादित नाहीत याची खात्री करण्यासाठी किमान आधारभूत किंमत (MSP) वस्तूंचा/पिकांचा संच वैविध्यपूर्ण असला पाहिजे. कालांतराने जेव्हा कार्यक्षम आणि लवचिक कृषी बाजारपेठ विकसित होईल तेव्हा MSP ची प्रणाली निरर्थक बनेल.

५. श्रीराम (२०२२) यांनी नमूद केले आहे की, भारतीय कृषी बाजाराचे सध्याचे स्वरूप लक्षात घेता, कृषी उत्पन्न बाजार समिती (APMC) मंड्याच्या आधुनिकीकरणावर भर द्यावा. तसेच देशातील प्रत्येक पंचायतीमध्ये लहान, अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी संघटित बाजारपेठेची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी ग्रामीण हाट नेटवर्कचा वेगाने विस्तार करावा. ग्रामीण हाटांची सुधारणा करणे यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.

६. जमीन, मजूर, पाणी, ऊर्जा, बियाणे, खते आणि पत यांसारख्या वापरल्या जाणाऱ्या कृषी निविष्ठांच्या (Inputs) प्रतियुनिट कृषी उत्पन्नात जास्तीत जास्त वाढ करण्यासाठी सरकारने कृषी संशोधन, तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधा विकासामध्ये गुंतवणूक केली पाहिजे. या क्षेत्रांमध्ये सार्वजनिकरीत्या अर्थसहाय्यित संशोधनास प्रोत्साहन दिले पाहिजे.

७. मजबूत पायाभूत सुविधांची उपस्थिती हा मजबूत कृषी मूल्य साखळीचा एक महत्त्वाचा घटक आहे. यामध्ये कापणीपूर्व आणि कापणीनंतरच्या हाताळणी सुविधा, साठवणूक आणि वितरण, प्रक्रिया सुविधा, रस्ते आणि व्यापार सुलभ करणाऱ्या बंदरांवर जागतिक दर्जाच्या 'एक्झिट पॉईंट पायाभूत सुविधांचा' समावेश आहे (APEDA, २०२१). खाजगी क्षेत्रातील गुंतवणूक/ थेट परकीय गुंतवणूक (FDI) आकर्षित करण्यासाठी सरकारला सुरुवातीला पुढाकार घेऊन या क्षेत्रांमध्ये मोठी गुंतवणूक करावी लागेल. विकासाच्या नंतरच्या टप्प्यात, भारतीय कृषी निर्यात जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मक बनवण्यासाठी, सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्त्वावर अशा जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा उभारल्या जाऊ शकतात.

या लेखाच्या सुरुवातीला नमूद केलेली दोन मुख्य आव्हाने लक्षात घेता, कृषिक्षेत्राच्या संसाधन वापर कार्यक्षमतेशी संबंधित समस्यांचे निराकरण करणे हे धोरण प्राधान्य असावे. त्यामुळे हे सुनिश्चित होईल की, या क्षेत्राद्वारे भरीव विक्रीयोग्य अधिशेष (Marketable Surplus) निर्माण केला जाईल जो शाश्वत असेल. कृषी उत्पादनाच्या शेती आणि विपणन यांना प्रोत्साहन देण्यासाठी शेती आणि शेतकरीकेंद्रित स्थिर धोरण वातावरण आवश्यक आहे. धोरण अनिश्चितता/ अस्थिरतेचा नकारात्मक परिणाम कृषी विपणन सुधारणांच्या प्रक्रियेवर होऊ शकतो म्हणून सरकारने शेतीविषयक सुधारणांची धोरणे निश्चित करताना सर्व घटकांना सामावून घेऊन, त्यांचे समर्थन मिळवून धोरण जाहीर करावे. विपणन संबंधित पायाभूत सुविधांची हळूहळू पुनर्रचना आणि सुसंघटित सहकारी तत्त्वावर आधारित उत्पादक संघटनांची मजबूत उपस्थिती,

कृषिमूल्य साखळीच्या जागतिकीकरणातून मिळालेल्या नफ्याचे न्याय्य वाटप करण्यास भविष्यात उपयोगी पडतील. कृषिक्षेत्र आणि शेतकऱ्याला जागतिकीकरणामुळे एकात्मिक झालेल्या कृषिमूल्य साखळीत सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देणे हे शेती आणि शेतकरीकेंद्रित धोरणाचे उद्दिष्ट असले पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ सूची**


१. कुमार, ए. (२०२२), भारतात कृषी विपणन सुधारणांची गरज, डेव्हिड चेल्ला बास्कर, व्ही. आणि शलेंद्र (एड्स.), भारतातील कृषी विपणन-उदारमतवादी आणि स्पर्धात्मक प्रणालीसाठी सुधारणा (PP. 1-8). राणी लक्ष्मीबाई केंद्रीय कृषी विद्यापीठ, झाशी (उत्तरप्रदेश) आणि राष्ट्रीय कृषी विस्तार व्यवस्थापन संस्था (MANAGE), हैदराबाद, भारत.

२. कुमार, पी. (२०२२), शेतीचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी बाजारपेठेतील आव्हाने, डेव्हिड चेल्ला बास्कर, व्ही. आणि शलेंद्र (एड्स.), भारतातील कृषी विपणन - उदारमतवादी आणि स्पर्धात्मक प्रणालीसाठी सुधारणा (PP. 67 - 72). राणी लक्ष्मीबाई केंद्रीय कृषी विद्यापीठ, झाशी (उत्तर प्रदेश) आणि राष्ट्रीय कृषी विस्तार व्यवस्थापन संस्था (MANAGE), हैदराबाद, भारत.

३. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार, (२०२१, मार्च कृषी, सहकार आणि शेतकरी कल्याण विभाग), वार्षिक अहवाल २०२०-२१, https://agricoop.nic.in/en/annual-report. 24 मे 2022 रोजी https://agricoop.nic.in/sites/default/files/Web%20copy%20of%20AR%20%28Eng%29_6.pdf वरून पुनर्प्राप्त केले.

४. चांद, आर. (२०२०, नोव्हेंबर), नवीन शेती कायदा: परिणाम समजून घेणे [NITI वर्किंग पेपर सिरीज 1/2020]. NITI आयोग, भारत सरकार.

५. डाउन टू अर्थ (२०२१, डिसेंबर ७). ग्रामीण कृषी बाजार: दोन वर्षानंतर, फक्त ६% हाट अपग्रेड झाले. विनम्र. २४ मे २०२२ रोजी https://www.downtoearth.org.in/news/governance/gramin-agricultural-markets-two-years-on-just-6-haats-upgraded-80588 वरून पुनर्प्राप्त केले.

६. तिवारी, ओ. (२०२१, फेब्रुवारी ५), शेतीविषयक कायदे स्पष्ट केले: गैरसमज संपवण्याची आणि गतिरोध तोडण्याची वेळ, इंडिया टीव्ही बातम्या, २३ मे २०२२ रोजी https://www.indiatvnews.com/news/india/farm-laws-exlained-time-to-end-misconceptions-and-break-impasse-682985 वरून पुनर्प्राप्त केले.

७. तिवारी, आर., आणि शर्मा, एच. (२०२१, नोव्हेंबर २१). स्पष्ट केले: शेतकरी, सरकार, विरोधक आणि पंतप्रधान यांच्यासाठी शेती कायदा रद्द करणे म्हणजे काय. इंडियन एक्सप्रेस, २३ मे २०२२ रोजी https://indianexpress.com/article/exlained/farmers-protest-farm-laws-repeal-7632011/ वरून पुनर्प्राप्त केले.

८. देशपांडे, पीपी (२०२१, डिसेंबर ८), शेतीविषयक कायदे रद्द - कृषी सुधारणांना धक्का? टाइम्स ऑफ इंडिया, २४ मे २०२२ रोजी https://timesofindia.indiatimes.com/blogs/truth-lies-and-politics/repeal-of-farm-laws-a-setback-to-agricultural-reforms/ वरून पुनर्प्राप्त केले.

९. नारायणन, एस. (२०२०, सप्टेंबर २८). फार्म बिलेथ्री इंडिया फोरम, २४ मे २०२२ रोजी

https://www.theindiaforum.in/article/three-farm-bills वरून पुनर्प्राप्त केले.

१०. मालवीय डी. (२०२२, फेब्रुवारी २६), शेतीविषयक कायदे २०२०: सुधारणांची सुरुवात, आर्थिक आणि राजकीय साप्ताहिक, ५७ (९), ४-५.

११. मित्रा, बी. एस. (२०२०, डिसेंबर ३). तरीही जवळपास निम्मे शेतमाल एपीएमसीच्या बाहेर विकले जाते. पण मोदी सरकारला सर्व एकाच आकाराचे हवे आहेत. प्रिंट. २५ मे २०२२ रोजी https://theprint.in/opinion/about-half-of-farm-produce-sold-outside-apmcs-anyway-but-modi-govt-wants-one-size-fits-all वरून पुनर्प्राप्त केले.

१२. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाकडून पुनर्प्राप्त. (२०१८). कृषी निर्यात धोरण. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय, २४ मे २०२२ रोजी https://commerce.gov.in/wp-content/uploads/2020/02/NTESCL636802085 403925699 AGRIEXPORTPOLICY.pdf वरून पुनर्प्राप्त केले.

१३. व्यंकटेश्वरलू, ए. (२०२१), भारतातील कृषी विकासाची राजकीय अर्थव्यवस्था: धोरणे, उपलब्धी आणि चिंता, दिल्ली: आकार पुस्तके.

१४. सिंग, आर., आणि लोहिया, एम. (२०२०, मे २५), विश्लेषण: मॉडेल एपीएलएम कायदा - लेक्सलाइफ इंडिया, लेक्सलाइफ इंडिया, वरून २४ मे २०२२ रोजी पुनर्प्राप्त

१५. श्रीराम, एम.एस. (२०२१, मार्च १३) शेतीविषयक कायदे: आधुनिकीकरणासह नियंत्रणमुक्ती, आर्थिक आणि राजकीय साप्ताहिक, ५६ (११), ३७ -४२.

१६. News18.com वरून पुनर्प्राप्त, (२०२१, नोव्हेंबर १९), शेतीविषयक कायदे स्पष्ट केले: तीन कृषी कायदे काय आहेत आणि शेतकऱ्यांनी त्यांना विरोध का केला. न्यूज १८, २३ मे २०२२ रोजी https://www.news18.com/news/india/farm-laws-exlained-what-are-the-three-agri-legislations-and-why-farmers-opposed-them-4461893 वरून पुनर्प्राप्त केले.

◆

---

''प्रभावी नागरीकत्वासाठी वाचण्याची व लिहिण्याची क्षमता जेवढी आवश्यक असते तेवढीच संख्याशास्त्रीय पद्धतीने विचार करण्याची क्षमता एके दिवशी आवश्यक ठरेल.''

***- एच. जी. वेल्स***

---

# अर्थक्षेत्रातील महिलांचे योगदान

**संतोष दास्ताने** †

**प्रस्तावना**

समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये महिलांचा टक्का हळूहळू वाढत असला तरी अनेक मोक्याची उच्च पदे महिलांसाठी दूरच राहिली आहेत. भारतात राष्ट्रपती, पंतप्रधान, अर्थमंत्री, राज्यपाल ही पदे महिलांनी भूषवली असली किंवा त्या भूषवत असल्या तरी समाजातील अनेक क्षेत्रांत व विशेष करून अर्थक्षेत्रातील कितीतरी उच्च पदे अद्याप कोणाही महिलेच्या वाट्यास आली नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीशपद किंवा रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नरपद ही पुरुषांचीच मक्तेदारी राहिली आहे. लोकसंख्येत जरी जवळपास निम्मा वाटा असला तरी उच्च पदांच्या विभागणीत ते प्रमाण मुळीच पाळले जात नाही, असे स्पष्ट होते. जबाबदारीच्या व संवेदनशील पदांवर निवड करताना महिलांचा पुरेशा प्राधान्याने विचार होत नाही. लिंग समानता किंवा महिलांचे सबलीकरण याचा प्रत्यक्षातील अनुभव तितकासा सकारात्मक नाही हेच खरे! या मागील मुख्य कारण म्हणजे समाजातील पुरुषप्रधान मानसिकता अद्याप बदललेली नाही. देशात ग्रामीण व नागरी भागात विकेंद्रीकरणाचे कायदे संमत होऊन १९९३ मध्ये अमलात आले. पण इच्छा आणि क्षमता असूनही, काही अपवाद वगळता, ग्रामीण भागात स्त्री सरपंचाचा कारभार त्यांचे पतिदेव हाकत असतात, हे सार्वत्रिक दृश्य आहे. प्रशासन, शिक्षण, पोलीस सेवा येथे महिलांची कामगिरी लक्षणीय आहे. सशस्त्र सेना दलात महिलांचा सहभाग वाढत आहे, पण अद्याप मोठी मजल गाठायची आहे, हेही विसरता कामा नये. समाजातील विविध क्षेत्रांमध्ये महिलांच्या सहभागाची आजची स्थिती काय आहे, महिलांच्या सहभागाचा टक्का वाढवण्यासाठी काय करायला हवे, याचा क्षेत्रवार अभ्यास होणे गरजेचे आहे. इंग्लंडमधील मजूर पक्षाच्या खासदार श्रीमती राचेल रीव्हस यांनी अर्थ-वित्त-बँकिंग या क्षेत्रांबाबत असा विस्तृत संशोधन अभ्यास नुकताच प्रसिद्ध केला आहे.[१] महिला अर्थतज्ज्ञांची या क्षेत्रातली कामगिरी कशी काय आहे, त्यामागील प्रेरणा कोणत्या, त्यांची कामगिरी तपासण्याचे निकष कोणते आहेत, ते कोणते असावेत अशा मुद्दयांचा वस्तुनिष्ठ मागोवा त्यांनी घेतला आहे. इंग्लंडमध्येदेखील आजपर्यंतच्या आठशे वर्षांच्या इतिहासात अर्थमंत्रीपद (इंग्लंडमधील त्या पदाचे नाव - Chancellor of the Exchequer) कुणाही

† माजी अध्यक्ष व माजी विश्वस्त, मराठी अर्थशास्त्र परिषद
आजीव सभासद क्र. ६३, भ्रमणध्वनी : ९८२२००९९५४, ई-मेल : santosh.dastane@gmail.com

महिलेच्या वाट्यास आले नाही. जर मजूर पक्ष पुढे सत्तेवर आला तर त्यांची त्या प्रतिष्ठेच्या पदावर नेमणूक होणार आहे असे जाहीर झाले आहे.

त्यांचा मुद्दा सिद्ध करण्यासाठी अर्थशास्त्रातील सर्वोच्च अशा नोबेल स्मृती पुरस्काराचा उल्लेख पुरेसा आहे. सन १९६९ नंतर आज २०२३ अखेर एकूण ९३ अर्थतज्ज्ञ या पुरस्काराने सन्मानित झाले आहेत. पण त्यात फक्त दोन महिला अर्थतज्ज्ञ आहेत : एलिनोर ओस्त्रोम (२००९) आणि एस्तेर डुफ्लो (२०१९); व तोही पुरस्कार त्यांना त्या त्या वर्षी विभागून मिळाला आहे, एकटीला पूर्णपणे स्वतंत्र असा नव्हे! विद्वत्ता आणि क्षमता यात कोठेही कमतरता नसून असा गौरव होण्यापासून महिला वंचित राहातात याचा शोध आवश्यक का आहे हे या उदाहरणावरून स्पष्ट होते.

**महिला अर्थतज्ज्ञांची कामगिरी :**

रीव्हस यांनी त्यांच्या पुस्तकात एकूण नऊ महिला अर्थतज्ज्ञांच्या या क्षेत्रातील कामगिरीचा सविस्तर आढावा घेतला आहे. त्यात एकोणिसाव्या शतकातील हरीएत मार्तिनो यांच्यापासून सध्याच्या पिढीतील एस्तेर डुफ्लो व जेनेट येलेन आणि इतरांचा समावेश आहे. शिवाय सिडने वेब यांच्या पत्नी बेट्रीस वेब, आल्फ्रेड मार्शल यांच्या पत्नी मेरी मार्शल, ओस्टीन रॉबिन्सन यांच्या पत्नी जोन रॉबिन्सन, पोलंडमधील समाजवादी अर्थतज्ज्ञ रोझा लुक्झेम्बर्ग, अमेरिकन अर्थतज्ज्ञ अना स्वार्त्झ यांच्याही कामगिरीचे विश्लेषण त्यांनी पुस्तकात तपशिलात मांडले आहे. वेगळा व अपारंपरिक आर्थिक विचार, आर्थिक सिद्धांताच्या शाखेतील मूलगामी विवेचन, आर्थिक धोरणावरील त्यांचा प्रभाव, आर्थिक-वित्तीय-सरकारी-खासगी संस्थांमध्ये काम करून त्यांनी उमटवलेला आपला स्वतंत्र ठसा असे त्यांचे विविध पैलू त्यांनी विशद केले आहेत. त्या सर्व महिला अर्थतज्ज्ञांची या क्षेत्रातील कामगिरी पुरुष अर्थतज्ज्ञांच्या तोडीस तोड आहे, ती कोणत्याही अर्थाने निकस अथवा कनिष्ठ नाही असा मुद्दा येथे ध्यानी येतो. पतिदेव जर प्रसिद्धीच्या आणि लोकप्रियतेच्या झोतात वावरणारे असतील तर त्यांच्या पत्नीची कामगिरी झाकोळली जाते, त्या कामगिरीचे पूर्वग्रहविरहित व तटस्थ असे मूल्यमापन होत नाही. तो दोष टाळून महिला अर्थतज्ज्ञांच्या कामगिरीवर उचित आणि समतोल भाष्य करण्याचे काम या पुस्तकाने केले आहे. सहकारी, सहलेखक, सहसंशोधक म्हणून त्यांचे अपूर्व असे योगदान आहे असे येथे समजून येते. केवळ मदतनीस असे दुय्यम नव्हे तर स्वतंत्र आणि उल्लेखनीय काम त्यांनी केले आहे अशी नोंद इतिहासात होईल, नव्हे ती व्हायला हवी असे त्यांचे आग्रही प्रतिपादन आहे.

**महिलांच्या योगदानाचे ठळक पैलू (१) :**

अर्थशास्त्र, प्रशासन, समाजशास्त्र या विद्याशाखांमध्ये आपल्या लेखनाने आपले स्वतंत्र स्थान निर्माण करणाऱ्या आद्य अर्थशास्त्री म्हणून हरीएत मार्तिनो (१८०२-१८७६) यांचे नाव आवर्जून घेतले जाते. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस खुल्या आणि उदारमतवादी अर्थव्यवस्थेचा मार्तिनो यांनी जोरदार पुरस्कार केला. सरकारचा हस्तक्षेप नसावा. शिक्षण आणि न्यायसंस्था ही क्षेत्रे वगळून, सरकारची कोणतीही थेट नियंत्रणे नसावीत, देशात आणि देशाबाहेरील व्यापार खुला आणि निर्बंधरहित असावा, असे त्यांचे विवेचन होते. त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांना त्या काळी प्रचंड प्रतिसाद मिळाला होता.[२] तेव्हा सनातनवादी अर्थशास्त्र ही विचारधारा नव्याने स्थिरावत होती. मार्तिनो यांचे लेखन ती तत्त्वे अधोरेखित करणारे होते. त्यांना 'ॲडम स्मिथ यांची कन्या' असे टोपण नाव मिळाले होते. त्यांनी दोन वर्षे अमेरिकेत वास्तव्य केले आणि त्या समाजाचा बारकाईने अभ्यास केला. त्यावर त्यांनी तीन खंडात लिहून प्रसिद्ध केलेले Society in America हे पुस्तक अतिशय प्रमाणभूत मानले जाते. अमेरिकेतील गुलामगिरीवर त्यांनी टीका केली, त्यांना अधिक अधिकार

मिळावेत अशी जाहीर मागणी त्यांनी केली. इतके मूलभूत संशोधन-लेखन करूनही इंग्लंड आणि अमेरिका येथील अभ्यासकांनी त्यांच्या लेखनाकडे दुर्लक्ष केले.

बेट्रीस वेब (१८५८-१९४३) या समाजशास्त्रज्ञ, अर्थतज्ज्ञ, स्त्रीवादी विचारवंत, समाजसुधारक म्हणून ओळखल्या जातात. त्या व त्यांचे पती सिडने वेब हे फेबियन सोसायटीचे संस्थापक सदस्य होते. इंग्लंडमधील प्रसिद्ध 'लंडन स्कूल ऑफ एकोनोमिक्स'च्या त्या संस्थापक होत्या. शिवाय लंडन विद्यापीठाच्या स्थापनेत त्यांचा पुढाकार होता. त्यांचे लेखन व विचार 'सहकारी संघराज्यवाद' या व्याख्येत बसणारे आहे. लोकशाही मूल्यांचा अंगीकार करून कल्याणकारी राज्य स्थापले जावे, असे त्यांचे स्वप्न होते. मजुरांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीतील सुधारणेबद्दल त्यांना विशेष आस्था होती. श्रमाचे अर्थशास्त्र या शाखेतील 'सामूहिक सौदाशक्ती' ही संज्ञा त्यांनीच प्रथम वापरात आणली. इंग्लंडमधील प्रसिद्ध "Poor Law" याचा अभ्यास करण्यासाठी १९०५ साली हुजूर पक्षाने एक रॉयल कमिशन नेमले होते. बेट्रीस वेब त्याच्या एक सदस्य होत्या. त्यांनी सादर केलेला अल्पसंख्य अहवाल एक मोलाचा दस्तावेज म्हणून आजही वाचला जातो. The Cooperative Movement in Great Britain हे त्यांनी लिहिलेले पुस्तक या विषयावरील एक महत्त्वाचा संदर्भ म्हणून मानले जाते. त्यांचे पती सिडने वेब यांच्या बरोबर त्यांनी लेखन केले[३], अनेक संशोधन प्रकल्प पार पाडले; पण बेट्रीस वेब यांचे स्वतःचे स्वतंत्रपणे केलेले कामही तितकेच महत्त्वाचे होते, यात संशय नाही.

आल्फ्रेड मार्शल यांच्या पत्नी मेरी पेले मार्शल (१८५०-१९४४) यांचे अर्थशास्त्रातील उच्च शिक्षण केंब्रिज विद्यापीठात झाले. मेरी या आल्फ्रेड यांच्या विद्यार्थिनी होत्या, त्यांचा १८७६ मध्ये विवाह झाला. इंग्लंडमध्ये विविध महाविद्यालये आणि विद्यापीठे येथे त्यांनी अर्थशास्त्राचे अध्यापन केले. महिलांना समान हक्क, समान कामासाठी समान वेतन, मतदानाचा हक्क यासाठी त्या जन्मभर झगडल्या. आल्फ्रेड यांचे Principles of Economics हे गाजलेले पुस्तक १८९० साली प्रसिद्ध झाले. त्यामागील चिंतन, संशोधन, कच्चे लेखन यात मेरी यांचे मोलाचे साह्य होते, मात्र त्या पुस्तकातील नेमक्या कोणत्या भागाचे किती लेखन त्यांनी केले याचे स्पष्ट उल्लेख सापडत नाहीत. 'आल्फ्रेड यांच्या लेखनात मेरी यांचे मुबलक योगदान होते' असे केन्स यांनीही आपल्या Essays in Biography[४] या पुस्तकात म्हटले आहे. आल्फ्रेड आणि मेरी मार्शल या दोघांच्या नावाने १८७९ मध्ये प्रसिद्ध झालेले The Economics of Industry हे पुस्तक मेरी यांनी आपल्या महाविद्यालयीन अध्यापन काळात जी व्याख्याने दिली त्यावर आधारित होते. तत्कालीन आर्थिक सिद्धान्त आणि धोरण या दोन्हीवर या पुस्तकाचा दाट प्रभाव दिसतो. आजही त्या पुस्तकातील मुद्द्यांवर आधारित संशोधन आणि लेखन होत आहे.[५] आल्फ्रेड यांना मात्र मेरी यांचे हे पुस्तक आवडले नव्हते. पुस्तकाला भरपूर मागणी असली तरी त्याची नवी आवृत्ती त्यांनी काढलीच नाही. स्त्रियांच्या लेखनाकडे दुर्लक्ष करणे, त्याला कमी लेखणे याचे हे स्पष्ट उदाहरण आहे. मेरी मार्शल यांचे आपल्या जीवनातील आठवणी सांगणारे एक छोटेखानी पुस्तक नंतर प्रसिद्ध झाले.[६] मेरी यांच्या मृत्युनंतरच्या श्रद्धांजली वाहाणाऱ्या लेखात केन्स यांनी त्यांच्या अर्थशास्त्रातील योगदानाचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन केले आहे.[७]

आर्थिक प्रणाली, आर्थिक सिद्धान्त आणि आर्थिक धोरण या सर्व क्षेत्रांमध्ये आपले लेखन-विचार आणि समाजातील प्रत्यक्ष कामगिरीने वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या मोजक्या अर्थतज्ज्ञांमध्ये पोलिश अर्थशास्त्री श्रीमती रोझा लुक्झेम्बर्ग (१८७१-१९१९) यांचे नाव अवश्यमेव घ्यावे लागेल. विचारानेच नव्हे तर आचाराने

त्या पूर्णतः मार्क्सवादी / साम्यवादी, डाव्या विचारांचे राजकीय पक्ष, कामगार चळवळी यात त्या हिरिरीने सहभागी असत. Ph.D. ही सर्वोच्च पदवी मिळवणाऱ्या त्या जगातील बहुधा पहिल्याच महिला अर्थतज्ज्ञ. त्यांचा संशोधनाचा विषय : पोलंडचा औद्योगिक विकास, पदवी प्रदान वर्ष १८९८. लेनिन व टोटोस्की यांचा त्यांना सहवास लाभला होता. रशिया, जर्मनी, फिनलंड, स्वित्झर्लंड येथे त्यांचा संचार होता. मार्क्सच्या लेखनातील अनेक मुद्द्यांवर स्पष्टीकरण देताना त्यांनी The Accumulation of Capital हे पुस्तक १९१३ मध्ये लिहिले. या प्रसिद्ध पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद जगाला १९५१ मध्ये उपलब्ध झाला आणि त्यांच्या लेखनाची आणि विचारांची महती जगाला समजली. या पुस्तकाला जोन रॉबिन्सन यांची प्रस्तावना आहे. भांडवलशाहीचा प्रवास, त्यातील गतिमान बदल, तिचे भवितव्य याचे तर्कशुद्ध विश्लेषण त्यात आहे. मार्क्सच्या विचारांची परंपरा त्यांनी समर्थपणे पुढे नेली. त्याचा शास्त्रशुद्ध समाजवाद, भांडवलशाहीतील स्थित्यंतरे आणि लोकशाही संरचना यांचा समन्वय असणारा समाज लुक्झेम्बर्ग यांना अभिप्रेत होता. मात्र मोस्कोमध्ये १९१९ च्या जानेवारी महिन्यात त्यांची दुर्दैवी हत्या करण्यात आली.

अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना प्रथमपासून **जोन रॉबिन्सन** (१९०३-१९८३) यांच्या लेखनाचा परिचय असतो. तो मुख्यतः मूल्य सिद्धांतातील अपूर्ण स्पर्धा ही संकल्पना समजून घेताना! केम्ब्रिज विद्यापीठात केन्स यांच्या त्या विद्यार्थिनी होत्या. सनातनवादी अर्थशास्त्र ज्या पूर्ण स्पर्धेच्या गृहितावर उभे होते ते त्यांनी नाकारले आणि बाजारात एकाच वेळेस स्पर्धा आणि मक्तेदारी असे प्रवाह अस्तित्वात असणारे प्रतिमान त्यांनी मांडले. ग्राहक-मक्तेदारी [Monopsony] ही संकल्पना त्यांचीच. केन्सचे सिद्धान्त अधिक विस्ताराने स्पष्ट करण्याचे काम त्यांनी केले. भांडवलाचा सिद्धांत, भांडवल संचय, आर्थिक अभिवृद्धी या विषयांवरील त्यांचे लेखन नावाजले गेले. आर्थिक क्षेत्रातील लिंगाधारित विषमता त्यांनी दाखवून दिली आणि त्याविरुद्ध आवाज उठवला! त्यांचे सुरुवातीचे लेखन मार्शलची परंपरा पुढे नेणारे होते, नंतर त्यांच्या लेखनाचे वर्णन केन्सवादी आणि त्याही नंतरचे लेखन केन्सोत्तरवादी असे होऊ शकेल.[८]

विसाव्या शतकातील मौद्रिक अर्थशास्त्राचा आढावा घेताना अमेरिकन अर्थतज्ज्ञ श्रीमती **अना स्वार्त्झ** (१९१५-२०१२) यांच्या कामगिरीकडे दुर्लक्ष करता येणार नाही. आर्थिक - वित्तीय इतिहास, मौद्रिक सांख्यिकी या क्षेत्रांमधील त्यांची कामगिरी अतुलनीय आहे. मिल्टन फ्रीडमन आणि अना स्वार्त्झ यांनी मिळून लिहिलेले सुमारे ९०० पानांचे A Monetary History of the United States १८६७-१९६० (प्रकाशन वर्ष १९६३) हे पुस्तक या विषयावरील एक प्रमाणग्रंथ मानला जातो. त्या आधी १९५३ मध्ये त्यांनी गयेर  आणि रोस्टो यांच्या बरोबरीने Growth & Fluctuations in British Economy हा दोन खंडातील संशोधन अभ्यास प्रसिद्ध केला होता. सुमारे सहा दशके त्या National Bureau of Economic Research या अमेरिकेतील विख्यात संशोधन संस्थेशी संबंधित होत्या.[९]

**महिलांच्या योगदानाचे ठळक पैलू :**

समकालीन महिला अर्थतज्ज्ञांमध्ये **एलिनोर ओस्त्रोम आणि एस्तेर डुफ्लो** यांची नावे येणे आवश्यकच आहे. त्या दोघी नोबेल स्मृती पुरस्काराच्या अनुक्रमे २००९ व २०१९ या वर्षांच्या मानकरी होत. ओस्त्रोम (१९३३-२०१२) या अमेरिकेतील इंडियाना विद्यापीठात राज्यशास्त्राच्या प्राध्यापक होत्या. त्यांचा हा बहुमान राजकीय अर्थतज्ज्ञ म्हणून त्यांनी केलेल्या लेखनाबद्दल, विशेष करून आर्थिक प्रशासनाबाबतच्या त्यांच्या विवेचनाबद्दल होता. नद्या, पाणी, वनसंपत्ती

या सामायिक नैसर्गिक संसाधनांचा वापर समाजाकडून होत असताना शाश्वत विकासाच्या दृष्टीने काय करता येईल याच्या धोरणाची काही सूत्रे त्यांनी विशद केली. त्यांनी लिहिलेले एक पुस्तक आणि त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झालेला लेख येथे त्यांची भूमिका स्पष्ट होते.[१०]

विकासाच्या अर्थशास्त्रामध्ये गरिबी दूर करण्याची जी धोरणे आहेत त्यामध्ये काही क्रांतिकारी बदल सुचवणारे विवेचन डुफ्लो (जन्म १९७२, पेरीस येथ) यांनी मांडले आणि त्याबद्दल त्यांना २०१९ चा नोबेल स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात आला. गरिबी हटवण्यासाठी केवळ सरकारी मदत हा पर्याय तितकासा प्रभावी ठरत नाही. गरीब लोकांच्या गटांमध्ये विविध निकष वापरून आणि प्रत्यक्ष प्रयोग करून गरिबीबद्दलची अधिक वास्तव ओळख होऊ शकते. अशा धोरणांमध्ये लवचिकता अत्यंत महत्त्वाची असते. त्यानुसार धोरणांची आखणी हवी असे त्यांचे आग्रही प्रतिपादन आहे. त्यांचे पती अभिजित बॅनर्जी यांच्याबरोबर त्यांनी लिहिलेल्या २०११ सालच्या Poor Economics - A Radical Rethinking of the Way to Fight Global Poverty या पुस्तकात त्यांचा सिद्धान्त समाविष्ट आहे.

अमेरिकेच्या आर्थिक - वित्तीय धोरणांवर आपला प्रभाव पाडणाऱ्या कुशल अर्थतज्ज्ञ म्हणून **जेनेट येलेन** (जन्म १९४६) ओळखल्या जातात. अमेरिकेच्या अर्थमंत्री (अमेरिकेत हे पद सेक्रेटरी ऑफ ट्रेझरी असे आहे) म्हणून त्यांची नेमणूक २०२१ मध्ये झाली. ते अत्युच्च पद भूषवणाऱ्या त्या पहिला महिला आहेत. त्या आधी अमेरिकेच्या मध्यवर्ती बँकेच्या (फेडरल रिझर्व्ह सिस्टीम) प्रथम महिला अध्यक्ष म्हणून चार वर्षे काम पाहिले. अध्यक्ष क्लिंटन यांच्या आर्थिक सल्लागार मंडळाच्या त्या सदस्य होत्या. विचाराने त्या केन्सवादी. श्रमाचे अर्थशास्त्र, कामगार संघटना, रोजगार या विषयांचा त्यांचा दांडगा अभ्यास आहे. त्यांनी येल विद्यापीठातून Ph.D. पदवी प्राप्त केली व काही काळ हार्वर्ड विद्यापीठात अर्थशास्त्राचे अध्यापन केले. येलेन यांचे पती जॉर्ज अकेरलोफ (अर्थशास्त्रातील नोबेल स्मृती पुरस्काराचे २००१ सालचे मानकरी) यांची त्यांना साथ लाभली. त्यांनी बरोबरीने मौलिक संशोधन व विपुल लेखन केले आहे. त्यांना समकालीन असणाऱ्या आणि आपापल्या देशात अत्युच्च पदावर उल्लेखनीय काम करणाऱ्या आणखी दोन महिला म्हणजे - युरोपियन मध्यवर्ती बँकेच्या अध्यक्ष **ख्रिस्तीन लागार्द** आणि इंडोनेशियाच्या अर्थमंत्री **मूल्यनी इंद्रावती**. गेल्या काही वर्षात जगात जी मोठी आर्थिक-वित्तीय अरिष्टे आली (जसे, २००८चे वित्तीय संकट, कोरोना महासाथ आणि रशिया-युक्रेन युद्ध) त्यावेळी या तिन्ही महिला अर्थतज्ज्ञांनी अभूतपूर्व असे व्यावसायिक कौशल्य आणि नेतृत्व गुण दाखवले आणि आपण पुरुषांइतकी, नव्हे त्याहीपेक्षा अधिक कार्यक्षमता दाखवू शकतो असे सिद्ध केले. आर्थिक संकटे आल्यावर का होईना पण त्या निमित्ताने महिलांना आर्थिक-वित्तीय-राजकीय धोरण-प्रशासन या क्षेत्रात राष्ट्रीय तसेच जागतिक पातळीवर नवनवीन संधी उपलब्ध होत आहेत व महिला त्या संधीचे सोने करीत आहेत असा अनुभव आता येत आहे.

पूर्वीच्या पिढीतील महिला अर्थशास्त्रींनी लक्षणीय काम करूनदेखील, काही अपवाद वगळता, त्यांच्या वाट्याला दुर्लक्ष, अनुल्लेख, पूर्वग्रहदूषित मूल्यमापन असे अनुभव आले. त्यांना उचित मान आणि श्रेयापासून वंचित ठेवण्यात आले. 'मौद्रिक इतिहासाचे बहुतेक सर्व काम स्वार्त्झ यांनीच केले आहे, श्रेय-प्रसिद्धी-पुरस्कार मात्र मला मिळाले' अशी जाहीर कबुली फ्रीडमन यांनी दिली आहे. इतके मोलाचे आणि मूलभूत काम करूनही स्वार्त्झ यांना नोबेल पुरस्काराचा सन्मान मिळू शकला नाही. आपली पत्नी पेले यांना आल्फ्रेड मार्शल केवळ 'गृहिणी व मदतनीस' मानत असत. जोन रॉबिन्सन यांचे अर्थशास्त्रातील अलौकिक स्थान वादातीत आहे. पण त्यांनी चीनच्या सांस्कृतिक क्रांतीवर लिहिलेल्या

पुस्तकाबद्दल तेव्हा गैरसमज करून घेण्यात आला किंवा इतरही काही कारण असू शकते. पण १९७५च्या आगेमागे नोबेल पुरस्कारासाठी त्यांचे नाव जोरदार चर्चेत होते. तथापि, त्या बहुमानाने त्यांना हुलकावणी दिली हेच खरे! राजकीय पक्षांच्या रक्तमय संघर्षामध्ये रोझा लुक्झेम्बर्ग यांची दुर्दैवी हत्या झाली. जुन्या पिढीतील महिला किंवा प्रचलित पिढीतील महिला अर्थतज्ज्ञांनी केवळ अध्यापन-संशोधन व घरसंसार यात समतोल साधण्याची कसरत केली. इतकेच नव्हे, तर मूलभूत संशोधन करून, आर्थिक धोरणाचा गाडा व्यवस्थित हाकून आपले वेगळे स्थान निर्माण केले हे मान्य करावे लागेल.

आज एकविसाव्या शतकात महिलांच्या कामगिरीकडे पाहाण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. लिन्गाधारी अर्थशास्त्र, हवामान बदलाचे आर्थिक-सामाजिक परिणाम, पर्यावरण संरक्षणाची आव्हाने, गरिबी-विषमता यांच्याविरुद्धचा लढा, महिला सबलीकरण अशा समस्या आता अखिल मानवजातीच्या समस्या झाल्या आहेत. त्या समस्यांना भिडण्यासाठी महिला तसूभरही मागे नाहीत असे दिसून येत आहे. याची काही उदाहरणे पाहा : **एन क्रुगर** या विदेशी व्यापार आणि आर्थिक विकास या विषयांमधील तज्ज्ञ आहेत. जागतिक बँकेचे प्रमुख अर्थतज्ज्ञ म्हणून त्यांनी काम पाहिले. अमेरिकन इकोनोमिक असोसिएशनच्या त्या अध्यक्ष होत्या. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची उपव्यवस्थापकीय संचालक या अतिशय मानाच्या आणि जोखमीच्या पदावर त्यांनी यशस्वीपणे काम केले. त्यांचे २०१२ सालचे Struggling with Success - Challenges Facing the International Economy हे पुस्तक प्रसिद्ध आहे.[११] **कार्मेन रेनहार्ट** जागतिक बँकेच्या प्रमुख अर्थतज्ज्ञ होत्या. नंतर त्या बँकेच्या वरिष्ठ उपाध्यक्ष होत्या. वित्तीय क्षेत्रातील चढउतार विशद करणारे, अतिशय परिश्रमपूर्वक लिहिलेले त्यांचे पुस्तक (सहलेखन) त्यांच्या वस्तुनिष्ठ संशोधनाची साक्ष आहे [The Time is Different - Eight Centuries of Financial Folly, 2009]. नायजेरियाच्या पहिल्या महिला अर्थमंत्री आणि जागतिक व्यापार संघटनेच्या पहिल्या महिला सरसंचालक म्हणून **श्रीमती नगोजी ओकोन्जो इवेला** या ख्यातनाम आहेत. विदेशी व्यापाराचा विस्तार करणे, त्यासाठी उचित अशी आर्थिक धोरणे आखणे, वित्तीय स्थैर्य साधणे या मुद्द्यांवरील त्यांचे विचार आणि लेखन वाखाणले गेले आहे. त्यांनी एमआयटी (अमेरिका) येथून Ph.D. ही सर्वोच्च पदवी प्राप्त केली. **श्रीमती क्रिस्तालिना जोर्जिवा** या आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या व्यवस्थापकीय संचालक म्हणून २०१९ पासून कार्यरत आहेत. महिलांचे हक्क आणि पर्यावरणाचा समतोल अशा विषयांमध्ये त्या विशेष रस घेतात. भारतीय वंशाच्या, दिल्ली स्कूल ऑफ एकोनोमिक्स येथे शिकलेल्या **श्रीमती गीता गोपीनाथ** या आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या तीन वर्षे प्रमुख अर्थतज्ज्ञ होत्या. सध्या त्या नाणेनिधीच्या उपव्यवस्थापकीय संचालक आहेत. साकलिक अर्थशास्त्र आणि विदेशी वित्तव्यवहार यांचा त्यांनी विशेष अभ्यास केला आहे.

अशा रीतीने गेल्या सुमारे पन्नास वर्षांची परिस्थिती हळूहळू का होईना बदलली आहे. अर्थमंत्रालय, विदेशी नियामक संस्था, मध्यवर्ती बँका, संशोधन संस्था, वित्तीय संस्था येथे महिलांनी नेत्रदीपक कामगिरी करून दाखवली आहे व दाखवत आहेत. हवामान बदलासारख्या खडतर समस्या, सहस्रक विकासाची उद्दिष्टे अशी आव्हाने पुरुष तज्ज्ञांच्या बरोबरीने महिला कुशलतेने स्वीकारत आहेत. मात्र सर्व क्षेत्रांचा एकत्रित आढावा घेतला तर अशा उच्च पदावरील महिलांचे गणिती प्रमाण आजही जेमतेम तीस टक्के इतकेच भरते. ते वाढण्यास मुबलक वाव आहे हे निश्चित! महिलांच्या कामाची गुणवत्तेच्या निकषावर निकोप अशी दखल घेतली जावी, त्यांना समान - नव्हे वाढती संधी मिळावी असे या विवेचनाचे सार आहे.

**भारतातील परिस्थिती :**

पाश्चात्त्य देशांमध्ये आणि विशेष करून जागतिक पटलावर आपल्या कामगिरीने अमीट ठसा उमटवणाऱ्या काही महिला अर्थतज्ज्ञांच्या कामाची दखल प्रस्तुत लेखात घेण्यात आली आहे. मात्र आर्थिक-वित्तीय क्षेत्रात आपली प्रभावी कामगिरी नोंदवणाऱ्या भारतातील महिलांची मात्र येथे काहीच चर्चा केली नाही ही मर्यादा मान्य करायला हवी. पाश्चात्त्य महिला अर्थतज्ज्ञांची अशी माहिती काही प्रमाणात उपलब्ध आहे.[१२] हेही खरे की, भारतातील त्याबाबतची अधिकृत, एकत्रित आणि विश्वसनीय माहिती उपलब्ध नाही. विविध लेख, चरित्रे, आत्मचरित्रे, भाषणे, माध्यमांमधील संदर्भ, सरकारी अहवाल, खासगी प्रकाशाने अशा विविध स्रोतांमधून अशी माहिती एकत्र करावी लागणार आहे. उदा. देशाचा अर्थमंत्री असा एक संदर्भ घेतल्यास सध्या अर्थखात्याची धुरा निर्मला सीतारमण सांभाळीत आहेत. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी काही काळ केंद्रीय अर्थखाते सांभाळले होते व वार्षिक अर्थसंकल्पही सादर केले होते. इशर जज अहलुवालिया, पद्मा देसाई, देवकी जैन, जयंती घोष, उत्सा पटनाईक अशी नावे डोळ्यापुढे येतात. पण ही नावे म्हणजे परिपूर्ण यादी नव्हे. भारतात शिक्षण, लेखन आणि संशोधन क्षेत्रात महिलांची कामगिरी डोळ्यात भरणारी आहे, पण प्रशासन आणि तत्सम उच्च पदांवर देशात महिलांचे प्रमाण किती, त्यातील चढउतार कसे आहेत, त्यामागील प्रेरक घटक कोणते याचा शोध आवश्यक वाटतो. त्यामुळे या विषयावर व्यापक आणि शास्त्रशुद्ध संशोधनास वाव आहे, हे कबूल केले पाहिजे. कोणी अभ्यासक ही जबाबदारी अंगावर घेईल अशी आशा आहे.

**संदर्भ व टीपा :**

१. The Women Who Made Modern Economics by Rachel Reeves, London : Basic Books, पहिली आवृत्ती, २०२३, असाच अभ्यास रीव्हस यांनी इंग्लंडमधील महिला खासदारांच्या बाबतीत केला आहे. इंग्लंडमध्ये सन १९१९ मध्ये प्रथम एक महिला खासदार हाउस ऑफ कॉमन्समध्ये निवडून गेल्या. त्यानंतर १९१९ ते २०१९ या शंभर वर्षांच्या काळातील इंग्लंडमधील महिला खासदारांच्या कामगिरीचा ताळेबंद त्यांनी आपल्या Women of Westminster - The MPs Who Changed Politics या आपल्या २०१९ सालच्या पुस्तकात मांडला आहे.

२. त्यांची गाजलेली दोन पुस्तके : Illustrations of Political Economy आणि History of the Thirty Years Peace.

३. त्या दोघांनी मिळून सहलेखन केलेली दोन प्रमुख पुस्तके : History of Trade Unionism आणि Industrial Democracy.

४. केन्स, जॉन मेनार्ड : Essays in Biography, London : Palgrave Macmillan, 2010

५. सध्या गाजत असलेल्या नवप्रवर्तन या विषयावर Mariana Mazzucato यांच्या The Entrepreneurial State : Debunking Public vs Private Sector Myths [2013] या पुस्तकामागील मूळ प्रेरणा मेरी मार्शल यांच्या पुस्तकाचीच आहे.

६. Mary Peley Marshall : What I Remember, Cambridge University Press, 2015.

७. Keynes J. M. & F. A. Hayek : Obituary - Mary Peley Marshall, Economic Journal, Vol. 54, No. 214, (1944), पाने २६८-८६.

८. त्यांची प्रमुख पुस्तके : The Economics of Imperfect Competition, The Accumulation of Capital, An Essay on Marxian Economics, Aspects of

Development & Underdevelopment, Economic Heresies, Economic Philosophy, Introduction to the Theory of Employment, Freedom & Necessity, The Cultural Revolution in China इत्यादी.

९. फ्रीडमन आणि स्वार्त्झ यांनी सहलेखन केलेले आणखी एक प्रसिद्ध पुस्तक : Monetary Trends in the US & UK, University of Chicago Press, 1982.

१०. ओस्त्रोम, एलिनोर : Governing The Commons - the Evolution of Institutions for Collective Action, 1990. तसेच त्यांनी Annals of Economics & Finance येथे २०१४ मध्ये लिहिलेला एक शोधनिबंध.

११. त्यांची इतर पुस्तके : International Trade - What Everyone Needs to Know, 2020, A New Approach to Sovereign Debt Restructuring, 2002, Economic Policy Reforms, (Ed.) 1992.

११. पहा : Distinguished Women Economists by Ciarelli James & Julianne Ciarelli, 2003.

(प्रस्तुत लेखासाठी जरूर ते संदर्भ साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या धनंजयराव गाडगीळ ग्रंथालयाचा मी आभारी आहे. मात्र लेखात काही त्रुटी अथवा अपूर्णता आढळल्यास त्यांना मी जबाबदार आहे. ----- लेखक)

◆

## डॉ. सौ. अरुणा रारावीकर आर्थिक लेख पुरस्कार

मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे २०११ पासून हा पुरस्कार सुरू केला आहे. परिषदेच्या आजीव सदस्यांनी आर्थिक विषयांवर सतत वाचन-मनन करून त्यावर जिल्हा व राज्यपातळीवरील मराठी दैनिक वृत्तपत्रासाठी वैचारिक व प्रबोधनात्मक लेख लिहिण्यास उद्युक्त व्हावे, हा त्यामागील हेतू आहे. त्यांच्या अशा प्रसिद्ध झालेल्या व निवड समितीने शिफारस केलेल्या लेखांना दोन पुरस्कार दिले जातील. प्रथम पुरस्कार रु. १०००/- चा व द्वितीय पुरस्कार रु. ५००/- याप्रमाणे आहे. या पुरस्कारासाठी १ जानेवारी, २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीतील लेख विचारात घेतले जातील.

एक सदस्य जास्तीत जास्त आपले तीन लेख (चार प्रती) पाठवू शकतील. त्यासाठी प्रसिद्ध झालेले लेख, वृत्तपत्रांचे नाव व दिनांकासह झेरॉक्स करून ३० ऑगस्ट २०२४ पूर्वी कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद यांच्याकडे पाठवावेत. नोव्हेंबर २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे संपन्न होत असलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४७ व्या राष्ट्रीय अधिवेशनात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**पत्रव्यवहारासाठीचा पत्ता**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, डॉ. मारोती तेगमपुरे, 'संगाई', घर क्रमांक २२, भालचंद्र पेट्रोल पंपाच्या मागे, शहीद भगतसिंग नगर, पारनेर रोड, अंबड, जि. जालना ४३१२०४ (भ्रमणध्वनी: ९४२३९९३१३७)

**- डॉ. मारोती तेगमपुरे**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद

# बिमारू राज्यांचा बहुआयामी गरिबी निर्देशांकाच्या अनुषंगाने सामाजिक, आर्थिक प्रगतीचा तुलनात्मक आढावा

**कारभारी भालचंद्र काशिनाथ** †

**प्रस्तावना :**

भारताने 'सबका साथ सबका विकास' या अभिव्यक्तीचा अवलंब करून शाश्वत विकास उद्दिष्ट्ये (SDGs) स्वीकारली आहेत. UN ला सादर केलेल्या SDGA या स्वैच्छिक राष्ट्रीय पुनरावलोकन (२०१७) अहवालानुसार भारत विविध शाश्वत विकास उद्दिष्ट्ये साध्य करत आहे. UNDP च्या २०१८ पुनरावलोकन अहवालानुसार ०.१२१ या MPI निर्देशांकासह भारत १०५ विकसनशील राष्ट्रांमध्ये ५३व्या क्रमांकावर आहे. २०१५-१६ आणि २०१९-२१ मधील MPI मूल्य आणि मुख्य गणना गुणोत्तर या दोन्हीमध्ये मोठ्या प्रमाणात घट झाल्यामुळे भारताची धोरणे योग्य दिशेने जात असल्याचे दिसून येते.

पारंपरिक मानव विकास निर्देशांक (HDI) प्रामुख्याने उत्पन्न पातळीच्या आधारे निश्चित होतो; परंतु बहुआयामी गरिबी निर्देशांक हे तुलनेने अधिक सर्वसमावेशक असून ते अल्किरे-फोस्टर पद्धतीवर आधारित आहे. जागतिक बहुआयामी गरिबी निर्देशांक अहवाल हा संयुक्तपणे ऑक्सफर्ड पॉव्हर्टी अँड ह्युमन डेव्हलपमेंट इनिशिएटिव्ह (OPHI) आणि संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP) यांच्याद्वारे प्रकाशित केला जातो. याच बहुआयामी गरिबी निर्देशांकाच्या धर्तीवर भारतातील राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी राष्ट्रीय बहुआयामी गरिबी निर्देशांक तयार करण्याची जबाबदारी नीती आयोगाकडे देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने नीती आयोगाने आरोग्य, शिक्षण, पोषण, ग्रामीण विकास, पाणी पुरवठा, स्वच्छता, वीज आणि शहरी विकास विभागांसह एक आंतर मंत्रालय समन्वय समिती (MPICC) स्थापन केली आहे. यामध्ये सांख्यिकी मंत्रालयातील तज्ज्ञांचा समावेश असून तांत्रिक साहाय्य UNDP व OPHI समिती यांनी केले आहे.

राष्ट्रीय बहुआयामी गरिबी निर्देशांकामध्ये तीन भारांकित परिमाणे आहेत. ज्यामध्ये आरोग्य, शिक्षण आणि राहणीमान दर्जा यांचा समावेश आहे व ते पुढीलप्रमाणे १२ निर्देशांकामध्ये वर्गीकृत केले आहेत.

बहुआयामी गरिबी निर्देशांकामध्ये पुढील तीन महत्त्वाचे मापदंड वापरून गरिबीची पातळी अनुमानित केली जाते.

**अ. वार्षिक दरडोई गणना प्रमाण** (H) : एकूण लोकसंख्येला बहुआयामी गरीब व्यक्ती संख्येने भाग देऊन बहुआयामी गरीब लोकसंख्येचे प्रमाण प्राप्त होते.

**आ. गरिबीची तीव्रता** (A) : बहुआयामी गरीब

† सहाय्यक प्राध्यापक, अकबर पीर भौम कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिकस, मुंबई
आजीव सभासद क्र. १७९३, भ्रमणध्वनी : ७४००४७६५९, ई-मेल : bhalchandra.karbhari@apcollege.edu.in

### तक्ता क्र. १ MPI निर्देशांक आणि त्यांचे भारांकन

| | परिमाण | भारांकन | निर्देशांक |
|---|---|---|---|
| **आरोग्य** | (१/३) | (१/६) | पोषण |
| | | (१/१२) | बाल आणि किशोर मृत्यु दर |
| | | (१/१२) | माता आरोग्य |
| **शिक्षण** | (१/३) | (१/६) | शालेय शिक्षणाची वर्षे |
| | | (१/६) | विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती |
| **राहणीमान दर्जा** | (१/३) | १/२१ | स्वयंपाकाचे इंधन |
| | | १/२१ | स्वच्छता |
| | | १/२१ | पिण्याचे पाणी |
| | | १/२१<br>१/२१ | गृहनिर्माण<br>वीज |
| | | १/२१ | संपत्ती |
| | | १/२१ | बँक खाते |
| **एकूण** | १ | १ | |

स्रोत: MPI : प्रगती पुनरावलोकन अहवाल २०२३ पान १५.

व्यक्तींच्या वंचिततेचे सरासरी प्रमाण म्हणजे गरिबीची तीव्रता होय. गरिबीची तीव्रता गणना करण्यासाठी सर्व गरीब लोकांच्या भारित वंचित गुणांची बेरीज केली जाते आणि नंतर एकूण बहुआयामी गरीब लोकसंख्येने भागली जाते.

**इ. बहुआयामी गरिबी निर्देशांक** (MPI) : वार्षिक दरडोई गणना प्रमाण (H) आणि गरिबीची तीव्रता (A) यांचा गुणाकार करून MPI मूल्य (MPI = H x A ) प्राप्त होते. वार्षिक दरडोई गणना प्रमाण हे गरिबीचे प्रमाण आणि ते किती प्रमाणात वंचित आहेत याचे गुणोत्तर स्पष्ट करते. बहुआयामी गरिबीमध्ये ० ते १ पर्यंतची श्रेणी दिली जाते, जर श्रेणी ० असेल तर गरिबी नाही आणि १ असेल तर गरिबी जास्त आहे असा निष्कर्ष काढला जातो. नीती आयोगानुसार जर एखाद्या कुटुंबाला ०.३३ किंवा त्याहून अधिक श्रेणी मिळाली तर ते कुटुंब बहुआयामी गरीब आहे असे मानले जाते.

**संशोधन पद्धती :**

**नमुना निवड :**

१९८०च्या दशकामध्ये आर्थिक विश्लेषक आशिष बोस यांनी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांना सादर केलेल्या अहवालात भारतातील मागास राज्यांच्या (बिहार, मध्यप्रदेश, राजस्थान आणि उत्तर प्रदेश) अर्थव्यवस्थेचे वर्णन करण्यासाठी BIMARU हे संक्षिप्त रूप वापरले. BIMARU या शब्दाचा उच्चार 'बिमार' या हिंदी शब्दासारखा आहे ज्याचा अर्थ आजारी असा होतो. नंतर ओडिशा राज्याचा या यादीत समावेश झाल्याने ते BIMAROU म्हणून ओळखले जाऊ लागले.

एकूण नमुना निवड पद्धतीनुसार उद्देशपूर्ण नमुना निवड करण्यात आली आहे. ज्यामध्ये सर्व बिमारू राज्ये आहेत. बिमारू राज्यांची निवड करण्याचा उद्देश म्हणजे ही सर्व राज्ये जास्त दारिद्र्य असलेल्या पहिल्या दहा राज्यांत आहेत. त्यामुळे या राज्यांच्या विकास प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला आहे. यासाठी राष्ट्रीय

बहुआयामी गरिबी निर्देशांकामधील पुढील तीन परिमाण विचारात घेतले आहेत. अ) आरोग्य, आ) शिक्षण, इ) राहणीमान दर्जा.

**तथ्य संकलन :**

हा शोधनिबंध माहितीच्या दुय्यम स्त्रोतांवर आधारित आहे ज्यामध्ये, भारताचा राष्ट्रीय बहुआयामी गरिबी निर्देशांक प्रगती पुनरावलोकन अहवाल २०२३, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाद्वारे राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण NFHS-4 (२०१५-१६) व NFHS-5 (२०१९-२१), आर्थिक सर्वेक्षण, जनगणना २०११, विविध सरकारी अहवाल, संदर्भ पुस्तके, नियतकालिके, वृत्तपत्रे आणि सरकारच्या अधिकृत वेबसाइट्स यांचा समावेश आहे.

**उद्दिष्ट्ये :**

१. बहुआयामी गरिबी निर्देशांकाचा अभ्यास करणे.

२.बिमारू राज्यांच्या बहुआयामी गरिबी निर्देशांकाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**गृहीतके :**


१. बिमारू राज्ये बहुआयामी गरिबी निर्देशांकामध्ये तुलनेने राष्ट्रीय स्तरापेक्षा मागे आहेत.

**विश्लेषण :**

**भारतातील बहुआयामी गरिबीचा आढावा:**

राष्ट्रीय MPI प्रगती अहवाल, दुसरी आवृत्ती (नोव्हेंबर २०२१) यामध्ये भारतातील सर्व ३६ राज्ये, केंद्रशासित प्रदेश आणि ७०७ प्रशासकीय जिल्ह्यांसाठी बहुआयामी गरिबीचे अंदाज मांडले आहेत. हे अंदाज NFHS च्या ५ व्या फेरीतील तथ्ये वापरून केले गेले आहेत. हा अहवाल NFHS-4 (२०१५-१६) आणि NFHS-5 (२०१९-२१) सर्वेक्षण कालावधीमधील बहुआयामी दारिद्र्यांमधील फरक देखील दर्शवितो. भारताची दारिद्र्यांमधील प्रगती निर्देशांकानुसार आलेख क्र. १ मध्ये दर्शविली आहे.

भारतात गरिबी पातळी ६% पेक्षा कमी झाली असली, तरी ३१.५२% भारतीयांना अद्यापही पोषक




आलेख क्र. १.
निर्देशांकानुसार भारतातील बहुआयामी गरीबी व वंचिततेचे प्रमाण (%)

स्रोत: MPI: प्रगती पुनरावलोकन अहवाल २०२३ पान ३७

आहार प्राप्त होत नाही. म्हणून, पोषण निर्देशांक वंचितता प्रमाण ११.९% दिसून येते. सर्वाधिक वंचिततेचे प्रमाण स्वयंपाकासाठीचे इंधन (१२.३%), स्वच्छता (९.२५%) आणि गृहनिर्माण (१२.७%) निर्देशांकामध्ये आहे. इतर सर्व निर्देशांकामध्ये अहवालानुसार भारताची प्रगती समाधानकारक आहे. तरीसुद्धा २०१९ मधील कोविड साथीचा आणि आर्थिक स्थित्यंतराचा विचार करता गेल्या २० वर्षांमध्ये बहुआयामी दारिद्र्यात घट दिसून येते. परंतु या कालावधीत प्रत्यक्षात दारिद्र्य किती कमी झाले. विशेषतः बिमारू राज्यांमध्ये, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. बिहार आणि उत्तर प्रदेश या दोन राज्यांमध्ये एकूण ३२ कोटीपेक्षा जास्त बहुआयामी गरीब आहेत. मध्यप्रदेश आणि उत्तर प्रदेशातील ४०% पेक्षा जास्त लोकसंख्या, तसेच बिहारमधील अर्ध्याहून अधिक लोकसंख्या अनेक प्रकारच्या गरिबीने ग्रस्त आहेत. याउलट, केरळमध्ये फक्त १% लोकसंख्या, दिल्ली, पंजाब, गोवा, सिक्कीम आणि तामिळनाडूमध्ये ४ ते ७% लोक बहुआयामी गरिबीत जीवन जगत आहेत. थोडक्यात, बहुआयामी गरिबीमध्ये बिमारू व इतर राज्ये आणि राष्ट्रीय प्रमाणात खूप मोठे अंतर आहे.

**बिमारू राज्यांतील बहुआयामी गरिबीचा आढावा :**

बिमारू राज्यांबरोबर ईशान्य भारतातील मेघालय, आसाम, नागालँड आणि अरुणाचल प्रदेश या राज्यांतही बहुआयामी दारिद्र्याचे प्रमाण जास्त आहे. देशातील सर्वात गरीब ५० जिल्हे बिमारू राज्यांमध्ये आहेत. २०१५ नंतर निवडणूक काळात सर्वच राजकीय पक्षांनी बिमारू राज्ये विकसित होत असल्याचे दावे केले. परंतु बहुआयामी दारिद्र्याच्या निकषांनुसार ही राज्ये अजूनही गरीब आहेत.

बिहार हे भारतातील नेहमीच सर्वात गरीब राज्य राहिले आहे. बिहारमध्ये बहुआयामी गरिबीचे प्रमाण सर्वात जास्त ५१.८९% इतके आहे. २०१९-२१ या कालावधीत बिहारमध्ये सर्वाधिक ३३.७६% लोक वंचित आहेत. त्यापाठोपाठ झारखंड व मेघालय या राज्यांमध्ये अनुक्रमे २८.८१% व २७.७९% इतकी लोकसंख्या गरीब आहे.

बिहारमध्ये २०१९-२१ ते २०२२-२३ दरम्यान बहुआयामी दारिद्र्यातून सुमारे ७% लोकसंख्या कमी झाली. ही घट खूप मोठी असली तरी बिहारमध्ये २०२२-२३ मध्ये २६.५९% लोकसंख्या बहुआयामीदृष्ट्या गरीब असेल असाही अनुमान आहे. नीती आयोगानुसार २०२२-२३ मध्ये बिहार, मेघालय

**तक्ता क्र. २ बिमारू राज्यांमध्ये बहुआयामी गरिबीचे प्रमाण व बदल**

| अ.क्र. | राज्ये | २०१५-१६ | २०१९-२१ | २०१५ ते २१ कालावधीतील बदल |
|---|---|---|---|---|
| १ | बिहार | ५१.८९% | ३३.७६% | - १८.१३ |
| २ | मध्यप्रदेश | ३६. ५७% | २०. ६३ % | - १५.९४ |
| ३ | राजस्थान | २८.८६% | १५.३१% | - १३.५६ |
| ४ | ओडिशा | २९.३४ % | १५.६८% | - १३.६५ |
| ५ | उत्तर प्रदेश | ३७.६८ % | २२.९३% | - १४.७५ |
| | भारत | २४. ८५% | १४.९६% | - ९.८९ |

स्रोत: MPI: प्रगती पुनरावलोकन अहवाल २०२३, पान ६३.

आणि झारखंड या राज्यांमध्ये गरीब लोकांची संख्या सर्वाधिक असू शकते.

मध्यप्रदेशमध्ये बहुआयामी गरिबी व गरिबीची तीव्रता या दोन्हीमध्ये घट झाल्याचे दिसते. मध्यप्रदेशमधील अलिराजपूर (३१.०५%), बरवानी (२८.८%), खांडवा (२८.३८%), बालाघाट (२६.४८%) आणि टिकमगढ (२६.३३%) या जिल्ह्यांमध्ये वार्षिक दरडोई गुणोत्तर प्रमाणामध्ये सुधारणा झाली आहे. उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, छत्तीसगढ आणि आसाम या राज्यांमध्ये २०२२-२३ पर्यंत गरिबीचा दर प्रत्येकी ५% ने कमी होऊ शकतो असा अंदाज आहे.

सर्वच बिमारू राज्यांमध्ये राष्ट्रीय प्रमाणापेक्षा बहुआयामी गरिबी वेगाने कमी होत आहे, तर राजस्थान व ओडिशा या राज्यांमध्ये इतर बिमारू राज्यांपेक्षा मात्र बहुआयामी गरिबी कमी आहे. मध्यप्रदेश व बिहारपासून वेगळे झालेले अनुक्रमे छत्तीसगढ व झारखंड हे स्वतंत्र राज्य निर्मितीनंतरसुद्धा बहुआयामी दारिद्र्याच्या निकषांनुसार पहिल्या दहा राज्यांत आहेत. ज्या राज्यांचा बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक मूल्य आधीच चांगला होता त्याच राज्यांमध्ये दारिद्र्य कमी होत आहे. उदा. केरळने आपल्या बहुआयामी दारिद्र्याची पातळी आधीच ९२% पेक्षा कमी केली आहे, जी सर्व राज्यांपेक्षा चांगली आहे तर बिहार (४५%) सर्वात तळाशी आहे.

तक्ता क्र. ३ बिमारू राज्यांतील बहुआयामी गरिबीचा आढावा मुख्य परिमाणांच्याआधारे स्पष्ट करतो. वार्षिक दरडोई गुणोत्तर प्रमाण हे २०१९-२१ मध्ये भारतात बिहारमध्ये सर्वाधिक असून राजस्थान व ओडिशा वगळता सर्व बिमारू राज्यांमध्ये वार्षिक दरडोई गुणोत्तर प्रमाण राष्ट्रीय प्रमाणापेक्षा जास्त आहे. अहवालानुसार मात्र ते २०१५-१६ कालावधीबरोबर तुलना केल्यास सर्व बिमारू राज्ये व भारतात वार्षिक दरडोई गुणोत्तर प्रमाण कमी झाले आहे.

बिमारू राज्यांबरोबर ईशान्य भारतातील मेघालय (२७.७९), आसाम (१९.३५) व नागालँड (१५.४३) ही राज्ये वार्षिक दरडोई गुणोत्तर प्रमाण (H) कमी असलेल्या पहिल्या दहा राज्यांत आहेत, तर गरिबीची तीव्रता (A) मात्र सर्व बिमारू राज्ये व भारतात ४ ते ५ % ने कमी झाल्याचे दिसते. परंतु सर्व बिमारू राज्यांत MPI मूल्य ०.३३ पेक्षा जास्त असल्याने बिमारू राज्यांमध्ये गरिबीचे प्रमाण राष्ट्रीय प्रमाणापेक्षा व इतर राज्यांपेक्षा जास्त असल्याचे दिसून येते. तसेच राष्ट्रीय स्तरावरसुद्धा MPI मूल्य ०.६६ इतके असल्याने

**तक्ता क्र.३. बिमारू राज्यांतील बहुआयामी गरिबीचा आढावा**

| राज्ये | वर्ष | वार्षिक दरडोई गुणोत्तर प्रमाण (H) (%) | | गरिबीची तीव्रता (A) (%) | | MPI मूल्य (Hx A) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१५-१६ | २०१९-२१ | २०१५-१६ | २०१९-२१ | २०१५-१६ | २०१९-२१ |
| बिहार | | ५१.८९ | ३३.७६ | ५१.०१ | ४७.४० | ०.२६५ | ०.१६० |
| मध्यप्रदेश | | ३६.५७ | २०.६३ | ४७.२५ | ४३.७० | ०.१७३ | ०.०९० |
| राजस्थान | | २८.८६ | १५.३१ | ४७.३४ | ४२.७० | ०.१३७ | ०.०६५ |
| ओडिशा | | २९.३४ | १५.६८ | ४६.४२ | ४४.५० | ०.१३६ | ०.०७० |
| उत्तर प्रदेश | | ३७.६८ | २२.९३ | ४७.६० | ४४.८३ | ०.१७९ | ०.१०३ |
| भारत | | २४. ८५ | १४.९६ | ४७.१४ | ४४.३९ | ०. ११७ | ०.०६६ |

स्रोत : MPI: प्रगती पुनरावलोकन अहवाल २०२३, पान ६२-६४,


बहुआयामी दारिद्र्य जास्त आहे असे म्हणावे लागेल.

आलेख क्र. २ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, भारतात बिहार, झारखंड आणि मेघालय या तीन राज्यांत बहुआयामी गरिबीचे प्रमाण सर्वात जास्त आहे. त्यानंतर उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगढ, ओडिशा, आसाम व नागालँड ही राज्ये आहेत. म्हणजेच बहुआयामी दारिद्र्य बिमारू व ईशान्येकडील राज्यात केंद्रित झाले आहे. सर्वच बिमारू राज्यांमध्ये सर्वाधिक वंचित लोकसंख्या आहे व बहुआयामी गरिबीचे प्रमाण राष्ट्रीय प्रमाणापेक्षा जास्त आहे. याठिकाणी एका गोष्टीची नोंद घेणे आवश्यक आहे की बिमारू राज्यांबरोबर ईशान्य भारतातील मिझोराम वगळता इतर राज्येही बहुआयामी दारिद्र्य संकल्पनेनुसार मागासलेली आहेत. त्यामुळे बिमारू राज्यांबरोबर या राज्यांचाही विचार आर्थिक धोरणात होणे गरचेचे आहे.

**बिमारू राज्यांतील आरोग्यक्षेत्राचा आढावा :**

बहुआयामी गरिबीचे प्रमाण उत्तर प्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, ओडिशा आणि राजस्थान या राज्यांमध्ये वेगाने कमी होत आहे. बिहारमध्ये बहुआयामी दारिद्र्यात सर्वात मोठी घट (-१८.१३) झाल्यामुळे बहुआयामी गरिबीचे प्रमाण वेगाने कमी होत असल्याचे दिसून येते; परंतु पोषण निर्देशांक वंचितता सर्वात जास्त आहे. बिहारमध्ये अंदाजे ४२.२०% लोकसंख्येला पुरेसे पोषण मिळत नाही. या क्रमवारीत पुढे झारखंड (४०.३२%), गुजरात (३८.०९%), उत्तर प्रदेश (३६.४३%) आणि

**आलेख क्र. २ राज्यनिहाय बहुआयामी गरिबीचे प्रमाण**




स्रोत: MPI: प्रगती पुनरावलोकन २०२३, पान ५६.

छत्तीसगढ (३५.१२%) अशी राज्ये क्रमाने आहेत.

NFHS ५ (२०२१) व एकात्मिक बाल विकास सेवा अहवालानुसार उत्तर प्रदेश हे देशातील तिसरे राज्य आहे. जिथे ३९.७% बालकांची वाढ अपुरी आहे व ३२.१% बालके कमी वजनाची आहेत. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानुसार बिमारू राज्यांत बालमृत्यू दर बिहार (२९), मध्यप्रदेश (४६), राजस्थान (३५), ओडिशा (३८), उत्तर प्रदेश (४१) एवढा असून तो राष्ट्रीय प्रमाणापेक्षा (३०) जास्त आहे. तसेच माता मृत्यूदर, उत्तर प्रदेश (६.४) वगळता बिहार (१५.१), मध्यप्रदेश (१५.९), राजस्थान (१४.५), ओडिशा (९.७) एवढा असून तो राष्ट्रीय प्रमाणापेक्षा (७.३) जास्त आहे. म्हणजेच आरोग्य या मुख्य निर्देशांकाशी निगडित सर्व निर्देशांकामध्ये बिमारू राज्यांमध्ये वंचितांचे प्रमाण जास्त आहे. या राज्यांमध्ये अस्वच्छता, संसर्गजन्य रोगांचा प्रसार, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची मर्यादित उपलब्धता, कुपोषण, आरोग्यसेवेचा अभाव, उच्च बालमृत्यू दर, प्रसूती दरम्यान अतिरिक्त रक्तस्त्राव होणे, बाळंतपणानंतर मातेच्या आरोग्याकडे दुर्लक्ष आणि शरीरातील लोहाची कमतरता यांसारख्या अनेक घटकांचा बाल आणि किशोर मृत्युदरावर परिणाम होत आहे. बिहारचा विचार केल्यास एकूण प्रजनन दर प्रतिमहिला ३ मुले आहे, जी प्रजननक्षमतेच्या बदली पातळीपेक्षा जास्त आहे. भारतात ८०% जन्म वैद्यकीय प्रसूती केंद्रांमध्ये होऊन व जिल्हा स्तरीय आरोग्यसेवा प्रणाली अस्तित्वात असूनही बिमारू राज्यांत नवजात अर्भकांचे प्राण वाचवण्यासाठी आरोग्ययंत्रणा सक्षम असल्याचे दिसत नाही.

**बिमारू राज्यांतील शिक्षणक्षेत्राचा आढावा :**

शिक्षण निर्देशांकानुसार १० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या सर्वांनी सहा वर्षे शिक्षण पूर्ण केले नसेल तर ते कुटुंब वंचित असल्याचे मानले जाते. सर्वात कमी गुण असलेली राज्ये म्हणजे तेलंगणा, झारखंड, आंध्रप्रदेश, मेघालय आणि बिहार आहेत. त्याचप्रमाणे, एखाद्या कुटुंबातील शालेय वयाच्या मुलाने १८ वर्षे पूर्ण होण्याआधीच शिक्षण सोडले तर ते वंचित मानले जाते. यानुसार उत्तर प्रदेशनंतर मध्यप्रदेश, झारखंड, मेघालय आणि बिहार राज्यांत वंचिततेचे प्रमाण सर्वात जास्त आहे. २०११ च्या जणगणनेनुसार मध्यप्रदेश आणी ओडिशा ही राज्ये वगळता उर्वरित बिमारू राज्यात साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी होते जे बहुआयामी गरिबी निर्देशांकामध्ये कायम असल्याचे दिसून येते. शिक्षणाचा व प्रजनन दराचा येथे एक आंतरसंबंध प्रस्थापित केला जाऊ शकतो. उदा. बिहारमध्ये प्रजनन दरानुसार, शालेय शिक्षण नसलेल्या स्त्रियांना, १२ किंवा त्याहून अधिक वर्षे शालेय शिक्षण घेतलेल्या स्त्रियांपेक्षा सरासरी १.६ अधिक मुले आहेत, किंबहुना सर्वच बिमारू राज्यांमध्ये हे प्रमाण जवळपास समान आहे. म्हणजेच महिलांचा साक्षरता दर वाढवल्यास प्रजनन दर कमी होऊ शकतो.

२ ते ४ वर्षे वयोगटातील मुले अंगणवाडीमध्ये जाण्याचे प्रमाण बिहार (३५%), मध्यप्रदेश (२५%), राजस्थान (२५%), ओडिशा (४२%), उत्तर प्रदेशमध्ये (१३%) खूपच कमी आहे. तर ६-१७ वयोगटातील मुले शाळेत जाण्याचे प्रमाण बिहार (८५%), मध्यप्रदेश (८१%), राजस्थान (९२%),ओडिशा (८७%), उत्तर प्रदेशमध्ये (८१%) चांगले आहे. परंतु १५-१७ वयोगटात शाळा सोडण्याचे प्रमाण बिहार (६९%), मध्यप्रदेश (५५%), राजस्थान (५५%), ओडिशा (५१%), उत्तर प्रदेशमध्ये (५८%) पर्यंत आहे. म्हणजेच बिमारू राज्यांमध्ये शाळा सोडण्याचे प्रमाण अधिक असल्यामुळे साक्षरता दर कमी आहे.

**बिमारू राज्यांतील राहणीमान दर्जाचा आढावा :**

राहणीमान निर्देशांकानुसार जर स्वयंपाकाच्या इंधनसाठी घरात लाकूड, कोळसा, कडबा किंवा इतर कोणत्याही नैसर्गिक साधनांचा वापर होत असेल तर ते

कुटुंब वंचित मानले जाते. मेघालय, छत्तीसगढ, ओडिशा आणि बिहारनंतर झारखंडमधील ६९.१२% लोकसंख्या या निर्देशांकानुसार वंचित आहे. जैन व इतर (२०१८) यांच्या मते २०१५ ते २०१८ दरम्यान बिहार, मध्यप्रदेश आणि उत्तर प्रदेश राज्यातील ग्रामीण कुटुंबांमध्ये स्वच्छ इंधनाची उपलब्धता वाढली आहे. परंतु कोविड दरम्यान ग्रामीण कुटुंबांमध्ये LPG व नैसर्गिक गॅस उपलब्धतेत १९.७% घट झाली. अजूनही बिमारू राज्यांमध्ये ५०% पेक्षा जास्त कुटुंब स्वयंपाकासाठी इंधन म्हणून लाकूड आणि शेणाच्या गौऱ्या वापरतात.

घरामध्ये कोणत्याही प्रकारच्या शौचालयाची उपलब्धता नसल्यास ते कुटुंब वंचित मानले जाते. बिहारमध्ये ५७%, झारखंड (४३.३६%), ओडिशा (३९.८५%), मध्यप्रदेश (३५.५१%) आणि मणिपूरमध्ये (३५.२३%) लोकसंख्येला शौचालयासाठी आवश्यक संसाधने उपलब्ध होत नाही. मणी व इतर (२०२१) यांच्यानुसार बिहारमध्ये शहरी भागात स्वच्छतेची योग्य सुविधा नसलेली कुटुंबे ६७.९% आहेत आणि ग्रामीण भागात ४३% आहेत. बिहारमध्ये अंदाजे ३९% कुटुंबांकडे कोणत्याही प्रकारची स्वच्छता सुविधा उपलब्ध नाही म्हणजेच मोकळ्या जागेत किंवा शेतांचा वापर शौचास केला जातो. स्वच्छता अहवाल २०१६ (MSPI/GOI, २०१७) नुसार २०१५ मध्ये राजस्थानमधील सुमारे ५२% कुटुंबांमध्ये स्वच्छतागृहांची सुविधा होती म्हणजेच ४८% कुटुंबे उघड्यावर शौच करतात. बेंजामिन अर्नहोल्ड व इतर (२०१४) यांच्यानुसार मध्यप्रदेशमध्ये अशुद्ध पाणी आणि स्वच्छता या पायाभूत सुविधा यांचा अभाव आहे. केवळ १३% ग्रामीण कुटुंबांना घरामध्ये शौचालय उपलब्ध आहे, तर १०% पेक्षा कमी लोकांना नळाचे पाणी उपलब्ध आहे. NFHS-५ ची आकडेवारी मात्र बिमारू राज्यांमध्ये स्वच्छता प्रमाण ९०% च्या वर दाखवते. बिमारू राज्यांमध्ये योग्य स्वच्छता सुविधा नसलेल्या कुटुंबांमध्ये अतिसार आणि टायफॉइडसारखे आजार जास्त आहेत. स्वच्छता (शौचालय व कचरा व्यवस्थापन) हा राज्य सरकारचा विषय आहे, त्यामुळे बिमारू राज्यांनी केंद्र सरकारबरोबर समन्वय साधून स्वच्छता सेवा पुरवण्यावर भर दिला पाहिजे.

पिण्याच्या पाण्याच्या निकषानुसार, एखाद्या कुटुंबाला त्याच्या घरापासून चालण्याच्या अंतरावर किंवा शुद्ध पाणी पुरवठा होत नसेल ते कुटुंब वंचित मानले जाते. या निर्देशांकात मणिपूर (२६.७७%) सर्वात वंचित आहे. त्यानंतर मेघालय, मध्यप्रदेश, झारखंड आणि आसाम राज्ये क्रमाने येतात. रश्मी राणी व इतर (२०२३) यांच्यानुसार बिहारमध्ये फक्त ४.४% कुटुंबांना नळाचे पाणी उपलब्ध आहे, तर ८९.६% कुटुंबे पिण्याच्या पाण्यासाठी हातपंप/ट्यूबवेल/बोअरवर अवलंबून आहेत. राजस्थानमध्ये (२०१५-१६) ८५% पेक्षा जास्त कुटुंबांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध होते. बिमारू राज्यांमध्ये भारतीय मानक ब्युरोने शिफारस केलेल्या प्रतिदिन १३५ ते २२५ लिटर प्रतिव्यक्ती पातळीपेक्षा पाण्याचा वापर कमी आहे. विशेषतः बिहारमधील सात जिल्ह्यांतील लोकसंख्या प्रतिदिन ५० ते १३५ लिटर प्रतिव्यक्ती पाण्याचा वापर करते जे प्रमाण खूप कमी आहे. ओडिशातील १५ जिल्ह्यांतील ९८५६ गावांमधील स्वच्छ पिण्याच्या पाण्याच्या स्थितीबाबत आत्मशक्ती ट्रस्ट आणि त्यांच्या सहयोगी संघटनांनी ९३७१५ कुटुंबे आणि ३२९६० कूपनलिका यांचा अभ्यास केला ज्यानुसार १० पैकी ४ घरांमध्ये पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध नाही व ४०.९३% कूपनलिका आणि निम्मे हातपंप (४८.६%) निकामी झाले आहेत. पाणी पुरवठ्यात हरियाणा (९९.२५%) व १००% यश मिळविणाऱ्या गोवा आणि तेलंगणाने बिमारू राज्यांपेक्षा चांगली कामगिरी केली आहे.


जर एखाद्या कुटुंबाचे घर, फरशी, छप्पर पूर्णपणे माती, चिकणमाती किंवा शेणापासून बनलेले असेल

तर ते घर वंचित मानले जाते. मणिपूरमध्ये पक्क्या घरांचे प्रमाण ७५.५०% आहे, त्याखालोखाल अरुणाचल प्रदेश (७४.३४%), आसाम (६९.३७%), त्रिपुरा (६६.८३%) आणि बिहार (६५.३७%), मध्यप्रदेश (४५%) आहेत. जात आणि आर्थिक सर्वेक्षण (२०२३) नुसार बिहारमधील एकूण २.७६ कोटी कुटुंबांपैकी ४०% पेक्षा जास्त कुटुंबांना अजूनही पक्के घर नाही. यापैकी ६३,८४० कुटुंबांना खुल्या आकाशाखाली झोपण्याशिवाय पर्याय नाही. बहुआयामी निर्देशांकानुसार बारा राज्यांमध्ये पक्क्या घरांची लक्षणीय कमतरता आहे. त्या तुलनेत चंदीगड, दिल्ली, आंध्रप्रदेश या राज्यात मोठ्या प्रमाणात घरांची उपलब्धता आहे. तसेच लक्षद्वीप, मिझोराम, केरळ राज्यांतही घरांची कमतरता आहे. राजस्थानमध्ये मागील काळात घरांच्या उपलब्धता चांगल्या प्रमाणात वाढलेल्या आहेत.

आलेख क्र. ३ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, राजस्थान सोडून सर्व बिमारू राज्ये, पश्चिम बंगाल, झारखंड, छत्तीसगढ व अरुणाचल, मणिपूर, त्रिपुरा व आसाम या राज्यांमध्ये पक्के घर असण्याचे प्रमाण कमी आहे. मणिपूर, अरुणाचल प्रदेश आणि त्रिपुरामध्ये २०२०-२१ मध्ये फक्त ४३% घरे पक्की होती. तर भारतात केवळ २८.४% घरे पक्की होती. ज्यात स्वतंत्र स्वयंपाकघर, एक शौचालय, एक स्नानगृह आणि घरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी व्यवस्था होती.

प्रधानमंत्री आवास योजना व राज्यसरकार पुरस्कृत योजना उदा. ओडिशामधील बिजू पक्का घर योजना राबवूनसुद्धा या राज्यांमध्ये पक्के घर असण्याचे प्रमाण

**आलेख क्र. ३. पक्क्या घरांचे राज्यनिहाय प्रमाण**




स्रोत : Multiple Indicator Survey (NSS Round ७८), २०२०-२१.

कमी आहे. या ठिकाणी नोंद घ्यावी लागेल की बिमारू व ईशान्येकडील राज्यांत पक्के घरबांधणीसाठी, विशेषतः ग्रामीण भागात बांबू, लाकूड व इतर नैसर्गिक साधनांचा वापर जास्त होतो. त्यामुळे पक्के घर ही संकल्पना सुधारित करणे आवश्यक आहे.

जर घरामध्ये वीजपुरवठा नसेल तर ते राहाण्यायोग्य मानले जात नाही. उत्तरप्रदेशमध्ये ९.१६% कुटुंबे या निर्देशांकानुसार वंचित आहेत. बिहारमध्ये ग्रामीण भागात केवळ ५२.८% गावे आणि ६% घरांमध्ये वीजपुरवठा आहे, तर सुमारे ८५% लोकसंख्येला वीजपुरवठा नाही. शहरी भागात मात्र वीजपुरवठा चांगल्या प्रकारे आहे, तर २०२१ मध्ये भारतात ९९.३४ % ग्रामीण लोकसंख्येला वीजपुरवठा केला गेला. राष्ट्रीय पातळीशी तुलना केल्यास बिमारू राज्यांत वीजपुरवठा प्रमाण विरुद्ध आहे.

संपत्ती निकषानुसार एखाद्या कुटुंबाकडे रेडिओ, टी.व्ही., टेलिफोन, संगणक, बैलगाडी, सायकल, दुचाकी किंवा फ्रीज आणि कार किंवा ट्रक यापैकी एकापेक्षा जास्त मालमत्ता नसल्यास ते कुटुंब वंचित असते. मेघालयातील ३७.०७% लोकांकडे अशा वस्तूंची मालकी कमी आहे. त्यानंतर नागालँड, बिहार, मध्यप्रदेश आणि झारखंडमध्ये हे प्रमाण कमी आहे. राष्ट्रीय प्रमाणापेक्षा (४.७२%) बिमारू राज्यांत या निर्देशांकात वंचितता जास्त आहे.

राहणीमाण दर्जा निकषामध्ये बँक खात्याचासुद्धा समावेश आहे. ज्या कुटुंबाचे बँक किंवा पोस्ट ऑफिसमध्ये खाते नसेल तर ते वंचित समजले जाते. सर्वसाधारणपणे, ९६% भारतीयांची बँक खाती आहेत, केवळ ९.०१% लोकसंख्येकडे बँक खाते नसलेले मेघालय हे सर्वात कमी बँक खातेदार असलेले राज्य आहे. बँकांमधील बचत खात्यांचा विचार करता चंदीगड, पुडुचेरी, हिमाचल, ओडिशा व तामिळनाडू या राज्यांमध्ये सर्वाधिक बँक खाती असल्याचे दिसून येते. परंतु बँक खाते असणे म्हणजे आर्थिक समावेशकता असा संबंध प्रस्थापित होऊ शकत नाही. त्यामुळे MPI सुधारणेसाठी मापदंड म्हणून बँक खात्याच्या उपयुक्ततेवर तज्ज्ञांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. अहवालानुसार कोविड महामारीच्या काळात बँक खात्याची संख्या स्थिर राहिली व बचत करणाऱ्यांची संख्या कमी झाली. तसेच डेबिट आणि क्रेडिट कार्ड वापरकर्त्यांचे प्रमाण कमी झाले. परंतु यामुळे दारिद्र्य वाढले असे सिद्ध होत नाही.

**निष्कर्ष आणि निरीक्षणे :**

१. भारताच्या बहुआयामी गरिबी मूल्यामध्ये २०१५-१६ आणि २०१९-२१ दरम्यान २४.८५% वरून १४.९६% पर्यंत घट झाल्याचा निष्कर्ष अहवालामध्ये आहे. परंतु या निष्कर्षाच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. कारण ९.८६% घट दारिद्र्य पातळीमध्ये घट होणे म्हणजे सुमारे एकूण १३५.५ दशलक्ष लोक दारिद्र्यात नसल्याचे यातून निष्पन्न होते. कारण एवढ्या मोठ्या प्रमाणात जर गरिबी कमी होत असेल तर त्याचा सकारात्मक परिणाम बिमारू राज्यांवर दिसत नाही.

२. २०२०-२१ मध्ये कोविड साथीच्या आजारामुळे झालेले आर्थिक आणि सामाजिक स्थित्यंतर MPI मूल्य लक्षात घेत नाही. त्यामुळे बिमारू राज्यांतील आर्थिक सामाजिक घसरणीचा आणि मर्यादांचा MPI मूल्यांमध्ये विशेष विचार केला गेला नाही.

३. बिमारू राज्यांबरोबर ईशान्येकडील राज्ये अरुणाचल, मणिपूर, त्रिपुरा व आसाम बहुआयामी गरिबी निर्देशांकानुसार वंचित आहेत.

**शिफारशी :**

१. नवजात बालकांचे मृत्यू कमी करण्यासाठी आरोग्य सेवांची उपलब्धता आणि दर्जा सुधारणे आवश्यक आहे.

२. बिमारू राज्यांना सार्वत्रिक शालेय शिक्षणाचा दर्जा प्रदान करणे आवश्यक आहे. त्याशिवाय भारताचे

पूर्ण साक्षरता ध्येय साध्य होऊ नाही.

३. स्वच्छता (शौचालय व कचरा व्यवस्थापन) हा राज्य सरकारचा विषय आहे, त्यामुळे बिमारू राज्यांनी केंद्र सरकारबरोबर समन्वय साधून स्वच्छता सेवा पुरवण्यास प्राधान्य द्यावे.

४. ग्रामीण विकास स्थायी समितीनुसार प्राप्त निधीचा अपुरा वापर हे बिमारू राज्ये इतर राज्यांच्या तुलनेत मानव विकास निर्देशांकात मागे असल्याचे एक प्रमुख कारण आहे. त्यामुळे प्राप्त निधीचा वापर परिणाम आधारित संकल्पनेनुसार करावा.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. भारत : बहुआयामी गरिबी निर्देशांक, प्रगती पुनरावलोकन २०२३, नीती आयोग, भारत सरकार.

२. Benjamin Arnhold, Bertha Briceno, Sandipan Ganguly, Paul Gertler, John M. Colford Jr., Sumeet R. Patil, The Effect of India's Total Sanitation Campaign on Defecation Behaviors and Child Health in Rural Madhya Pradesh: A Cluster Randomized Controlled Trial, PLOS Medicine, August 2014,Volume 11, Issue 8, e1001709.

३. DHS Final Reports, International Institute for Population Sciences - IIPS/India and ICF. 2022. India national family health survey NFHS-5 2019-21. Mumbai, India: IIPS and ICF. https://www.dhsprogram.com/pubs/pdf/FR374/FR374.pdf.

४. Jain A., Tripathi S., Mani S., Patnaik S., Shahidi T., Ganesan K., Access to clean cooking energy and electricity survey of states 2018, Council on Energy, Environment and Water (CEEW); New Delhi, India.

५. Mani, Sunil, Shalu Agrawal, Abhishek Jain and Karthik Ganesan. State of Clean Cooking Energy Access in India: Insights from the India Residential Energy Survey (IRES) 2020. 2021 New Delhi: Council on Energy, Environment and Water.

६. Multi{le Indicator Survey (NSS Round 78), 2020-21.

७. Rashmi Rani Anand, Swati Rajput, Shubham Kumar Sanu, And Pratyush Sinha, Assessing Availability and Consumption of Water Resource Dynamics in Selected Districts of Bihar, India, January 2023 International Journal of Ecology and Environmental Sciences 49(1):71-81.

८. Rukmini S., India's BIMARU states developing but not catching up, (2018), https://www.livemint.com/Politics/2mYGqXDSb37bediFJmGUvL/Indias-BIMARU-states-developing-but-not-catching-up.html.

९. Status of IMR and MMR in India, Ministry of Health and Family Welfare , Feb 2022, https://pib.gov.in/Press Release IframePage.aspx?PRID=1796436.


◆

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार धोरणाबाबतचे विचार

**शेडगे दत्तात्रय भगवानराव** †

**प्रास्ताविक:**

प्रख्यात समाजसुधारक, कायदेतज्ज्ञ आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार कल्याण आणि कामगारांच्या हक्कांबाबत प्रगल्भ विचार होते. आंबेडकर हे कामगार हक्कांचे कट्टर पुरस्कर्ते होते. त्यांच्या विचारांवर सामाजिक न्याय आणि समतेच्या बांधिलकीचा खोलवर प्रभाव होता. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी कामगारांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती सुधारणे आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. कामगारांसाठी न्याय्य वेतन, वाजवी कामाचे तास आणि सुरक्षित कामाच्या परिस्थितीवर त्यांनी भर दिला. संघटित आणि असंघटित अशा दोन्ही क्षेत्रांमध्ये वेगवेगळ्या वातावरणात कामगारांना भेडसावणाऱ्या असुरक्षा ओळखून त्यांचा दृष्टिकोन विस्तारला.

कामगारांना त्यांच्या हक्कांसाठी कामगार संघटनांच्या निर्मिती आणि बळकटीकरणाला डॉ.आंबेडकरांनी पाठिंबा दिला. ब्रिटिश राजवटीत व्हाइसरॉयच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य म्हणून आणि नंतर स्वतंत्र भारताचे कायदामंत्री म्हणून, डॉ.आंबेडकरांनी कामगार कायद्यांना आकार देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना सुरक्षितता प्रदान करण्यासाठी त्यांनी आरोग्य विमा, निवृत्तीवेतन आणि बेरोजगारी लाभ यासारख्या उपायांसाठी डॉ.आंबेडकरांनी आग्रह धरला. कामगारांची सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शिक्षण आणि कौशल्य विकास याचे महत्त्व डॉ.आंबेडकरांनी ओळखले होते.

डॉ.आंबेडकर भांडवलशाही व्यवस्था आणि जातिव्यवस्था या दोन्हींवर टीका केली आहे. त्यांचा असा युक्तिवाद होता की, कामगारांचे आर्थिक शोषण सामाजिक भेदभावाने वाढले आहे आणि म्हणूनच कामगार समस्यांचे कोणतेही निराकरण करण्यासाठी जाती-आधारित असमानतादेखील दूर केले पाहिजे. डॉ.आंबेडकरांनी ज्या आर्थिक लोकशाहीची कल्पना केली होती त्यामध्ये कामगारांना त्यांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या आर्थिक निर्णयांमध्ये आपले म्हणणे मांडता येईल. कामगारांना संधी मिळाव्यात आणि देशाच्या आर्थिक विकासात समान सहभाग घेता यावा यासाठी आर्थिक शक्ती आणि संसाधनांच्या पुनर्वितरणावर त्यांचा विश्वास होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेतील कामगारांसाठी केलेल्या तरतुदींद्वारे कामगारांच्या कल्याणासाठी आणि हक्कांसाठी त्यांची बांधिलकी दर्शवतात.

† विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर (सातारा).
आजीव सभासद क्र. १४२५, भ्रमणध्वनी : ९८८१८४८४९८, ई-मेल : shedagedb@gmail.com

**अभ्यासाचे उद्दिष्ट:**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार कल्याण आणि कामगार हक्कांबद्दलच्या विचारांचे अन्वेषण आणि विश्लेषण करणे.

**अभ्यासाची व्याप्ती:**

या अभ्यासात डॉ.आंबेडकरांचे लेखन, भाषणे, विधायी योगदान आणि इतर संबंधित दस्तऐवजांचा समावेश आहे.

**संशोधन पद्धती:**

गुणात्मक दृष्टिकोन: या अभ्यासात प्रामुख्याने डॉ.आंबेडकरांच्या विचारांचे संदर्भ बारकाईने समजून घेण्यासाठी गुणात्मक पद्धतीचा वापर केला आहे.

वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक: डॉ.आंबेडकरांच्या कल्पनांचा तपशील देण्यासाठी वर्णनात्मक आणि प्रासंगिकतेचा अर्थ लावण्यासाठी तसेच मूल्यांकन करण्यासाठी विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब केला आहे.

**तथ्य संकलन:**

या अभ्यासाकरिता प्रामुख्याने दुय्यम माहितीस्रोत वापरले आहेत. ज्यामध्ये डॉ.आंबेडकरांचे लेखन आणि भाषणे, संसदीय वादविवाद आणि संविधान योगदान अभ्यासले आहे. यामध्ये संदर्भग्रंथ, शैक्षणिक जर्नल्समधील लेख तसेच ऐतिहासिक विश्लेषण आणि टीका यांचा समावेश आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगारांचे हक्क आणि कामगार कल्याणाबाबत प्रगल्भ आणि पुरोगामी विचार खालील मुख्य मुद्दयांद्वारे मांडता येईल.

**१) कामगारांचे हक्क आणि प्रतिष्ठा:**

डॉ.आंबेडकरांचा कामगारांच्या अंगभूत सन्मानावर आणि कामगारांच्या मूलभूत हक्कांबाबत आग्रह होता. कामगारांना केवळ उत्पादनाची साधने न मानता त्यांना न्याय्य वागणूक, योग्य वेतन आणि वाजवी कामाच्या परिस्थितीचा अधिकार असलेला माणूस म्हणून वागणूक दिली पाहिजे, यावर त्यांनी भर दिला.

**२) आर्थिक समानता:**

डॉ.आंबेडकरांनी आर्थिक म्हणजेच उत्पन्नातील असमानता कमी करण्याचा पुरस्कार केला. त्यांनी असा युक्तिवाद केला की, कामगारांचे शोषण हे आर्थिक असमानतेचे एक प्रमुख कारण आहे आणि याला जमीन सुधारणा, किमान वेतन कायदे अशा उपायांच्या बदलांद्वारे अंगीकृत करणे आवश्यक आहे.

**३) सामाजिक सुरक्षा आणि कल्याण:**

डॉ.आंबेडकर हे कामगारांच्या सामाजिक सुरक्षेचे प्रखर आग्रही समर्थक होते. नागरिकांच्या, विशेषतः कामगार वर्गाचे कल्याण करणे हे राज्याचे प्रथम कर्तव्य आहे असा त्यांचा आग्रह होता. यामध्ये आरोग्य सेवा, सेवानिवृत्ती लाभ आणि बेरोजगारी विम्याच्या तरतुदींचा समावेश होता.

**४) संघटना स्थापन करण्याचा अधिकार:**

डॉ.आंबेडकरांनी कामगारांच्या संघटना स्थापन करण्याच्या अधिकाराचे समर्थन केले. त्यांनी कामगारांच्या हिताचे रक्षण करणे, न्याय्य वागणूक सुनिश्चित करणे यासाठी नियोक्त्यांशी वाटाघाटी म्हणजेच सामूहिक सौदेबाजी करण्यासाठी संघटना (युनियन) आवश्यक मानल्या.

**५) शिक्षण आणि कौशल्य विकास:**

डॉ. आंबेडकरांनी कामगारांसाठी शिक्षणाबरोबरच कौशल्य विकासाला महत्त्व दिले. त्यांचा विश्वास होता की, शिक्षण हे सक्षमीकरणाची गुरुकिल्ली आहे आणि व्यावसायिक प्रशिक्षण आणि कौशल्य विकास कामगारांना चांगल्या नोकऱ्या मिळवून देऊ शकतात.

**६) व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग:**

डॉ.आंबेडकरांना असा विश्वास होता की, कामगारांना व्यवस्थापनातील निर्णयप्रक्रियेत सामील केल्याने चांगले औद्योगिक संबंध राखून उत्पादकता वाढू शकते आणि कामगारांमध्ये मालकीची भावना

निर्माण होऊ शकते.

**७) सक्तीच्या मजुरीचे निर्मूलन:**

डॉ.आंबेडकर सक्तीचे मजुरी म्हणजेच 'वेठबिगार' व्यवस्थेचे कट्टर विरोधक होते. त्यांनी असा युक्तिवाद केला की, वेठबिगारसारख्या प्रथा केवळ शोषणात्मक नसून अमानवीयदेखील आहेत. त्यांनी समानता आणि न्याय्यसमाज निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित केले होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कामगारांसाठी विशेष कार्ये:

**१) मजूर पक्षाची स्थापना:**

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आधुनिक कामगार वर्ग उदयास आला. भारतामध्ये जसजसा औद्योगिक विकास होत गेला तसतशी कामगार संख्यासुद्धा वाढू लागली. त्या काळात प्रभावी कामगार कायदे अस्तित्वात नव्हते. त्यामुळे भांडवलदारांकडून कामगारांचे शोषण होऊ लागले, त्यांच्या स्वार्थी वृत्तीमुळे कामगार आणि मालक यांच्यात वाद-विवाद होऊ लागले. औद्योगिक विकासामुळे खेड्यातील लोकसुद्धा मोठ्या प्रमाणात शहरात येऊ लागले होते. त्यामुळे शहरातील कामगारांची संख्या वाढली. मुबलक प्रमाणात कामगार मिळू लागल्याने कामगारांची किंमतसुद्धा कमी झाली. अशा प्रवृत्तीमुळे कारखानदार अधिक श्रीमंत होत गेला तर कामगार वर्गाची अजूनच दयनीय अवस्था होत गेली.

काम करताना कामगाराला अपघात झाला तर त्या कामगाराला विमा मिळत नव्हता. आरोग्यविषयक सुविधा नव्हत्या, विश्रांतीगृहे नव्हती, उपहारगृहे नव्हती, कल्याणकारी योजना नव्हत्या, पिण्याच्या पाण्याची सोय नव्हती, कामाचे तास निश्चित नव्हते, ज्यादा श्रमाचा मोबदला दिला जात नव्हता. कामगारांना दररोज १५ ते १६ तास काम करावे लागायचे. कारखान्यातसुद्धा अपुरी जागा, यंत्रसामग्रींना सुरक्षितता नाही, स्वच्छता नाही, प्रदूषण अशा प्रकारचे वातावरण कारखान्याचे होते.

कामगाराच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी एखादी कामगारांची संघटना असावी, असे डॉ.आंबेडकरांना वाटत होते. १९३४ सालापासून बाबासाहेब म्युनिसिपल कामगार संघात सामील झाले आणि मुंबई महापालिकेच्या कामगारांच्या प्रश्नांत त्यांनी स्वतः लक्ष घातले आणि १५ ऑगस्ट १९३६ ला स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. बाबासाहेबांनी हा पक्ष केवळ मजूर, कामगार, कष्टकरी वर्गाच्या कल्याणासाठीच स्थापन केला होता म्हणून त्यांनी पक्षाच्या नावातच 'मजूर' हा शब्द वापरला. मजूर पक्षाचा जाहीरनामा 'टाइम्स ऑफ इंडिया' या इंग्रजी दैनिकात पहिल्यांदा प्रकाशित करण्यात आला होता. या जाहीरनाम्यात कामगारांविषयी ध्येय-धोरणे अतिशय सूक्ष्म पद्धतीने विचार करून ठरविली होती.

**मजूर पक्षाच्या जाहीरमान्यात अंतर्भूत केले विषय पुढीलप्रमाणे-**

१) कामगारांना आपल्या क्षेत्रात प्रावीण्य संपादन करून उत्पादनशक्ती वाढविण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

२) शेतकरी व कामगारांना सुधारलेल्या शहरीकरणाप्रमाणे राहाता यावे, यासाठी जाहीरनाम्यात आग्रह होता.

३) लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक अशा प्रसंगी देशातील उद्योगधंद्यांची मालकी व व्यवस्था सरकारने आपल्याकडे घ्यावी.

४) कामगार वर्गाच्या हितासाठी कारखान्यातील नोकरी, पगारवाढ, कामाच्या तासांच्या मर्यादा, पगारी रजा, वृद्धापकाळात कर्मचाऱ्यांना निवृत्त वेतन, बोनस, घरभाडे, मिळवून देण्याचे कायदे मंजूर करून घेण्याचे कामगार मजूर पक्ष व कामगार नेते म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी यशस्वीपणे केले.

**२) स्वातंत्र्योत्तर कामगारांविषयी कार्य:**

स्वतंत्र भारतात बाबासाहेब कायदेमंत्री झाले तेव्हा

कामगारांच्या कल्याणासाठी अनेक कायदे त्यांनी केले. जसे की, कामगार व मालक यांच्यातील वाद मिटविण्यासाठी १९४७ मध्ये औद्योगिक कलह कायदा आणला.

१९४८ साली कंपनी कायदा करण्यात आला. तसेच त्याचवर्षी किमान वेतन कायदा केला, ज्यानुसार शासनाने ठरवून दिलेले किमान वेतन मजुरांना मिळाले पाहिजे. त्याचप्रमाणे कामगारांच्या जीवनात सुरक्षितता मिळावी, काम करताना अपघात झाला किंवा अपंगत्व आले तर त्यासाठी उपाय म्हणून १९४८ मध्ये कर्मचारी राज्य विमा कायदा निर्माण केला. यासारखे अनेक कायदे व मजुरांना न्याय मिळवून देणाऱ्या अनेक शिफारशी प्रत्यक्ष कायद्यात त्यांनी उतरविल्या.

**३) भारतीय राज्यघटना आणि कामगार:**

भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार म्हणून डॉ. बी.आर.आंबेडकर यांनी कामगारांच्या हक्कांचे रक्षण केले आहे. संविधानाप्रमाणे, 'कामगार' हा भारतीय राज्यघटनेच्या अंतर्गत 'समवर्ती सूची' मधील एक विषय आहे. जेथे केंद्र आणि राज्य सरकारे दोन्ही केंद्र सरकारसाठी काही बाबींच्या आरक्षणासाठी कायदा करण्यास सक्षम आहेत. कामगार अधिकार क्षेत्राची घटनात्मक स्थिती खालीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**मूलभूत हक्क:**

कलम १४: कायद्यासमोर समानता आणि भारताच्या हद्दीत कायद्यांचे समान संरक्षण सुनिश्चित करते. यामध्ये सर्व कामगारांना समान वागणूक दिली जाते.

कलम १५: धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या आधारावर भेदभाव करण्यास प्रतिबंध करते. कामाच्या ठिकाणी होणारा भेदभाव रोखण्यासाठी हे महत्त्वाचे आहे.

कलम १६: सार्वजनिक रोजगाराच्या बाबतीत संधीच्या समानतेची हमी देते आणि राज्याच्या अंतर्गत कोणत्याही कार्यालयात नोकरी किंवा नियुक्तीमध्ये भेदभाव प्रतिबंधित करते.

कलम १९(१)(c): संघटना किंवा युनियन बनवण्याचा अधिकार प्रदान करते, जे कामगारांना ट्रेड युनियन तयार करण्यासाठी आवश्यक आहे.

कलम २१: जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे रक्षण करते. ज्याचा अर्थ, उपजीविकेचा अधिकार आणि अनुकूल कामकाजाच्या परिस्थितीचा समावेश केला आहे.

कलम २३: मानवी तस्करी आणि वेठबिगारी प्रतिबंधित करते, याची खात्री करून कोणत्याही व्यक्तीला त्यांच्या इच्छेविरुद्ध काम करण्यास भाग पाडले जात नाही.

कलम २४: १४ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांना कारखाने, खाणी किंवा इतर कोणत्याही धोकादायक रोजगारामध्ये काम करण्यास प्रतिबंधित करते.

**राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे:**

कलम ३८: सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि राष्ट्रीय जीवनाच्या सर्व संस्थांना माहिती देणारी सामाजिक व्यवस्था सुरक्षित करून लोकांच्या कल्याणाला चालना देण्यासाठी राज्याला निर्देश देते.

कलम ३९: हे कलम राज्याला याची खात्री करणे अनिवार्य करते की, पुरुषांना आणि स्त्रियांना समान रीतीने, उपजीविकेचे पुरेसे साधन मिळण्याचा अधिकार आहे. समाजाच्या भौतिक संसाधनांची मालकी आणि नियंत्रण सामान्य हितासाठी सर्वोत्तम म्हणून वितरित केले जाईल. स्त्री आणि पुरुष दोघांनाही समान कामासाठी समान वेतन राहील. कामगार म्हणून पुरुष आणि स्त्रिया यांचे आरोग्य आणि सामर्थ्य याचा गैरवापर केला जाणार नाही आणि आर्थिक गरजेमुळे नागरिकांना त्यांच्या वय किंवा शक्तीला अनुपयुक्त व्यवसाय करण्यास भाग पाडले जाणार नाही.

कलम ४१: बेरोजगारी, म्हातारपण, आजारपण आणि अपंगत्व तसेच इतर गरजांच्या बाबतीत काम

करण्याचा, शिक्षणाचा आणि सार्वजनिक सहाय्याचा अधिकार सुरक्षित करण्यासाठी प्रभावी तरतूद करण्यासाठी राज्याला निर्देश देते.

कलम ४२: कामाबाबत न्याय्य व मानवीय परिस्थिती आणि गर्भवती व बाळंत स्त्रियांसाठी कामाच्या ठिकाणी योग्य व सुरक्षित व्यवस्था ठेवण्याची तरतूद केली.

कलम ४३: सर्व कामगारांना काम, राहणीमान वेतन, कामाच्या परिस्थितीमध्ये एक सभ्य जीवनमान आणि पूर्णआनंद सुनिश्चित करण्याचे राज्याला निर्देश देते. सामाजिक व सांस्कृतिक संधींसह शाश्वत जीवनासाठी निर्वाह वेतनाची तरतूद केली.

कलम ४३ क: उद्योगांच्या व्यवस्थापनामध्ये कामगारांच्या सहभागाला प्रोत्साहन देते, औद्योगिक सुसंवाद आणि कामगारांमध्ये मालकीची भावना वाढीस लागते.

या तरतुदींचा एकत्रित हेतू कामगारांच्या हक्कांचे संरक्षण, वाजवी वेतन, सुरक्षित कामाची परिस्थिती आणि बालमजुरी तसेच कामगार शोषणावर प्रतिबंध सुनिश्चित करून न्याय्यव्यवस्था निर्माण करणे आहे.

**डॉ.आंबेडकरांचे कामगार कायदेविषयक कार्य:**

**कामगार कायदे आणि सुधारणा:**

भारतातील कामगार कायद्यांचा मसुदे तयार करण्यात डॉ.आंबेडकरांनी महत्त्वाची भूमिका बजावली. १९४२ ते १९४६ या काळात व्हाईसरॉयच्या कार्यकारी परिषदेचे कामगार सदस्य म्हणून कार्यरत असताना फॅक्टरीज कायदा, औद्योगिक विवाद कायदा आणि खाण कायदा यांसह अनेक प्रमुख कामगार कायदे लागू करण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. ६ आणि ७ सप्टेंबर १९४३ रोजी नवी दिल्ली येथे कामगार मंत्री म्हणून डॉ.आंबेडकरांनी अतिशय प्रभावी भाषणात श्रमिकांच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, सांस्कृतिक सुविधा आणि आरोग्य संसाधनांच्या मागण्या स्पष्ट केल्या.

**कामगार संघटनांना मान्यता देण्याचे बंधन:**

कामगारांचे प्रश्न त्यांना आपल्या संघटनेमार्फत मांडता यावेत याकरिता १३ नोव्हेंबर, १९४३ रोजी भारतीय श्रमिक संघटना कायद्यामध्ये दुरुस्ती करणारे विधेयकही त्यांनी विधिमंडळामध्ये मांडले. या विधेयकामध्ये कामगार संघटनांना मान्यता देण्याचे बंधन मालकांवर टाकण्यात आले होते. भारतातील कामगार चळवळीला प्रोत्साहन दणारे हे विधेयक कामगारांना नवसंजीवनी देणारे ठरले, हे मान्य करावे लागेल.

**कारखाना (दुरुस्ती) कायदा, १९४४:**

या दुरुस्तीचा उद्देश कामाची परिस्थिती आणि कामगारांचे कल्याण सुधारण्याचा होता. मुख्य तरतुदींमध्ये कामगारांचे आरोग्य आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी कामाचे तास, विश्रांतीचा कालावधी आणि कामाच्या परिस्थितीवरील नियमांचा समावेश होता. कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या महिला आणि मुलांचे कल्याण, त्यांच्या कामाच्या तासांवर निर्बंध घालणे आणि त्यांच्या कामाची परिस्थिती सुधारणे यावरही या दुरुस्तीत भर देण्यात आला होता.

**कारखाना (दुसरी दुरुस्ती) अधिनियम, १९४५:**

ही दुरुस्ती कारखाना कामगारांचे आरोग्य, सुरक्षा आणि कल्याण आणखी सुधारण्यावर केंद्रित होती. कारखान्यांमध्ये कॅन्टीन, क्रॅच आणि टॉयलेटची व्यवस्था यासारख्या अनिवार्य कल्याणकारी उपायांची सुरुवात केली. कारखान्याच्या आवारात कामगारांना उपलब्ध असलेल्या वैद्यकीय सुविधा वाढवण्याचाही या दुरुस्तीचा उद्देश होता.

**कारखाना (सुधारणा) कायदा, १९४६:**

१९४६ च्या दुरुस्तीने कामगार संरक्षण आणि कल्याण वाढविण्यासाठी ठरावीक कामगारांची संख्या असलेल्या कारखान्यांमध्ये कल्याण अधिकाऱ्यांची सक्तीची नियुक्ती करण्याची तरतूद होती. कारखान्यांनी कामगारांसाठी पुरेशा सुरक्षितता उपाय आणि सुविधा

राखल्या आहेत याची खात्री करण्यासाठी या दुरुस्तीने प्रयत्न केला. विशेषत: व्यावसायिक धोके कमी करण्यावर लक्ष केंद्रित केले.

या सुधारणांचा एकत्रित उद्देश भारतातील कारखान्यातील कामगारांसाठी अधिक सुरक्षित, आरोग्यदायी आणि अधिक न्याय्य वातावरण उपलब्ध करून देणे होता. ज्यातून डॉ.आंबेडकरांची सामाजिक न्याय आणि कामगार हक्कांसाठीची वचनबद्धता दिसून येते. भारत सरकारने भारतीय मजुरांसाठी स्वीकारलेल्या विविध नवीन योजना जसे की, भविष्य निर्वाह निधी, बोनस, भत्ते इ. या सर्व योजना डॉ.आंबेडकरांच्या विचारमंथनाने बनवलेल्या आहेत.

**किमान वेतन विधेयक:**

१९४६ मध्ये डॉ.आंबेडकरांनी सुचवलेल्या नवीन विधेयकात कामगारांना त्यांच्या कामाच्या ठिकाणची परिस्थिती सुधारणे आणि किमान वेतनाशी संबंधित होते. या किमान वेतनामध्ये दर ५ वर्षांच्या कालावधीत सुधारणा करण्याची तरतूदही करण्यात आली. हे विधेयक १९४८चा कायदा बनला आहे आणि त्याला सध्या किमान वेतन कायदा, १९४८ असे संबोधले जाते.

डॉ.आंबेडकरांनी कंपनी कायद्यांतर्गत, प्रौढ कामगारांना १० दिवसांची आणि बाल कामगारांना १४ दिवसांची पगारी रजा देण्याचा लाभ दिला आहे. यासोबतच, अखर्चित पगाराच्या रजेच्या बाबतीत भरपाई रजा मिळण्याची तरतूदही करण्यात आली आहे. ओव्हरटाईम वेतन मिळण्याची तरतूदही त्यांनीच केली होती. या अंतर्गत जर कोणताही कामगार दिवसातील ८ तासांपेक्षा जास्त किंवा आठवड्यातून ४८ तासांपेक्षा जास्त काम करत असेल, तर त्याला नियोक्त्याकडून ओव्हरटाईम वेतन मिळण्याचा अधिकार होता. तसेच हे ओव्हरटाईम वेतनाचे दर सामान्य वेतनापेक्षा जास्त असावेत हे देखील केवळ त्यांच्याच विचारात होते.

**महिला सक्षमीकरण:**

महिला सक्षमीकरण हा नेहमीच डॉ. आंबेडकरांच्या चिंतनाचा मध्यवर्ती विचार राहिला आहे. राष्ट्र-राज्याच्या विकासासाठी महिलांची भूमिका महत्त्वाची आहे. भारतातील महिलांचा दर्जा कामगार कल्याणाच्या दृष्टीने उंचावण्यासंदर्भात डॉ.आंबेडकर यांचे महत्त्वाचे योगदान दिसून येते. १९४१ चा खाण मातृत्व लाभ कायदा त्यांनी आणला. या कायद्यानुसार प्रसूती रजेचा लाभ कालावधी १६ आठवड्यांपर्यंत वाढवण्यात आला होता. या प्रसूती रजेच्या कालावधीत पूर्ण वेतन मिळण्याची तरतूद करण्यात आली होती आणि ती फक्त नियोक्ताच्या बाजूने द्यावी लागते. गर्भधारणेच्या काळात कोणत्याही महिलेला नोकरीवरून काढून टाकता येणार नाही. यामुळे महिला कर्मचाऱ्यांना तिच्या गरोदरपणात योग्य विश्रांती मिळण्यास आणि बाळाच्या जन्मानंतर तिचा रोजगार चालू ठेवण्यास मदत झाली. याचा परिणाम महिला कर्मचाऱ्यांच्या सहभागाचे दर वाढण्यात झाला.

**डॉ. आंबेडकरनिर्मित महत्त्वाचे कायदे**

१. आठ तास कामाची वेळ (Reduction in Factory Working Hours 8 hours duty)
२. महिलांना प्रसूती रजा (Mines Maternity Benefit Act)
३. महिला कामगार वेलफेयर फंड (Women Labour welfare fund)
४. महिला व बालकामगार संरक्षण कायदा (Women and Child, Labour Protection Act)
५. खाणकामगार यांना सुविधा (Restoration of Ban on Emloyment of Women on Underground Work in Coal Mines)
६. भारतीय फॅक्टरी कायदा (Indian Factory Act)
७. राष्ट्रीय रोजगार एजन्सी- सेवायोजन कार्यालय (National Emloyment Agency -

Emloyment Exchange)

८. राज्य कामगार विमा (Emloyees State Insurance (ESI))

९. कामगारांना महागाई भत्ता (DA). (Dearness Allowance (DA) to Workers).

१०. कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा (Revision of Scale of Pay for Emloyees).

११. कोळसा खाणी भविष्य निर्वाह निधी (Coal Mines Provident Fund)

१२. कामगार कल्याण निधी (Labour Welfare Funds)

१३. भारतीय कामगार संघटना (सुधारणा) विधेयक (The Indian Trade Unions (Amendment) Bill)

१४. आरोग्य विमा योजना (Health Insurance Scheme).

१५. भविष्य निर्वाह निधी कायदा (Provident Fund Act.)

१६. कामगार विवाद कायदा (Labour Disputes Act).

१७. किमान वेतन (Minimum Wage).

डॉ.आंबेडकरांचे सामाजिक, राजकीय, घटनानिर्मिती इत्यादी संबंधीचे कार्य हे असामान्य आहेच. या कार्याबरोबरच कामगारांच्या उत्कर्षासाठी केलेले कायदे व कामगार वर्गाच्या संबंधीचे इतरही कार्य उल्लेखनीय व महत्त्वपूर्ण आहे. परंतु बाबासाहेबांच्या या अफाट कार्यासंबंधी भारतीय महिला व पुरुष कामगार, कामगार संघटनांना अजूनही पुरेशी जाण झालेली नाही, ही अत्यंत खेदाची बाब आहे.

डॉ.आंबेडकरांनी कामगारांसाठी विशेष उल्लेखनीय केलेले कार्य खालीलप्रमाणे आहे-

१. शेतकऱ्यांसाठी किमान वेतन दर असावेत अशी मागणी विधिमंडळात केली.

२. १९३७ साली कोकणातील बहुजन कामगारांचे शोषण थांबविण्यासंबंधी खोती पद्धत नष्ट करण्यासंबंधी बिल मांडले.

३. मालकांनी आपले अंदाजपत्रक कामगारांसाठी जाहीर करण्याची मागणी केली.

४. १९३८ मध्ये सावकारी नियंत्रण विधेयक तयार केले.

५. बिडी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी बिडी कामगार संघ स्थापन केला.

६. २ सप्टेंबर १९४५ ला कामगार कल्याण योजना सादर केली. ही योजना लेबर चार्टर म्हणून प्रसिद्ध आहे.

७. सेवा योजन कार्यालयाची (Employment Exchange) स्थापना केली.

८. १४ एप्रिल १९४४ ला भरपगारी रजेचे विधेयक मंजूर केले.

९. १९ एप्रिल १९४६ ला मध्यवर्ती कायदेमंडळात कमीत कमी मजुरी आणि कामगारांची संख्या किती असावी यासंबंधी बिल मांडले व त्याचेच १९ फेब्रुवारी १९४८ ला कायद्यात रूपांतर झाले.

१०. औद्योगिक कलह मिटविण्यासाठी समेट घडवून आणणारी यंत्रणा (लवाद यंत्रणा) उभारण्याची तरतूद केली.

११. ३१ जानेवारी १९४४ रोजी खाण कामगारांसाठी 'कोळसा खाण कामगार फंडाची' स्थापना करणारे विधेयक मांडले.

१२. ८ एप्रिल १९४६ ला 'मिका माईन्स लेबर वेल्फेअर फंडाची' स्थापना करण्यासंबंधीचे बिल संमत केले.

१३. 'इंडियन्स माईन्स (अमेंडमेंड) ऑर्डिनन्स १९४५' नुसार स्त्री कामगारांच्या मुलांसाठी पाळणा घराची व्यवस्था करण्याचे व्यवस्थापनावर बंधन घातले.

१४. 'भारतीय खाण कायदा १९४६' तयार करून स्त्री कामगारांना खाणीत जमिनीच्या आतमध्ये काम

करण्यास व रात्रपाळीस बंदी केली.

१५. 'दि माईन्स मॅटरनिटी बेनिफिट ॲक्ट' नुसार खाणीतील स्त्रियांना बाळंतपणाची (प्रसूतीपूर्व व प्रसूतीनंतर) रजा देण्याची शिफारस केली.

१६. 'दि फॅक्टरी अमेंडमेंट बिल' संमत करून कामगारांना १० दिवसांची पगारी रजा आणि बाल कामगारांना १४ दिवसांची पगारी रजा देण्यासंबंधी कायद्यात दुरुस्ती केली.

१७. १९४६ च्या बजेट सेशनमध्ये आठवड्याचे कामाचे तास ५४ वरून ४८ व दिवसाला १० तासांऐवजी ८ तास करण्याचे बिल मांडले.

१८. अपघातग्रस्त कामगारांना मोबदला मिळावा म्हणून 'कामगार भरपाई कायद्याची' निर्मिती केली.

१९. २१ फेब्रुवारी १९४६ साली मध्यवर्ती कायदे मंडळात 'दि इंडियन्स ट्रेड युनियन्स (अमेंडमेंड) ॲक्ट आणून ट्रेड युनियनला मान्यता देणे व्यवस्थापनाला सक्तीचे करण्यासंबंधीचे विधेयक मांडले.

२०. 'स्टेट्स ॲण्ड मायनॉरिटीज' या ग्रंथामध्ये वेठबिगार कामगारांच्या प्रश्नाला हात घालताना बाबासाहेबांनी 'वेठबिगार हा गुन्हा आहे' असे मत मांडले आहे.

देशातील कामगारांच्या सुसह्य जीवनाचा डॉ. आंबेडकरांनी घातलेला पाया उद्ध्वस्त होईल अशी स्थिती सध्या निर्माण झाली आहे. कामगार कायद्यांमध्ये होत असलेल्या सुधारणा कामगारांच्या हक्कांच्या मुळावरच येत आहेत. प्रचंड प्रमाणात वाढलेली कंत्राटी कामगार प्रथा यामुळे डॉ.आंबेडकरांनी मिळवून दिलेल्या किमान वेतन, भरपगारी रजा, विमा योजना, बोनस या सर्व हक्कांची पायमल्ली सध्या होताना दिसते आहे.

समग्र भारतातील कामगार चळवळ, कामगार कायदे, स्त्री कामगाराबद्दलची आत्मीयता, त्यांच्या कौटुंबिक संसाराविषयीची चिंता, त्यांच्या जीवनाच्या उत्थान, उन्नतीचा मार्ग केवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांमुळेच सुकर झाला असे म्हणता येईल. आज कामगारांची स्थिती वाईट आहे. साम्राज्यवाद, नववसाहतवाद, सांस्कृतिक दहशतवाद, बहुराष्ट्रीय कंपन्या इत्यादींमुळे कामगारांच्या श्रमाला दाम कमी आणि भांडवलदाराला जास्त नफा या दोहोंतील वाढत्या फरकामुळे गरीब हा दिवसेंदिवस अधिक गरीब, तर श्रीमंत हा अधिकाधिक श्रीमंत होत आहे. सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांची घसरण होत आहे, सामान्य माणसांचे अवमूल्यन होत आहे. अशा व्यवस्थेविरुद्ध तसेच शासक समाजव्यवस्थेविरूद्ध आपण प्रतिरोध केला तरच डॉ.आंबेडकरांच्या स्वप्नातला भारत आपण घडवू शकू.

**निष्कर्ष:**

भारतीय समाजसुधारक, अर्थशास्त्रज्ञ आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगारांचे कल्याण आणि कामगार हक्कांच्या प्रश्नांवर प्रगल्भ विचार होते. कामगारांबद्दलचे त्यांचे विचार खालील निष्कर्ष मुद्दयांमध्ये सारांशित केले जाऊ शकतात.

**१. आर्थिक आणि सामाजिक न्याय:**

डॉ.आंबेडकरांचा कामगारांसाठी आर्थिक आणि सामाजिक न्यायाची व्यवस्था असावी यासाठी आग्रह होता. त्यांनी न्याय्य वेतन, वाजवी कामाचे तास आणि कामाच्या ठिकाणच्या चांगल्या परिस्थितीची मीमांसा केली. आर्थिक शोषण आणि सामाजिक भेदभाव एकमेकांशी जोडलेले आहेत आणि म्हणून त्यांचा एकत्रितपणे विचार करणे आवश्यक आहे, यावर भर देणारा त्यांचा दृष्टिकोन सर्वांगीण होता.

**२. कामगार हक्क:**

डॉ.आंबेडकर हे कामगार हक्कांचे प्रखर पुरस्कर्ते होते. त्यांनी कामगारांसाठी कायदेशीर संरक्षणाच्या महत्त्वावर भर दिला, ज्यात संघटित होण्याच्या आणि संघटना स्थापन करण्याच्या अधिकारांचा समावेश आहे.

**३. राज्याचा हस्तक्षेप:**

कामगारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी

अर्थव्यवस्थेत राज्याच्या महत्त्वपूर्ण हस्तक्षेपासाठी डॉ.आंबेडकरांनी असा युक्तिवाद केला की, सरकारने उद्योगांचे नियमन, न्याय्य कामगार पद्धती सुनिश्चित करणे, आरोग्य विमा, बेरोजगारी लाभ आणि निवृत्तीवेतन यांसारख्या सामाजिक सुरक्षा उपाय प्रदान करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली पाहिजे.

**४. शिक्षण आणि सक्षमीकरण:**

डॉ.आंबेडकरांनी कामगारांसाठी शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या महत्त्वावर भर दिला. त्यांचा असा विश्वास होता की, शिक्षणाद्वारे कामगारांना सक्षम बनवण्यामुळे त्यांना रोजगाराच्या चांगल्या संधी मिळतील आणि त्यांची सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारेल.

**५. औद्योगिकीकरण आणि आर्थिक विकास:**

डॉ.आंबेडकरांनी औद्योगिकीकरण हे रोजगारनिर्मिती आणि जीवनमान सुधारण्याचे साधन म्हणून पाहिले. त्यांचा असा विश्वास होता की, नियोजित आणि सुव्यवस्थित औद्योगिक अर्थव्यवस्था रोजगाराच्या चांगल्या संधी देऊ शकते आणि देशाच्या सर्वांगीण आर्थिक विकासात योगदान देऊ शकते.

**६. वैधानिक उपाय:**

कामगारांच्या हक्कांचे रक्षण करण्याच्या उद्देशाने कामगार कायद्यांचा मसुदा तयार करण्यात डॉ.आंबेडकरांचा मोठा वाटा होता. १९४२ ते १९४६ या काळात व्हाईसरॉयच्या कार्यकारी परिषदेचे कामगार सदस्य म्हणून त्यांनी किमान वेतन, मातृत्व लाभ आणि कामगारांच्या कल्याणाशी संबंधित कायदे तयार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

**७. कामगार चळवळीतील समावेशकता:**

डॉ.आंबेडकरांनी सर्वसमावेशक कामगार चळवळीचा पुरस्कार केला जो, उपेक्षित समुदायांसह सर्व कामगारांच्या गरजा आणि अधिकारांना संबोधित करतो. केवळ आर्थिक मुद्द्यांवरच नव्हे, तर सामाजिक न्याय आणि समानतेवरही लक्ष केंद्रित करणारी कामगार चळवळ निर्माण करणे ही डॉ.आंबेडकरांची दृष्टी होती.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कामगारांबद्दलचे विचार त्यांच्या सामाजिक न्याय, समता आणि आर्थिक लोकशाहीच्या व्यापक दृष्टिकोनामध्ये खोलवर रुजलेले होते. त्यांचा एक निष्पक्ष आणि न्याय्य समाज निर्माण करण्यावर विश्वास होता. जिथे कामगारांना सन्मानाने वागवले जाते, त्यांना पुरेसे संरक्षण दिले जाते आणि त्यांची सामाजिक-आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी सक्षम केले जाते.

**भविष्यातील संशोधनाची दिशा:**

जगातील सर्वात मोठी लोकसंख्या आणि विशेषतः तरुणांचा देश म्हणून अग्रेसर असणाऱ्या आपल्या देशात बेरोजगारी, टोकाची विषमता पाहावयास मिळते. अशा स्थितीत अलीकडे केंद्राच्या पातळीवर अनेक कामगार कायद्यांच्या एकत्रीकरणातून निर्माण केलेल्या चार कामगार संहितांची (Labour Code) समीक्षा डॉ.आंबेडकरांच्या कामगारांबाबत असलेल्या विचारांनुसार व्हावी, यासाठी आणखी सखोल संशोधनाची आवश्यकता आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. जाधव प्रतिभा जयवंत, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री कामगारांसंदर्भातील योगदान', Aarhat Multidiscilinary International Education Research Journal (AMIERJ), Volume-IX, Issues- VI, Nov-Dec 2020.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, प्रकरण ३९: 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगारविषयक धोरण - एक बोध', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, २५ डिसेंबर १९९३.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर: लेखन आणि भाषणे खंड १८, भाग-३, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, संपादक: वसंत मून, हरी नरके, प्रा.अशोक

गोडघाटे, प्रा.डॉ.म.ल.कासारे, एन.जी.कांबळे, द्वितीय आवृत्ती- प्रा.अविनाश डोळस, २०१६.

४. दामोदर विनय आणि सह-लेखक- वाघचौरे जयराम, 'भारतातील कामगार कल्याण आणि कामगार कायद्यांमध्ये डॉ. आंबेडकरांचे योगदान!', 'प्रबुद्ध भारत', संपादक: ॲड. प्रकाश आंबेडकर, ११ नोव्हेंबर, २०२२.

५. बागडे रक्षित मदन, 'डॉ. आंबेडकरांचे अर्थचिंतन', डॉ. बाबासाहेब आंबेडकर- जीवन आणि कार्य, संपादक- डॉ. रक्षित बागडे आणि डॉ. किशोर वासनिक.

६. भदरगे एस. के., 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कॉ. शामराव परुळेकर यांच्या कामगार चळवळीचा तौलनिक अभ्यास', International Journal of Creative Research Thoughts (IJCRT) Volume 4, Issue, 1 January 2016.

७. भारताचे संविधान, भारत सरकार, विधी व न्याय मंत्रालय, ९४ व्या सुधारणेपर्यंत आणि २६ सप्टेंबर २००६ पर्यंत फेरबदल केल्याप्रमाणे.

८. माकुमे नूतन हरिश्चंद्र, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार', A Half Yearly National Peer Reviewed Research Journal, Knowledge Resonance, जानेवारी 2021.

९. म्हाळुंगेकर अर्जुन डी., 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची कामगाराविषयक चळवळ', Journal "Navjyot' / Vol. II / Issue - III / 2013.

१०. लोंढे संतोष मारुती, ' कामगारांच्या विकासामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान', International Journal of Advance and Applied Research, Vol.3 No.5, Nov.-Dec. 2022

११. Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches Vol. 3, 18, 20, 21, 37, 39 Publisher: Dr. Ambedkar Foundation, Ministry of Social Justice & Empowerment, Govt. of India.

◆

**Announcement for Call of Articles**

**Dr. Ravindra Sabnis Memorial Prize.**

Marathi Arthshatra Parishad has considered an Endowment Fund for the award, on an annual basis of Dr. Ravindra Sabnis Memorial Prize of Rupees Four Thousand Only for outstanding contribution in form of an article published during the calendar year 2023 in standard accredited journals an themes belonging to the areas of Banking, Industrial Finance and General Industrial Economics.

Last date for Submission of the articles (Four Copies) for this year contest is 30 Augest 2024, For further details, contact the undersigned at this address.

**Dr. Avinash Ramlal Nikam**
Plot No. 49, Ganesh Nagar,
Behind Sai Bal Rugnalay,
Shahada, Dist. Nandurbar 425409
Cell. 9822665141

# भारत : माहिती तंत्रज्ञान आणि ग्रामीण विकास

**राहुल शं. म्होपरे**†

**प्रस्तावना :**

'भारत त्याच्या खेड्यांमध्ये राहातो.' या महात्मा गांधीजींच्या उक्तीप्रमाणे, भारतासारख्या विकसनशील देशात विकासाची संकल्पना ग्रामीण विकासाशी जोडलेली आहे. बहुतांश आशियायी देश ग्रामीण भागावर अवलंबून आहेत. त्या देशांच्या सरकारांनी त्यांचा आर्थिक आणि सामाजिक विकास मजबूत करण्यासाठी, ग्रामीण भागाच्या विकासावर किंवा उन्नतीवर लक्ष केंद्रित केले. ग्रामीण विकासाच्या समर्थनार्थ माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाची संभाव्य भूमिका आणि महत्त्व ही अशा देशांत विशिष्ट चिंतेची बाब आहे. ग्रामीण विकास क्षेत्रात आयसीटीचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष वापर करून त्याला 'ग्रामीण माहितीशास्त्र' असेही संबोधले जाते. ग्रामीण भागातील सामाजिक उत्पादन, सामाजिक उपभोग आणि सामाजिक सेवांवर लक्ष केंद्रित करून ग्रामीण अर्थव्यवस्थेला माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचा फायदा होऊ शकतो. ग्रामीण माहितीचा वापर करून शाश्वत विकास शक्य आहे, फक्त जर माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान हस्तक्षेप स्थानिक गरजांना प्रतिसाद देण्यास सक्षम असतील आणि ग्रामीण भागातील प्रचलित ज्ञानानुसार पुन्हा समायोजन करू शकतील. तळागाळात प्रचलित असलेल्या गरजा आणि स्थानिक ज्ञान समजून घेण्यासाठी, या हस्तक्षेपांना शक्यतो प्रभावी द्वि-दिशात्मक दुवा असायला हवा.

अलीकडील बदलांची व्याप्ती आणि वेग हे माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानमध्ये क्रांतिकारक प्रगतीचे कार्य आहे. आयसीटी ही मुळात माहिती हाताळणीची साधने आहेत - देशाच्या विकासासाठी उत्पादन, साठवणूक, प्रक्रिया, वितरण आणि देवाणघेवाण करण्यासाठी वस्तू, अनुप्रयोग आणि सेवांचा विविध संच माहितीद्वारेच वापरले जाऊ शकतो. त्यामध्ये रेडिओ, टेलिव्हिजन आणि टेलिफोनचे 'जुने' आणि 'पारंपरिक' माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान आणि संगणक, उपग्रह, वायरलेस तंत्रज्ञान आणि इंटरनेटचे 'नवीन' आणि 'प्रगत' माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान समाविष्ट आहेत. संगणक आणि सॉफ्टवेअर प्रोग्रामचा वापर हा तंत्रज्ञानाचा केंद्रबिंदू आहे. ते इतर गोष्टींबरोबरच यंत्रसामग्री, उपकरणे, साधने, कौशल्ये, ज्ञान आणि कौशल्य यांचा संदर्भ घेऊ शकतात. ग्रामीण भागाच्या विकासासाठी तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर झाला आहे आणि तंत्रज्ञानाच्या कार्यक्षम वापरामुळे कृषिक्षेत्रात विस्तार आणि प्रगती झाली आहे.

ग्रामीण विकासात आयसीटीची भूमिका या

† सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, देवचंद कॉलेज, अर्जुननगर.
आजीव सभासद क्र. ११९४, भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०, ई-मेल : rahulmhopare@rediffmail.com

शोधनिबंधामध्ये मांडण्यात आली आहे. हा शोधनिबंध ग्रामीण समुदायाच्या अलिप्ततेशी संबंधित समस्यांकडे लक्ष वेधतो. आयसीटी शहरी आणि ग्रामीण समुदायांमधील डिजिटल विभाजन कमी करू शकते. ग्रामीण भागातील गरिबी दूर करण्यासाठी, ग्रामीण विकासामध्ये आयसीटीच्या भूमिकेचा केंद्रबिंदू 'वृद्धीमध्ये समानता' आणि 'सर्वांना संधीची समानता' आहे. आयसीटी ग्रामीण समाजाच्या उन्नतीसाठी योग्य दिशेने महत्त्वाची भूमिका बजावू शकते. माहिती तंत्रज्ञानाची अफाट क्षमता वंचितांपर्यंत पोहोचवण्याची नितांत गरज आहे. हा शोधनिबंध प्रामुख्याने ग्रामीण भारताचा विकास करण्यासाठी ग्रामीण विकास उपक्रमांमधील आयसीटी हस्तक्षेप कसा सक्षम आहे यावर केंद्रित करत आहे. या शोधनिबंधात ग्रामीण भागातील तंत्रज्ञानाच्या विकासाची उद्दिष्ट्ये, ग्रामीण भागात तंत्रज्ञानाच्या वापराचे फायदे, तंत्रज्ञानाच्या वापराचे क्षेत्र, ग्रामीण विकासात माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानाची भूमिका, ग्रामीण भागातील आव्हाने व उपाय इ. मुद्द्यांचे वर्णन केले आहे.

**संशोधन पद्धती:**

तथ्य संकलित करण्यासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर केला गेला आहे आणि ही माहिती मासिके, जर्नल्स आणि इंटरनेटवरून गोळा केली आहे. या तथ्य अथवा माहितीच्याच्या आधारे, महत्त्वाचे निष्कर्ष काढले गेले आहेत आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेत माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाची भूमिका वाढवण्यासाठी रचनात्मक भविष्यातील मागण्यांचा एक भाग म्हणून विचार केला गेला आहे.

**भारतातील राज्यांचे डिजिटलायझेशन मापन: श्रीमंत राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश सरासरी जास्त डिजिटल:**

जागतिक प्रवृत्तीप्रमाणे, भारतातील श्रीमंत राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश (UTs) मध्ये डिजिटलायझेशनची पातळी तुलनेने जास्त आहे. CHIP स्कोअरनुसार, आयसीटी शीर्ष पाच राज्ये - कर्नाटक, महाराष्ट्र, तेलंगणा, गुजरात आणि हरियाणा ही भारतातील श्रीमंत राज्यांपैकी एक आहेत. केंद्रशासित प्रदेश आणि लहान राज्यांमध्ये (लोकसंख्या १ कोटीपेक्षा कमी) तसेच दिल्ली आणि चंदीगडचे सर्वोच्च दोन रँक आणि दरडोई उत्पन्न आहे. आकृती १ आणि २ मध्ये हे वर्णन चित्रित केले आहे.


राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांची क्रमवारी इतर राज्य-स्तरीय निर्देशांकांशी तुलना या दोन्ही आकृतींमधून दर्शविले आहे. स्टार्ट-अप रँकिंग २०२३ अहवालप्रमाणे, आघाडीवर असलेल्या कर्नाटक आणि गुजरात CHIP रँकिंगमध्येही पहिल्या पाच राज्यांमध्ये आहेत. २०२२ मध्ये नोंदवलेल्या व्यवसाय सुलभतेच्या श्रेणीतील सात राज्यांपैकी - गुजरात, तेलंगणा, हरियाणा, केरळ आणि तामिळनाडू ही पाच राज्येदेखील CHIP रँकिंगमधील पहिल्या सात राज्यांमध्ये आहेत. याशिवाय, इंडिया इनोव्हेशन इंडेक्स (२०२१) ने कर्नाटक, तेलंगणा, महाराष्ट्र, तामिळनाडू आणि उत्तर प्रदेश या राज्यांना शीर्ष पाच प्रमुख राज्ये म्हणून स्थान दिले आहे, त्यापैकी तीन CHIP प्रमाणेही आघाडीवर आहेत.

**इंटरनेटवरील उपक्रम:**

इंटरनेट फक्त लोकांना जोडण्याच्या उद्देशाच्या पलीकडे गेले आहे किंवा कार्यालयीन काम करण्यासाठी सक्षम पर्याय आहे. आज, इंटरनेटचा वापर कामाशी संबंधित क्रियाकलापांसाठी होत नाही. ग्रामीण भारतातील खेड्यातील वर्गांच्या प्रमाणात फरक नाही. ग्रामीण भारतात, पाचपैकी चार AIU (सक्रिय इंटरनेट वापरकर्ते) १००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावातील आहेत आणि असे आढळून आले आहे की, पाचपैकी किमान ३ AIU पुरुष या उपक्रमांचे संचालन करत आहेत. तथापि, डिजिटल पेमेंट, डिजिटल कॉमर्स आणि ऑनलाइन शिक्षणाच्या बाबतीत पुरुषांचे प्रमाण किरकोळ

आकृती : १

केंद्रशासित प्रदेश आणि लहान राज्ये (लोकसंख्या < 1 कोटी)




स्त्रोत: स्टेट ऑफ इंडियाज डिजिटल इकॉनॉमी (SIDE) अहवाल, २०२४.

जास्त आहे. आकृती ३ आणि ४ मध्ये हे वर्णन चित्रित केले आहे.


**ग्रामीण विकासात माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाची भूमिका:**

**१. कृषी उत्पादन वाढवणे :** शेतकरी (विशेषत: लहान) अनेकदा खराब माती, दुष्काळ, धूप आणि कीटक यांसारख्या अनेक धोक्यांमुळे अडचणीत येतात. कीटक आणि रोग नियंत्रण, चेतावणी प्रणाली, नवीन वाण, उत्पादन ऑप्टिमाइझ करण्याचे नवीन मार्ग आणि गुणवत्ता नियंत्रणासाठी नियमांबद्दल अद्ययावत माहिती प्रदान करून माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान सुधारण्यास मदत करू शकते.

**२. क्षमता-बांधणी आणि सक्षमीकरण :** माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर समुदाय आणि शेतकरी संघटनांना बळकट करण्यासाठी, त्यांच्या स्वत:च्या क्षमता मजबूत करण्यासाठी आणि आदान-प्रदान किमती, जमिनीचे दावे, संसाधन हक्क आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या वाटाघाटी करताना त्यांच्या क्षेत्राचे अधिक चांगले प्रतिनिधित्व करण्यासाठी केले जाऊ शकते. ग्रामीण समुदाय आयसीटीच्या वापराद्वारे इतरांशी संवाद साधण्यास सक्षम आहेत, जे त्यांच्यातील सामाजिक अलगाव कमी करते. त्याशिवाय, आयसीटी

**आकृती : २**

**मोठी राज्ये (लोकसंख्या > 1 कोटी)**





स्त्रोत: स्टेट ऑफ इंडियाज डिजिटल इकॉनॉमी (SIDE) अहवाल, २०२४

* मोठी राज्ये (लोकसंख्या १ कोटी) आणि केंद्रशासित प्रदेश आणि लहान राज्ये (लोकसंख्या ₹ १ कोटी), स्कोअर प्रमाणित आहेत. लडाख आणि लक्षद्वीप अनेक निर्देशकांसाठी डेटा उपलब्ध नसल्यामुळे रँकिंगमध्ये समाविष्ट नाहीत.

कायद्याची निर्मिती आणि जमीन-शीर्षक मंजुरी यासारख्या प्रक्रिया अधिक पारदर्शक बनविण्यास सक्षम आहेत.


**३. दारिद्र्य निर्मूलन :** गरिबांकडे माहिती, ज्ञान आणि संवादाच्या गरजा असतात, परंतु ते सहसा त्या पूर्ण करू शकत नाहीत. ग्रामीण आणि दुर्गम भागातील गरिबांसाठी आयसीटीचा प्रचार करण्यासंदर्भात, नैसर्गिक संसाधने, बाजारपेठा, वस्तूंच्या किमती, उत्पन्नवाढीचे उपक्रम, सहाय्य सेवा इत्यादींच्या माहितीद्वारे उपजीविकेला आधार देण्यासाठी आयसीटी महत्त्वपूर्ण

## आकृती : ३




स्रोत: KANTAR, ICUBE2020, P14.

## आकृती : ४




स्रोत: KANTAR, ICUBE2020, P14.

भूमिका बजावू शकतात. दारिद्र्य कमी करण्यामध्ये माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानची भूमिका केवळ उत्पन्नातील गरिबी कमी करण्यापुरती मर्यादित नाही, तर त्यात सक्षमीकरणासारखे गैर-आर्थिक आयामदेखील समाविष्ट आहेत.

शेतीच्या संदर्भात, पाच प्रमुख सेवा किंवा कार्ये आहेत जी आयसीटीशी अगदी जवळून संबंधित आहेत:

- विविध प्रकारच्या कृषी माहितीप्रणाली (AIS) द्वारे माहिती;
- विविध माहिती प्रक्रिया साधनांद्वारे नैसर्गिक संसाधने

आणि पर्यावरणीय प्रभावाच्या परिस्थितीचे निरीक्षण करणे (पर्यावरणाचा ऱ्हास, मातीची धूप, जंगलतोड इ.) चे विश्लेषण;

- शिक्षण आणि संप्रेषण तंत्रज्ञान जे शिक्षण आणि ज्ञान व्यवस्थापनासाठी नवीन दृष्टिकोन निर्माण करण्यात अतिशय महत्त्वाची भूमिका बजावत आहेत;
- नेटवर्किंग जेथे आयसीटी संस्था/ लोकांशी संबंध जोडण्यासाठी, आपापसांत माहिती व ज्ञानाची निर्मिती आणि देवाणघेवाण करणाऱ्या 'भागधारकांचे आभासी समुदाय' तयार करण्यात मदत करू शकतात. जर व्यवस्थित व्यवस्थापित केले असेल, तर नेटवर्किंग हे परस्परसंवादी ज्ञानविकास प्रक्रिया विकसित करण्याच्या दिशेने पहिले पाऊल आहे ज्यामुळे शिक्षण नेटवर्क होऊ शकते.
- निर्णय समर्थन प्रणाली (DSS) ज्याद्वारे डेटा आणि माहिती सूचित निर्णय घेण्याकरिता संबंधित ज्ञान इनपुट प्रदान करते. माहितीप्रणालीचे ज्ञानप्रणालीमध्ये रूपांतर करण्यात ही साधने महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

**भारतातील शेतकरी आणि कृषी संशोधक यांच्यात माहिती विलंब होत आहे कारण:**

- मीडिया, माहिती व्यवस्थापन आणि माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान यांचा योग्य वापर केला जात नाही.
- पुरेशा विस्तार कामगारांचा अभाव.
- भारतात कृषी माहिती साक्षरतेचा अभाव.
- शेतकरी आणि बहुतांश विस्तार कामगारांसोबत अद्ययावत कृषी माहितीचा अभाव.
- शेतकरी आणि ग्राम-स्तरीय विस्तार कर्मचाऱ्यांचे कमी तांत्रिक ज्ञान.
- ग्रामीण लोकांच्या आर्थिक समस्या.
- टॉप-डाऊन दृष्टिकोन विस्तार क्रियाकलापासाठी स्वीकारला जातो.

त्यामुळे संशोधन विस्तार आणि शेतकरी यांच्यातील दुवा कमकुवत राहिला आहे, इ.

**सूचना/शिफारशी:**

- ग्रामपंचायत, सरकारी कार्यालये, शाळा, आयसीटी केंद्रे इत्यादी संस्थांद्वारे ग्रामीण जनतेपर्यंत आयसीटी वापराविषयी जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे.
- सरकारने सॉफ्टवेअर डेव्हलपर्सना त्यांच्या संबंधित मातृभाषेत सॉफ्टवेअर पॅकेजेस विकसित करण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे.
- ग्रामीण भागात माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानची जागरूकता निर्माण करण्यासाठी संवाद आणि व्यावसायिक चर्चा उघडणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष:**

आयसीटीचा अप्रत्यक्षपणे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेला फायदा होण्यासाठी प्रभावी ॲप्लिकेशन्स आणि चॅनेलचा वापर करण्यात आल्याचे विश्लेषणातून दिसून आले आहे. तथापि, सरकारने आपल्या विकास कार्यक्रमांमध्ये या तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी आणि आयसीटीचा प्रभावी आणि कार्यक्षमतेने वापर करण्यासाठी, भविष्यात आयसीटी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेत अधिक घट्ट नाते निर्माण होण्याकरिता लोकांना शिक्षित करण्यासाठी अधिक पुढाकार घेणे आवश्यक आहे.

(सदर लेखासाठी गणेश टेकळे या संशोधक विद्यार्थ्याची मदत झाली आहे. त्याबद्दल संशोधक त्यांचे ऋणी आहेत.)

**संदर्भ ग्रंथ सूची:**

१. अराठी, चितला. ग्रामीण भारतावरील माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचा प्रभाव, IOSR जर्नल ऑफ कॉम्प्युटर इंजिनिअरिंग (IOSRJCE) ISSN: 2278-0661 खंड ३, अंक २ (जुलै-ऑगस्ट २०१२), पान क्र. ३२-३५ www.iosrjournals.

२. घटक ६, ग्रामीण विकासात माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानची भूमिका, https://egyankosh.ac.in/bitstream/123456789/25875/1/Unit-6.pdf दि.: २१/०९/२०२२
३. KANTAR, भारतातील इंटरनेट दत्तक, ICUBE2020, OyZ 2021, http://www.kantar.com/
४. नायक, सुर्यवंशी आणि कल्याणकर, आयसीटी: अ टूल फॉर सस्टेनेबल रुरल डेव्हलपमेंट, इंटरनॅशनल जर्नल ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड ॲप्लिकेशन्स खंड- २, क्रमांक १, एप्रिल / मे २००९ ISSN: 0974-1003
५. भटनागर, एस. आणि श्वेअर, आर. (२०००). ग्रामीण विकासामध्ये माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान: भारत केस स्टडीज, जागतिक बँक संस्था, १-१९२.
५. मिश्रा दीपक, केडिया मानसी, रेड्डी आरती, रामनाथ कृतिका आणि मनीष मयंक. (२०२४), स्टेट ऑफ इंडियाज डिजिटल इकॉनॉमी (SIDE) अहवाल, २०२४, IPCIDE, ICRIER इंडियन कौन्सिल फॉर रिसर्च ऑन इंटरनॅशनल इकॉनॉमिक रिलेशन्स, https://icrier.org/publications/the-state-of-india-s-digital-economy-report-2024/ वरून ३० जून २०२४ रोजी प्राप्त.
६. शिंकर राजेश्री, Rural Development through ICT, रिसर्च जर्नल ऑफ केमिकल अँड एन्व्हायर्नमेंटल सायन्सेस Res J. Chem. पर्यावरण, विज्ञान व्हॉल ५ (१) फेब्रुवारी २०१७:०६-१० ऑनलाइन ISSN 2321-1040.

◆


## मराठी अर्थशास्त्र परिषद
## मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने महिला लेखिकेने लिहिलेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथास रु.११०००/-, प्रमाणपत्र व मानचिन्ह देण्यात येते. १ जानेवारी, २०२३ ते ३१ डिसेंबर, २०२३ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथांच्या महिला लेखिकेस (मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सभासद असणे आवश्यक) स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे ३० ऑगस्ट, २०२४ पर्यंत पोहचतील या बेताने पाठवावे. नोव्हेंबर, २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे संपन्न होत असलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४७ व्या राष्ट्रीय अधिवेशनात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**पत्रव्यवहारासाठीचा पत्ता**

कार्यवाह - खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, डॉ. मारोती तेगमपुरे, 'संगाई', घर क्रमांक २२, भालचंद्र पेट्रोल पंपाच्या मागे, शहीद भगतसिंग नगर, पारनेर रोड, अंबड, जि. जालना ४३१२०४ (भ्रमणध्वनी: ९४२३९९३१३७)

**- डॉ. मारोती तेगमपुरे**

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद

# २०१५ पासूनच्या अर्थशास्त्रातील नोबेल स्मृती पारितोषिक प्राप्त अर्थतज्ज्ञांचे आर्थिक विचार

**प्रशांत हरमकर** †

अर्थशास्त्रातील अतुल्य कामगिरी केल्याबद्दल १९६९ पासून रॉयल स्विडीश ॲकॅडमी ऑफ सायन्सने द सव्हेअरजियस स्विस बँक पारितोषिक देण्यास सुरुवात केली. अर्थशास्त्राचे पहिले नोबेल पारितोषिक विजेते रॅग्नर फ्रिश आणि जॉन टिंबरजन ठरले. तेव्हापासून दरवर्षी अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक देण्यात येते. सामान्यपणे आर्थिक तत्त्व वा सिद्धांत अथवा नव्याने विकसित केलेल्या संकल्पनांना अर्थशास्त्रातील नोबेल स्मृती पारितोषिक दिले जात होते. मात्र गेल्या दशकापासून नोबेल पारितोषिक केवळ आर्थिक सिद्धांत वा आर्थिक तत्त्वाबाबतच्या संशोधनाला न देता वादप्रश्न सोडविणारे आर्थिक तत्त्व वा सिद्धांतांना नोबेल पारितोषिक दिले जाते. यामुळे तत्त्व वा सिद्धांतांचे उपयोजन आणि परिणामकारकता याला महत्त्व देऊन पारितोषिक विजेत्यांची निवड केल्या जाते. परिणामतः अर्थशास्त्र हे आधिक्याने वास्तववादी आणि व्यवहारोपयोगी झाले आहे. ४७ व्या मराठी अर्थशास्त्र परिषदेचा पहिला सैद्धांतिक विषय म्हणून '२०१५ पासूनच्या अर्थशास्त्रातील नोबेल स्मृती पारितोषिक प्राप्त अर्थतज्ज्ञांचे आर्थिक विचार' असा शोधनिबंधक लेखकासाठी विषय चर्चेला ठेवला आहे. २०१५ पासून ज्या अर्थशास्त्रज्ञांना नोबेल पारितोषिक प्राप्त झाले आहे त्यांचे अध्ययन हे अनुभवनिष्ठ विश्लेषण आहे. पारितोषिक विजेत्यांनी केवळ सिद्धांत वा प्रारूपाची मांडणी केली नाही, तर त्यांच्या सिद्धांत वा प्रारूपाचा प्रत्यक्ष व्यवहारातील समस्या सोडविण्यामध्ये सहभाग झाला आहे. म्हणजेच नोबेल पारितोषिक विजेत्याच्या संशोधनाने प्रत्यक्ष व्यवहारातील समस्या सोडविण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या संशोधनातून निर्माण झालेली साधने ही केवळ सैद्धांतिक नसून प्रत्यक्ष व्यवहारात हाताळली जाणारी आहे. त्यामुळे नोबेल पारितोषिक प्राप्त अर्थशास्त्रज्ञांनी अर्थशास्त्राला वास्तवाच्या अधिक जवळ घेवून गेले आहे.

अर्थशास्त्राच्या नोबेल पारितोषिक विजेत्यांना विविध क्षेत्रांतील योगदानाबाबत नोबेल स्मृती पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. ते त्या क्षेत्रातील विशेषज्ञ आहेत. दारिद्र्य आणि कल्याण, करार सिद्धांत, वर्तणूक अर्थशास्त्र, आर्थिक वृद्धी, तंत्रज्ञान आणि हवामान बदल लिलाव सिद्धांत, श्रम अर्थशास्त्र, बँक आणि वित्तीय अरिष्ठ, स्त्री श्रमबाजार अशा विविध क्षेत्रांतील त्यांच्या संशोधनाने अर्थशास्त्राला समृद्ध केले आहे. या विविध क्षेत्रातील नोबेल पारितोषिक विजेत्याच्या योगदानाबाबत

† सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, या.द.व.देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तिवसा, जि. अमरावती. आजीव सभासद क्र. : १३७९, भ्रमणध्वनी : ९४२०६३३१२८, ई-मेल :

शोधनिबंध लेखक शोधनिबंध लिहू शकतात.

उपयोग, दारिद्र्य आणि कल्याण यांच्या सैद्धांतिक आणि व्यावहारिक विश्लेषणाकरिता अंगस डेटॉन यांना २०१५ च्या नोबेल पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. उपभोग, कल्याण आणि दारिद्र्यावर मात करण्याकरिता आर्थिक धोरणांची रचना कशी असावी याकरिता व्यष्टी, समष्टी आणि विकासाचे अर्थशास्त्र या अनुषंगाने मांडणी केली आहे. यामुळे शोधनिबंधलेखक उत्पन्न, खर्च आणि बचत, कल्याण आणि दारिद्र्याचे मापन या अनुषंगाने अंगस डेटॉन यांच्या योगदानाबाबतचे विश्लेषण लेखक करू शकतात. सबळ मागणी व्यवस्था आणि व्यष्टी अर्थशास्त्र, वैयक्तिक उपभोग आणि समष्टी अर्थशास्त्र, विकसनशील देश आणि विकासाचे अर्थशास्त्र, उपभोक्त्याची मागणी, कल्याणाचे मापन, लिंग विषमता, बचत आणि तरलता, किंमतीमधील बदल व उपभोग, आरोग्य, असमानता व भारतातील दारिद्र्य, दारिद्र्य आणि दारिद्र्याचे मापन, अन्न आणि पोषणाचे भारतातील वास्तव या विविध पैलूंच्या अनुषंगाने शोधनिबंध लेखक अंगस डेटॉन यांच्या संशोधनावर पेपर लिहू शकतात.

करार सिद्धांताकरिता ऑलिव्हर हार्ट आणि बेनजट हॉल्मस्ट्रोम यांना २०१६ चे नोबेल स्मृती पारितोषिक प्रदान करण्यात आले. आधुनिक अर्थशास्त्रामध्ये असंख्य प्रकारचे करार केले जातात. या करारांना अर्थशास्त्रामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. कराराची रचना अधिक सबळ होण्याकरिता हार्ट आणि होल्मस्ट्रोम यांनी नवीन सैद्धांतिक साधने निर्माण केली आहे. वास्तवातील करार आणि संस्था समजून घेण्याकरिता त्यांचे मौल्यवान योगदान आहे. बेनजट होल्मस्ट्रोम यांनी अभिकर्त्याच्या पर्याप्त कराराची रचना तयार केली. होल्मस्ट्रोमने कराराचे सामान्यीकरण करून परिणामाची वास्तववादी मांडणी केली आहे.

ऑलिव्ह हार्ट यांनी करार सिद्धांतामध्ये मुलभूत योगदान दिले आहे. हार्ट यांचे अपूर्ण कराराच्या संदर्भात योगदान महत्त्वपूर्ण मानले गेले आहे. कोणत्या पक्षासोबत करार करायला पाहिजे. त्या कराराची क्षमता काय असायला पाहिजे. याबाबत संशोधन करून अपूर्ण कराराचे अध्ययन केले आहे. मालकी आणि व्यवसायाचे नियंत्रण यावर नव्याने प्रकाश टाकला आहे. याचा परिणाम अर्थशास्त्रावर झाला आहे. शोधनिबंध लेखक बेनजट होल्मस्ट्रोम आणि ऑलिव्ह हार्ट यांचे अर्थशास्त्रातील योगदान, प्रमुख अभिकर्ता प्रारूप, पारंपारिक नैतिक धोका प्रारूप, पर्याप्त करार, अपूर्ण करार, संपत्ती अधिकाराची अनुभवनिष्ठ चाचणी, निगम वित्त, वित्त आणि शासन, असममित माहिती आणि करार या अनुषंगाने शोधनिबंध लेखक आपला शोधनिबंध लिहू शकतात.

वर्तवणूक अर्थशास्त्राला २०१७ चे नोबेल पारितोषिक बहाल करण्यात आले. आर्थिक व्यवहार घडून येत असताना मानसशास्त्रीय अंतरंग उलगडून दाखविण्याकरिता रिचर्ड थैलेर यांना नोबेल स्मृती पारितोषिक देण्यात आले. रिचर्ड बॅलेर यांनी मानव वर्तणुकीच्या दृष्टिकोनातून आर्थिक घटनांचा विचार केला आहे. वास्तववादी विश्लेषण करताना आर्थिक निर्णय कशा प्रकारे घेतले जातात. लोकांची वर्तवणूक कशा प्रकारची असते व अंतिमतः आर्थिक निर्णय कशा प्रकारे घेतले जातात याचे विश्लेषण केले आहे. अर्थशास्त्र आणि मानसशास्त्र, रिचर्ड थैलेर यांचे अर्थशास्त्रातील योगदान, वर्तवणूक वित्त आणि वादप्रश्न, वर्तवणूक कायदा आणि अर्थशास्त्र, मानसशास्त्र आणि बचत धोरण, वर्तवणूक अर्थशास्त्र आणि शेअर बाजार तसेच रिचर्ड थैलेर यांच्या वर्तवणूक अर्थशास्त्राची तुलना हर्बट सिमान, मॉअराइस अलाइस, डेनियल काहमेहन, रॉबर्ट शिलार, युजीन फामा आणि पटेर हॅनसन' यांच्या वर्तवणूक अर्थशास्त्राशी करता येईल.

आर्थिक वृद्धी, तंत्रज्ञानात्मक बदल आणि हवामान बदल याकरिता २०१८ चे 'अर्थशास्त्राचे नोबेल स्मृती पारितोषिक देण्यात आले. विल्यम नार्थस आणि पॉल रोमर यांना हवामान बदल एकात्मिकरण आणि तंत्रज्ञानात्मक नवप्रवर्तन एकीकरण यांच्या दीर्घकालीन समष्टी आर्थिक विश्लेषणाकरिता नोबेल स्मृती पारितोषिक बहाल करण्यात आले. आर्थिक वृद्धीसह पर्यावरण आणि दबाव निर्माण करणाऱ्या प्रश्नांना संबोधून ते सोडविण्याची पद्धती त्यांनी विकसित केली आहे. शोधनिबंध लेखक, जोखीम, अनिश्चितता हवामान बदल व अर्थशास्त्र, अंतर्जात वृद्धीचे मूलतत्त्व, आर्थिक विकासाच्या व्यूहरचना, हवामान बदल आणि आर्थिक धोरणे, हवामान बदलाचे अर्थशास्त्र आणि प्रारूपे, दीर्घकालीन आर्थिक वृद्धी आणि परतावा, तंत्रज्ञानात्मक नवप्रवर्तन, प्रेरणा आणि अर्थशास्त्र, कल्पनावाहक वृद्धी, अपूर्ण बाजारातील धोरणे, गतिशील अर्थव्यवस्था आणि अनिश्चितता या विविध पैलूंच्या अनुषंगाने २०१८ च्या नोबेल पारितोषिकासंदर्भात शोधनिबंध लेखक आपला शोधनिबंध लिहू शकतात.

अर्थशास्त्राचे २०१९ चे नोबेल पारितोषिक अभिजीत बॅनर्जी, इस्थर डूफ्लो आणि मायकेल क्रेमेर यांना प्राप्त झाले. जागतिक पातळीवर दारिद्र्य कमी करण्याचा अनुभवनिष्ठ दृष्टिकोन आणि दारिद्र्याशी लढा देणाऱ्या संशोधनाला पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. बॅनर्जी, डुल्फो आणि क्रेमेर यांचे अर्थशास्त्रातील योगदान, दारिद्र्य कपातीची त्रिसूत्री, दारिद्र्याचे अनुभवनिष्ठ विश्लेषण आणि शिफारशी, आरोग्यक्षेत्र, सूक्ष्म वित्त, मर्यादित विवेकवाद, JAPAL चे दारिद्र्य कपातीमधील योगदान, महिला सक्षमीकरण आणि आर्थिक विकास, शैक्षणिक कार्यक्रम आणि विकसनशील देश, विकास आणि दारिद्र्य निर्मूलन, बिकट परिस्थितीसाठी उत्तम अर्थशास्त्र, गरिबीचे अर्थकरण या विविध पैलूंच्या अनुषंगाने शोधनिबंध लेखकांना २०१९ च्या नोबेल पारितोषिक विजेत्याच्या संशोधनावर प्रकाश टाकता येतो. अंगस रेटन आणि अभिजीत बॅनर्जी यांच्या दारिद्र्य दृष्टिकोन याची देखील तुलना करता येईल. या अनुषंगाने शोधनिबंध लेखक पेपर लिहू शकतात.

लिलाव सिद्धांत व नव्याने विकसित केलेल्या लिलाव प्रारूपाला २०२० चे नोबेल पारितोषिक बहाल करण्यात आले. लिलाव सिद्धांत व प्रारूपाची मांडणी पॉल आर. मिलग्रोम आणि रॉबट वि. विल्यम यांनी केली आहे. या दोन्ही अर्थशास्त्रज्ञांनी वस्तू आणि सेवांच्या लिलावाच्या प्रारूपाची नव्याने रचना तयार करण्यात आली. उच्चतम लिलाव किंमत आणि समाजहित यांच्या परस्परसंबंधातून नवीन लिलाव प्रारूपे विकसित करण्यात आली. मिलग्रोम आणि विल्यम यांचे लिलाव सिद्धांत व प्रारूपामधील योगदान, परिपूर्ण लिलाव पद्धती, लिलावाचे विविध प्रकार व त्यांचे उपयोजन, नवीन लिलाव पद्धती, बहुविध लिलाव व संयोग घड्याळ प्रारूपाची तुलना व साम्य, कार्यप्रवृत्त लिलाव, स्पेक्ट्रम लिलाव, वीज लिलाव, उत्पादक मिश्र लिलाव, लिलाव अंमलबजावणीतील समस्या या विविध पैलूंच्या आधारे २०२० च्या नोबेल पारितोषिक विजेत्यांच्या संशोधनावर आधारित पेपर शोधनिबंध लेखकांना लिहिता येतो.

श्रम अर्थशास्त्र व कार्यकारण संबंध याकरिता २०२१ च्या नोबेल पारितोषिकाने गौरविण्यात आले. श्रम बाजारातील अनुभवनिष्ठ योगदान व कार्यकारण संबंधाचे विश्लेषण यामधून पारितोषिक विजेत्यांनी कार्यपद्धती विकसित केली आहे. याकरिता डेव्हिड कार्ड, जोशुआ एग्रिस्ट आणि गाइडो इम्बेन्स यांना नोबेल पारितोषिक बहाल करण्यात आले आहे.

समाजासाठी महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याकरिता नैसर्गिक प्रयोगाची मदत झालेली आहे. यामुळे श्रमबाजाराचे नवीन अंतरंग स्पष्ट झालेले आहे.

२०२१च्या नोबेल पारितोषिक विजेत्यांचे श्रम बाजार व कार्यकारण संबंधामधील योगदान, नैसर्गिक प्रयोग, श्रमबाजारातील समजूती, श्रमबाजाराची नवचौकट किमान वेतनासह श्रमबाजार, प्रादेशिक विविधता आणि वेतनदर, श्रमिक संघटनाचे वेतनावरील परिणाम, स्थानिक श्रमबाजार आणि उच्चत्तम स्थलांतरण, श्रमिक स्थलांतरण आणि असमानता या विविध पैलूंच्या अनुषंगाने डेव्हिड कार्ड, जोशुआ एग्रिस्ट आणि गाईडो इमेन्स यांच्या संशोधनावर शोधनिबंध लेखकांना आपला शोधनिबंध लिहिता येईल.

वित्तीय अरिष्टामध्ये अधिकोषाची भूमिका याकरिता २०२२ चे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक बेन बर्नाकी, डगलस डायमंड आणि फिलीप दयबविंग यांना प्रदान करण्यात आले. यांच्या संशोधनाचे प्रायोगिक महत्त्व नियंत्रित वित्तीय बाजार आणि वित्तीय अरिष्टाला आळा घालण्याच्या धोरणात्मक निर्णयामध्ये आहे. बँक क्षेत्रातील घसरण व अरिष्ट, असुरक्षितता व अफवा, अरिष्ट आणि धोरणात्मक प्रतिसाद, जागतिक वित्तीय अरिष्ट व अर्थव्यवस्थांना बसणारे धक्के, वित्तीय अरिष्ट आणि धोरणात्मक उपाय, कोविड १९ आणि अरिष्ट, दिवाळखोरी, तरलता आणि घसरण, महामंदीचे समष्टी आर्थिक विश्लेषण, वित्तीय अरिष्टांचे अमौद्रिक परिणाम, ऋण बाजार या विविध आयामाच्या अनुषंगाने २०२२ च्या नोबेल पारितोषिक विजेत्यांच्या संशोधनावर शोधनिबंध लिहिता येतो.

क्लाऊडिया गोल्डीन यांना २०२३ चे अर्थशास्त्राचे नोबल पारितोषिक प्राप्त झाले. क्लाऊडिया गोल्डिन यांच्या संशोधनामुळे स्त्री श्रमबाजाराचे परिणाम समजून घेण्यामध्ये पुढारलेपण आलेले आहे. त्यांनी श्रमबाजारातील लिंग भिन्नतेचे न उलगडलेले विविध आयाम स्पष्ट करून दाखविले आहे. स्त्री श्रमिक आणि श्रमबाजार, स्त्री श्रमिकाच्या आकृतीबंध, स्त्री श्रम बाजाराचा U आकाराचा वक्र, गर्भनिरोधक गोळ्या आणि श्रम बाजारावरील परिणाम, स्त्री श्रमबाजारातील उत्पन्न तफावत, पालकत्वाचा प्रभाव, स्त्री श्रमबाजाराचे वास्तव व लिंग तफावत, विवाहित स्त्री श्रमबाजाराचे वास्तव, बदलता स्त्री श्रमबाजार व रोजगार या विविध पैलूंच्या अनुषंगाने शोधनिबंध लेखकांना क्लाऊडिया गोल्डिन यांच्या संशोधनावर शोधनिबंध लिहिता येतो.

२०१५ पासून अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक विजेत्यांनी अर्थशास्त्राच्या विविध शाखांमध्ये योगदान देऊन अर्थशाखाला समृद्ध केले आहे. या नोबेल पारितोषिक विजेत्यांच्या संशोधनामुळे अनुभवनिष्ठ संशोधनाचे अर्थशास्त्रामधील प्राबल्य वाढले आहे. यामुळे नोबेल पारितोषिक विजेते अर्थशास्त्राला वेगळ्या उंचीवर घेऊन गेले आहे.

◆

## निवेदन - अर्थसंवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांना आवाहन करण्यात येते की, अर्थसंवादमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या लेखांवर आपण ५० ते १०० शब्दांची आपली प्रतिक्रिया संपादकांकडे पाठवावी. याबरोबरच आपण अर्थशास्त्रीय विनोदी चुटकुले तसेच अर्थशास्त्रीय प्रबोधनात्मक लहान गोष्टी देखील पाठवू शकता. निवडक योग्य प्रतिक्रिया, अर्थशास्त्रीय विनोदांना व प्रबोधनात्मक अर्थशास्त्रीय गोष्टींना अर्थसंवाद मधून प्रसिद्धी देण्यात येईल.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# महाराष्ट्रातील शैक्षणिक व आरोग्यविषयक धोरणांचा आर्थिक अभ्यास

**सुभाष सावंत** [†]

१. महाराष्ट्रातील विविध शैक्षणिक व आरोग्यविषयक धोरणांचा आर्थिक अभ्यास आणि त्यांचा राज्याच्या विकासावर काय परिणाम झाला आहे, याचे विवेचन या शीर्षकाखाली अपेक्षित आहे. शिक्षण आणि आरोग्य हे देशाच्या सर्वांगीण विकासाचे दोन महत्त्वाचे घटक आहेत. शिक्षित आणि आरोग्यदायी निरोगी लोकसंख्या ही देशाच्या विकासासाठी अत्यावश्यक आहे. शिक्षण हे देशाच्या आर्थिक विकासाचा आधार आहे. शिक्षण हे नवनवीन संशोधनास आणि उत्पादकतेत सुधारणा करण्यास मदत करते. निरोगी लोकसंख्या ही श्रमबाजारातील सहभाग आणि उत्पादकता वाढते आणि आर्थिक विकासात सुधारणा करते. थोडक्यात, शिक्षण आणि आरोग्यातील गुंतवणूक देशाला विकसित करण्यास मदत करते. नोबेल स्मृती पारितोषिक प्राप्त अर्थशास्त्रज्ञा क्लॉडिया गोल्डिन यांच्या मते, शैक्षणिक गुंतवणूक ही लोकांची उत्पादकता आणि त्यांच्यातील कौशल्य वाढवते. ज्याचा सकारात्मक परिणाम आर्थिक विकासावर होतो. उत्तम शैक्षणिक आणि आरोग्य सुविधा हे नेहमीच कुठल्याही देशाच्या किंवा राज्याच्या प्रगतीस प्रोत्साहित करतात. चांगल्या शैक्षणिक सुविधांमुळे कुटुंब, समाज आणि देश यांची वर्धित दिशेने प्रगती होत असते. शिक्षण आणि आरोग्य यांचा आर्थिक विकासाशी सकारात्मक संबंध आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याच्या विकासातील शिक्षण आणि आरोग्य यांची भूमिका याचा अभ्यास करता येईल.

२. जागतिक बँक प्रतिवर्षी मानव भांडवल निर्देशांक (Human Capital Index- HCI) प्रसिद्ध करत असते. मानव भांडवल निर्देशांक हे आज जन्माला आलेले मूल अठरा वर्षांचे झाल्यावर किती मानवी भांडवल प्राप्त करू शकते, याची मोजमाप करते. मानवी भांडवल निर्देशांक आज कामगारांना उपलब्ध असणाऱ्या आरोग्य आणि शैक्षणिक सुविधा कशा पद्धतीने पुढच्या पिढीच्या उत्पादकतेमध्ये सुधारणा करतात, याचे मोजमाप करते. या संदर्भात महाराष्ट्रातील मानव भांडवल निर्देशांकमधील आरोग्य आणि शिक्षणाचे योगदान याचा अभ्यास करता येईल.

३. शिक्षण आणि आरोग्य यावर प्रतिव्यक्ती किंवा प्रतिकुटुंब किती खर्च होतो, याचा तुलनात्मक

† प्राध्यापक व विभागप्रमुख, भोसला मिलिटरी कॉलेज, नाशिक
आजीव सभासद क्र. : १७०३, भ्रमणध्वनी : ७५८८६४९६८३, ई-मेल : subhash.sawant@bmc.bhonsala.in

अभ्यास करणारा शोधनिबंध सादर करता येईल. असा तुलनात्मक अभ्यास महाराष्ट्रातील विविध जिल्हे, विभाग आणि महाराष्ट्र -इतर राज्य असाही करता येईल. तसेच विविध उत्पन्न गट, सामाजिक गट आणि त्यांची शैक्षणिक पार्श्वभूमी यांच्यात तुलना करूनही करता येईल. अशा तुलनात्मक अभ्यासासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्रोतांचा आधार घेता येईल.

४. महाराष्ट्रातील शैक्षणिक व आरोग्य सुविधा याच्यावर परिणाम करणारे घटक कोणते आहेत, या विषयावर पूर्वी केलेल्या संशोधन याचा टीकात्मक अभ्यास करणे शक्य आहे.

५. शिक्षण आणि आरोग्य संबंधात महाराष्ट्राचे धोरण, धोरणांची उत्क्रांती, धोरणात झालेली विविध बदल आणि त्या धोरणाचे टीकात्मक मूल्यमापन असा अभ्यास करता येईल. याशिवाय शिक्षण आणि आरोग्य याबाबतच्या घटनात्मक तरतुदी, विविध कायदे, कायद्यात झालेले बदल आणि भविष्यात चांगल्या सुविधांसाठी कायद्यात करावे लागणारे बदल, या कायद्याची पार्श्वभूमी, त्याची गरज, परिणाम आणि त्यातील त्रुटी याचे विश्लेषण व मूल्यमापन यावर निबंध लिहिता येईल.

६. महाराष्ट्रातच नाही तर देशभरातच शिक्षण आणि आरोग्य यांबाबत मोठ्या प्रमाणात असमानता जाणवते. उदाहरणार्थ, शहरी आणि ग्रामीण, खाजगी आणि सार्वजनिक, गरीब आणि श्रीमंत इ. त्यामुळे अशा असमानतेची कारणे, त्याचे परिणाम आणि त्यावरील उपाययोजना सुचवणारा शोधनिबंध सादर करता येतील.

७. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण आणि आरोग्य या सुविधांमध्ये किती आणि कशा पद्धतीने गुंतवणूक अपेक्षित आहे, त्यातून किती रोजगार निर्माण होईल आणि भविष्यात त्याचा लोकांचे आरोग्य, ज्ञान, कौशल्य आणि विकास यावर काय परिणाम होईल, याचे विवेचन करणारा अभ्यास सादर करता येईल.

८. महाराष्ट्र हे विकासात अग्रेसर राज्य असले तरी महाराष्ट्रात आज आरोग्याच्या विविध समस्या जाणवतात. उदाहरणार्थ, कुपोषण, बाल मृत्यू, माता मृत्यू, साथीचे आजार, विविध मानसिक आजार इ. महाराष्ट्रातील आरोग्याच्या संदर्भात असणाऱ्या विविध किंवा विशिष्ट समस्या यांचा आढावा घेणारा अभ्यासही सादर करता येईल.

९. महाराष्ट्राच्या विविध आरोग्य योजना, तसेच महाराष्ट्रातील केंद्र पुरस्कृत विविध आरोग्य योजनेचा आढावा घेणारा शोधनिबंध मांडता येईल. उदाहरणार्थ, महात्मा फुले जन आरोग्य योजना, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, अंगणवाडी आणि पोषण योजना, जलजीवन मिशन, स्वास्थ्य पायाभूत सुविधा योजना, पोषण शक्ती निर्माण योजना, राष्ट्रीय स्वास्थ्य मिशन इ. यासाठी एखादी योजना घेऊन त्या योजनेवर झालेला आजपर्यंतचा खर्च, त्याचे लाभार्थी, त्या योजनेतील समस्या, भविष्यात करावे लागणारे अपेक्षित बदल, योजनेच्या अंमलबजावणीत खाजगी क्षेत्राची भूमिका, विविध योजनांमधील तुलना असा अभ्यास करता येईल.

१०. महाराष्ट्रातील राष्ट्रीय शिक्षण मिशन, सर्व शिक्षा अभियान, मोफत आणि सक्तीचे शिक्षण विधेयक २००८, नवीन शैक्षणिक धोरण २०२०, वंचित घटकांसाठी असणाऱ्या शैक्षणिक सुविधा, साखर शाळा, निवासी शाळा, निवासी हंगामी वसतिगृह, राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पांतर्गत शाळा, भटक्या-विमुक्त घटकांसाठीच्या शाळा, वसतिगृहांच्या सुविधा, अपंग, मूकबधिर आणि मतिमंद

यांच्यासाठीच्या शैक्षणिक सुविधा, आदिवासी शाळा, जिल्हा परिषद शाळा, मनपा शाळा, खाजगी शाळा, केंद्रीय शाळा इत्यादींचा आढावा घेणारा शोधनिबंध सादर करता येईल. यासारख्या योजनांवर झालेला खर्च, या योजनांचे लाभार्थी, योजनांचे गुणदोष आणि त्यांचे मूल्यमापन याचा आढावा घेऊन उपाययोजना सुचवता येतील.

११. डॉक्टर्स, परिचारिका (नर्स), पॅथॉलॉजी लॅब, रुग्णालय (हॉस्पिटल्स), रुग्णवाहिका इत्यादी आरोग्यसेवांची उपलब्धता, महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर या सेवांचा झालेला विस्तार आणि विकास कशा पद्धतीने झाला ते मांडता येईल. त्याच पद्धतीने शैक्षणिक क्षेत्रात झालेले विविध बदल, त्याचे टप्पे, विस्तार, मनुष्यबळाची उपलब्धता व त्यांची गुणवत्ता, इतर शैक्षणिक सुविधांची उपलब्धता, त्यांची वैशिष्ट्ये आणि समस्या याचे मूल्यमापन करणारा अभ्यास सादर करता येईल.

१२. शिक्षण आणि आरोग्य यासंबंधी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि महाराष्ट्र पातळीवरील विविध अहवाल अभ्यास प्रसिद्ध झालेले आहेत. त्या अहवालांचे मूल्यमापन व त्यांची परस्परांशी तुलना यासंबंधी अभ्यास होऊ शकतो. केंद्र आणि राज्य सरकारने शिक्षण आणि आरोग्य या संदर्भात नेमलेल्या विविध समित्यांचे मूल्यमापन याची चर्चा शोधनिबंधात होऊ शकते.

१३. शिक्षणाच्या विविध विद्याशाखा, विद्यार्थ्यांचा विविध विद्याशाखा प्रवेशाबाबतचा कल, शिक्षणाचे बाजारीकरण, महागडे शिक्षण, शिकवणी वर्गाचे वाढत चाललेले प्रस्थान आणि त्यातील अर्थकारण याची चर्चाही शोधनिबंधात होऊ शकते.

१४. महाराष्ट्र सरकारचा आरोग्य आणि शिक्षणावरील खर्च, शिक्षण आणि आरोग्य यामुळे लोकांच्या जीवनमानावर झालेला परिणाम, १९९१ मध्ये भारताने स्वीकारलेल्या नवीन आर्थिक धोरणामुळे शिक्षण आणि आरोग्य या दोन्ही क्षेत्रावर झालेलं परिणाम, शिक्षण आणि आरोग्यक्षेत्रातील खाजगीकरण आणि त्यातून आलेल्या विविध समस्या याचा अभ्यास करता येईल.

१५. तंत्रज्ञानात झालेल्या बदलाचा शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रावर परिणाम होत आहे. तंत्रज्ञानातील बदलाचा या सेवांच्या उपलब्धतेवर, गुणवत्तेवर झालेला परिणाम आणि त्यांचा लोकांच्या जीवनमानावर झालेला परिणाम याची चर्चा शोधनिबंधात मांडता येईल.

१६. शोधनिबंध सादर करताना प्रसिद्ध झालेले अहवाल व सांख्यिकीय माहिती, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय अहवाल, उपलब्ध असणारे दर्जेदार संदर्भ ग्रंथ यांसारख्या दुय्यम स्त्रोतांचा आधार घेता येईल. याशिवाय लाभार्थी व्यक्ती आणि संस्था यांच्याकडून माहिती संकलित करता येईल. शोधनिबंधाची मांडणी करताना आवश्यकतेप्रमाणे तक्ते, आलेख, आकृत्या आणि इतर सांख्यिकीय साधनांचा वापर करावा.

◆

वापरलेली नाहीत अशी यंत्रे भांडवल नाहीत.
चळवळ हा नफ्याचा घटक आहे.

**- कार्ल मार्क्स**

# भारतातील वित्तीय क्षेत्राच्या बदलत्या आकृतीबंधाचा अभ्यास

**माधव एच. शिंदे** †

**प्रस्तावना:**

देशाच्या आर्थिक विकासामध्ये वित्तीय व्यवस्थेची भूमिका मूलभूत स्वरुपाची राहिलेली आहे. वित्तीय व्यवस्थेमध्ये विनिमय साधने आणि मौद्रिक संसाधनांचा समावेश होतो. त्यादृष्टीने पैसा, कर्ज आणि वित्त या घटकांचा समावेश असलेली व्यवस्था म्हणजे वित्तीय व्यवस्था होय. अर्थव्यवस्थेतील वेगवेगळ्या घटकांना सातत्याने या तिन्ही घटकांची आवश्यकता भासत असते. ती आवश्यकता पूर्ण करण्याचे काम वित्तीय व्यवस्थेद्वारे केले जाते. वित्ताचा विचार करता, यामध्ये औद्योगिक वित्त, कृषी वित्त, विकास वित्त, सरकारी वित्त यांचा समावेश होतो. अर्थव्यवस्थेतील अशा वेगवेगळ्या क्षेत्रांची वित्ताची गरज वित्तीय व्यवस्थेद्वारे पूर्ण केली जाते. मुळात, वित्त हा उत्पादन प्रक्रियेतील मूलभूत घटक आहे. आर्थिक विकास आणि वित्त यांतील सहसंबंध दर्शविणारे उत्पादन फलन अनेक अभ्यासकांनी मांडले असून त्याद्वारे कामगार, कच्चा माल आणि पैसा हे उत्पादन प्रक्रियेतील मुलभूत घटक असल्याचे स्पष्ट झाले आहे. पैशाच्या आधारे मानवी भांडवल व भौतिक भांडवल प्राप्त करणे आणि विकसित करणे शक्य होते. त्यामुळे आर्थिक विकासाला गती मिळत असल्याने वित्तीय व्यवस्थेतील पैसा, कर्ज आणि वित्त यांना आर्थिक विकासाचे इंधन मानले जाते. देशातील वित्तीय व्यवस्था अधिक विकसित असतील तर तांत्रिक प्रगती, भांडवल संचयन आणि बाजारपेठ यांना चालना मिळून आर्थिक विकासाला गती मिळण्यास मदत होते. अशा प्रकारे वित्तीय व्यवस्थेचे आर्थिक विकासातील स्थान स्पष्ट करणारे सैद्धांतिक विश्लेषण मोठ्या प्रमाणात झाले आहे. प्रथम बचत सिद्धांत, पतनिर्मिती सिद्धांत, वित्तीय नियंत्रण सिद्धांत, वित्तीय उदारीकरण सिद्धांत यांसारख्या विविध सिद्धांतामधून वित्ताचे आर्थिक विकासातील स्थान अधोरेखित होताना दिसते.

वास्तविकत:, वित्तीय व्यवस्थेमध्ये विशेषीकृत आणि अविशेषीकृत वित्तीय संस्था, संघटित आणि असंघटित वित्तीय बाजारपेठा, वित्तीय साधने आणि निधीचे हस्तांतरण करणाऱ्या सेवांचा समावेश होतो. यापैकी वित्तीय संस्थांचे बँकिंग व बिगर बँकिंग, मध्यस्त व बिगर मध्यस्त वित्तीय संस्था असे तर वित्तीय बाजारपेठांचे प्राथमिक व दुय्यम वित्तीय बाजार तसेच पैसा व भांडवली बाजार असे वर्गीकरण केले जाते. वित्तीय साधनांमध्ये सरकार, लोक आणि संस्था यांच्या ठेवी, रोखे, भागभांडवल, इ. रूपात साठवलेली मत्ता

† सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर.
आजीव सभासद क्र. : १४३२, भ्रमणध्वनी : , ई-मेल :

यांचा समावेश होतो. अशा या वित्तीय व्यवस्थेमुळे देशातील उत्पादन प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या गुंतवणूक निधीची उपलब्धता होऊन विविध क्षेत्रांतील उत्पादन प्रक्रियेला गती मिळण्यास मदत होते. देशाचा आर्थिक विकास वेगाने होतो. जागतिक पातळीवर आर्थिक घडामोडींचा वेग जसजसा वाढत गेला तशी वित्तीय व्यवस्थेची व्यापकता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. दरम्यान, वित्तीय व्यवस्थेसंदर्भातील नियम, कायदे आणि धोरणे यामध्ये काळानुरूप बदल झाले आहेत. वेळेची निकड लक्षात घेऊन त्यामध्ये वेळोवेळी सुधारणादेखील करण्यात आलेल्या आहेत.

पार्श्वभूमी: वित्तीय व्यवस्थेला जागतिक पातळीवर आणि भारतातही मोठा इतिहास लाभलेला आहे. प्राचीन काळापासून लोक आपल्या गरजा भागविण्यासाठी मौद्रिक व्यवहार करीत आलेले आहेत. भारत, चीन, ग्रीक यांसारख्या प्राचीन संस्कृती असलेल्या प्रदेशांमध्ये अशा व्यवहारांच्या नोंदी आढळून येतात. काळाच्या ओघात उत्पादन, व्यापार, बाजारपेठा, रोजगार यांमध्ये झालेल्या आमूलाग्र बदलांमुळे वित्तीय व्यवस्थेतही बदल होत आले आहेत. विनिमयाची साधने, चलनाचे स्वरूप वेगाने बदलले आहे. मोहरा, धातुरूपी नाणी, सुवर्णमान ते कागदी नोटा असा चलन व्यवस्थेचा प्रवास झाल्याचे पाहायला मिळते. दुसरीकडे, चलनव्यवस्थेबरोबरच, कर्ज आणि वित्ताचे स्वरूपही बदलताना पाहायला मिळते. मध्ययुगीन कालखंडात भारतामध्ये वित्तीय संस्थांच्या स्थापनेला सुरुवात झाल्यामुळे वित्तीय व्यवहारांना संस्थात्मक रूप मिळाले. उत्पादन व्यवस्थेला मिळणारी गती आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये होणाऱ्या वाढीबरोबर वित्तीय व्यवहारांमध्ये झालेल्या वाढीमुळे वित्तीय संस्थांच्या प्रसाराला गती मिळून बँकिंग, बिगर बँकिंग संस्थांबरोबरच पैसा बाजार, भांडवल बाजारातील संस्थांच्या संख्येत मोठी वाढ झाली. तर उत्पादन, व्यापार आणि मानवी जीवनातील वाढत्या जोखमींना सामावून घेणाऱ्या विमा संस्थांचा उदय होऊन मोठ्या प्रमाणात विस्तार झाल्याचे पाहायला मिळते. दरम्यान, जगभरातील वित्तीय व्यवहार जसे वाढत गेले तसे भारतातील वित्तीय व्यवहारांमध्येही लक्षणीय प्रमाणात वाढ होत गेल्याने वित्तीय व्यवस्था आणि वित्तीय साधनांचे स्वरूप आणि रचनेत आमूलाग्र बदल झाल्याचे दिसून येते. निधीची वाढती मागणी आणि पुरवठा करणाऱ्या पैसा बाजार आणि भांडवली बाजारांच्या कार्याची व्यापकता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. देशातील वित्तीय व्यवस्थेमध्ये काळानुरूप सुधारणाही करण्यासाठी वेगवेगळ्या समित्या आणि आयोगांची स्थापनाही झालेली पाहायला मिळते. अशा प्रकारे वित्तीय व्यवस्थेमध्ये झालेल्या बदलांचा आर्थिक विकासाच्या परिप्रेक्ष्यातून आढावा घेणे आवश्यक आहे.

**वित्तीय व्यवस्थेचे घटक आणि कार्ये:**

वित्तीय व्यवस्थेमध्ये प्रामुख्याने पैसा, वित्तीय बाजार, वित्तीय संस्था, वित्तीय साधने, वित्तीय मत्ता, वित्तीय सेवा, देयक व्यवस्था, परकीय चलन बाजार, विमा यांसारख्या घटकांचा समावेश होतो. देशातील आर्थिक व्यवहारांच्या आवश्यकतेनुसार निधीची मागणी आणि पुरवठा करणाऱ्या वित्तीय व्यवस्थेतील या घटकांमध्ये काळाच्या ओघात झालेल्या आणि होत असलेल्या बदलांचा आढावा घेणे आर्थिक विकासाच्यादृष्टीने गरजेचे असते. या वित्तीय व्यवस्थेची आर्थिक विकासातील भूमिका अतिशय मूलभूत स्वरूपाची राहिली आहे. प्रामुख्याने अर्थव्यवस्थेच्या ज्या क्षेत्रामध्ये निधीचे आधिक्य असते त्या क्षेत्राकडून ज्या क्षेत्राला तुटवडा जाणवतो त्या क्षेत्राकडे निधी प्रवाहित करणे हे वित्तीय व्यवस्थेचे प्रमुख कार्य आहे. हे कार्य पार पाडत असताना वित्तीय व्यवस्था १) माहिती आणि व्यवहार खर्चात घट करण्याचे आणि २) व्यापार, विविधीकरण आणि जोखमीचे व्यवस्थापन करण्याचे कार्यदेखील पार पाडत असते. वित्तीय

व्यवस्थेतील वेगवेगळ्या घटकांची चर्चा पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे.

**पैसा :** भारताच्या वित्तीय व्यवस्थेचा प्रमुख घटक असलेल्या पैसा या घटकांस प्राचीन इतिहास लाभलेला आहे. मौर्य काळापासून, ते मुघल, मराठा आणि ब्रिटिश साम्राज्यातील चलनव्यवस्थेची तत्कालीन आर्थिक व्यवहारांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका राहिलेली आहे. काळाच्या ओघात या चलनव्यवस्थेचे स्वरूप बदलत आलेले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील ब्रिटिश सत्तेतील भारतीय कौन्सिल विधेयक, फावलर समिती याद्वारे करण्यात आलेल्या सुधारणा आणि स्वातंत्र्योत्तर काळात झालेले बदल आणि अगदी अलीकडे अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे विकसित होत असलेले आभासी वा डिजिटल चलन यामुळे पैशाचे बदलते स्वरूप, पैशाची मागणी व पुरवठा यातील बदल आणि त्यांचे अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम आणि एकूणच भारतातील वित्तीय व्यवस्थेच्या विकासाला मिळत असलेली गती यांचा शास्त्रोक्त ऊहापोह होणे अपेक्षित आहे.

**वित्तीय बाजार :** वित्तीय बाजारपेठ हा वित्तीय व्यवस्थेचा अविभाज्य भाग असून यामध्ये पैसा बाजार आणि भांडवली बाजाराचा समावेश होतो. पैसा बाजारामध्ये पैशाच्या देवाण-घेवाणीचे अल्पकालीन तर भांडवली बाजारामध्ये दीर्घकालीन वित्तीय व्यवहार होतात. भारतामध्ये पैसा बाजार आणि भांडवली बाजाराचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाला असून त्याचा देशातील बचत, गुंतवणूक, उत्पादन, रोजगार निर्मिती आणि एकूणच आर्थिक विकासावर सकारात्मक परिणाम झाल्याचे पाहायला मिळते. त्यादृष्टीने देशातील वित्तीय बाजाराचे स्वरूप, उलाढालीची प्रवृत्ती, वित्तीय बाजाराची साधने आणि त्यांचे योग्य नियंत्रण आणि व्यवस्थापन करण्यासाठी स्थापन झालेल्या विविध संस्थांची भूमिका आणि काळाच्या ओघात त्यामध्ये झालेले बदल अधोरेखित होणे आवश्यक आहे.

**बँकिंग आणि बिगर बँकिंग संस्था :** देशाच्या आर्थिक विकासात बँकिंग तसेच बिगर-बँकिंग संस्थांची भूमिका अत्यंत मोलाची राहिलेली आहे. भारतामध्ये १८ व्या शतकापासून बँकिंग संस्थांच्या स्थापनेस सुरुवात होऊन वित्त व्यवस्थेला संस्थात्मक स्वरूप निर्माण होण्यास प्रारंभ झाला. प्रारंभी खाजगी स्वरूपाचा असलेला हा व्यवसाय सरकारी पातळीवरही सुरू झाला. त्यानंतर सहकारी स्वरूपाच्या बँकिंग व्यवस्थेची निर्मिती होऊन देशात बळकट बँकिंग रचनेचा पाया रोवला गेला. तीन प्रेसिडेन्सी बँकांचे एकत्रीकरण करून भारतीय स्टेट बँकेची स्थापना, रिजर्व्ह बँकेची स्थापना असो वा १९६९ आणि १९८० झालेले बँकांचे राष्ट्रीयीकरण असो वा १९९१ नंतर खाजगी आणि विदेशी बँकांच्या प्रसाराला मिळालेली गती असो, यामुळे देशातील बँकिंग व्यवस्थेच्या विकासात भर पडली हे नक्की. आज देशात सूचित आणि अनुसूचित या प्रकारांमध्ये देशातील बँकिंग संस्थांची विभागणी झालेली आहे. त्यापैकी सूचित बँकांमध्ये व्यापारी, सहकारी आणि प्रादेशिक ग्रामीण बँका यांचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाल्याचे पाहायला मिळते. यामध्ये आजघडीला देशात ९१ व्यापारी बँका, ३१ राज्य सहकारी बँका आणि प्रत्येक राज्यांमध्ये जिल्हा सहकारी, ग्रामीण पतसंस्था, नागरी सहकारी बँका यांचे मोठे जाळे पसरले आहे. तसेच देशामध्ये जवळपास ४३ प्रादेशिक ग्रामीण बँका कार्यरत आहेत. काळाच्या ओघात या बँकांचा ग्राहक वर्ग, ठेवी, कर्ज आणि इतर वित्तीय व्यवहारांच्या उलाढालीत मोठी वाढ झाली आहे. अलीकडे नवनवीन तंत्रज्ञानाच्या शोधांमुळे बँकिंग संस्थांच्या ग्राहक वर्गात आणि व्यवहारात मोठी वाढ होऊनही कामकाजात सुलभता निर्माण होण्यास मदत होत आहे. डिजिटल बँकिंग संकल्पनेमुळे बँकांच्या कामकाजात आमूलाग्र बदल होत असल्याचे पाहायला मिळते. दुसरीकडे, बँकिंग व्यवस्थेच्या व्यवहारांचा वाढता आवाका लक्षात घेता, बँकेतर वित्तीय संस्थांच्या

स्थापनेला सुरुवात झाली. सन १९६४ नंतर देशामध्ये बिगर बँकिंग संस्थांच्या स्थापनेला सुरुवात झाली. आज या बिगर-बँकिंग वित्तीय संस्थांचे मोठे जाळे देशभर पसरले असून वित्तीय व्यवस्थेला बळकट करण्याचे कार्य त्या माध्यमातून सुरू असल्याचे पाहायला मिळते. २०२३ या वित्तीय वर्षाच्या शेवटपर्यंत देशात जवळपास ९४८० एवढ्या बिगर-बँकिंग वित्तीय संस्था कार्यरत असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. तसेच अलीकडील काळात देशात लघु बँका, देयक बँकांच्या स्थापनेलाही सुरुवात झालेली आहे. त्यामाध्यमातून बँकिंग क्षेत्राला बळकटी देण्याचा प्रयत्न असल्याचे म्हणता येईल. मात्र या सर्व प्रयत्नांमुळे आर्थिक विकास प्रक्रियेला चालना मिळते की नाही, हे वेळोवेळी अभ्यासणे आवश्यक असते. त्यादृष्टीने देशात वाढत जाणाऱ्या बँकिंग आणि बिगर-बँकिंग संस्थांच्या आर्थिक विकास प्रक्रियेतील भूमिकेची विस्तृत चर्चा होणे अपेक्षित आहे.

**वित्तीय साधने** : वित्तीय व्यवहार पूर्ण करण्यासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या विविध वित्तीय साधनांमध्ये रोख रक्कम, राजकोषीय पत्रे, समभाग, रोखे, ऋणपत्रे, परकीय विनिमय बाजार साधने, विमा यांसारख्या विविध साधनांचा समावेश होतो. या साधनांचा वाढता उपयोग, त्यांचे नियमन करण्यासाठी विविध संस्थांची झालेली निर्मिती, काळाच्या ओघात त्यामध्ये झालेले बदल आणि त्यामुळे वित्तीय व्यवहारांना मिळणारी चालना तसेच देशाची आर्थिक विकास प्रक्रिया, रोजगारनिर्मिती, बचत, गुंतवणूक, उत्पन्न, बाजारपेठ, वस्तूंच्या किमती यावर या साधनांच्या होणाऱ्या परिणामांचा संशोधनात्मक आढावा घेणे गरजेचे आहे. अलीकडील काळात वित्तीय व्यवस्थेमध्ये जागतिक पातळीवर वेगाने होत असलेल्या बदलांचा भारतीय वित्तीय व्यवस्थेवर होणारा परिणाम, वित्तीय साधनांचा वाढता वापर आणि त्याला आधुनिक तंत्रज्ञानाची मिळालेली जोड यामुळे देशातील उत्पादनप्रक्रियेबरोबरच, रोजगारनिर्मिती, बचत, गुंतवणूक, उपभोग यावर होणाऱ्या दूरगामी परिणामांचा संशोधनात्मक ऊहापोह होणे गरजेचे आहे.

**वित्तीय सेवा** : वित्तीय सेवांचा विचार करता, यामध्ये बँकिंग आणि बिगर बँकिंग सेवांबरोबरच म्युच्युअल फंड, शेअर बाजार, विमा, निधी हस्तांतरण, यांसारख्या विविध वित्तीय सेवांचा समावेश होतो. यापैकी विमा सेवांसारख्या सेवांचे उत्पादन, वाहतूक, साठवणूक आणि विविध सेवांच्या प्रक्रियेत महत्त्वाचे स्थान राहिले आहे. भारतामध्ये आजघडीला विमा सेवांचे मोठे जाळे पसरले असून जीवन विमा आणि साधारण विमा व्यवसायात जवळपास ५७ विमा संस्था कार्यरत आहेत. या संस्थांमुळे देशात मोठी गुंतवणूक झालेली असून, हजारो रोजगार संधींची निर्मिती झालेली आहे. भारतात अशा वित्तीय सेवांचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाल्याचे दिसून येते. त्या माध्यमातून देशात गुंतवणूक, उत्पादन आणि रोजगारनिर्मितीला पाठबळ मिळत असून, आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत अशा वित्तीय सेवांची मागणी वाढत जाऊन उलाढालीचे स्वरूपही वेगाने बदलत आहे. तीच बाब म्युच्युअल फंड्स वा शेअर बाजार आणि इतरही वित्तीय सेवांच्याबाबतीत घडताना दिसून येते. आज देशात वित्तीय सेवा पुरविणाऱ्या अनेक वित्तीय संस्था कार्यरत आहेत. अशा संस्थाच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा आर्थिक विकासातील सहभाग आणि भूमिका वेळोवेळी तपासून पाहाणे आवश्यक आहे.

**आंतरराष्ट्रीय वित्त संस्थांचा प्रभाव** : जागतिक पातळीवर वित्तीय व्यवस्थेचे जाळे निर्माण झालेले असून त्याचे नियंत्रण आणि नियमन करणाऱ्या विविध संस्थादेखील स्थापन झाल्या आहेत. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक याबरोबरच, आंतरराष्ट्रीय पातळीवरील बँकांचे नियंत्रण आणि नियमन करणारी BASEL नियमावली असो वा वित्तीय व्यवहार सुरळीत पार पाडण्यासाठी निर्माण केलेली SWIFT सारखी प्रणाली असो यांचा वेगवेगळ्या देशांतील वित्तीय

व्यवस्था आणि व्यवहारांवर नेहमीच प्रभाव राहिलेला आहे. भारताच्या वित्तीय व्यवस्थेवर अशा आंतरराष्ट्रीय संस्था आणि कायदे आणि करारांचा असलेला प्रभाव वेळोवेळी अभ्यासणे गरजेचे असते.

**धोरणात्मक पाठबळ :** देशातील वित्तीय व्यवस्थेवर नियंत्रण ठेवणाऱ्या वेगवेगळ्या संस्था कार्यरत असून, या संस्थांवर अंतिम नियंत्रण हे सरकारचे राहाते. त्यामुळे सरकार आणि नियंत्रण ठेवणाऱ्या संस्थांनी वेळोवेळी स्वीकारलेल्या धोरणांचा वित्तीय व्यवस्थेच्या कार्यपद्धतीवर परिणाम होत असतो. सरकारी पातळीवर राबविण्यात येणारे राजकोषीय आणि मौद्रिक सत्तेच्या पातळीवर राबविण्यात येणाऱ्या मौद्रिक धोरणांचा देशातील वित्तीय व्यवस्थेवर प्रभाव असतो. काळाच्या ओघात या धोरणांचे स्वरूपही बदलताना दिसून येते. त्यामुळे या धोरणांचा तसेच, संस्थात्मक पातळीवर वेळोवेळी स्वीकारण्यात आलेल्या विविध उपाययोजनांचीही सखोल चर्चा घडून येणे अपेक्षित आहे.

एकंदरीतच, वित्तीय व्यवस्था ही देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानली जाते. देशातील वित्तीय व्यवस्था जेवढी बळकट असेल तेवढी आर्थिक विकासाची गती अधिक राहाण्याची संभाव्यता असते. भारताच्या आर्थिक विकासामध्ये देशातील वित्तीय व्यवस्थेची भूमिका अत्यंत मूलभूत स्वरूपाची राहिलेली आहे. काळाच्या ओघात या वित्तीय व्यवस्थेमध्ये महत्त्वपूर्ण बदल होऊन देशातील वित्तीय व्यवस्थेचा आकृतीबंध बदलताना पाहायला मिळतो. या बदलत्या आकृतीबंधाचे देशातील उत्पादन, रोजगार, बचत, गुंतवणूक, उपभोग, इ.वर अनुकूल वा प्रतिकूल परिणाम होतात, हे स्पष्ट आहे. त्यादृष्टीने वित्तीय व्यवस्थेच्या बदलत्या आकृतीबंधाचे देशाच्या अर्थव्यवस्थेवर होत असलेल्या विविधांगी परिणामांची सखोल अशी संशोधनात्मक चर्चा होणे आवश्यक आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या येत्या अधिवेशनामध्ये देशातील वित्तीय व्यवस्थेच्या अशा वेगवेगळ्या पैलूंवर विस्तृत स्वरूपात शास्त्रोक्त व संशोधनात्मक चर्चा व्हावी, एवढीच अपेक्षा. त्यादृष्टीने आवश्यक असणारी संभाव्य साहित्यसामुग्री व आकडेवारी पुढील स्त्रोतांमधून उपलब्ध होऊ शकेल.


1) Ambedkar, B.R., History of Indian Currency and Banking, Nation Press New Delhi.
2) Bhole L.M., Mahakud Jitendra, (2011), Financial Institutions and Markets; Structure, Growth and Innovations, Tata McGraw Hill Education Pvt. Ltd. New Delhi.
3) Gaurav Datt, Mahajan Ashwani, (2014), Indian Economy (69th Ed.), S. Chand & Company Pvt. Ltd. New Delhi.
4) Pathak Bharati, (2024), Indian Financial System, Pearson Education India, Chennai.
5) Siddhartha Sankar Saha, (2020), Indian Financial System: Financial Markets, Institutions and Services, McGraw Hill Education Pvt. Ltd. New Delhi.
6) RBI (2023), Handbook of Statistics on Indian Economy, Govt of India.
7) Indian Economic Survey, Ministry of Finance, Govt. of India.
8) Artha Vijnana, Gokhale Institute of Economics and Politics, Pune.
9) Arthamimansa, Vidarbha Arthashastra Parishad, Nagpur.
10) Arthasanwad, Marathi Arthashastra Parishad, Maharashtra.
11) Economic and Political Weekly, Mumbai.
12) Indian Economic Review, Delhi School of Economics, New Delhi.
13) International Journal of Banking, Risk and Insurance, Publishing India

Group.
14) International Journal of Financial Markets and Derivatives, Inderscience Publishers.
15) https://irdai.gov.in/evolution-of-insurance
16) https://www.rbi.org.in/scripts/FS_Overview.aspx?fn=6
17) https://mospi.gov.in/107-money-market
18) https://www.capitalmarket.com/
19) https://www.nabard.org/

◆

## ४७ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन, लातूर
## निबंध लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१) चर्चासत्रासाठी विषयाचे जे शीर्षक जाहीर केलेले असते तेच शीर्षक आपल्याही निबंधाला देणे आवश्यक नाही. त्याच्या अंतर्गत एखादा उप-विषय निवडून त्या अनुषंगाने योग्य असे शीर्षक आपणास देता येईल.

२) सामान्यपणे विषयाचा ऐतिहासिक आढावा घेण्यासाठी पूर्ण निबंधाचा उपयोग करू नये. त्यात अनेक वादग्रस्त मुद्द्यांचे विश्लेषण असल्यास आणि त्यातून नवीन अर्थ लावण्याचा प्रयत्न करणार असल्यासच विस्तृत आढावा घ्यावा.

३) जी माहिती एम.ए. पर्यंतच्या पाठ्यपुस्तकांमध्ये उपलब्ध असते तिचा संदर्भ म्हणून उपयोग करावा. परंतु त्या पातळीचे विश्लेषण असू नये. कारण ते सर्वांना माहीत असते. त्या माहितीतील सांख्यिकी संबंध शोधून त्यापलीकडे जाऊन विश्लेषणाचा प्रयत्न करणे योग्य राहील.

४) समाजाच्या आर्थिक जीवनाचा (राष्ट्रीय / प्रादेशिक आणि आवश्यकतेनुसार स्थानिक) सामाजिक सांस्कृतिक जीवनाशी येणारा संबंध, त्यात होणारे बदल आणि शासनाचे आर्थिक धोरण यावर निबंधात त्या-त्या विषयाच्या अनुषंगाने भर असावा.

५) निबंधात वेगवेगळ्या भागामध्ये जे संबंध आपण दर्शवितो आणि निष्कर्ष प्रस्थापित करतो त्यांच्यात अंतर्गत सुसंगती साधण्याचा प्रयत्न केला जावा.

६) निबंधात शक्यतो महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या 'अर्थशास्त्र परिभाषा कोश' आणि 'शासन व्यवहार कोश' यातील परिभाषेचा उपयोग करावा. त्यातील शब्दांचा अर्थ पटत नसल्यास इतर शब्दांचा उपयोग करावा. महत्त्वाच्या मराठी संज्ञांचे मूळ इंग्रजी शब्द कंसात द्यावेत.

७) निबंधातील आकडेवारीचे संदर्भ अचूक, सुस्पष्ट, परिपूर्ण आणि मान्य पद्धतीनुसार असणे आवश्यक आहे.

८) निबंधाची मांडणी केवळ सांख्यिकी माहितीचे संकलन करून वर्णन करणारी न ठेवता संशोधनात्मक पद्धतीची असावी. त्यामुळे निबंधाची पातळी उंचावेल. निबंध इतर भाषांतून केवळ भाषांतरित नसावेत.

९) निबंधाच्या शेवटी संदर्भ टीपा / संदर्भ सूची प्रमाणित पद्धतीने असावी.

१०) निबंधाच्या अखेरीस ३०० शब्दांत गोषवारा द्यावा.

## मराठी अर्थशास्त्र परिषद
## ४७ वे राष्ट्रीय अधिवेशन, लातूर
## शोधनिबंध लेखकांसाठी निवेदन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४७ वे वार्षिक अधिवेशन दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे नोव्हेंबर २०२४ च्या दरम्यान आयोजित केली जाणार आहे. या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान सातारा येथील प्रा. डॉ. अनिलकुमार वावरे हे भूषवतील. सदर अधिवेशनाचे स्थानिक कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. एस.पी. गायकवाड आणि स्थानिक–कार्यवाह डॉ. बालाजी घुटे (९८९००७९१८०) आहेत. परिषदेच्या चर्चासत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

१. २०१५ पासूनच्या अर्थशास्त्रातील नोबेल स्मृती पारितोषिक प्राप्त अर्थतज्ज्ञांचे आर्थिक विचार.

२. भारताच्या वित्तीय क्षेत्राच्या बदलत्या आकृतीबंधाचा अभ्यास.

३. महाराष्ट्रातील शैक्षणिक व आरोग्यविषयक धोरणांचा आर्थिक अभ्यास.

वरील तीन विषयाचे शोधनिबंध आपणास मा. अध्यक्षांकडे पाठवता येतील. चौथा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष अधिवेशनापूर्वी जाहीर करतील, त्या विषयावर सदस्यांकडून शोधनिबंध मागविले जात नाहीत. २० ऑक्टोबर, २०२४ ही निबंध स्वीकारण्याची अंतिम तारीख राहील. निबंध लेखकांनी आपले निबंध जास्तीत जास्त २००० शब्दांत मांडावयाचे असून निबंधासोबत ३०० शब्दांत त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. शोधनिबंध युनिकोड या फॉन्टमध्ये झरसशचरज्ञशी या सॉफ्टवेरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ १४ असावी. निबंधाची सॉफ्ट कॉपी (सीडी) व दोन हार्ड कॉपीज मा. अध्यक्षांकडे पाठवाव्यात. निबंध लेखक मराठी अर्थशास्त्र परिषदेचा आजीव सभासद असावा, निबंध मराठीत असावेत, ते पूर्वी कोठेही प्रकाशित केलेले नसावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी, महाविद्यालय / विद्यापीठाचे नाव व पत्ता हा सर्व तपशील मराठीत देणे आवश्यक आहे. निबंधलेखकांनी आपले निबंध पुढील पत्त्यावर पाठवावेत.

**प्रा. डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे**
प्राध्यापक, अर्थशास्त्र विभागप्रमुख, छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा.४१५००१
मो. ९८५०११७२२६ ई–मेल : dranilwavare@gmail.com, maparishad1977@gmail.com

**डॉ. मारोती तेगमपुरे**
कार्यवाह खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद,
मो. ९४२३९९३१३७

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

## मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

(यु.जी.सी. केअर लिस्ट (ग्रुप १) समावेशीत तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक)

**ISSN 0973-8452**



## जाहिरातीचे दर

| | कृष्णधवल (B/W) | रंगीत |
|---|---|---|
| १) समोरचे आतील पृष्ठ | रु. ५,०००/- | रु. ११,०००/- |
| २) मागील (आतील) पृष्ठ | रु. ५,०००/- | रु. ११,०००/- |
| ३) मागील शेवटचे पृष्ठ | रु. ६,०००/- | रु. १५,०००/- |

आपला मजकूर - डिझाईन (1/5 = 150 x 210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नावानेच काढावा. जाहिरात प्रसिद्ध होताच अर्थसंवादचा अंक आपणास मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद !



**अनिलकुमार कृ. वावरे**
अध्यक्ष
भ्रमणध्वनी : ९८५०११७२२६

**अविनाश रा. निकम**
कार्याध्यक्ष
भ्रमणध्वनी :९८२२६ ६५१४१

**मारोती वि. तेगमपुरे**
कार्यवाह खजिनदार
भ्रमणध्वनी : ९४२३९९३१३७

**राहुल शं. म्होपरे**
प्रमुख संपादक
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०


मूल्य : रु. १०/- (सभासदांकरिता विनामूल्य)

भारती मुद्रणालय, कोल्हापूर